
# रॉकफेलर





REFBK-0009834

विषय

सं. क्र.

# रॉकफेलर

## व्यक्ति आणि कर्तृत्व

दा. क्र. 8138

लेखक:

रेमंड बी. फॉस्डिक

अनुवादक:

माधव मनोहर

अनुक्रम ........ वि: ........

क्रमांक ........

REFBK-0009834

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य अडीच रुपये

Copyright, 1956, by Raymond B. Fosdick

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबअी ४

प्रकाशक :
**वि. ग. परचुरे**
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबअी ४

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ...
अनुक्रम 23288 विः ...
क्रमांक ... नों: दि ...

## ग्रंथकाराविषयीं

रेमंड बी. फॉस्डिक हा वृत्तीनें वकील. त्याचें जीवन अनेकविध असून नामांकित आहे. १९१६ सालीं युद्धमंत्र्याचा खास प्रतिनिधि या नात्यानें मेक्झिकन सीमा-रेषेवर त्यानें कामगिरी केलेली आहे. १९१९ सालीं जनरल पर्शिंगचा नागर मदतनीस म्हणून त्यानें फ्रान्समध्यें काम पाहिलें. १९१९ ते १९२० या काळांत लीग ऑफ नेशन्सचा अंडरसेक्रेटरी जनरल तो होता. १९३६ सालीं रॉकफेलर फाउंडेशनचा तो प्रेसिडेंट झाला. आणि १९४८ सालीं सेवानिवृत्त होईपर्यंत याच पदावर तो होता.

## ग्रंथाविषयीं

अगणित संपत्ति व अलौकिक मोठेपण यांच्या साहचर्यातून उद्भवणाऱ्या गूढ संकटांशीं ज्याला सतत मुकाबला करावा लागला, अशा एका थोर पुरुषाचें हें चरित्र आहे. सार्वजनिक कल्याणास वाहिलेल्या एका अर्पित जीवनाची ही कहाणी आहे. कोणत्या ना कोणत्या रीतीनें प्रत्येक अमेरिकन माणसाच्या जीविताशीं ज्या घटनांचा संबंध पोहोंचतो आणि तरी सुद्धां ज्यांचें अनामिक

कर्तृत्व व अमर्याद महत्त्व अद्यापि प्रायः अज्ञात आहे, अशा घटनांचा हा वृत्तांत आहे.

ल्हानपणीं धाकट्या रॉकफेलरला खर्चावयास दिलेल्या प्रत्येक पेनीचा जमाखर्च चोख ठेवावयास लागे. कठोर बॅप्टिस्ट धर्मपंथास अनुसरणाऱ्या त्याच्या माता-पितरांच्या घरांत पत्ते, नृत्य आणि नाटक असल्या निरुपद्रवी करमणुकीस सुद्धां मज्जाव होता. कॉलेजमध्यें गेल्यावर आणि तदनंतर यांपैकीं कित्येक आकुंचित बंधनांचा निश्चयपूर्वक त्यानें त्याग केला. पण त्याची धर्मनिष्ठा मात्र तशीच अप्रतिहत, अभंग राहिली. त्याचप्रमाणें अगणित संपत्तीसह अगणित जबाबदाऱ्या येतात आणि त्यांचें उत्तरदायित्व निष्ठापूर्वक मान्य करावयास हवें, ही परंपरागत कौटुंबिक शिकवण त्यानें सतत ध्यानांत बाळगली. एक पेनीचा सुद्धां गैरवाजवी उपयोग करणें हें पाप आहे, तेव्हां सार्वजनिक कल्याणापायीं स्वतःची संपत्ति वेंचणें हें एक आध्यात्मिक कर्तव्य होय. एका लोकविलक्षण प्रश्नास वाहिलेल्या जीविताची पूर्वतयारी त्यानें व्यासंगपूर्वक केली. स्वतःस प्राप्त झालेल्या अलौकिकपणास स्मरून लोककल्याणाच्या कार्यांत स्वतःची संपत्ति कशा रीतीनें कारणीं लावतां येईल, हा तो प्रश्न होय. रॉकफेलरनें प्रस्तुत प्रश्नाच्या संबंधांत जीं उत्तरें शोधलीं, त्यांमुळें अमेरिकेंतील दातृत्वाच्या आधुनिक योजना प्रस्थापित करण्यास मोठें साहाय्य केलें आहे.

लोककल्याणाचीं अनेकविध कामें रॉकफेलरनें हातीं घेतलीं. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील नीग्रो शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं त्यानें तनमनधन वेंचलें. सर्व जगभर शिक्षणाचा प्रचार व्हावा, एतदर्थ त्यानें जगभर शिक्षाकेंद्रें स्थापिलीं. लोकहिताच्या अनेक कल्पना कार्यान्वित करण्यासाठीं रॉकफेलर सेंटर व रॉकफेलर फाउंडेशन या संस्थांचें पाठबळ कारणीभूत झालें. कॅन्सरच्या संशोधन-उपचारासाठीं त्यानें अविश्रांत परिश्रम केले. स्वतःच्या देशांत विल्यम्सबर्ग नामक वसाहतकालीन वास्तूचें त्यानें पुनरुज्जीवन केलें. त्याचप्रमाणें फ्रान्समधील ऱ्हीम्स कॅथीड्रल व व्हर्साय आणि फांतेन ब्लो येथील पुरातन वास्तूंचा जीर्णोद्धार करण्यास त्यानें स्वेच्छेनें मदत देऊं केली. टोकियोंतील इंपीरिअल युनिव्हर्सिटीचें ग्रंथालय धरणीकंपांत जमीनदोस्त झालें. त्याची वास्तु उठविण्यासाठीं त्यानें अनाहूत दान दिलें. अमेरिकेंतील जगद्विख्यात सौंदर्यस्थळांचें दर्शन सर्व लोकांस सुलभ व्हावें, यासाठीं त्यानें अगणित संपत्ति वेंचिली. मालक व मजूर यांच्यांतील परस्परसंबंध उभयतांस सुखकर व्हावेत, म्हणून त्यानें जातीनें परिश्रम घेतले. अशीं किती म्हणून कार्यें

सांगावीत? त्या सर्व लोकहितवादी कार्यांचा इतिहास प्रस्तुत ग्रंथांत ग्रथित केलेला आहे.

रॉकफेलरच्या एक विश्वस्त सहकारी म्हणून फॉस्डिकनें अनेक वर्षें त्याच्या सहवासांत काम केलें आहे. रॉकफेलर घराण्यांतील सर्व पत्रव्यवहार चरित्रकारास उपलब्ध करून देण्यांत आला होता. आणि प्रस्तुत चरित्रांत या बहुमोल साधनांचा वापर मुक्तहस्तानें केलेला आढळेल. महान् संपत्तीचें आणि संपत्तिप्राप्त संधीचें आव्हान एका नम्र पण निश्चयी माणसानें कसें स्वीकारलें आणि परिणामीं फलनिष्पत्ति काय व कशी झाली, त्याचा समग्र वृत्तांत प्रस्तुत चरित्रांत सादर केलेला आहे.

* * *

## अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| १ | कौटुंबिक पार्श्वभूमि | १ |
| २ | बाळपणाचा काळ | ४ |
| ३ | कॉलेजचीं वर्षें | १३ |
| ४ | वरच्या वर्गांतील विद्यार्थी | १६ |
| ५ | २६, ब्रॉडवे | १९ |
| ६ | प्रौढपणाचा काळ | २७ |
| ७ | कोलोराडो संप | ४६ |
| ८ | 'जीवन. धर्मपंथ नव्हे.' | ६७ |
| ९ | रॉकफेलर सेंटर | ८६ |
| १० | विल्यम्सबर्ग | ९५ |
| ११ | पार्क्स आणि सृष्टिसंरक्षण | ११८ |
| १२ | जीर्णोद्धाराचीं कामें | १४३ |
| १३ | शिक्षण व संशोधन | १५४ |

# वि श्व सा हि त्य

| | रु. न.पै. |
|---|---|
| धडधडतें काळीज | २–२५ |
| आरोपी | २–५० |
| एकटा | २–५० |
| अमेरिकन संस्कृति | २ [illegible] |
| असा आहे रशिया | २ [illegible] |
| ध्रुवाचा अस्त | ६ |
| मी विजयी आहें | २ |
| अखेरचा रामराम | २–५० |
| आशियांतील धर्मसंग्राम | १–५० |
| बेन फ्रँकलिन | १–५० |
| जॉर्ज वॉशिंग्टन | १–५० |
| अखेरचें पान | २–५० |
| सावट | २–५० |
| अब्राहम लिंकन | १–५० |
| स्वातंत्र्याचीं नवीं क्षितिजें | २ |
| हेलेन केलर : एक व्यक्तिरेखा | १–५० |
| बाळपणींचा काळ सुखाचा | २–५० |
| प्रेमळ घर | २–५० |
| स्वातंत्र्यवीर | २–५० |
| पांच भावांची गोष्ट | १–५० |
| स्वातंत्र्य आणि संस्कृति | २–५० |
| रॉकफेलर | २–५० |

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर

अनुक्रमांक 23288 दि: 5.12.21
क्रमांक 124 नों: दि:

प्रकरण पहिलें

# कौटुंबिक पार्श्वभूमि

दा. क्र. ८८३४

परिस्थिति त्याच्या विरुद्ध होती. आणि तरीसुद्धां तो महत्पदास चढला आणि त्यानें कांहीं विशिष्ट थोरवी प्राप्त करून घेतली. अशा एका माणसाची ही कहाणी आहे. माणसाचें अवघें जीवन आकारत असतांना परिस्थितीचा विरोध अनेकविध रूपें धारण करतो. कधीं कधीं आजारीपण असतें, कधीं कधीं भोंवतालचें वातावरण दुःखदायक असतें, पुष्कळ वेळां दारिद्र्य असतें आणि हें दारिद्र्य अनेक आकुंचित बंधनें माणसावर लादतें. धाकट्या जॉन डी रॉकफेलरच्या बाबतींत खरा विरोध होता तो संपत्तीचा. या संपत्तीनें त्याचा कोंडमारा केला असता. या संपत्तीनें त्याच्या सर्व शक्ती शोषून घेतल्या असत्या. आणि त्याच्या आयुष्याचा सर्वनाश केला असता. मोठ्या वैभवशाली वातावरणांत त्याचा जन्म झाला. वैभवापासून त्याचें कडेकोट संरक्षण करण्यासाठीं त्याच्या मातापितरांनीं पराकाष्ठेचे प्रयत्न केले. पण तरीसुद्धां दौलतीचें दडपण त्याच्या बाळपणावर पडलेंच. शाळेंत तर हें दडपण त्याला सतत जाणवत असे. त्यानें कॉलेजमध्यें नांव घातलें आणि जगांतील सर्वांत श्रीमंत माणसाचा मुलगा, हें लेबल त्या नांवावर चिकटलें. बापाच्या ऑफिसमध्यें तो काम करावयास लागला, तेव्हां तेथें सुद्धां सर्वांच्या संशयखोर नजरा त्याच्याकडे वळल्या. कारण कोणत्याहि दृश्य शक्तीशीं त्याच्या यशाचा संबंध जोडतां येण्यासारखा नव्हता. खुशामतीचीं कडवट फळें त्याला चाखावीं लागलीं. आणि स्वार्थी स्नेहाचा भ्रमनिरास त्याला भोगावा

लागला. पैशामुळें जी खोटी प्रतिष्ठा प्राप्त होते, तिचा तो बळी झाला. आणि भित्र्या मनाच्या क्षुद्रतेचा प्रत्यय त्याला मिळाला. ज्या संबंधामुळें त्याला आपल्या आयुष्यांत कांहीं समतोल साधतां आला असता आणि योग्य दृष्टिकोण त्याला लाभला असता, अशा सर्व संबंधाना तो मुकलेला होता. परिस्थिति अशी होती कीं या संपत्तीपायीं बहुतकरून त्याच्या मनांत तुच्छता बाणली असती. शेवटीं तो निराश झाला असता आणि हेतुशून्य निष्फल जिणें त्याच्या वाट्यास आलें असतें. इतिहासाचा दाखला बहुतकरून हा असा आहे. पण रॉकफेलरच्या बाबतींत मात्र तसें घडलें नाहीं. साधा, सरळ, विनम्र, सुस्वभावी म्हणून या माणसाची ख्याति झाली. लोकशाही मूल्यांचा तो आदर करावयास शिकला. या सर्वांवर ताण म्हणजे ज्या अमाप संपत्तीचा वारसा त्याला दैवयोगानें लाभला होता, त्या संपत्तीचा विनियोग मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं कसा करतां येईल, याच एका गोष्टीचा त्याच्या मनानें ध्यास घेतला. सुदैवानें त्याला आयुष्य पुष्कळ लाभलें. आणि हें दीर्घायुष्य त्यानें या एकाच कारणीं लावलें. विधायक कल्पनाशक्ति आणि अप्रतिहत तितिक्षा यांच्या बळावर त्यानें आपलें ईप्सित साध्य करून घेतलें.

इ. स. १८७० मध्यें क्लीव्हलँड ही एक विकास पावणारी वसाहत होती. येथील लोकांची आपल्या भवितव्यावर दृढ श्रद्धा होती. इ. स. १८३० मध्यें क्लीव्हलँड हें एक खेडें होतें. इ. स. १८६० च्या सुमारास तें एक मोठें शहर झालें. आणि त्यापुढील दहा वर्षांत तेथील लोकसंख्या दुपटीनें वाढली. याच सुमारास थोरल्या रॉकफेलरचें अवाढव्य तैलसाम्राज्याचें स्वप्न आकारत होतें. आणि त्याच्या धंद्याचीं पाळेंमुळें नकळत या शहरांत पसरत होतीं. अर्थात् त्याच्या धंद्याचा व्याप अजून जगड्व्याळ झाला नव्हता. इ. स. १८५३ मध्यें वयाच्या तेरा-चौदाव्या वर्षी तो या गावांत आला होता. आणि मध्यंतरीच्या काळांत आपल्या विस्मयजनक कर्तृत्वाचा त्यानें पाया घातला होता.

इ. स. १८६८ मध्यें रॉकफेलर दांपत्य आपल्या बेसी नांवाच्या दोन वर्षांच्या कन्येसह केस ॲव्हेन्यूच्या कोपऱ्यावर घर नं. ९९७ मध्यें राहण्यास आलें. त्या दिवसांत युक्लिड ॲव्हेन्यूचें हें अखेरचें टोक होतें. यापूर्वी चेशायर स्ट्रीटवर घर नं. २९ मध्यें हें कुटुंब राहत असे. युक्लिड ॲव्हेन्यू हा त्या काळीं शहराचा वैभवशाली भाग म्हणून मानला जात असे. कारण येथें गांवांतील सर्व बड्या-बड्यांचीं घरें होतीं. रॉकफेलरचें यश आणि महत्त्व उत्तरोत्तर वाढत होतें. त्याचें दृश्य चिन्ह म्हणजे हें स्थलांतर होय. रॉकफेलरनें युक्लिड ॲव्हेन्यूमधील नव्या

घरांत संसार थाटून पुरें एक वर्ष झालें नाहीं, तोंच तेथें रॉकफेलरची दुसरी मुलगी जन्मास आली. तिचें नांव अलाइस. परंतु वर्षभरांतच ती मरण पावली. इ. स. १८७१ मध्यें आल्टाचा जन्म झाला. आणि नंतर पुढच्याच वर्षी आणखी एक चौथी मुलगी जन्मास आली. हिचें नांव एडिथ. रॉकफेलर कुटुंबांतील माणसें वाढत होतीं. पण एकामागून एक मुलींचीच त्यांच्या संसारांत भर पडत होती. आणि म्हणून मनांतल्या मनांत हें दांपत्य कष्टी होतें. अखेरीस ता. २९ जानेवारी १८७४ रोजीं त्यांची मनीषा पूर्ण झाली. बापाचेंच नांव मुलास ठेवण्यांत आलें. यानंतर कुटुंबविस्तार अधिक झाला नाहीं. यानंतर चार वर्षांनीं आपल्या घरापासून चार मैल दूर रॉकफेलरनें एक नवें घर घेतलें. आणि रॉकफेलर कुटुंबांतील मंडळी फॉरेस्ट हिलमधील या नव्या घरांत उन्हाळ्याच्या दिवसांत जाऊन राहूं लागली. पुढें पुढें युक्लिड ॲव्हेन्यूमधील जुनें घर म्हणजे केवळ शहरांत थांबावयाचें एक ठिकाण होऊन बसलें. फार तर वसंत ऋतूंतील आणि पावसाळ्यांतील कांहीं दिवस रॉकफेलर कुटुंब येथें राहत असे. बाकी त्यांचे सर्व दिवस फॉरेस्ट हिलवरच जात. पुढें पुढें तर असें झालें कीं शहरांतील घरांत फक्त रविवारीं कुटुंबाचा मुक्काम व्हावयास लागला.

* * *

## प्रकरण दुसरें

# बाळपणाचा काळ

थोरल्या रॉकफेलरच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या जसजशा वाढत गेल्या, तसतसा न्यूयॉर्कशीं त्याचा संबंध अधिकाधिक वाढूं लागला. आणि शेवटीं अशी एक वेळ येऊन ठेपली कीं जेव्हां न्यूयॉर्क शहरामध्येंच कायमचें बस्तान ठेवणें आवश्यक आहे हें त्याला कळून चुकलें. कामकाज वाढलें कीं कुटुंबापासून दुरावा पण वाढीस लागतो. तें टाळण्यासाठीं इ. स. १८७५ च्या नोव्हेंबरमध्यें रॉकफेलरनें आपल्या सर्व कुटुंबीयांस न्यूयॉर्कमध्यें बोलावून घेतलें. या वेळीं धाकट्या जॉनचें वय जवळजवळ दोन वर्षांचें होतें. यानंतर हा क्रम पुढें कित्येक वर्षें तसाच अबाधित चालू राहिला. आणि हिवाळ्यांत रॉकफेलर कुटुंबांतील सर्व मंडळी न्यूयॉर्कमध्यें राहण्यासाठीं येऊं लागली.

इ. स. १८८४ च्या उन्हाळ्यांत रॉकफेलरनें न्यूयॉर्कमध्यें वेस्ट फिफ्टीफोर्थ स्ट्रीटवर एक घर विकत घेतलें. न्यूयॉर्क शहरांतील सर्वांत चांगले आणि सुखकर असे जे कांहीं भाग होते, त्यांतील हा एक होता. येथील हवा अजून ताजी आणि शुद्ध होती. आणि येथील कांहीं ठिकाणचें वातावरण खेडवळ होतें. रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ सोडली, तर आपण एका फार मोठ्या शहराच्या नजीक राहत आहोंत, याचा सुद्धां येथील रहिवाशांस विसर पडला असता.—त्या वेळीं फिफ्थ ॲव्हेन्यूचा रस्ता चिरेबंदी बांधणीचा होता.—त्या काळच्या आठवणी सांगतांना रॉकफेलर म्हणतो, "आणि रस्त्यांतील दगडांवरून धडधडत

जाणाऱ्या पोलादी चाकांचा आवाज अजून माझ्या कानांत भरून राहिला आहे."

कायदेशीर भाषेंत बोलावयाचें म्हणजे इ. स. १८८४ पासून रॉकफेलर कुटुंबाचें न्यूयॉर्कमधील घर हेंच खरें घर झालें. पण त्यानंतरसुद्धां कित्येक वर्षें घर म्हणजे पूर्वींचें जुनें क्लीव्हलँडमधील, असेंच रॉकफेलर कुटुंबांतील सर्व मंडळींना वाटत असे. युक्लिड ॲव्हेन्यूवरील घराचें महत्त्व हळूहळू कमी होत गेलें. पण आनंद-समाधानाचें केंद्र अजूनपर्यंत फॉरेस्ट हिलमध्येंच होतें. रॉकफेलर मंडळी न्यूयॉर्कमध्यें राहावयास गेल्यावर जीवनक्रमांत थोडाबहुत बदल होणें अपरिहार्य होतें. पण तरीसुद्धां घरासंबंधींच्या चक्रनेमिक्रमांत तसा कांहीं बदल झाला नाहीं. आणि उन्हाळ्यांतील फॉरेस्ट हिलचा सुखद निवास तसाच दीर्घकालपर्यंत चालूच राहिला. येथील वातावरण त्या सर्वांच्या परिचयाचें आणि आवडीचें होतें. फॉरेस्ट हिलमधील प्रतिवार्षिक वास्तव्यामुळें रॉकफेलर मंडळींना तेथील वातावरणाची सतत ओढ वाटत असे.

रॉकफेलर पतिपत्नींच्या जीवनांत धर्माचें स्थान अग्रगण्य होतें. उभयतां मनस्वी धार्मिक होतीं. आणि चर्चमधील धर्मकार्याला त्यांची एकांतिक निष्ठा सदा वाहिलेली असे. अशा परिस्थितींत त्यांचा पुत्र धार्मिक स्त्रीपुरुषांच्या आणि प्रवृत्तींच्या परिसरांत लहानपणापासून वाढावा, हें क्रमप्राप्तच होतें. त्याच्या निकट आप्तांव्यतिरिक्त रॉकफेलर कुटुंबांत आणखी कांहीं मंडळी होती. त्याच्या दोन्ही आज्या तेथेंच राहत असत. आणि त्याची एक मावशी पण. तिचें नांव ल्यूसी. पण तो तिला ल्यूट मावशी म्हणत असे. त्याचे आजोबा – म्हणजे आईचे वडील—मि. स्पेल्मन इ. स. १८८१ मध्यें निधन पावल्यावर या दोघी मायलेकी रॉकफेलरच्या घरींच राहत असत. आपल्या मुलांच्या संगोपनाबाबत स्वतः रॉकफेलर निर्धास्त होता. अपत्यांच्या संबंधींची सर्व जबाबदारी त्यानें आपल्या पत्नीवर सोपविली होती. पण असें असलें तरी सुद्धां छोट्या रॉकफेलरचा बाळपणाचा काळ बापाच्या व्यक्तित्वानें भारलेला दिसतो. बापाचे कांहीं खास स्वभावविशेष मुलांत तंतोतंत उतरलेले दिसतात. उदाहरणार्थ, प्रत्येक बारीकसारीक तपशील नजरेखालून घालण्याची त्याची सवय. किंवा पैसा कसा वांचवावा आणि खर्चावा, याबाबतच्या त्याच्या कल्पना. बापाच्या सुप्रसिद्ध लेजर-वरून मुलांनीं लहानपणापासून हिशेब लिहिण्याची विवक्षित पद्धति उचललेली दिसते. मुलांच्या हिशेबाच्या खतावण्या आजहि उपलब्ध आहेत. त्यांत कोठें यत्किंचितहि खोडाखोड नाहीं. एकूण एक सर्व जमाखर्च स्वच्छ आणि चोख

लिहिले आहेत. बापाप्रमाणेंच मुलालाहि नीटनेटका, तपशीलवार, बिनचूक हिशेब लिहिण्यांत आनंद वाटत असावा, असें या खतावण्या सांगतात. याच काळांत पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करावयास तो शिकला. पैसा मिळविण्यास त्यानें बालपणींच सुरुवात केली होती, असें दिसतें. या वयांत अनेक चमत्कृति-जनक उद्योग करून त्यानें पैसा कमावला आहे, असें आढळून येतें. इ. स. १८८७-८८ च्या त्याच्या चिमुकल्या हिशेबवहींत खालीलप्रमाणें अनेक मनोरंजक नोंदी आढळतात: फुटकें भांडें दुरुस्त करणें, १ डॉलर. फाउंटनपेन दुरुस्त करणें, २५ सेंट्स. पेन्सिली तासणें, २ सेंट्स. तार दुरुस्त करणें, १० सेंट्स. गालिचा आंथरणें, १० सेंट्स. थर्मामीटर्स लावणें, १० सेंटस्. आणि माशा मारणें—एका माशीस प्रत्येकीं २ सेंट्स.

तो जसा वयानें वाढत चालला, तशा त्याच्यावरील जबाबदाऱ्या पण वाढीस लागल्या. आणि त्याबरोबरच त्याची मिळकत पण वाढीस लागली. इ. स. १८९० मध्यें तो सोळा वर्षांचा झाला, तेव्हां फॉरेस्ट हिल इस्टेटीचा सर्व जमाखर्च तो बघत असे. आणि तेथील सर्व कामांवर देखरेख करीत असे. इ. स. १८९१-९२ सालांतील त्याच्या खतावणींतील एक नोंद मेपल सायरप-संबंधींची आहे. त्या वर्षी हें काम त्याच्यावर सोपविण्यांत आलें होतें. यासंबंधीं विचारतां त्यानें माहिती सांगितली, ती येणेंप्रमाणें: "त्या वर्षी माझी तब्येत बरी नव्हती, म्हणून वर्षभर मी तेथेंच राहिलों होतों. इस्टेटीवर एक माणूस होता. त्याला मेपलपासून साखर कशी बनवावी, तें माहीत होतें. त्याच्या जोडीनें मी कामास लागलों. इस्टेटीवरील एकूण एक सर्व मेपल झाडांची आधीं आम्हीं नोंद केली. नंतर झाडांत खांचा पाडल्या. खांचांतील रस डबड्यांतून गोळा केला. एक तंबू ठोकला आणि जवळपास भट्टी पेटवून सर्व रस उकळून काढला. त्या कामापासून जो अनुभव मिळाला, तो मौल्यवान् होता."

उद्योगधंद्याच्या संबंधांतील हा अनुभव फॉरेस्ट हिलपुरताच मर्यादित होता, असें नाहीं. कॉलेजमध्यें नांव घालण्यापूर्वी आपल्या बापासाठीं तो घोड्यांची खरेदी करीत असे. आणि २१, वेस्ट फिफ्टीफिफ्थ स्ट्रीटवरील रॉकफेलर तबेल्याची व्यवस्था पाहत असे. अगदीं लहानपणापासून कौटुंबिक सहल-सफरींची व्यवस्था करण्याचें काम त्याच्याकडेच सोपविण्यांत आलें होतें. आणि तिकिटें काढणें, बिलें भागविणें, टिप्स देणें, उतरण्या-राहण्याची व्यवस्था बघणें आणि आगगाड्यांच्या वेळापत्रकाबरहुकूम सहलींची संपूर्ण योजना आंखणें आणि ती

कार्यवाहींत आणणें—असलीं कामें त्या वेळेपासूनच करण्याची त्याला सवय जडली होती.

छोट्या जॉनचें बाळपण धर्मभावनेनें भारलेलें होतें. आणि तेव्हांपासून अनेक अवघड जबाबदाऱ्या पार पाडण्याचे तगादे त्याच्या पाठीमागें लावून देण्यांत आले होते. त्यामुळें आपल्या बाळपणाचा काळ त्याला फार सुखाचा, मजेचा किंवा गमतीचा वाटला नसेल, असा तर्क वरील पुराव्यावरून कोणी करण्याचा संभव आहे. पण भोंवतालचें वातावरण कितीहि नीरस असलें, तरी सर्वत्र गंमत शोधणारी आणि वेडेपण उघड करणारी बालमनांतील अनावर जिज्ञासा बहुतकरून दडपली जाण्याचा संभव क्वचितच असतो. आणि रॉकफेलर कुटुंबांतील वातावरण शांतगंभीर असलें, तरी नीरस मुळींच नव्हतें. आणि विशेष म्हणजे बालसुलभ हुशारी आणि खोडकरपणा यांचा स्वाभाविक वांटा जो काय मिळावयाचा, तो त्याच्या गांठीं होता.

हें जरी खरें असलें, तरी घरांतील एकंदर वातावरण मौजमजेपासून अलिप्त आणि खेळकरपणास विशेष उत्तेजन देणारें नसल्यामुळें जॉनच्या मनाचा कोंडमारा झाला असावा, असें मानण्यास थोडीबहुत जागा आहे. बायबलचे पाठ आणि दारूबंदीचे खडे घोकण्यांत वा गिरविण्यांत बालमनास विशेष समाधान लाभत नाहीं. या घरांत समवयस्कांची संगतसोबत त्याला कधीं लाभली नाहीं. स्वतःच्या बरोबरीच्या मुलांत मिसळण्याची संधि कधीं विशेष न लाभल्यामुळें सामाजिक संबंधाचा आणि सहकाराचा अभाव त्या वेळीं त्याला बराच जाणवला असावा. कित्येक वर्षांनंतर आपल्या चुलत भावाबहिणींचें त्या काळांत बालसुलभ अशा विविध उद्योगांनीं व्यापिलेलें खेळकर जीवन आठवून त्याला विषाद वाटत असे. त्याचा चुलता विल्यम रॉकफेलर याच्या मुलामुलींच्या संबंधीं तो कधींकधीं म्हणे : "त्या मुलांना जें सदा उपलब्ध होतें, तें आम्हां मुलांना कधींच लाभलें नाहीं. आणि हा भेदभाव त्या वेळीं देखील आमच्या लक्षांत येऊन चुकला होता. त्यांचें सामाजिक जीवन गमतीचें आणि समृद्ध होतें. त्यांनीं दिलेल्या पार्ट्या पाहिल्या कीं आपल्याला असें कांहीं करतां येत नाहीं, म्हणून आम्ही कुढत असूं. आजच्या दृष्टिकोणांतून पाहिलें असतां त्या वेळचें आमचें सामाजिक जीवन अगदींच आकुंचित होतें, असें म्हणावें लागेल. चर्च म्हणजे आमच्या कुटुंबाचा केंद्रबिंदु होता. इतर मुलांना जें सामाजिक जीवन सहज उपलब्ध होत असे, तें क्लीव्हलँडमध्यें आमच्या वांट्यास कधींच आलें नाहीं. आम्ही कधीं शाळेंत गेलों

नाहीं. आणि फॉरेस्ट हिलमध्यें कोणी मुलें कधीं भेटीगांठीसाठीं आलींच, तर बहुतकरून तीं आमच्या आईबापांच्या स्नेह्यासोबत्यांचींच असत. घर आणि चर्च यापलीकडे आमचें जग नव्हतें. चर्चमधील रविवारच्या शाळेंत आम्ही उत्साहानें जात असूं. याचें कारण म्हणजे तेथील ऑर्केस्ट्रा. मी आणि माझ्या बहिणी कोणतें ना कोणतें वाद्य वाजविण्यास शिकलों होतों. चर्चमधील सकाळच्या शाळेचा एक सामाजिक संबंध वगळला, तर इतरत्र कोठें आम्हांला मित्र नव्हते. आमच्या वयाचे खेळगडी आम्हांला कधींच लाभले नाहींत. शाळकरी मुलांची दोस्ती म्हणजे काय, तें आमच्या गांवीं नव्हतें. कारण शाळेंत आम्ही कधींच गेलों नाहीं."

थोरल्या रॉकफेलरला प्रवासाचा विशेष शौक होता. कुटुंबांतील सर्व मंडळी, किमानपक्षीं एक डॉक्टर आणि एक पाद्री, या सर्वांना आगगाडीच्या एका खाजगी कारमध्यें कोंबून उन्हाळ्याच्या सुटींत सारें खंड पालथें घालावयासाठीं तो निघत असे. हा एक त्यांचा आवडता छंद होता. कुटुंबांत कधीं गमतीच्या गोष्टी चालत, तेव्हां कोणी म्हणे, डॉक्टर कशासाठीं? तर तब्येतीची काळजी घेण्यासाठीं. आणि पाद्री कशासाठीं? तर कोणी दगावल्यास पुरण्यासाठीं! या कौटुंबिक सफरींचा संपूर्ण वृत्तांत आज उपलब्ध नाहीं. जॉनच्या निबंधाच्या वहींत इ. स. १८८४ मध्यें निदान एकदां तरी सर्व कुटुंब अशा सफरीस गेल्याचा उल्लेख आहे. ता. १२ डिसेंबर १८८४ रोजीं त्यानें लिहिलेल्या एका निबंधांत सॅनफ्रान्सिस्को येथें घालविलेल्या पंधरवड्याची हकीकत आहे.

इ. स. १८८७ मध्यें आणखी एका महत्त्वाच्या प्रवासाचा योग आला. या वर्षीं रॉकफेलर कुटुंब जन्मांत पहिल्यांदाच यूरोप बघण्यासाठीं बोटींतून रवाना झालें. या खेपेस सुद्धां सर्व संच तोच ठराविक होता. आईबाप, बहिणी, मावशी आणि डॉक्टर बिगार. या वेळीं जो पाद्री बरोबर घेतला होता, त्याचें नांव डॉ. स्ट्राँग. त्याच्याबरोबर त्यानें आपली सर्वांत थोरली मुलगी मेरी म्हणून आणली होती. जॉनच्या डायरींतील नोंदी मुख्यत: लंडनमधील प्रेक्षणीय स्थळांसंबंधीं आहेत. या सफरींत तरी निदान धर्माचें स्थान फारसें महत्त्वाचें नसावें. म्यूझिअम्स, आर्ट गॅलरीज पाहिल्याच्या नोंदी डायरींत सांपडतात. प्राणिसंग्रहालयांत हत्तीवर स्वार झाल्याची एक नोंद आहे. मदाम टसॉडच्या मेणाच्या चित्रें पण त्यांनीं पाहिलीं. मेणाच्या चित्रांचें प्रदर्शन पाहून आपली निराशा झाली, असें जॉन म्हणतो. आणि शेवटीं महाराणी व्हिक्टोरियाची ज्युबिली मिरवणूक पिकॅडिलींतील एका खोलींतून पाहिल्याची नोंद आहे. जॉन म्हणतो, "या खोलीचें भाडें ६७

पौंड १० शिलिंग होतें." कोणत्याहि लहान मुलाला अशा एखाद्या सफरींत मिळालेला अनुभव चित्तवेधक वाटला असता. लहानग्या जॉनच्या बाबतींत तर बोलावयास नको. आधींच तपशिलांच्या शोधांत आणि स्मरणांत त्याचें मन रमत असे. पुढें शाळकरी दिवसांत जे अनेक निबंध तो लिहिणार होता, त्यांची सर्व सामग्री या सफरींत तो गोळा करीत होता.

आणखी दोन वर्षांनंतर युरोपची आणखी एक सफर रॉकफेलर कुटुंबानें केली. या खेपेस त्यांचा प्रवास 'सिटी ऑफ पॅरिस' या बोटीनें झाला. कॉलेजमध्यें नांव घालण्यापूर्वी रॉकफेलर कुटुंबानें ज्या सफरी केल्या, त्यांची पुष्कळशी माहिती जॉनच्या जुनाट, कांहींशा मळलेल्या, फाटक्या डायऱ्यांतून मुख्यतः उपलब्ध होते. एवढ्या लहानशा मुलानें इतक्या साक्षेपानें भरून काढलेल्या डायऱ्या पाहून आज नवल वाटतें. या डायऱ्या पाहिल्यावर एका महत्त्वाच्या गोष्टीचा बोध होतो. रॉकफेलर कुटुंब दूरदूरच्या सफरींवर जात असे, तें केवळ मजा मारण्यासाठीं म्हणून नव्हे. तर अशा सफरींतील अनुभवांनीं मन समृद्ध होतें, सुसंस्कृत होतें म्हणून. लोकांत बडेजाव मिरविण्यासाठीं म्हणून अशा सफरी काढावयाच्या नसतात. सफरीचा हेतु गंभीर असतो. याच सुमारास अमेरिकेंतील कित्येक श्रीमंत माणसें आपल्या वैभवाचें भडक प्रदर्शन करण्यासाठीं आणि विलासी जगांत खळबळ माजविण्यासाठीं युरोपचा दौरा करीत असत. अर्थात् रॉकफेलर कुटुंब या असल्या क्षुद्र हेतूनें कधीं म्हणून प्रवासास निघालें नाहीं, याविषयीं शंकाच नको. संपत्ति जशी एक ठेव आहे आणि तिचा विनियोग दूरदर्शी शहाणपणानें करावयास हवा, त्याचप्रमाणें रिकामपणाची संधि ही सुद्धां ठेव आहे. पैशाची उधळपट्टी लांछनास्पद होय. तशीच वेळेची सुद्धां. अशी रॉकफेलर कुटुंबाची धारणा होती.

जॉनच्या शालेय शिक्षणाविषयीं येथें कांहीं तरी सांगावयास हवें होतें, असें कोणास वाटेल. पण खरोखर त्यासंबंधीं विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं. अगदीं लहानपणीं त्याला जें कांहीं शिकविण्यांत आलें, त्याविषयीं खुद्द जॉनला सुद्धां आज कांहीं आठवत नाहीं. इ. स. १८८४ मध्यें 'न्यूयॉर्क स्कूल ऑफ लँग्वेजेस' मध्यें त्याचें नांव घालण्यांत आलें. त्यापूर्वी काय घडलें, तें आज त्याच्या स्मरणांत नाहीं. त्याच्या बहिणींना शिकविण्यासाठीं जे शिक्षक घरीं येत, तेच बहुतकरून थोडा वेळ त्याला घेऊन बसत असावेत, असें वाटतें. कारण याच वयांत केव्हां तरी तो लिहिण्यावाचण्यास शिकला. त्याला दहावें वर्ष लागलें

तेव्हां त्याला एखाद्या शाळेंत पाठविण्याचा विचार त्याच्या आईबापांनीं केला असावा. त्यांचा हा विचार शहाणपणाचा आणि योग्यच होता. कारण शाळेंत सुसूत्र अभ्यासाची शिस्त लागते. म्हणून पहिल्यांदा त्यांनीं वरील शाळा निवडली. फॉर्टीथर्ड स्ट्रीट, ब्रॉडवे येथें ही शाळा होती. आणि पहिलीं दोन वर्षें जॉननें या शाळेंत काढलीं. शाळेंतील त्याचा अभ्यासाचा अहवाल चाळला आणि त्या वेळीं त्यानें लिहिलेले निबंध वाचले, तर त्या वेळीं रूढ असलेल्या अभ्यासाची कल्पना येईल. वाचन, लेखन, पाठांतर, गणित, इतिहास, भूगोल या विषयांमध्यें साधारणपणानें त्याला ९८·७ गुण मिळालेले दिसतात. आणि ९४·७ खालीं केव्हांहि त्याचे गुण गेलेले दिसत नाहींत.

इ. स. १८८५-१८८६ च्या हिवाळ्यांत जॉननें सी. एन्. डग्लस याच्या खाजगी शाळेंत अभ्यास केला. ही नवीन शाळा फार लहान असावी. कारण सिक्स्थ ॲव्हेन्यूच्या कोपऱ्यावरील थर्टीफोर्थ स्ट्रीटवर एका दुकानाच्या पहिल्या मजल्यावर एकाच खोलींत ही सर्व शाळा भरत असे. येथें सुद्धां विषय पूर्वींचेच होते. आणि सर्वसाधारणपणें त्याला शेकडा ९६ गुण मिळालेले दिसतात. या काळांत बहुतकरून डग्लस हा एकटाच त्याचा शिक्षक असावा.

कारण काय असेल तें असो, हीहि व्यवस्था असमाधानकारक ठरली असावी. कारण पुढच्याच वर्षीं त्यानें आणखी एका तिसऱ्याच शाळेंत नांव घातलें. या ‘कटलर स्कूल’मध्यें त्यानें दोन वर्षें काढलीं. ही शाळा पुष्कळच मोठी होती. आणि त्या काळीं बरीच प्रसिद्ध होती. अभ्यासाच्या बाबतींत जॉन अतिशय दक्ष असे. आणि साधारणपणें त्यानें त्या वेळीं मिळविलेल्या ९८·१० गुणांनीं त्याच्या प्रकृतीवर बराच ताण पडलेला असावा. तें कांहीं कां असेना, त्यानंतर पुढील वर्षीं तो कांहीं ‘कटलर’ शाळेंत जाऊं शकला नाहीं, एवढी गोष्ट खरी. शाळेंत जाण्याऐवजीं त्या हिवाळ्यांत आपल्या आईबरोबर फॉरेस्ट हिलमध्यें तो राहिला. आणि या सुटींत मोकळ्या हवेंतील व्यायामाकडे त्यानें बरेंच लक्ष पुरविलें असावें. ‘त्या हिवाळ्यांत तूं काय केलेंस?’ म्हणून त्याला कोणीं विचारलें, तर तो सांगतो : “मी भाजीपाल्यासारखा नुसता रुजलों, वाढलों. बाकी कांहींसुद्धां केलें नाहीं...त्या दिवसांत मी फार लाजाळू होतों. शाळेंत मुलांशीं वा मास्तरांशीं माझें कधीं पटलें नाहीं. आणि माझी तब्येत पण फारशी चांगली नव्हती...” त्याच्या मनाची अवस्था कशीहि असो, फॉरेस्ट हिलमधील मुक्कामांत त्याची प्रकृति पुष्कळच सुधारली. आणि इ. स. १८८८ च्या नोव्हेंबरमध्यें तो पुन्हा

वि:
नों: दि:

'कटलर' शाळेंत नियमित जावयास लागला.

मध्यंतरींच्या काळांत आठवड्यांतून कांहीं दिवस गांवांतील एक विद्यार्थी घरीं येऊन त्याला शिकवीत असे. या शिकवणीमुळें त्याच्या अभ्यासांत सुटींत देखील खंड पडला नाहीं. या वर्षीं देखील वार्षिक परीक्षेंत त्याला पहिल्यासारखेच उत्तम गुण मिळालेले दिसतात. आणि त्यावरून एकदां सोडलेला अभ्यास फिरून सुरू करते वेळीं त्याला विशेष प्रयास पडले नसावेत, असें वाटतें. कॉलेजमध्यें नांव घालण्यापूर्वीं त्यानें चौथ्या आणि अखेरच्या शाळेंत नांव घातलें. तेवीस वेस्ट फिफ्टीफिफ्थ स्ट्रीट येथें 'ब्राउनिंग स्कूल' होतें. पहिल्या 'कटलर' शाळेपेक्षां ही 'ब्राउनिंग' शाळा त्याला अधिक पसंत पडली. त्याचें कारण विचारलें, तर तो सांगतो कीं या शाळेंत प्रत्येक मुलाकडे जातीनें लक्ष पुरविलें जात असे.

इ. स. १८८९ पासून १८९३ पर्यंतचीं वर्षें जॉननें या 'ब्राउनिंग' मध्येंच काढलीं. इ. स. १८९१-९२ च्या हिवाळ्यांत त्याची तब्येत पुन्हा एकाएकीं बिघडली. आणि कांहीं दिवस त्यानें पुन्हा फॉरेस्ट हिलवर काढले. ज्यावर तारखेची नोंद नाहीं, असा एक वर्गांतील अभ्यासाचा अहवाल आजहि वाचावयास मिळतो. त्यांत खालील विषयांची नोंद केलेली आढळते: जर्मन, फ्रेंच, ग्रीक, लॅटिन, इंग्रजी निबंध, गणित, प्रायोगिक विज्ञान, बुक-कीपिंग, भूगोल, अमेरिकेचा आणि इंग्लंडचा इतिहास, ड्रॉइंग आणि पी. टी. त्या काळांत त्यानें लिहिलेली एक निबंधाची वही आजसुद्धां उपलब्ध आहे. अनेक विषयांवर त्यानें लिहिलेलें आहे. स्लीपी हॉलोमधील शाळा, मुद्रणकला, कॅनडांत पळून गेलेल्या एका नीग्रो गुलामाची कहाणी, इत्यादि. एका उत्तरपत्रिकेवरून असें दिसतें कीं त्या वेळीं स्पेलिंग फार कच्चें होतें. त्याच्या शुद्धलेखनाची—किंवा अशुद्धलेखनाची—त्याच्या शिक्षकानें गंमतीनें थट्टा केलेली दिसते. enclined, extraviganty, approched, staired, आणि jinger इत्यादि शब्दांचे स्पेलिंग दुरुस्त केल्यावर खालीं त्या शिक्षकानें शेरा मारला आहे: 'Oh John! Thy spelling is not thy greatest accomplishment! Look and behold!'

इ. स. १८९३ मध्यें त्यानें कॉलेजमध्यें नांव दाखल केलें. शाळकरी दिवसांत त्यानें जें कांहीं कमावलें होतें, त्याचा कॉलेजमध्यें फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. स्वभावानें लाजाळू, गंभीर प्रवृत्तीचा, असंस्कृत असा हा

विद्यार्थी कॉलेजमधील गमतीच्या खेळकर वातावरणाशीं लवकर समरस होऊं शकला नाहीं. आणि त्यामुळें कॉलेजमधील त्याचे पहिले कांहीं दिवस सुखांत गेले नाहींत. तो नेहमीं मनांतल्या मनांत अस्वस्थ असे. आणि इतर विद्यार्थ्यांशीं त्याला चटदिशीं जुळतेंमिळतें घेतां येत नसे.

१९ सप्टेंबर १८९३ रोजीं 'ब्राउन युनिव्हर्सिटी'त त्यानें नांव दाखल केलें.

* * *

प्रकरण तिसरें

# कॉलेजचीं वर्षें

कॉलेजांत नांव घातल्यावर पहिल्या आठवड्यांत तेथें ज्या कांहीं घडामोडी घडल्या, त्यांच्याविषयीं त्यानें आपल्या बापाला मोठ्या उत्साहानें एक लांबलचक पत्र लिहिलें : "आमचें सर्वांचें येथें फार चांगलें चाललें आहे. सर्वांनाच हा अनुभव नवीन आहे. आणि त्याची गंमत आम्ही सध्यां लुटीत आहोंत. येथील प्रोफेसर्स सुस्वभावी आहेत. आणि आम्हांला कसलाहि सल्ला देण्यांत किंवा मार्गदर्शन करण्यांत ते सदा तत्पर असतात. त्यांची आम्हांला मोठीच मदत होते. अल्फा डेल्टा फाय सोसायटीच्या पांचपंचवीस मेंबर्सशीं आमची चांगली गट्टी झालेली आहे. आणि सर्वांनीं मिळून या सोसायटीची मेंबरशिप घ्यावी, असा आमचा मानस आहे....लेफर्टस आणि मी परवां रात्रीं फिरावयास गेलों होतों. आणि वाटेंत रस्ता चुकलों. हा एक विचित्र अनुभव मिळाला....प्रेसिडेंट अँड्र्यूज फार भला माणूस आहे. अगदीं आपल्या उच्च स्थानास शोभेल असा. आम्हां सर्वांशीं तो फार मोकळेपणानें बोलतो वागतो. सर्व बाबतींत मोठ्या जिव्हाळ्यानें सल्ला-मसलत देतो. आणि कांहीं वेळां कांहीं कारणानें कोणाची खरडपट्टी काढण्यासाठीं त्याला थोडी कडक भाषा वापरावी लागली, तरी कोणाला त्याचें विशेष कांहीं वाटत नाहीं. कारण त्याची वागणूक मोठी प्रेमळ आहे...संख्येच्या बाबतींत आम्हीं या वर्षी उच्चांक प्रस्थापित केला आहे. वर्गांत एकूण १७५ विद्यार्थी आहेत. आमच्या वर्गांत ३ काळीं मुलें आहेत. ही बातमी आजीला सांगावी.

तिला गंमत वाटेल...परवांच्या दिवशीं आमच्या वर्गातच प्रार्थना घेण्यांत आली. त्या वेळीं विद्यार्थी प्रसंगास साजेल अशा गांभीर्यानें वागले; हें ऐकून तुम्हाला फार आनंद होईल. म्हणून मुद्दाम कळवीत आहें..." सभासंमेलनांत किंवा पार्टीच्या वेळीं लोकांत मिळून मिसळून कसें वागावें, तें अजून जॉनला नीटपणें समजत नसे. घोळके करून उभें राहावयाचें आणि उगाच कांहीं तरी वेड्यासारखी बडबड करावयाची, या गोष्टीचा जॉनला मनापासून तिटकारा होता. कॉलेजमध्यें नेमून दिलेल्या अभ्यासाव्यतिरिक्त आणखी पुष्कळ उद्योग, चळवळी चालत. पण जॉनच्या छंदांची निवड मुळांतच आकुंचित होती. त्याला घोड्यावर चांगलें बसतां येत होतें. आणि सायकल नेटानें चांगली चालवितां येत असे. इंग्लंडमध्यें इ. स. १८९५ च्या उन्हाळ्यांत दर दिवशीं ७५ मैल त्यानें सायकलवरून हाणले होते, ही गोष्ट खरी. परंतु सांघिक व्यायामाची त्याला मुळीं सुद्धां कांहीं माहिती नव्हती. या काळांतील त्याचा एक मित्र कोल्वी हा पेहलवानी पेशाचा होता. अर्थातच जॉनचा पेशा तो नव्हता, हें उघड होतें. ता. ५ ऑक्टोबर १८९३ रोजीं केलेल्या शरीरतपासणीच्या अहवालावरून असें दिसतें कीं त्याची उंची सरासरीपेक्षां कमी होती—५ फूट ६ इंच. वजन पण कमी होतें—१२७. पण हातापायांच्या ताकदींत तो इतरांपेक्षा वरचढ होता. याचा अर्थ असा नव्हे कीं त्याची तब्येत नाजूक होती. तसा तो चांगला सशक्त होता. आणि त्याला मनापासून तशी आवड असती तर कॉलेजमधील एखाद्या खेळांत त्यानें नक्कीच भाग घेतला असता.

त्याच्या आवडीनिवडी भिन्न प्रकारच्या होत्या, हें उघड आहे. उदाहरणार्थ, प्रॉव्हिडन्समधील सेंट्रल चर्चच्या बायबल वर्गासाठीं शिक्षक म्हणून काम करण्याचें त्यानें आपखुशीनें कबूल केलें. आणि कॉलेजमधील वाय्. एम. सी. ए. च्या अनेकविध उद्योगांत त्यानें मनःपूर्वक भाग घेतला. असल्या उद्योगांत त्याचें मन सहज रमत असे, याचें कोणास आश्चर्य वाटावयास नको. संगीताविषयीं त्याच्या मनांत पहिल्यापासूनच आवड होती. आणि त्या दिशेनें कॉलेजमध्यें पण त्यानें कांहीं यत्न करून पाहिले. कॉलेजच्या पहिल्याच वर्षी—ऑक्टोबर महिन्याच्या आरंभीं त्यानें आपल्या आईला एक पत्र लिहिलें आहे. ग्ली क्लबमध्यें प्रवेश मिळविण्यासाठीं त्यानें पुष्कळ खटपट केली, पण यश आलें नाहीं—असा उल्लेख त्या पत्रांत आढळतो.

कॉलेजमधील पहिल्या वर्षाच्या अखेरीस जॉननें अनेकांशीं स्नेह जोडण्यांत

यश मिळविलें होतें. त्याच्या स्वभावांतील लाजाळूपणा हळू हळू कमी व्हावयास लागला होता. आणि लोकांत थोडेंबहुत मिळून मिसळून वागावें, असें त्याला वाटावयास लागलें होतें. पण त्या काळांतील सर्वसाधारण कॉलेज-विद्यार्थ्यांच्या मानानें तो अजूनसुद्धां एकलकोंडा आणि एकमार्गी होता. निदान कॉलेजमध्यें असतांना तरी स्वभावांतील तुटकपणाची प्रवृत्ति शेवटपर्यंत तशीच होती, असें कॉलेजमधील त्या वेळचे त्याचे मित्र सांगतात.

पुढच्या वर्षीच्या उन्हाळ्यांत जॉन रॉकफेलर आणि डिक रिचर्डसन हे दोघे मित्र इंग्लडमध्यें गेले. आणि तेथें ते दोघे सायकलवरून पुष्कळ हिंडले.

* * *

प्रकरण चवथें

# वरच्या वर्गांतील विद्यार्थी

सप्टेंबरच्या आरंभीं जॉन बार हार्बर येथें कांहीं दिवस राहून प्रॉव्हिडन्सला परत आला. त्याच महिन्याच्या अखेरीस कॉलेजमधील त्याच्या ज्युनिअर वर्षास सुरुवात झाली.

याच वर्षी अनेक मानसन्मान त्याच्या वांट्यास आले. आणि त्यामुळें कॉलेजमध्यें त्यानें स्वतःबद्दल केवढा विश्वास आणि आदर पैदा करून ठेवला होता, त्याचें प्रत्यंतर मिळालें. ज्यूनिअर वर्गांचा प्रेसिडेंट म्हणून तो निवडून आला. आणि तदनंतर त्याच्या वर्गांतील दोन प्रमुख समारंभांचें नेतृत्व त्याच्याकडे सोपविण्यांत आलें. ज्यूनिअर प्रोमनेड आणि ज्यूनिअर सेलेब्रेशन.

कॉलेजमधील अखेरच्या दोन वर्षांत जॉनला आणखी किती तरी जबाबदारीचीं कामें पार पाडावीं लागलीं. पण तरी सुद्धां त्याचें सामाजिक जीवन अबाधित राहिलें. ज्यूनिअरच्या वर्षाच्या अखेरीस केव्हां तरी पुन्हा एकदां नाटकांत काम करण्याचा त्यानें निश्चय केला. कदाचित् इतर कोणी मित्रांनीं नाटकांत काम करण्यासाठीं त्याचें मन वळविलें असेल. तदनंतर पुढील वर्षासाठीं फूटबॉल टीमचा मॅनेजर म्हणून त्याची निवड करण्यांत आली. ॲथलेटिक असोसिएशनच्या डायरेक्टर बोर्डाचा मेंबर म्हणून त्याची यापूर्वींच निवड झालेली होती. पण कॉलेजमधील सर्वांत प्रतिष्ठित संस्था म्हटली म्हणजे फूटबॉल टीम होय. आणि या फूटबॉल टीमचा मॅनेजर म्हणजे कॉलेजमधील मानसन्मानाचा तो सर्वश्रेष्ठ अधिकारी ठरावा.

'ब्रॉऊन' मधील तिसरें वर्ष संपल्यावर जॉन पुन्हा एकदां युरोपमध्यें गेला. आणि नॉर्थ केपपर्यंत त्याची सफर लांबली. या खेपेस त्याच्याबरोबर त्याची बहीण आल्टा होती. शिवाय जॉन स्ट्रॅांग आणि त्याची बायको पण होती. जर्मनींत पोहोंचल्यावर तेथून ते चौघे मॉस्को आणि सेंट पीटर्सबर्ग पाहून आले. या सफरींत कांहीं अनपेक्षित अडचणींनीं त्यांचा पिच्छा पुरविला. रशियांतील जग जसें वेगळें, तसेच तेथील अनुभव पण जगावेगळे होते. त्यासंबंधीं एके ठिकाणीं जॉन लिहितो : "येथील भाषा तर शुद्ध रानटी आहे. आजवर इतक्या भाषा आम्हीं ऐकल्या, पण ही भाषा म्हणजे केवळ अजब आहे. या भाषेंत आमच्या हॉटेलचें नांव सुद्धां आम्हांला धड सांगतां येत नाहीं, कोठें जावयाचें तें पण टॅक्सी ड्रायव्हरला सांगतां येत नाहीं. अशी सारी पंचाईत झाली आहे."

फिनलंड, स्वीडन आणि डेन्मार्कमधील दौरा थोडक्या दिवसांत आटोपून हॅंबुर्गहून ते सरळ नॉर्थ केपच्या दिशेनें निघाले. मध्यंतरीं आल्ड्रिच कुटुंबांतील मंडळी त्यांना येऊन मिळाली होती. ही मंडळी पण नॉर्थ केपचीच सफर करणार होती. तेव्हां त्या सर्वांचें उद्दिष्ट आणि मार्ग एकच होते. या वेळीं आईला लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो : "प्रॉव्हिडन्सचा सीनेटर आल्ड्रिच आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळी आमच्याबरोबरच जेवावयास बसतात. त्याची बायको आणि त्याच्या दोन मुली. या दोन्ही मुलींना गेल्या कित्येक वर्षांपासून मी ओळखतों आहें." जॉनची मिस आल्ड्रिचशीं पहिल्यांदा भेट झाली, ती एका नाचाच्या वेळीं. तदनंतर अनेक वेळां त्यांच्या भेटी-गांठी झाल्या होत्या. तिचें सौंदर्य आणि सौहार्द त्याला मनस्वी आकर्षक वाटलें होतें. आणि ११० बेनिव्होलंट स्ट्रीट येथील तिच्या घरीं तो वारंवार तिला भेटण्यासाटीं म्हणून जावयास लागला होता. अशाच एका भेटीच्या प्रसंगीं जॉननें सेनेटर आल्ड्रिचला आपल्या नॉर्थ केप सफरीचा बेत सांगितला होता. आल्ड्रिच स्वतः प्रवासाचा शौकीन होता. आणि त्यानें पण जॉनच्या सफरींत सहकुटुंब साथ करण्याचें ठरविलें होतें. जॉननें आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांत अनपेक्षित घडलेली घटना असा जिचा निर्देश केला होता ती घटना वस्तुतः तितकीशी अनपेक्षित नव्हती.

बर्फाचे पांढरे शुभ्र डोंगर आणि गोठलेल्या समुद्राच्या पांढऱ्या शुभ्र खाड्या यांचीं मोठ्या उत्साहानें केलेलीं विपुल वर्णनें जॉनच्या पत्रांत आणि डायरींत आढळतात. पण मिस आल्ड्रिचचा आणि त्याचा स्नेहसंबंध कसा वाढत चालला होता, त्याची माहिती मात्र या पत्रांतून वा डायऱ्यांतून मुळींच मिळत नाहीं.

प्रॉव्हिडन्समधील औपचारिक सामाजिक बंधनांचा जांच येथें नसल्यामुळें थोड्याच अवधींत दोघांनाहि सर्वत्र मोकळेपणानें हिंडतां फिरतां आलें. आणि मग उभयतांना परस्परांचा सहवास अधिकाधिक हवाहवासा वाटावयास लागला. सीनिअर वर्षाच्या सुरुवातीस जॉन जेव्हां प्रॉव्हिडन्सला परत आला, तेव्हांपासून मिस आल्ड्रिचला तो नेमानें भेटावयास लागला.

अखेरीस कॉलेजचा अभ्यासक्रम संपण्याची वेळ जसजशी जवळ यावयास लागली, तसतसें जॉनच्या अंतःकरणांतील उदास दुःख त्याच्या पत्रांत तीव्रतेनें प्रतिबिंबित झालेलें दिसलें. अशाच एका पत्रांत तो लिहितो : "म्हणजे आतां कॉलेजचे दिवस जवळजवळ संपलेच, असें म्हणावयास हवें. आज माझें अखेरचें पाठांतर झालें. आणि आतां यानंतर परीक्षेस बसावें लागणार नाहीं, हें कळून चुकलें. तुम्हांला कल्पना नाहीं, पण येथें आमच्या कंपूतील सर्व आनंद नष्ट झाला आहे. येथील वातावरणावर जशी सुतकाची अवकळा पसरली आहे. आतां वाटतें, येथील आयुष्यांत केवढा आनंद भरलेला होता, केवढें सुख होतें. या लहानशा जगांत किती तरी नव्या नव्या उपयुक्त गोष्टी आम्ही शिकलों. गेलीं चार वर्षें आम्ही सर्वजण एकमेकांच्या निकट सहवासांत राहिलों. आतां यापुढें आयुष्यांत कधीं पुन्हा अशी संधि लाभणार नाहीं. हाच एक विचार येथें आम्हां सर्वांच्या मनांत घर करून आहे."

जॉननें कॉलेज सोडलें, त्या वेळींच कांहीं एक निश्चय त्यानें आपल्या मनाशीं केला होता. २६, ब्रॉडवे येथील आपल्या बापाच्या ऑफिसमध्यें जाऊन पडेल तें काम करावयाचें आणि शक्य तेवढी मदत बापाच्या कामाकाजांत करावयाची. कोल्बी आणि त्याचे कांहीं मित्र मिळून जगप्रवासास निघणार होते. आणि एक क्षणभर त्यांच्या सहवासांत राहण्याचा मोह अनावर झाला होता. शेवटीं सर्व प्रकारचे मोह बाजूस सारून त्यानें विचार केला होता कीं जितक्या लवकर बापाच्या ऑफिसमधलें काम समजून घेतां येईल, तितकें अधिक चांगलें. कॉलेजमधील अनुभवांनीं त्याच्या स्वभावांत एक नवा विश्वास निर्माण केला होता. पण तरीसुद्धां नजीकच्या भविष्यांत अनेकवार निराशेचीं दुःखें भोगावीं लागतील आणि अनेक अपेक्षांस शरण जावें लागेल, हें त्याला कळून चुकलें होतें. स्नेहाचें आणि स्वातंत्र्याचें जें वातावरण मागें टाकून पुढें जाण्यासाठीं तो निघाला होता, तें वातावरण पुढील आयुष्यांत बहुतकरून कधींच लाभणार नाहीं, ही कल्पना त्याला आली होती. आणि म्हणूनच मनांतल्या मनांत तो कष्टी होता.

* * *

प्रकरण पांचवें

# २६, ब्रॉडवे

२६, ब्रॉडवे येथें बापाच्या ऑफिसांत काम करावयास जॉननें सुरुवात केली. त्यानंतरचे पहिले कांहीं महिने त्याला मनस्वी त्रास भोगावा लागला. त्यापूर्वीच्या चार वर्षांतील आयुष्य आणि ऑफिसमधील आयुष्य यांना सांधणारा धागादोरा सांपडण्यासारखा नव्हता. कॉलेजमध्यें निष्काळजी स्वास्थ्य होतें. आणि तेथील जीवनाची गति मंद, सुखद होती. आतां ऑफिसच्या या नव्या वातावरणांत व्यावहारिक तपशील डोळ्यांत तेल घालून बघावयास हवे होते, पूर्वानुभवाशीं सर्वस्वीं विसंगत असें येथील कठोर, निर्लिप्त वातावरण होतें. ऑफिसमध्यें एकाएकीं अशा उद्योगांत त्याला गढावें लागलें कीं ज्याची त्याला कांहीं सुद्धां माहिती नव्हती. मनांतून त्याला वाटत होतें कीं या विशिष्ट कामास आवश्यक असलेलें शिक्षण आपल्या गांठीं मुळींच नाहीं. आणि ऑफिसमधील फायलींचे डोंगर उठविण्यास आपल्यासारखा माणूस अगदीं नालायक आहे.

ऑफिसमध्यें कामास प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर कांहीं वर्षें स्वतःच्या नालायकीचा हा विचार त्याला सतत भेडसावीत असे. याचें एक कारण कदाचित् असें असेल कीं तो तेथें अगदीं एकाकी, एकटा होता. त्याच्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. इ. स. १९२० मध्यें जॉननें लिहून ठेविलें आहे: 'ऑफिसमध्यें मीं जाण्यास सुरुवात केली, त्यापूर्वी माझ्या वडिलांनीं ऑफिस-मधल्या माझ्या कामासंबंधीं कधीं एक चकार शब्द काढला नाहीं. त्या वेळेपासून

आजपर्यंत हें असेंच चालू आहे. ते कधींच कांहीं सांगत नाहींत. एवढेंच काय, पण मी ऑफिसमध्यें येणार आहें याचा सुद्धां पत्ता त्यांनीं कधीं कोणाला लागूं दिला नाहीं. त्यांची कल्पना अशी होती कीं माझा रस्ता मीं शोधावा आणि मला काय हवें-नको तें मी स्वतःच शोधून काढावें. शेवटीं ऑफिसमधील जमाखर्चाच्या खतावण्या माझ्या मींच गोळा केल्या. आणि ऑफिसमधील एकंदर कामाची जुजबी ओळख करून घेतली.

आपल्या नालायकीबद्दल पहिल्या कांहीं वर्षांत त्यानें जी कल्पना करून घेतली होती, त्याला आणखी एक कारण संभवतें. त्याचा बाप आर्थिक व्यवहारांत अत्यंत निष्णात होता. अर्थकारणावरील त्याचें प्रभुत्व केवळ अतुलनीय असें होतें. ऑफिसमध्यें तसा तो एकटाच असला, तरी मुलाच्या दृष्टीनें ती गोष्ट भयंकर होती. पण बापाच्या जोडीला त्याचा आणखी एक निकट सहकारी होता. त्याचें नांव गेट्स. फ्रेडरिक टी. गेट्स. एके काळीं सामान्य बाप्टिस्ट पाद्री असलेला हा असामान्य माणूस थोरल्या रॉकफेलरचा अत्यंत विश्वासू असा सल्लागार होऊन राहिलेला होता. रॉकफेलरच्या विविध औद्योगिक साहसांत त्याचप्रमाणें त्याच्या उदार अर्थयज्ञांत गेट्स हा रॉकफेलरचा उजवा हात होता. अमेरिकन बाप्टिस्ट एज्युकेशन सोसायटीसाठीं त्यानें स्वार्थत्यागपूर्वक काम केलें होतें. इ. स. १८९१ मध्यें रॉकफेलरनें स्वतः विनंती केल्यावरून गेट्सनें रॉकफेलरच्या ऑफिसमध्यें काम करावयास सुरवात केली होती. त्यापूर्वीं त्यानें रॉकफेलरला स्वच्छ लिहून कळविलें होतें : "आपण सांगाल तेथें आणि आपण सुचवाल त्या पद्धतीनें मी मनोभावें काम करीन, अशी ग्वाही देतां. पण त्याच वेळीं आपणांस प्रार्थना करतों कीं कृपा करून माझ्यावर फारसा विश्वास टाकूं नका. कारण मुळांतच कसलें म्हणून कर्तृत्व माझ्याजवळ नाहीं. जेथें काम केलें असतां फारशी हानि पोहोंचण्याचा संभव नाहीं, अशा ठिकाणीं आपण प्रथम मला गुंतवून बघावें. नंतर साक्षात् अनुभवानें काय कळेल, तें खरें..." हा असा नम्र आत्मनिषेध खरें म्हणजे सर्वस्वीं अनाठायी होता. कारण अल्पावधींतच एक अत्यंत कर्तृत्ववान्, शहाणा, धोरणी, व्यवहारनिपुण व्यवस्थापक म्हणून तो कीर्ति मिळवणार होता.

एवंगुणविशिष्ट गेट्सच्या देखरेखीखालीं जॉन ऑफिसमधील काम बघावयास लागला. उद्योगधंद्यांतील बारीकसारीक खाचाखोचांची सर्वांगीण माहिती मुख्यतः गेट्सपासून धाकट्या रॉकफेलरनें करून घेतली. त्याच वेळीं कोल्बी-व्हाइटच्या व्यवहारांत थोरला रॉकफेलर कारण नसतांना केवळ निष्काळजीपणामुळें ओढला

गेला होता. या व्यवहारांत गुंतविलेला पैसा शक्य तेवढा मोकळा करण्यासाठीं गेट्सची धडपड चालली होती. आणि मुख्यतः त्याच्याच प्रतिभेच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर हा व्यवहार कांहीं अंशांनीं परिणामीं फायदेशीर होऊं शकला. कोल्बी-हॉइट् भांडवल अनेकविध व्यवहारांत गुंतून पडलें होतें. टिंबर खाणी, जमीन-सुधार, पोलाद, कागदाच्या गिरण्या आणि नटबोल्टचे कारखाने,—आणि याशिवाय देशभर पसरलेल्या विविध उद्योगांत हें सारें अवाढव्य भांडवल गुंतून पडलेलें होतें. गेट्सच्या बरोबरीनें जॉननें यासंबंधींच्या महत्त्वाच्या सभांत भाग घेतला. वादविषय झालेल्या अनेक प्रश्नांची पाहणी-तपासणी केली. आणि जेथें जेथें म्हणून हे सर्व उद्योग विखुरलेले होते, त्या सर्व स्थळांचें निरीक्षण करण्यासाठीं गेट्सबरोबर देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत तो फिरला. या दौऱ्यांतील वेस्ट कोस्टवरील प्युजेट साउंड हा एक टप्पा, एवढें सांगितलें म्हणजे या अचाट भ्रमंतीची सहज कल्पना येईल. यानंतरच्या पुढील काळांत उत्तरोत्तर अधिकाधिक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या जॉन स्वीकारणार होता. त्यासाठीं पूर्वतयारी म्हणून याहून अधिक मौल्यवान् आणि उत्तेजक अनुभव शोधून कोठें मिळाला नसता.

यानंतर बरोबर ३० वर्षांनीं धाकटा रॉकफेलर लिहिणार होता : “माझ्या वडिलांचे हजार उद्योग होते. आणि त्यांच्यापैकीं कांहीं थोड्यांचा व्यवस्थित परिचय करून घ्यावयाचा म्हटलें तरी तें महाकर्मकठिण होतें. अशा वेळीं मि. गेट्ससारखा मार्गदर्शक मला लाभला, हें मी माझें अहोभाग्य समजतों. त्यानें मनस्वी शांतपणानें आणि विलक्षण सहनशीलतेनें या जगड्व्याळ उद्योगसाम्राज्याची मला माहिती करून दिली. आणि त्याचबरोबर आमच्या ऑफिसचे नियंत्रक संबंध कोठें आणि कसे पोहोंचत होते, तें पण मला समजावून सांगितलें. ऑफिसचीं कामें अनंत आणि विलक्षण किचकट असतात. त्या सर्वांच्या तळाशीं जाऊन प्रत्येक लहान सहान प्रश्नाचा उलगडा मला सहज करतां येईल, अशा रीतीनें त्यानें मला ऑफिसच्या सर्व कामांची यथायोग्य आणि बिनचूक माहिती करून दिली. कोणत्याहि बापानें स्वतःच्या मुलाला अशा तऱ्हेची मदत —कधीं न कंटाळतां आणि इतक्या समंजस दयाभावानें—क्वचितच केली असती. कोणत्याहि माणसानें आपल्या सहकाऱ्याला याहून अधिक मरातबानें वागविलें नसतें. सर्वांत महत्त्वाची विशेष गोष्ट म्हणजे भावनेच्या ज्या नाजुकपणानें त्यानें माझी जोपासना केली, तिला तुलना नाहीं.”

ही झाली एक बाजू. दुसऱ्या बाजूनें मरणापूर्वी कांहीं थोडे दिवस आधीं धाकट्या रॉकफेलरच्या पूर्वायुष्याविषयीं येणेंप्रमाणें लिहून ठेवलें आहे: "आपल्या बापाच्या ऑफिसमध्यें हा तरुण मुलगा आला, तेव्हां त्याच्या गांठीं अमाप उत्साह होता. सतत काम करण्याची विलक्षण शक्ति होती. ऑफिसमध्यें पाऊल ठेवण्यापूर्वी अर्थशास्त्राच्या अभ्यासांतून आणि आपल्या बापाच्या संभाषणांतून अर्थव्यवहाराचें आणि दानयंत्रणेचें सैद्धांतिक ज्ञान त्यानें चांगलें पैदा केलें होतें. रॉकफेलर कुटुंबांतील सर्वच मुलांना रोजच्या दैनंदिन व्यवहारांत अशाच प्रकारचें मौल्यवान् अर्थशिक्षण आपोआप घरबसल्या मिळतें. कॉलेज सोडल्यावर व बापाच्या ऑफिसमध्यें कामासाठीं जाऊं लागल्यावर हा तरुण ग्रॅज्युएट पुन्हा घरींच राहूं लागला. रोजच्या व्यवहारांत जे जे म्हणून प्रश्न येतील, त्यांची चर्चा आपल्या सुप्रसिद्ध बापाशीं करावयास लागला. अशा रीतीनें सुरुवातीच्या प्रायोगिक वर्षांमध्यें त्यानें अनेकविध आर्थिक प्रश्नांची सहज तोंडओळख करून घेतली. केवळ बापाशीं दररोज बोलून, त्याच्याशीं यथासांग चर्चा करून. असें बहुमोल शिक्षण जगांतील कोणत्याहि युनिव्हर्सिटींत कधींच मिळालें नसतें. १९०१ च्या सुमारास या तरुण ग्रॅज्युएटनें अर्थशास्त्र आणि दानयंत्रणा या विषयांचा पोस्टग्रॅज्युएट कोर्स सहज घरबसल्या पुरा केला होता."

बापाच्या ऑफिसमध्यें काम करावयास सुरुवात केल्यानंतर पुष्कळ वर्षें त्या एकाच कामांत तो प्रायः व्यग्र असे, ही गोष्ट तर खरीच. पण तरी सुद्धां कॉलेजमधील ज्या आनंददायक आणि निष्काळजी जीवनाचा उपभोग त्यानें त्यापूर्वी मनमुराद घेतला होता, त्या जीवनाची ओढ त्याच्या मनांत सतत असे. विशेषतः ज्या एका विलक्षण आकर्षक ओढीनें कॉलेजमधील त्याच्या अखेरच्या वर्षांतील सर्व वेळ त्याला भारून टाकलें होतें, ती ओढ अजूनसुद्धां त्याच्या मनांत तशीच आणि तितकीच अनावर होती. ती ओढ म्हणजे मिस ॲबी आल्ड्रिचच्या दर्शनाची. त्यामुळें आतां कॉलेजमध्यें आणि पर्यायानें प्रॉव्हिडन्स-मध्यें जाण्याचें तसें कांहींसुद्धां कारण उरलेलें नसलें, तरी प्रॉव्हिडन्समधील ११०, बेनिव्होलंट स्ट्रीट येथें त्यांच्या भेटीगांठी सतत आणि नियमित चालूच होत्या. पण आतां अर्थातच पूर्वीप्रमाणें सर्व वेळ निष्काळजी राहणें त्याला परवडण्यासारखें नव्हतें. त्या घरीं संध्याकाळचा तो आला कीं बाह्यतः तरी निदान पूर्वीसारखाच तो निष्काळजी दिसे. त्याचा पोषाक नेहमींच नीटनेटका, व्यवस्थित असे. आणि मनांतील अस्वस्थता त्याच्या वर्तनांत प्रकट झालेली कधींच दिसत नसे. पण ही

महत्त्वाची अपॉइंटमेंट बिनचूक साधण्यासाठीं त्याला बरीच यातायात करावी लागे. शनिवारीं ऑफिसमधील काम तसेंच अर्धवट टाकून संध्याकाळची गाडी गांठण्यासाठीं त्याला बरीच धावपळ करावी लागे. प्रॉव्हिडन्समधील युनिव्हर्सिटी क्लबमध्यें घाईघाईनें जेवणखाण उरकून आणि कपडे बदलून लगेच बेनिव्होलंट स्ट्रीटचा रस्ता त्याला धरावा लागे. बरें, इच्छित स्थळीं पोहोंचल्यावर तरी निदान त्याचें मन स्वस्थ असेल, अशांतला पण भाग नव्हता. कारण तेथें पोहोंचल्यावर थोड्याच वेळांत मध्यरात्रीच्या परतीच्या गाडीचा वेध लागे. आणि या सर्व यातायातींत आणखी भर घालण्यासाठीं मनस्ताप देणाऱ्या घटना पुष्कळच घडत. उदाहरणार्थ, तो तेथें जात असे तेव्हां बहुतकरून मिस आल्ड्रिच त्याच्याच-सारख्या आणखी अनेक पाहुण्यांचें स्वागत हसतमुखानें करीत असलेली त्याच्या दृष्टीस पडे. या पाहुण्यांपैकीं कांहीं जण त्याच्याहून अधिक देखणे दिसत असत, हें नाकबूल करण्यांत कांहीं अर्थ नव्हता. आणि या सर्वांपेक्षां मन अस्वस्थ करून टाकणारी गोष्ट म्हणजे ते सर्वजण दररोज हवा तितका वेळ तिच्या संगतींत काढूं शकत. आतां त्या काळाची आठवण झाली कीं जॉन म्हणतो : "जो हेतु मनांत धरून मी तिच्या भेटीस जात असें, तोच हेतु आणखी कितीकांच्या मनांत त्या वेळीं होता. आणि त्या सर्वांचा मला मनस्वी मत्सर वाटत असे. त्या दिवसांत ही एकच गोष्ट माझ्या मनाचें स्वास्थ्य बिघडवून टाकण्यास पुरेशी होती."

जॉन ज्या वातावरणांत वाढला होता, तें अत्यंत मर्यादित, बंदिस्त असें होतें. तर मिस आल्ड्रिच ज्या वातावरणांत वाढली होती, तें वातावरण अगदीं भिन्न होतें. पहिली गोष्ट म्हणजे तें वातावरण सुसंस्कृत होतें. राजकारणाची आणि कला-वाङ्मयाची चर्चा तेथें नित्य चाललेली असे. तिच्या घरीं हमेश पार्ट्या झडत, आणि पत्त्यांच्या बैठकी होत. नृत्य-गायनादि कार्यक्रम अखंड चालूच असत. या उदार वातावरणानें तिचें व्यक्तित्व घडविलेलें होतें. इ. स. १८९४ मध्यें एका दिवशीं संध्याकाळीं जॉननें ॲबीला प्रथम पाहिलें, त्या वेळींच प्रथमदर्शनीं तिच्या व्यक्तित्वानें त्याच्या मनाला जसें कांहीं झपाटलें होतें. तें व्यक्तित्व म्हणजे या सुसंस्कृत वातावरणाचें फलित होतें. शिवाय ती विलक्षण रूपवान् होती. पण तिच्या रूपानेंच केवळ त्याला मोहित केलें होतें, असें नाहीं. उभयतांचा परिचय कालांतरानें जसा वाढत गेला, तसे तिच्या स्वभावांतील अनेक गुण त्याच्या प्रत्ययास आले. मनानें ती मोकळी होती. विनोदवृत्ति तिच्या स्वभावांत बाणलेली होती. सदासर्वकाळ ती उल्हसित दिसे. उल्हास हा तिच्या

स्वभावाचा एक अविभाज्य घटक होता. आणि तरीसुद्धां तिचें वर्तन संयत होतें. आणखी कांहीं विशेषांमुळें तिचें व्यक्तित्व त्याला मनस्वी गूढ पण विलक्षण आकर्षक वाटत असे. तर्कानें ज्यांची संगति लावतां येणार नाहीं, असे निश्चय ती क्षणार्धांत करीत असे. स्वतःच्या मालकीच्या मौल्यवान् सुंदर कलावस्तूंवर तिचें मनस्वी प्रेम असे. पण उदारपणानें देऊन टाकण्याची प्रवृत्ति तिच्या स्वभावांत होतीं. आणि अनेक प्रकारच्या माणसांचा आणि कल्पनांचा सारखाच सोत्साह आदर करण्यास ती उत्सुक असे. तिच्या स्वभावांतील हा एक गूढ विशेष त्याला मनस्वी आकर्षक वाटे. तिच्या बाजूनें बघावयाचें तर तिलासुद्धां या तरुण पुरुषाच्या गंभीर वृत्तींत, कांहीं विशेष अशा शांत विनोदबुद्धींत, आणि गूढ अशा ध्येयनिष्ठेंत विशेष आकर्षक असें पुष्कळच आढळलें होतें. आणि कालांतरानें त्यांचे स्नेहसंबंध जसे अधिक निकट व्हावयास लागले, तशीं उभयतांच्या स्वभावांतील साम्यस्थळें पण त्यांच्या लक्षांत यावयास लागलीं. उभयतांच्या आवडीनिवडी आणि उभयतांचा ध्येयवाद यांत कांहीं अभिन्नता आहे, हें त्यांच्या ध्यानांत आलें. आणि सर्वस्वीं भिन्न वातावरणानें पोसलेल्या त्यांच्या प्रवृत्तींत परस्परांस आकर्षक असें कांहीं ना कांहीं गूढ वैशिष्ट्य आढळलें, यांत शंका नाहीं. पण असें असलें तरी सुद्धां अजूनपर्यंत त्यांचा विचार ठरत नव्हता. आतां कॉलेज सोडून तीन वर्षें उलटलीं होतीं. आणि तरी सुद्धां काय करावें तें त्यांना समजत नव्हतें. त्याला ती आणि तिला तो आवडत असे, यांत शंकाच नाहीं. मध्यंतरींच्या निकट स्नेहसंबंधानें त्याला एक गोष्ट चांगली कळून चुकली होती. मिस आल्ड्रिचचा सहवास कधींच कंटाळवाणा होणार नाहीं. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट त्याला उघड दिसत असे. त्यांचे स्वभावभेद उघड होते. आणि पुढील वैवाहिक जीवनाच्या संदर्भात कदाचित् हे मूलभूत स्वभावभेद घातक ठरण्याचा संभव होता.

कदाचित् यामुळें असेल, कदाचित् आणखी दुसरीं कांहीं कारणें असतील, पण घाईघाईनें कोणताहि निर्णय घेण्यास दोघेंहि अधीर झालेलीं नव्हतीं. परस्परांचा परिचय झाल्यावर पांच वर्षांनीं उभयतांनीं मिळून एक निर्णय घेतला. कित्येक वर्षांनंतर जॉननें त्याबाबत सांगितलें : "शेवटीं आम्हीं दोघांनीं ठरविलें कीं त्यानंतर सहा महिनेपर्यंत एकमेकांस भेटायचें नाहीं. लिहायचें पण नाहीं. यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं आमचें आम्हांलाच धड कांहीं समजत नव्हतें. यानंतर एक दिवस रात्रीं मी आईजवळ यासंबंधीं कांहीं तरी बोललों. गमतीची गोष्ट अशी

कीं माझ्या ओळखीच्या सर्वच मुलींशीं तिचें वर्तन सारखेंच अगत्याचें असे. त्यांना सर्वांना ती वारंवार घरीं बोलावून घेई. आणि त्यांच्यापैकीं कोणा एकीवर तिची विशेष मर्जी आहे, असें चुकून कधीं एका शब्दानें वा कृतीनें तिनें मला दाखविलें नाहीं. माझी आई फारच शहाणी स्त्री होती. आणि मी आपण होऊन विचारल्याशिवाय ती कधींहि आपलें मत सांगत नसे. हें सारें अगदीं काल घडल्यासारखें मला आज आठवतें आहे. आमच्या ठरावाविषयीं मीं तिचें मत विचारलें, तेव्हां ती हसली आणि म्हणाली, 'अरे, काय वेडा आहेस कीं काय तूं? मिस आल्ड्रिचवर तुझं प्रेम आहे, एवढी साधी गोष्टसुद्धां तुला कशी समजत नाहीं? आतां असं कर, लगेचच्या लगेच तिला तसं सांग.' दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटे मी उठलों. तेव्हां निदान माझ्यापुरता तरी मी निर्णय घेतलेला होता, असें मला आढळून आलें."

आतां गंमत बघा. मध्यंतरीं अनेक वर्षे त्यानें विचारांत घालविलीं होतीं. पण आतां मात्र एक क्षणभर सुद्धां वाट बघण्याची त्याची तयारी नव्हती. उजाडण्यापूर्वीच त्यानें मिस आल्ड्रिचला पत्र सुद्धां लिहून टाकलें होतें. ताबडतोब तुझी भेट होण्याची शक्यता आहे काय, म्हणून त्यानें तिला विचारलें. नंतरचे दोन दिवस तसेच काळजी करण्यांत गेले. आणि नंतर हा तरुण माणूस तिला समक्ष भेटून एकदां काय तो सोक्षमोक्ष लावण्यासाठीं म्हणून निघाला. त्या वेळीं आल्ड्रिच कुटुंब वॉर्विक येथील हवेशीर घरांत राहण्यासाठीं म्हणून उन्हाळ्यांत गेलें होतें. मनांत दडलेलें सर्व कांहीं उघडें करून दाखविण्याची त्याला आतां घाई झाली होती. प्रवासांत त्याचें मन मनस्वी अधीर, अस्वस्थ होतें. कदाचित् मनांतील हेतु सफल होणार नाहीं, या भयानें तो व्याकुळ झाला होता. एवढी सारी धडपड वायां तर जाणार नाहीं ना, अशा संशयानें आतां त्याला घेरलें होतें. त्या वेळच्या रीतीप्रमाणें मुलीला मागणी घालावयाची, तर त्यापूर्वी तिच्या बापाची संमति घेणें आवश्यक होतें. त्या वेळीं न्यू पोर्ट बंदरांतील सुखनौकेंत सेनेटर आल्ड्रिचचा मुक्काम होता. आणि म्हणून जॉनला प्रथम तेथें जाऊन त्याची भेट घ्यावी लागली. मुलीला मागणी घालण्यासाठीं आलेला हा तरुण माणूस कांहीं आंतरिक भयानें चाचरत बोलत होता. प्राथमिक चार वाक्यें कशींबशीं बोलून झाल्यावर त्यानें आपल्या आर्थिक स्थितीविषयीं विस्तारानें बोलावयास सुरुवात केली. आज जॉन सांगतो: "पैशाविषयीं त्यानें मला कांहीं बोलूंच दिलें नाहीं. तो प्रश्न बाजूला सारून तो फक्त एवढेंच म्हणाला कीं माझ्या

मुलीला कसें सुख लाभेल, एवढाच विचार मी करणार आहें."—अर्थात् या मागणीच्या परिणामीं तिला सुख लाभेल किंवा नाहीं, त्या संबंधांत एक ती स्वतःच अधिकारवाणीनें बोलूं शकत होती. तो अधिकार तिनें पुरेपूर बजावला. अर्थातच ती 'होय' म्हणाली. आणि त्यानंतर तीन दिवसांनीं वृत्तपत्रांतून रॉकफेलर-आल्ड्रिच वाङ्निश्चयाची वार्ता सर्वत्र प्रसृत झाली.

वॉर्विकमधील सेनेटर आल्ड्रिचच्या हवेशीर प्रशस्त बंगल्यांत हा नियोजित विवाहसमारंभ मोठ्या थाटामाटांत साजरा करण्यांत आला. लग्नविधीच्या प्रसंगीं फक्त आप्तमित्र तेवढे हजर होते. पण त्यानंतर योजिलेल्या खान्यासाठीं एक हजार निमंत्रित पाहुणे समारंभासाठीं खास उभारलेल्या लग्नमंडपांत एकत्र गोळा झालेले होते. पाहुण्यांमध्यें जुन्या आचारविचारांचे जे कर्मठ लोक होते, त्यांना या समारंभांतील कांहीं बाबी संशयास्पद वाटल्या असण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, मद्यपानासाठीं मुक्तद्वार होतें. या संदर्भांत एक मनोरंजक गोष्ट सांगण्यासारखी आहे. डॉक्टर फाउन्स दारूच्या थेंबाला कधीं स्पर्श करीत नसे. त्यानें चुकून एका ग्लासांतील शांपेन फस्त केली. आणि वर सांगितलें कीं अशी मस्त जिंजर एल जन्मांत कधीं आपण प्यायलों नव्हतों.

लग्नसमारंभाची सांगता झाल्यावर हें नवविवाहित दांपत्य मधुचंद्रासाठीं पोकांटिको येथील रॉकफेलर बागबंगल्यावर गेलें. या ठिकाणीं एक महिनाभर हें जोडपें राहिलें. भोंवतालीं दिसणाऱ्या वर्षास्नात सृष्टिसौंदर्याचें दर्शन या दिवसांत डोळ्यांस मनस्वी आल्हाद देणारें होतें. आणि एकाकी, शांत, निर्जन पाय रस्त्यावरून फिरण्यांत किंवा घोड्यावरून रपेट करण्यांत विलक्षण सुख होतें. न्यूयॉर्कलापरत आल्यावर रॉकफेलर कुटुंबांत कांहीं दिवस त्यांनीं काढले. आणि मग १३ वेस्ट फिफ्टीफोर्थ स्ट्रीट येथें मुक्काम हलविला. यापुढील दहा वर्षें या नव्या घरांतच त्यांचा मुक्काम राहणार होता. आयुष्यांत कधीं भोगिलें नव्हतें, असें सुख जॉनच्या वांट्यास या काळांत आलें. आणि त्याला आपल्या परम भाग्याची मोठी धन्यता वाटली.

★ ★ ★

प्रकरण सहावें

# प्रौढपणाचा काळ

विवाहानंतर जॉनच्या आयुष्यास एक नवी दिशा लाभली, असें म्हणण्याचा कोणास मोह होईल. कारण लग्नानंतर त्याच्या कामांत एक नवाच आत्मविश्वास प्रकट झालेला दिसूं लागला. त्याच्या कामाचा उरक वाढला. आणि तरुण वयांत प्रौढपणास शोभतील अशा जबाबदाऱ्या हातीं घेऊन पार पाडण्याचें कर्तृत्व त्याला जसें कांहीं सहज लाभलें. पण असें म्हणण्याचा मोह शक्य तों टाळावयास हवा. कारण तें केवळ अर्धसत्य आहे. या वेळीं त्यानें लिहिलेल्या पत्रांत नव्यानेंच प्राप्त झालेला हा प्रौढपणा आणि आत्मविश्वास प्रचीतीस येतो, ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण लग्नापूर्वी ज्या एका विशिष्ट परिस्थितींत तो काम करीत होता, त्याचाच हा स्वाभाविक परिणाम होता. खरें म्हणजे व्यवस्थितपणाच्या, नीटनेटके-पणाच्या सवयी आतां जशा कांहीं त्याच्या स्वभावांतच भिनलेल्या होत्या. हिशेब बिनचूक, चोख ठेवण्याची सवय तर बालपणापासूनच त्यानें आत्मसात् केलेली होती. आतां बदल झालेला दिसत होता, तो एवढाच कीं त्याच्या कामाच्या कक्षा उत्तरोत्तर विस्तृत होत होत्या. मोठमोठ्या अवाढव्य योजनांशीं त्याचा संबंध पदोपदीं जडत होता. आणि त्यामुळें आपल्या बापाच्या व्यवहारांतील त्याची पदसिद्ध प्रतिष्ठा आतां दृढ प्रस्थापित झालेली होती.

इ. स. १९०० पासून १९१० पर्यंतच्या काळांतील पत्रव्यवहार नजरेखालीं घातला तर जॉनच्या वाढत्या जबाबदाऱ्यांची यथार्थ कल्पना येते. या दहा वर्षांत

बापानें क्वचितच कधीं आपल्या ऑफिसमध्यें पाऊल ठेविलें असेल. कळत न कळत बापाच्या शिरावरील अजस्र जबाबदाऱ्यांचें ओझें मुलाच्या खांद्यावर उतरत होतें. आणि एकूण व्यवहारांचें मार्गदर्शन आणि नियंत्रण आतां हा मुलगाच आपोआप करावयास लागला होता. जर कधीं एखाद्या वेळीं एखाद्या बाबतींत मुलानें बापाकडून मार्गदर्शन अपेक्षिलें किंवा कधीं साधा सल्ला मागितला, तरी आतां बापाकडून मुलास असें तुटक उत्तर मिळावयास लागलें : "तुला बरें वाटेल, तसें तूं कर." किंवा "तुला आतां सारें कांहीं कळतें. विचार करून तुझें तूंच काय तें ठरव." बापानें मुलावर जो विश्वास दाखविला तो यथायोग्यच होता, हें कालांतरानें अनेक घटनांच्या संदर्भांत वारंवार सिद्ध झालें. उदाहरणार्थ, आधीं पूर्ण विचार करून मनाशीं कांहीं एक निश्चय पक्का केल्यावर शिकागो विद्यापीठाच्या लगतची जागा मिळेल तशी जॉननें खरेदी करावयास सुरुवात केली. या खरेदींत त्याचा अधिकार अनेकविध होता. विद्यापीठाच्या विश्वस्त मंडळाचा एक सदस्य म्हणून. आणि थोरल्या रॉकफेलरचा प्रतिनिधि म्हणून. जॉननें पुढें एकदां सहज सांगितलें : "विद्यापीठाचा व्याप वाढता असेल तर या वाढत्या व्यापासाठीं जमीन पण मोठी हवी, अशी माझ्या वडिलांची धारणा होती." या धारणेस अनुसरून जॉननें एकंदर परिस्थितीचा सांगोपांग विचार केला. आणि विद्यापीठाची वास्तु ज्या जागेवर उभी होती, तिच्या लगतच्या सर्व जमिनींची काळजीपूर्वक नोंदणी-तपासणी केली आणि मग पुढील पांच वर्षांत योग्य ते जमिनींचे तुकडे त्यानें विचारपूर्वक खरेदी केले. या अवधींत जॉन आणि शिकागोचा लँड एजंट यांजमध्यें शेकडों पत्रांची देवघेव झाली. जमिनीच्या प्रत्येक तुकड्याची जॉनला तपशीलवार माहिती हवी असे. डॉ. गुडस्पीड यानें शिकागो युनिव्हर्सिटीचा जो इतिहास लिहिला आहे, त्यांत या सर्व व्यवहाराची तपशीलवार नोंद केलेली आढळते. ती येणेंप्रमाणें : "इ. स. १९०७ च्या मार्च महिन्यांत रॉकफेलरनें युनिव्हर्सिटीच्या लगत मिडवे प्लेझन्सच्या दक्षिणेस असलेली जागा युनिव्हर्सिटीच्या हवालीं केली. त्यामुळें पश्चिमेस वॉशिंग्टन पार्कपासून पूर्वेस डॉर्चेस्टर अॅव्हेन्यूपर्यंत एकूण पावणेतीन मैल लांबीची प्लेझन्सवरील आघाडी युनिव्हर्सिटीस मिळाली आहे. या विस्तीर्ण जागेच्या खरेदीपायीं एकूण १५ लक्ष ८२ हजार डॉलर्सची रक्कम रॉकफेलरनें खर्ची घातली होती."

याच काळांत थोरल्या रॉकफेलरचा उच्च शिक्षण देणाऱ्या ज्या संस्थांशीं संबंध आलेला होता, त्यांच्या सर्वांगीण विकासांत धाकट्या रॉकफेलरनें लक्ष घातलें.

यापूर्वी थोरल्या रॉकफेलरनें वासार आणि ब्राउन विद्यापीठांस मोठाल्या देणग्या दिलेल्या होत्या. पण गेट्सच्या उदार मार्गदर्शनामुळें जॉनच्या दृष्टिकोणाची कक्षा अधिक विस्तृत झालेली होती, हें या काळांतील अनेक युनिव्हर्सिट्यांच्या प्रमुखांशीं त्यानें केलेल्या वाढत्या पत्रव्यवहारावरून सहज कळून येण्यासारखें आहे. या काळांत कोलंबिया युनिव्हर्सिटीचा सेथ लो, हार्वर्डचा डॉ. एलियट, वेलेस्लेची कॅरोलिन हॅझर्ड आणि ब्रिन मॉरची एम्. कॅरे, टॉमस, या नामांकित शिक्षणतज्ज्ञांशीं त्याचे संबंध उत्तरोत्तर वाढत गेले. या वाढत्या संबंधांमुळें कांहीं विशिष्ट अटींवर उपर्युक्त विद्यापीठांना कोट्यवधि डॉलर्सच्या देणग्या थोरल्या रॉकफेलरकडून मिळाल्या. या सर्व व्यवहारांत जॉननें यांजपैकीं प्रत्येक शिक्षणसंस्थेचा जो सूक्ष्म आणि बिनचूक परिचय करून घेतलेला होता, त्याची साक्ष मिळते.

इ. स. १९०० ते १९१० या काळांत मानवतेच्या सेवेप्रीत्यर्थ थोरल्या रॉकफेलरनें जो पैका वेंचला, तो जगांतील दानाच्या इतिहासांत केवळ अपूर्व समजावा लागेल. त्यानंतर धाकट्या रॉकफेलरनें वडिलांचें पुण्यस्मरण करून गत इतिहासाची आपल्या पिढींत पुनरावृत्ति केली. याच उल्लेखनीय दशकांत थोरल्या रॉकफेलरनें तीन जगड्व्याळ विश्वस्त-निधि प्रस्थापित केले. रॉकफेलर इन्स्टिटयूट फॉर मेडिकल रीसर्च, जनरल एज्युकेशन बोर्ड, आणि आतां विश्वविख्यात झालेलें रॉकफेलर फाउंडेशन. या त्रिविध विश्वस्त-निधीच्या प्रस्थापनेस धाकट्या रॉकफेलरचा मोटाच हातभार लागलेला आहे. उपर्युक्त विश्वस्त-निधींचीं सर्व सूत्रें पडद्याआड राहून प्रायः त्यानेंच हलविलेलीं आहेत.

प्रस्तुत संदर्भात आणखी एका व्यक्तीचा आवर्जून निर्देश करावयास हवा. आणि तो म्हणजे गेट्सचा. तिन्ही निधींची मूळ कल्पना आणि योजना मुख्यतः त्याचीच होती. अवाढव्य रॉकफेलर संपत्तीच्या निदिध्यासांत त्याचें मन सदा व्यग्र असे. "अरे, तुझा पैसा वाढतो आहे. दररोज—क्षणाक्षणाला वाढतोच आहे." थोरल्या रॉकफेलरला तो मोठ्या आवेशानें सांगत असे. "वेळींच हा सारा पैसा योग्य कामांत सर्वत्र विखुरला नाहीं तर फार मोठा धोका आहे. या पैशाचा प्रचंड हिमनग उद्यां उभा राहील. आणि जर का वेळींच सावध झाला नाहींस, तर तुझ्या आणि तुझ्या मुलाबाळांच्या डोक्यावर त्याचे तुटके कडे कोसळतील. त्यांच्या माराखालीं तुमचा पार चुराडा होऊन जाईल." खरोखर या एकाच प्रश्नानें गेट्सच्या मनाला सतत बेजार करून सोडलें होतें. मानवाच्या

कल्याणासाठीं या अचाट संपत्तीचा विनियोग कसा करतां येईल, ही एकच चिंता त्याच्या मनाला अहोरात्र जाळीत असे.

इ. स. १८९७ च्या उन्हाळ्यांत गेट्सनें ऑस्लरचा 'प्रिन्सिपल्स ॲन्ड प्रॅक्टिस ऑफ मेडिसिन' नामक ग्रंथ साक्षेपानें अभ्यासपूर्वक वाचून काढला. न्यूयॉर्कमधील कॉलेज ऑफ फिजिशिअन्स ॲंड सर्जन्समध्यें या प्रचंड ग्रंथाचा पाठ्यपुस्तक म्हणून उपयोग केला जात असे. वैद्यकविषयक ग्रंथांमध्यें या ग्रंथराजाचें अग्रस्थान त्या काळीं निर्विवाद होतें. "हा सबंध ग्रंथ अंथपासून इतीपर्यंत मीं वाचून काढला."—गेट्सनें कालांतरानें लिहून ठेविलेलें आहे. "हें सांगण्यांत माझ्या उद्योगाची स्तुति करावी, असा माझा मुळींच हेतु नाहीं. स्तुतीच करावयाची, तर ती ऑस्लरच्या मोहक लेखनशैलीचीच करावी लागेल. वाङ्मयीन सौंदर्यानें नटलेला असा हा एक दुर्मिळ वैज्ञानिक ग्रंथ आहे. त्याची भाषाशैली अशी मनोरम आहे कीं—पानांमागून पानें आणि प्रकरणांमागून प्रकरणें वाचतां वाचतां बारीक टाइपांत छापलेलीं हजारभर पानें मीं केव्हां संपविलीं, तें मला समजलें सुद्धां नाहीं."

पण या ग्रंथराजानें सुद्धां गेट्सची पुन्हा एकवार घोर निराशा केली. "अमेरिकेंत ज्या पद्धतीनें वैद्यक शिकविलें आणि आचरिलें जातें, ती पद्धति मुळांतच सदोष आणि म्हणून निरुपयोगी आहे." असें आपलें मत गेट्सनें यापूर्वींच व्यक्त करून ठेविलें होतें. "या एका बाबतींत पूर्वीपासूनच माझें मन शंकेखोर बनलेलें आहे."—तो लिहितो "आणि या ग्रंथानें माझ्या मनांतील शंका अधिकच बळावली आहे. वैद्यकावरील सर्व ग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर माझ्या मनाची अशी खात्री पटली आहे कीं आमचें वैद्यक या काळांत फार तर चार किंवा पांच रोग बरे करण्याचा दावा करूं शकेल. बहुतकरून निसर्गच रोग बरा करतो. पुष्कळ वेळां निसर्गाला डॉक्टरची साथ मिळतेच असें नाहीं...अशा परिस्थितींत माझ्यासारख्या रोगावर औषध मागणाऱ्या एका सामान्य माणसाचें ऑस्लर समाधान करूं शकला नाहीं...हें पुस्तक वाचून संपविल्यावर माझ्या मनांत जो विचार स्थिर झाला, तो हा कीं अमेरिकेंत वैद्यकाचा शास्त्रोक्त अभ्यास खरोखर होतच नाहीं. वैद्यकाच्या अभ्यासाची या देशांत मनस्वी उपेक्षा होत आहे...तेव्हां स्वाभाविकच मला असें वाटलें कीं आपल्या देशाची आणि पर्यायानें सर्व जगाची फार मोठी सेवा करण्याची संधि रॉकफेलरला प्रस्तुत क्षेत्रांत उपलब्ध आहे."

गेट्सच्या मनांत एखादी 'गर्भवती' कल्पना रुजली कीं लगेच 'जन्मासाठीं धावून जाण्यास' तो विलंब लावीत नसे. या वेळीं अशीच एक 'गर्भवती' कल्पना त्याच्या मनांत रुजली होती, आणि विलंब न लावतां लगेच जन्मास आली होती; व तो धावून गेला होता. नंतरचा इतिहास त्यानें स्वतःच लिहून ठेविला आहे: "माझी कल्पना रॉकफेलरच्या नजरेखालून घालण्यासाठीं मीं एक स्मरणपत्र लेखनिकास उतरून घेण्यास सांगितलें...बहुतेक कोणत्याहि रोगावर हमखास गुणकारी असें औषध येथें उपलब्ध होत नाहीं. आणि परिणामकारक औषधांच्या अभावी रुग्णांचें दुःख वाढत जातें. ही स्थिति बरी नव्हे, हें मीं आधींच सप्रमाण दाखवून दिलें. नंतर बर्लिनमधील कॉश इन्स्टिटयूट कसें उपयुक्त कार्य करीत आहे, आणि पॅरिसमधील पाश्चर इन्स्टिटयूटचें यश नेमकें कशांत आहे, तें पण मीं सप्रमाण दाखवून दिलें...समजा, वैद्यकीय संशोधनासाठीं स्थापिलेल्या या नियोजित संस्थेनें कसलाहि शोध लाविला नाहीं, तरी सुद्धां केवळ रॉकफेलरनें अशी एखादी वैद्यक संशोधन शाळा स्थापिली आहे—तो अशी संस्था स्थापण्यास सक्रिय साहाय्य करील, असें गृहीत धरून मी हें लिहीत आहें—तर माझी अशी खात्री आहे कीं याच प्रकारच्या अशा आणखी कांहीं संस्था स्थापन होतील. किंवा निदान अशा संस्थांच्या पुरस्कारासाठीं विश्वस्त-निधि यापुढें उपलब्ध होतील. परिणामीं या देशांतील वैद्यक संशोधनास गति मिळेल. कालांतरानें वैद्यक संशोधन मोठ्या प्रमाणावर चालविलें जाईल. आणि अनुभवी, निष्णात, अधिकारी कार्यकर्त्यांच्या यत्नांस अंतीं यश आल्याशिवाय राहणार नाहीं."

गेट्सनें वैद्यकीय संशोधनाबाबत सुचविलेल्या योजनेचा जो आराखडा थोरल्या रॉकफेलरला सादर करण्यांत आला, त्यांत ग्रथित केलेलें अशा प्रकारच्या संशोधनसंस्थांचें उद्दिष्ट आणि तत्त्वज्ञान लक्षणीय आहे. गेट्स लिहितो: "वैद्यकशास्त्र सुसंघटित व्हावें असें वाटत असेल, तर त्यासाठीं धनिकांनीं मुक्त हस्तानीं आवश्यक तेवढा पैसा पुरवावयास हवा. त्या पैशाच्या बळावर अशा संशोधन-संस्थांचा योगक्षेम निर्वेधपणें चालूं शकेल. आणि असें झालें तरच तज्ज्ञ माणसें अखंड व्यासंगास आणि संशोधनास वाहून घेतील. अर्थातच बुद्धिमान् आणि ध्येयवादी संशोधक फक्त संशोधनाच्या कामीं एकचित्त राबावेत अशी इच्छा असेल, तर प्रथम सांसारिक कटकटींपासून त्यांची मुक्तता व्हावयास हवी. आणि त्याच्या संशोधनास आवश्यक तें स्वास्थ्य त्यांना उपलब्ध करून द्यावयास हवें."

संशोधनाच्या संदर्भातील सर्व योजनांचा हा विचार म्हणजे गाभा आहे. आणि हा विचार कृतींत उतरविण्यासाठीं मुख्यतः धाकट्या रॉकफेलरचे श्रम कारणीं लागले आहेत. गेट्सच्या योजना परिणामकारकपणें कार्यवाहींत आणण्यासाठीं जॉननें जिवापाड यत्न केले. कित्येक वर्षांनंतर तो लिहिणार होता : 'गेट्स हा खरा प्रतिभाशाली द्रष्टा होता. शैक्षणिक आणि संशोधन योजनांचा खरा निर्माता तोच. मी केवळ विक्रेता होतों. योग्य संधि साधून माझ्या वडिलांचें मन गेटस्च्या योजनांस अनुकूल करून घेण्याची कामगिरी करणारा मी केवळ मध्यस्थ होतों. गेट्स आणि मी, आम्ही दोघेहि माझ्या वडिलांचे साहाय्यक होतों. आमचीं कार्यक्षेत्रें, तसें पाहिलें तर, अगदीं भिन्न होतीं. पण आम्ही दोघेहि एकोप्यानें इष्ट तो कार्यभाग साधण्यासाटीं झटत असूं. मेंदू शिणवून गेट्स विचार करीत असे. आणि त्याचे विचार माझ्या वडिलांस मी विकीत असें. अर्थातच एका दृष्टीनें मी फार भाग्यशाली असा दलाल होतों. कारण गिऱ्हाइकास मी केव्हांहि गांठूं शकत असें. आणि त्याचें मन अनुकूल करून घेण्यासाटीं आवश्यक ती संधि केवळ मलाच उपलब्ध होण्यासारखी होती. जेवण झाल्यानंतर माझे वडील माझें बोलणें ऐकण्यास उत्सुक असत. किंवा कधीं कधीं गाडीनें जातां–येतांना मी त्यांच्याशीं मोकळेपणानें गप्पागोष्टी करीत असें. त्यांचें मन प्रसन्न केव्हां आहे, तें मला बरोबर कळत असे. अर्थातच माझ्याव्यतिरिक्त हें काम इतर कोणास जमण्यासारखें नव्हतें, हें उघड आहे. त्यांच्या प्रसन्नवृत्तीचा फायदा घेऊन गेट्सच्या कल्पना कार्यान्वित करण्यासाठीं त्यांची संमति बहुतकरून मी मिळवीत असें."

जॉनचें हें निवेदन त्याच्या स्वाभाविक नम्रतेचें द्योतक आहे, हें न सांगतां देखील समजण्यासारखें आहे. गेट्सच्या योजना कार्यवाहींत आणण्यासाटीं थोरल्या रॉकफेलरची संमति आवश्यक होती, हें तर खरेंच. पण केवळ संमतीनें सारें कांहीं भागण्यासारखें नव्हतें. रॉकफेलर इन्स्टिट्यूटचा अहवाल चाळला, तर जॉननें या संस्थेच्या स्थापनेसाठीं आणि विकासासाटीं किती परिश्रम केले आहेत, त्याची कल्पना सहजीं येईल. कोणत्याहि योजनेंत पैसा गुंतविण्याचा प्रश्न आला कीं थोरला रॉकफेलर एकदम तडकाफडकीं निर्णय घेत नसे. तसा तो फार सावध होता. आणि पूर्ण विचार करून शांतपणानें सावकाश निर्णय घेण्याची त्याची वृत्ति होती. गेट्स काय करी, तर केवळ एखाद्या योजनेचा कच्चा आराखडा फार तर तयार करी. पण त्यानें सुचविलेली योजना कितपत व्यवहार्य आहे आणि योजना व्यवहार्य ठरल्यास ती कशी कार्यकर होईल, तें बघण्याचें काम अर्थातच जॉनचें

प्रौढग्रन्थमाला काळ. 23288 वि. ३३
नों: दि:

होतें. त्यासाठीं अगोदर डोकेफोड करणें आणि सर्व प्रकारची माहिती पद्धतशीर मिळवून त्या योजनेचा पक्का आराखडा जॉनलाच करावा लागे. रॉकफेलर इन्स्टिट्यूटची कल्पना कार्यवाहींत आणण्यापूर्वी जॉननें प्रथम कोलंबिया विद्यापीठाचा प्रमुख सेथ लो याचा सल्ला घेतला. लोनें आपल्यापरीनें जॉन्स हॉप्किन्सचा डॉ. विल्यम एच. वेल्श आणि न्यूयॉर्क येथील कॉलेज ऑफ फिजिशिअन्स ॲण्ड सर्जन्सचा डॉ. टी. मिचेल प्रूडेन्स या तज्ज्ञांकडे विचारणा केली आणि त्यांचीं उत्तरें थाकट्या रॉकफेलरकडे रवाना केलीं.

नंतर जॉननें डॉ. एल्. एम्. एच्. होल्ट यांजकडे सल्ला मागितला. व्यवहार-परत्वें उभयतांचा परिचय पूर्वींपासूनच होता. होल्टनें या योजनेंत एकदां लक्ष घातल्यावर जॉननें त्याला आभारपूर्वक लिहिलें: "या बाबतींत घाईघाईनें कांहीं-सुद्धां करण्याचा आमचा विचार नाहीं. जें काय करावयाचें, तें विचारपूर्वक करावयाचें, असें आम्हीं ठरविलें आहे. तेव्हां तूर्त तशी घाई मुळींच नको." यानंतर वीस वर्षांनीं होल्टनें प्रस्तुत संदर्भांतील आपल्या आठवणींना उजाळा दिला. होल्ट लिहितो :

"या संबंधांतील माझी अगदीं पहिली आठवण आहे ती थाकट्या रॉकफेलरशीं झालेल्या एका संभाषणाची. १९०० च्या नोव्हेंबरमध्यें आम्ही दोघेजण क्लीव्हलँडहून न्यूयॉर्कला एकाच गाडीनें येत होतों. या प्रवासांत आम्ही दोघेजण यासंबंधीं पुष्कळच बोललों, असें मला आतां स्पष्ट आठवतें. ...त्या वेळीं डिप्थेरिया ॲंटिटॉक्झिनचा उपयोग नुकताच करण्यांत येऊं लागला होता. आणि त्याच्या आश्चर्यकारक परिणामाची कल्पना तज्ज्ञांस येऊन चुकली होती. वैद्यक संशोधनाचा हा अपूर्व विजय कसा प्राप्त झाला, त्यासाठीं बेरिंग आणि रुआं या संशोधकांस किती दीर्घकाळपर्यंत परिश्रमपूर्वक कष्ट करावे लागले, त्याचा समग्र इतिहास मीं या भेटींत रॉकफेलरला सांगितला. वस्तुस्थिति अशी होती कीं, डिप्थेरिया ॲंटिटॉक्झिनचा शोध कांहीं एकाएकीं केवळ योगायोगानें असा लागलेला नव्हता. तर त्यासाठीं शरीरविज्ञानाच्या मूलभूत तत्त्वांची कसून चिकित्सा करणें आवश्यक होतें. प्रयोगशाळेंत वर्षानुवर्षें अखंड झटून केलेल्या प्रयोगांचें हें कष्टसाध्य फलित होतें, ही गोष्ट समजून घेणें आवश्यक होतें. उदाहरणादाखल हें सांगून झाल्यावर मीं जी योजना सुचविली ती अशी : वैद्यकांत आजवर विशेष

प्रगति झालेली दिसत नाहीं, याचें एक महत्त्वाचें कारण असें कीं, या शास्त्राच्या संशोधनालाच केवळ वाहून घेणारीं बुद्धिमान् माणसें उपलब्ध होत नाहींत. म्हणून एका संशोधनासाठीं आवश्यक अशी सुसज्ज प्रयोगशाळा आणि त्या प्रयोगशाळेंत अहर्निश झटून काम करण्यासाठीं निश्चित असें वातावरण उपलब्ध करून द्यावयास हवें.

यानंतर वेळोवेळीं आमच्या अनेक मुलाखती झाल्या. आणि वैद्यक-शास्त्राच्या संशोधनासाठीं या देशांत कांहीं तरी निश्चित अशी योजना कार्यवाहींत आणावयास हवी, असा रॉकफेलरच्या मनाचा कल दिसावयास लागला. नंतरहि अनेक वेळां हा संकल्प कृतींत कसा उतरवितां येईल, याविषयीं पुढील हिवाळ्यांत आम्हीं अनेक वेळां चर्चा केली...

या उद्दिष्टास अनुसरून कांहीं निश्चित अशी आंखणी आम्हीं केव्हां आणि कशी केली, तें मला अजून आठवतें. १९०१ मधील वसंत ऋतूंत माझ्या घरीं आम्ही भोजनासाठीं जमलों होतों. त्या वेळीं डॉ. ख्रिस्टियन ए. हर्टर पण तेथें होता. आम्हीं मिळून रॉकफेलरशीं या प्रश्नाविषयीं पुष्कळ चर्चा केली. बराच वेळ आम्ही बोलत बसलों होतों. आणि त्या बैटकींत या प्रश्नाचा आम्हीं सांगोपांग विचार केला. अखेरीस संध्याकाळच्या वेळीं रॉक-फेलरनें आमच्याजवळ नियोजित संशोधनकार्याचें संचालन करूं शकतील, अशा कांहीं वैज्ञानिकांच्या नांवांची मागणी केली. पहिलें नांव जें आम्हांस आठवलें, तें अर्थातच डॉ. वेल्श याचें. डॉ. प्रूडेन्स, डॉ. थीओबाल्ड स्मिथ आणि डॉ. ब्रिग्ज यांचीं नांवें पण त्या वेळीं आम्हीं सुचविलीं. नियोजित संशोधन संस्थेच्या संचालक समितीवर आम्हां उभयतांचीं नांवें घालण्यास संमति द्यावी, अशी रॉकफेलरनें आम्हांला विनंति केली...

या भेटीनंतर थोड्याच दिवसांनीं ता. १४ जून १९०१ रोजीं रॉकफेलरनें मला पत्र लिहून कळविलें कीं, त्याच्या वडिलांनीं तूर्त २,००,००० डॉलर्सची रक्कम संशोधनकार्यांत गुंतविण्याचें आश्वासन दिलें आहे.'

संशोधनकार्यासाठीं ही जी २,००,००० डॉलर्सची देणगी थोरल्या रॉकफेलरनें मंजूर केली होती, तिचा विनियोग पुढील वर्षांत करण्यांत यावयाचा होता. नियंत्रण मंडळानेंच खुद्द रक्कम आणि मुदत सुचविलेली होती. अर्थातच संशोधनकार्यास वाहिलेल्या वैद्यक संस्थेची जी योजना गेट्सनें सुचविली होती,

तिचें स्वरूप आणि कार्य याहून पुष्कळच अधिक व्यापक होतें. त्या व्यापक योजनेची ही केवळ मुहूर्तमेढ होती, हें उघड आहे.

आणखी एक वर्षानंतर नव्यानेंच स्थापन झालेल्या संशोधनसंस्थेचा अध्यक्ष डॉ. वेल्श याच्या नेतृत्वानें आणि धाकट्या रॉकफेलरच्या अखंड प्रोत्साहनानें गेट्सची संपूर्ण योजना स्वीकारण्यांत आली. यासंबंधांत रॉकफेलरनें डॉ. वेल्शला लिहिलें : "तुमच्या समितीच्या सर्व शिफारसींचा अनुकूल विचार करावयास मी आणि माझे वडील तयार आहोंत. याबाबत तुमचा अखेरचा निर्णय ठरला कीं त्याविषयीं लगेच मला कळविण्यास अनमान करूं नका." ता. २४ जून १९०२ रोजीं वेल्शला लिहिलेल्या पत्रांत धाकट्या रॉकफेलरनें आपल्या वडिलांच्या संमतीनें आणखी दहा लक्ष डॉलर्सची देणगी देणार असल्याचें आश्वासन दिलें. त्या दहा लाखांचा विनियोग न्यूयॉर्कमध्यें संस्थेसाठीं चांगली जागा खरेदी करण्यासाठीं आणि आवश्यक त्या इमारती बांधण्यासाठीं करावयाचा होता. ही तर केवळ सुरुवात होती. तदनंतरच्या कांहीं वर्षांत थोरल्या रॉकफेलरनें आणखी कित्येक दशलक्षांच्या रकमा संस्थेच्या वाढत्या कार्यासाठीं वेळोवेळीं मंजूर केल्या. मध्यंतरींच्या काळांत लेक्झिंग्टन ॲव्हेन्यूवरील एका इमारतीच्या माळ्यावर तात्पुरत्या प्रयोगशाळा उभारण्यांत आल्या. आणि येथें पॅथॉलजी, फार्माकॉलजी, फिजिऑलजी आणि बायॉलॉजिकल केमिस्ट्री या शास्त्रांतील वैज्ञानिक संशोधन सुरू करण्यांत आलें. आपल्या बापाचें लक्ष या कार्याकडे वेधण्यासाठीं रॉकफेलर कशा युक्त्या योजीत असे, त्याचें प्रत्यंतर या काळांत त्यानें आपल्या आईला लिहिलेल्या खालील पत्रांत मजेदार रीतीनें उमटलेलें आहे :

"या पत्रासोबत रॉकफेलर इन्स्टिटयूटच्या डायरेक्टरच्या अहवालाची आणि शिफारसींची एक प्रत पाठवीत आहें. या अहवालाच्या आधारावर न्यूयॉर्कमधील प्रयोगशाळेसाठीं नवी इमारत बांधण्याची आणि व्यापक स्वरूपाची एक कायमची संशोधनसंस्था निर्माण करण्याची निकड कोणासहि पटेल, असें मला वाटतें. हा अहवाल म्हणजे बोर्डाच्या अनेक सभासदांच्या संयुक्त यत्नांचा आणि त्यासाठीं तळमळीनें व साक्षेपानें त्यांनीं केलेल्या विचारांचा आणि व्यासंगाचा परिपाक आहे. या अहवालांतील एकंदर परिस्थितीचें निवेदन इतकें समर्पक आहे कीं तुला तो वाचावयास आवडेल, अशी माझी खात्री आहे. एखाद्या वेळीं वडील खुशींत असतांना ते तुला

हा अहवाल वाचून दाखविण्याची परवानगी देतील, अशा आशेनें मी तो पाठवीत आहें. त्यांनीं तो वाचावयास हवाच, अशी जरुरी मुळींच नाहीं. आणि या कामाची तशी घाई पण नाहीं. मला आपलें एवढेंच वाटतें कीं त्यांच्या अवलोकनांत हा अहवाल आला तर झालेल्या कार्याची यथोचित कल्पना त्यांना येईल. आणि ज्यांच्या नेतृत्वाखालीं हें सर्व काम चाललें आहे, ते किती जबाबदारीनें आणि साक्षेपानें आपलें काम करीत आहेत याची त्यांना कल्पना येईल. त्याचप्रमाणें या कामाचा एकूण विस्तार कसा आणि किती होऊं शकेल, हें समजण्यास पण या अहवालाची मदत होईल."

आणखी कांहीं वर्षांनंतर इन्स्टिटयूटसाठीं हॉस्पिटलची इमारत बांधण्याच्या संबंधांत जॉननें फिरून एकदां याच युक्तीचा अवलंब केलेला आढळतो. या खेपेस तो आपल्या आईस लिहितो :

"या पत्रासोबत गेट्सनें अलिकडे मला लिहिलेलें एक पत्र मुद्दाम पाठवीत आहें. पत्र हॉस्पिटलसंबंधीं आहें, हें तें वाचतांक्षणींच तुझ्या लक्षांत येईल. हें पत्र तुला आणि वडिलांना वाचावयास फार आवडेल, अशी माझी खात्री आहे. त्यांत पुन्हा तूं स्वतः जर तें त्यांना वाचून दाखविलेंस, तर त्यांना त्यांत अधिकच गोडी वाटेल, हें मला माहीत आहे. आणि म्हणून त्यांच्याकडे हें पत्र सरळ न पाठवितां मी तें तुझ्याकडे पाठवीत आहें."

सर्व आयुष्यभर धाकटा राकफेलर हा रॉकफेलर इन्स्टिटयूटचा निष्ठावंत असा आधारस्तंभ होऊन राहिला होता. त्याच्या थोर पित्यानें स्थापन केलेली ही पहिलीच महान् संस्था होती. आणि यामुळेंच कदाचित् त्याच्या अंतःकरणांत या संस्थेस पहिलें स्थान प्राप्त झालें असावें. बापाचा प्रतिनिधि म्हणून तो या संस्थेच्या विकासांत जातीनें लक्ष घालीत होता. आणि तिच्या संगोपनात कांहीं उणें पडूं नये, म्हणून काळजी वाहत होता. इ. स. १९०६ मध्यें त्यानें आपल्या बापास लिहिलें : 'रॉकफेलर इन्स्टिटयूटला कमींत कमी ५० लक्ष डॉलर्स तरी लागतील.'—आणि त्यापुढील अनेक वर्षांत मुख्यतः पुत्राच्याच आग्रहामुळें थोरल्या रॉकफेलरनें या इन्स्टिटयूटला अनेक अवाढव्य देणग्या दिल्या. वेळोवेळीं दिलेल्या या देणग्यांच्या रकमांची बेरीज केवळ आश्चर्यकारक आहे.

इ. स. १९१० मध्यें या इन्स्टिटयूटच्या आर्थिक व्यवहारासाठीं एक विश्वस्त-मंडळ स्थापिण्यांत आलें. संस्थेच्या वैज्ञानिक संशोधनासाठीं तज्ज्ञांचें वेगळें मंडळ होतेंच. तेव्हां विश्वस्त मंडळाचा एक सभासद म्हणून काम करण्यास धाकट्या रॉकफेलरनें संमति दिली. पण त्यापूर्वी त्या विश्वस्त-मंडळाचा अध्यक्ष म्हणून गेट्सची प्रथम निवड व्हावी, अशी त्यानें मागणी केली. इन्स्टिटयूटच्या निर्मितीचें सर्व श्रेय गेट्सचेंच आहे, असें तो म्हणत असे. इ. स. १९२८ मध्यें गेट्सच्या निधनानंतर धाकट्या रॉकफेलरची त्याच्या जागीं निवड करण्यांत आली. आणि इ. स. १९५० पर्यंत विश्वस्त मंडळाचा अध्यक्ष म्हणून त्यानें काम केलें. या वर्षी त्यानें आपली जबाबदारी तरुण माणसांच्या हातीं सुपूर्द केली. जवळजवळ अर्धशतकपर्यंत उणींपुरीं पन्नास वर्षें त्याच्या निष्ठेचा आणि सेवेचा इन्स्टिटयूटला लाभ घडला.

तदनंतर 'जनरल एज्युकेशन बोर्ड' या दुसऱ्या एका महान् संस्थेची स्थापना थोरल्या रॉकफेलरनें केली. दक्षिणेंतील नीग्रो शिक्षणांत रॉकफेलर कुटुंबाचे पूर्वीपासूनच दानसंबंध गुंतलेले होते. त्या प्रदेशांतील बॅप्टिस्ट शिक्षणसंस्थांस रॉकफेलर कुटुंबांतील मंडळी नेहमींच मुक्त हस्तानें सर्वतोपरींची मदत करीत असत. त्यामुळें स्पेल्मन सेमिनारी, हॅम्प्टन आणि टक्सेगीसारख्या शिक्षणसंस्था आणि रॉबर्ट सी. ओग्डेन, जे. एल्. एम्. करी आणि जॉन एफ. स्लेटरसारखे शैक्षणिक नेते यांच्याशीं रॉकफेलर कुटुंबाचे घनिष्ठ संबंध जडलेले होते. ॲटलांटामधील स्पेल्मन सेमिनारी—म्हणजेच नंतरचें स्पेल्मन कॉलेज—या संस्थेस धाकट्या रॉकफेलरच्या आजीचेंच नांव देण्यांत आलें होतें. इ. स. १८८० मध्यें रॉकफेलर कुटुंबानें या संस्थेस भेट दिली होती. तेव्हां या आजीबाई स्वतः त्या मंडळींत होत्या. इ. स. १८९७ मध्यें रॉकफेलर आपल्या बापाच्या ऑफिसमध्यें जावयास लागला, तेव्हां इतर अनेक जबाबदाऱ्या त्यानें स्वीकारल्या, त्यांतच ही पण एक होती. दक्षिणेंतील शिक्षणसंस्थांत थोरला रॉकफेलर मुक्त हस्तानें देणग्या देत असे. या संबंधांत बापाचें प्रतिनिधित्व जॉन करूं लागला. आणि त्या काळांतील पत्रव्यवहार तपासून पाहिला तर जॉननें आपल्या जबाबदारीचें हें क्षेत्र किती विस्तृत केलें, त्याबाबत किती उत्साह दाखविला आणि चिंता वाहिली, त्याची साक्ष पटते.

इ. स. १९०१ मध्यें धाकट्या रॉकफेलरनें रॉबर्ट सी. ओग्डेनबरोबर दक्षिण राज्यांचा एक दौरा केला. आणि त्या वेळीं या विषयाकडे त्याचें लक्ष अधिकच

तीव्रतेनें वेधलें. ओग्डेन हा एक श्रीमान् व्यापारी होता. पण त्याच्या सहानुभूतीचें क्षेत्र विशाल होतें. आणि जॉन वानामेकरच्या सहवासांत सतत राहिल्यामुळें अनेक सामाजिक कार्यक्षेत्रांत त्याचा पुढाकार होता. दक्षिण राज्यांतील नीग्रोंच्या शिक्षणाचा प्रश्न मोठा बिकट होता. आणि या प्रश्नांत त्यानें मनापासून लक्ष घातलेलें होतें. नीग्रो मुलांसाठीं सर्वत्र शिक्षणसंस्थांची स्थापना करून प्रत्येक नीग्रो सुशिक्षित करण्याचें स्वप्न साकार करण्यासाठीं त्याचे नित्य यत्न चालले होते. या माणसाची कल्पनाशक्ति मोठी विलक्षण होती. आणि दर वर्षी पेन्सिल्व्हेनिया रेल रोडकडून एक खास गाडी भाड्यानें घेऊन विविध कार्यक्षेत्रांत नेतृत्व करणाऱ्या पन्नास स्त्रीपुरुषांना त्या भागांतील प्रमुख नीग्रो शाळा तो दाखवून आणीत असे. गेलीं कित्येक वर्षें त्याचा हा कार्यक्रम अव्याहत चालू होता. पहिल्या दौऱ्याच्या वेळीं त्याच्याबरोबर धाकटा रॉकफेलर, वॉल्टर हाइन्स पेज, जॉर्ज फॉस्टर पीबॉडी, आल्बर्ट शॉ, जॉन ग्रॅहम ब्रुक्स, बिशप डोन, विल्यम एच्. बाल्डविन, लायमन ॲबट इत्यादि नामांकित होते. दक्षिणेंतील वृत्तपत्रांच्या खबचट भाषेंत बोलावयाचें तर ही 'कोट्यधीशांची स्पेशल' अनेक शिक्षण-संस्थांच्या ठिकाणांना भेट देऊन आली. हॅम्प्टन इन्स्टिटयूट, ग्रीन्सबरो येथील स्त्रियांसाठीं चालविलेलें नार्थ कॅरोलिना कॉलेज, स्पेल्मन कॉलेज, जॉर्जियामधील ॲटलांटा युनिव्हर्सिटी पाहून झाल्यावर ही सर्व मंडळी आलाबामा राज्यांतील टस्केगी येथें गेली. त्याशिवाय अनेक शिक्षणसंस्थांचें कार्य त्यांनीं आपल्या डोळ्यांखालून घातलें.

ही गाडी न्यूयॉर्कला परतली, त्या वेळीं गाडींतच अनेक सभा घेऊन पुष्कळ विचारविनिमय करण्यांत आला. वॉशिंग्टन आणि ली युनिव्हर्सिटीचा प्रमुख हेन्री सेंट जॉर्ज टकर यानें अंतिम सभेंत जें परिणामकारक भाषण केलें, त्याचा दृश्य परिणाम रॉकफेलरच्या यापुढील अनेकविध कार्यांतून प्रकट होणार होता. त्या वेळीं टकर म्हणाला होता, "नीग्रोंना सुशिक्षित करण्याची कल्पना जर तुमच्या डोक्यांत असेल, तर दक्षिण राज्यांतील गोरी प्रजा आधीं अनुकूल करून घ्यावयास हवी. तुमच्या औदार्यामुळें नीग्रो मुलांना जें शिक्षण उपलब्ध होत आहे, तें आपल्या मुलांस मात्र मिळत नाहीं, असें गरीब गोऱ्या माणसांस आढळून आलें, तर त्यांच्या मनांतील असंतोषामुळें तुमचें सर्व कार्य विफल होण्याचा धोका आहे. खरें म्हणजे तुमच्या या अशा यत्नांत तुम्हांला खरोखर यश हवें असेल, तर नीग्रो मुलांबरोबर गरीब गोऱ्यांच्या मुलांना पण शिक्षणाची संधि तुम्हीं लोकांनीं

उपलब्ध करून द्यावयास हवी. गरीब गोऱ्यांच्या आणि काळ्यांच्या उन्नतीसाठीं एकसाथ यत्न व्हावयास हवेत." 'न्यूयॉर्क वर्ल्ड' मधील वृत्तांत सांगतो कीं, या घोषणेनंतर टाळ्यांचा जो कडकडाट झाला, त्यांत गाडीचा आवाजसुद्धां बुडून गेला.

या दौऱ्यावरून धाकटा रॉकफेलर परत आला, तो जसा कांहीं जीवितकार्य सांपडल्याच्या जाणिवेनें भारल्यासारखा. हें विशिष्ट कार्यक्षेत्र असें होतें कीं ज्यांत त्याच्या बापानें पण रस घेतलेला होता. आणि आतां त्याच कार्यक्षेत्रांत कांहीं शाश्वत स्वरूपाचें संस्मरणीय कर्तृत्व करून दाखविण्याची संधि आतां उपलब्ध झाली होती. आपल्यापुढील कार्याची आंखणी करण्यापूर्वी त्यानें केवळ आपल्या बापाचाच सल्ला घेतला असें नाहीं. त्यानें गेट्सचें पण मार्गदर्शन मिळविलें. रॉकफेलरप्रमाणेंच मॉरिस के. जेसप हा पण या बाबतींत कांहीं करण्याची उमेद बाळगून होता. या दौऱ्यामुळें त्याच्या मनांतील सहानभूति जागी झाली होती. आणि तिचें समाधान शोधण्याचा यत्न यापुढें तो निष्ठेनें करणार होता. बाप्टिस्ट होम मिशन सोसायटीचा सेक्रेटरी डॉ. वॉलेस बट्रिक याच्याशीं सुद्धां त्यानें या प्रश्नासंबंधीं सांगोपांग चर्चा केली. धाकट्या रॉकफेलरच्या मनांतील स्वप्न साकार करण्याच्या कामीं बट्रिकचे यत्न पुढील पाव शतकांत मनस्वी उपकारक ठरणार होते.

या सर्व सभांतून जी योजना अखेर निष्पन्न झाली, ती कार्यवाहींत आणण्यासाठीं जेसप ओग्डेन, पीबॉडी, बाल्डविन, करी, बट्रिक आणि धाकटा रॉकफेलर यांची एक समिति नियुक्त करण्यांत आली. ता. १५ जानेवारी १९०२ रोजीं जेसपच्या घरीं हे सर्व जण एकत्र जमले. आणि या शतकांतील एक अत्यंत दूरदर्शी, लोकोपकारक असें जिचें गौरवपूर्वक यथार्थ वर्णन करतां येईल, अशी एक योजना या सभेंत संमत करण्यांत आली. यानंतर आणखी एका महिनाभरांत जॉनच्या घरीं ही सर्व मंडळी भोजनाच्या निमित्तानें पुन्हा एकत्र जमली. जॉननें त्यानंतर आपल्या घरीं पत्र लिहून कळविलें कीं, ॲबे ही एकच स्त्री या सभेंत उपस्थित होती. एका उदात्त कार्यासाठीं एकत्र आलेल्या या संघटनेनें आणखी चौघांस समितीवर नियुक्त करून घेतलें. वॉल्टर हाइन्स पेज, आल्बर्ट शॉ, डॅनिअल कॉइट जिल्मन, आणि एडवर्ड एम्. शेपार्ड. यांपैकीं शेपार्डनें मार्गदर्शन करावें, असें ठरविण्यांत आलें. याच महत्त्वाच्या सभेंत शेपार्डनें 'जनरल एज्युकेशन बोर्ड' नामक एका नव्या संस्थेचा व्यापक सरनामा वाचून दाखवला. या सरनाम्यांत निर्दिष्ट केलेला नियोजित संस्थेचा उद्देश असा होता : अमेरिकेंतील

संयुक्त राज्यांत वंशलिंगधर्मनिरपेक्ष शिक्षणाचें नियोजन करणें. याच सभेंत जॉननें आपल्या बापाच्या वतीनें या संस्थेसाठीं दहा लाख डॉलर्सची देणगी देण्याचें आश्वासन दिलें. पुढील दहा वर्षांत या रकमेचा विनियोग नियोजित संस्थेच्या कामासाठीं करण्यांत यावा, असें रॉकफेलरनें सांगितलें.

इ. स. १९०३ मध्यें उपकारक नेतृत्वानें जरी उपर्युक्त संस्थेची स्थापना करण्यांत आली, तरी जनरल एज्युकेशन बोर्डाचें व्यापक कर्तृत्व इ. स. १९०५ पर्यंत निदर्शनास येणार नव्हतें. या वर्षी या संस्थेच्या विकासास अचानक गति मिळाली. रॉकफेलरच्या अवाढव्य संपत्तीचा यथायोग्य व्यय कसा करावा, या चिंतेंत गेट्स सदा चूर असे, म्हणून मागें सांगितलेंच आहे. हजार वाटांनीं घरांत येणाऱ्या या संपत्तीचा विनोयोग कसा करावयाचा, कोणत्या रीतीनें या अगण्य संपत्तीचा उपयोग केला असतां तो भविष्यास उपकारक ठरेल, या संबंधांत त्यानें लिहून ठेविलें आहे : "आमच्या देशांत आणि इतर देशांतील सुधारणेचा सर्वांगीण प्रचार व्हावा, यासाठीं मि. रॉकफेलर आणि त्याचा पुत्र या उभयतांनीं मिळून संयुक्त सहकारी दानयोजना निर्माण कराव्यात, याविना अन्य मार्ग मला दिसेना...नुसत्या कोरड्या सिद्धांतांनीं रॉकफेलरच्या मनाचें समाधान होण्यासारखें नव्हतें, हें मला अनुभवानें पुरतेपणीं कळून चुकलें होतें. त्याचें मन कार्यरत करावयाचें, तर त्यासाठीं कार्यवाहींत आणतां येतील अशा योजनांची आंखणी करणें आवश्यक होतें. आणि म्हणून योजनांची सूत्रबद्ध आंखणी करण्याच्या मार्गास मी लागलों."
—या बाबतींत धाकट्या रॉकफेलरशीं अनेक वाटाघाटी केल्यानंतर ता. ३ जून १९०५ रोजीं गेट्सनें थोरल्या रॉकफेलरला एक महत्त्वाचें पत्र लिहिलें. या पत्राचे ऐतिहासिक परिणाम दूरगामी ठरणार होते. प्रस्तुत पत्रांत गेट्सनें लिहिलें :

> "आतां तुमच्यासमोर दोन मार्ग आहेत. त्यांतील एक असा कीं तुम्हीं आणि तुमच्या अपत्यांनीं आपल्या हयातींतच मानवजातीच्या कल्याणासाठीं चिरंतन स्वरूपाच्या संयुक्त सहकारी दानसंस्था निर्माण करण्याच्या कामीं आपल्या अवाढव्य संपत्तीचा विनियोग करावयाचा—किंवा दुसरा मार्ग असा कीं आपल्या आयुष्याच्या अंतीं या संपत्तीची हवी तशी वाट लागलेली मिटल्या डोळ्यांनीं बघावयाची. कांहीं श्रीमंतांच्या संपत्तीची अशी विल्हेवाट लागलेली इतिहासास माहीत आहे. आणि असें झालें असतां अनपेक्षित भयावह परिणाम घडण्याची शक्यता नेहमींच विचारांत घ्यावयास हवी."

उपर्युक्त दोन पर्यायांपैकीं पहिला कसा युक्त आहे, हें गेट्सनें बिनतोड युक्तिवाद करून पटवून दिलें: "याविना अन्य पर्याय नीतिदृष्ट्या सर्वथा घातक ठरेल."—गेट्स पुढें लिहितोः "तुमच्या ह्यातींत हा विश्वस्त निधि योग्य कारणीं लावावयाचा असेल, तर त्यासाठीं एकच एक मार्ग उपलब्ध आहे, आणि तो म्हणजे यथायोग्य देखरेखीखालीं कायदेशीर संयुक्त सहकारी दानयोजना कटाक्षानें कार्यवाहींत आणण्याची व्यवस्था करणें...अर्थात् मानव-जातीच्या कल्याणासाठीं या दानयोजना मार्गस्थ होतील, अशी दक्षता आपण घ्यावयास हवी."

यानंतर आपल्या मनांत कोणत्या कल्पना घोळत आहेत, त्याचें त्यानें सोदाहरण सोपपत्तिक विवेचन केलें : "अमेरिकेंतील उच्च शिक्षणाच्या वितरणा-साठीं एक प्रचंड दानयोजना, अखिल जगांतील वैद्यक-संशोधनासाठीं एक दानयोजना, अमेरिकेंतील नागरिकांचीं मनें सुसंस्कृत व्हावींत म्हणून विविध कलांच्या अभिवृद्धीसाठीं एक दानयोजना, शास्त्रोक्त शेतीसाठीं आणि अनागर जीवन संपन्न करण्यासाठीं एक दानयोजना, अखिल जगतांत ख्रिश्चन संस्कृति प्रचलित करण्यासाठीं एक दानयोजना, अमेरिकेंतील नागरजीवनांत बुद्धिवादी सुधारणा प्रचलित करण्यासाठीं आणि नागरनीतीचें संगोपन करण्यासाठीं एक दानयोजना..." अशा अनेक दानयोजनांचें प्रतिपादन केल्यानंतर गेट्स पुढें लिहितो :

> "प्रस्तुत दानयोजना कार्यवाहींत आणण्यासाठीं जे निधि कारणीं लावावयाचे, ते एवढे प्रचंड असावेत कीं त्यांजपैकीं कोणा एका निधीचा जो विश्वस्त होईल, त्याला एकदम सार्वजनिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. हे निधि एवढे प्रचंड असावेत कीं त्यांचा विनियोग हा सार्वजनिक चिंतेचा, टीकेचा आणि देखरेखीचा विषय व्हावा. आज ज्याप्रमाणें सरकारी कामकाजावर लोकांची सक्त नजर असते, त्याचप्रमाणें प्रस्तुत निधींवर लोकांची सक्त नजर असावी. हे निधि एवढे प्रचंड असावेत कीं अखिल सुसंस्कृत जगाचें लक्ष त्यांजकडे वेधलें जावें, आणि जगांतील सुसंस्कृतांच्या सुबुद्ध टीकेचे ते निरंतर विषय व्हावेत. हे निधि एवढे प्रचंड असावेत कीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जगाच्या प्रत्येक पिढींतील अत्युच्च बुद्धिमत्ता या निधींकडे आकर्षिली जाईल..."

—गेट्सनें हें ऐतिहासिक पत्र थोरल्या रॉकफेलरला उद्देशून लिहिल्यानंतर धाकट्या रॉकफेलरनें त्या पत्राच्या पाठोपाठ लगेच आपल्या पित्यास आणखी एक पत्र लिहिलें. बहुतकरून गेट्सशीं संपूर्ण विचारविनिमय केल्यानंतर हें पत्र लिहिलेलें दिसतें. प्रस्तुत पत्रांत तो लिहितो : "मि. गेट्सचें पत्र आपण वाचलेंच असेल. मला वाटतें कीं त्या पत्रांतील युक्तिवाद केवळ बिनतोड आहे... माझ्या मतानें प्रस्तुत प्रश्नासंबंधींचा त्यांतील विचार अत्यंत व्यापक आणि दूरदर्शी आहे...त्या पत्रांतील विचारांशीं मी अंतःकरणपूर्वक सहमत आहें. त्यानें सुचविलेली योजना कार्यवाहींत आणणें शहाणपणाचें ठरेल, असें आपणांस वाटेल, अशी मला आशा आहे."

प्रस्तुत पत्रांतून जे विचार व्यक्त करण्यांत आले होते, आणि तदनुसार पितापुत्रांत जो विचारविनिमय झाला, त्यांची परिणति लगेच कृतींत अवतरली. तदनंतर एका पंधरवड्याच्या अवधींत थोरल्या रॉकफेलरनें जनरल एज्युकेशन बोर्डाच्या हवालीं एक कोटी डॉलर्स केले, आणि आणखी दीड वर्षानंतर तीन कोटी वीस लक्ष डॉलर्सच्या देणगीची त्यांत भर घातली. 'रॉकफेलर इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल रीसर्च'साठीं मोठाल्या देणग्यांचा ओघ अप्रतिहत सुरू झाला. आणि अशा रीतीनें रॉकफेलर फाउंडेशनच्या निर्मितीसाठीं अनुकूल अशी परिस्थिति आतां निर्माण झाली. जनरल एज्युकेशन बोर्डास पहिली मोठी देणगी जाहीर झाल्यानंतर धाकट्या रॉकफेलरनें आपल्या पित्यास लिहिलें : "मला वाटतें कीं ही घटना फार मोठी आहे. आणि तिचे परिणाम एवढे दूरगामी होणार आहेत कीं त्यांची आज आपल्याला कल्पनासुद्धां करतां येणार नाहीं."

तदनंतरच्या अर्धशतकांत ज्या कांहीं घटना घडल्या, त्यांजमुळें ही भविष्यवाणी किती अचूक होती, तें आज प्रत्ययास येतें. केवळ जनरल एज्युकेशन बोर्डाचाच विचार केला, तरीसुद्धां या भविष्याची प्रचीति पुरेपूर पटेल. इ. स. १९०५ मध्यें गेट्स या संस्थेचा पहिला अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आला. आणि इ. स. १९१७ मध्यें वॉलेस बट्रिक त्याच्या जागीं आला. मध्यंतरींच्या कालावधींत अमेरिकेंतील शिक्षणाच्या विकासास या संस्थेनें किती आणि कशी मदत केली, तो इतिहास सर्वांस माहीतच आहे. तदनंतर कित्येक वर्षें उलटून गेल्यावर धाकटा रॉकफेलर म्हणाला : "डॉ. बट्रिकच्या ऑफिसमधील भिंतीवर टांगलेला अमेरिकेचा नकाशा अजून माझ्या डोळ्यां-समोर आहे. त्या भल्या मोठ्या नकाशावर शेकडों टांचण्या टोचलेल्या होत्या. सर्व

देशांत काळ्या किंवा गोऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं जेथें म्हणून शिक्षणसंस्था स्थापन करण्यांत आल्या होत्या, तें तें स्थान प्रत्येक टांचणी बिनचूक दाखवीत असे...त्या नकाशाकडे नुसती नजर टाकली, तरी प्रत्येक राज्यापैकीं महत्त्वाच्या शिक्षणसंस्था नेमक्या कोठें आहेत, कोणत्या क्षेत्रांत या संस्थांचें जाळें अधिक घनदाट पसरलें आहे आणि कोणत्या क्षेत्रांत त्यांची अजून आवश्यकता आहे, तें क्षणार्धांत समजून येत असे." —या बोर्डाचा एक विश्वस्त म्हणून धाकट्या रॉकफेलरनें एकूण छत्तीस वर्षें काम केलें. आणि नंतर तर या संस्थेच्या अध्यक्ष-पदाची धुरा त्यानेंच वाहिली.

इ. स. १९०५ मध्यें गेट्स आणि धाकटा रॉकफेलर या दोघांनीं मिळून जी विस्तृत योजना सादर केली होती, त्यांतील एका सूचनेमधून दुसरी एक अजस्र विश्वव्यापक संस्था आकारास आली. नंतरच्या वर्षाच्या अखेरीस धाकट्या रॉकफेलरनें आपल्या पित्यास आणखी कांहीं योजना सुचविल्या. त्या योजनांत कालांतरानें निर्माण होणाऱ्या जगड्व्याळ रॉकफेलर फाउंडेशनचीं बीजें होतीं. थोरल्या रॉकफेलरनें या सर्व कल्पना उत्साहानें उचलून धरल्या. त्या वेळीं त्यानें आपल्या पुत्रास लिहिलें : "या तुमच्या सूचनांचा मी अवश्य विचार करीन. पण तूर्त मला असें वाटतें कीं तुम्हीं कामास लागावें. मनांत उमेद बाळगावी कीं या तुमच्या सूचनांतून कांहीं ना कांहीं इष्ट फलनिष्पत्ति होईल."

इ. स. १९०८ च्या मार्च महिन्यापर्यंत धाकटा रॉकफेलर रॉकफेलर फाउंडेशनच्या आंतर-राज्य चार्टरविषयीं सेनेटर आल्ड्रिचला लिहीत होता. या नियोजित संस्थेस रॉकफेलरकडून दहा कोटी डॉलर्सची अकल्पनीय देणगी मिळावयाची होती. पण राजधानींत, वॉशिंग्टनमध्यें चार्टर देण्यास विलंब लागणार, असा रंग दिसतांच थोरल्या रॉकफेलरनें पुढील सालच्या जून महिन्यांत अखेरच्या करारपत्रावर सही केली. प्रस्तुत करारपत्रान्वयें धाकटा रॉकफेलर, मि. गेट्स आणि हॅरोल्ड मॅकॉर्मिक—त्याचा जावई—या तिघां विश्वस्तांच्या हवालीं न्यू जर्सी स्टॅंडर्ड ऑइल कंपनीचे ७२,५६९ शेअर्स केले. त्या वेळीं त्यांची किंमत पांच कोटी डॉलर्स होती. हा प्रचंड निधि 'रॉकफेलर फाउंडेशन' या नांवानें ओळखला जावा, अशी तरतूद करण्यांत आली होती. कॉंग्रेसकडून कायदा होऊन चार्टर मिळावयास विलंब लागणार होता, म्हणून ही तात्पुरती योजना कार्यवाहींत आणण्यांत आली होती. प्रस्तुत संस्थेची संपूर्ण मालकी रॉकफेलरकडेच राहणार होती. एक सामान्य नागरिक म्हणून आपल्या मालकीच्या मालमत्तेचा आणि पैशाचा

विनियोग जगांत कोठेंहि कायदेशीरपणानें करण्याचा अधिकार त्याला खचित होता. या संबंधांत गेट्स म्हणतो : "खरें म्हणजे कॉंग्रेसनें चार्टर दिल्यास...खुद्द रॉकफेलरचे अधिकार मर्यादित होणार होते. कारण चार्टर दिला गेला, तर थोरल्या रॉकफेलरचा नियोजित निधीवरील अधिकार संपुष्टांत आला असता. आणि एका स्वतंत्र, कायद्यानें बांधलेल्या अशा, स्वयंचलित संस्थेच्या हातीं रॉकफेलर निधीचा वापर राहिला असता. उलट बाजूनें विचार करावयाचा तर रॉकफेलर ही व्यक्ति मर्त्य आहे. पण चार्टर चिरंतन आहे. एका व्यक्तीची बुद्धिमत्ता ती काय ? चार्टर मिळेल तर कर्तृत्ववान्, सुयोग्य अशा विश्वस्तांच्या आधीन हा निधि होईल. आणि ज्या कल्याणाच्या कामीं त्यांचा विनियोग व्हावयाचा आहे, तें काम अधिक चोख होण्यास मदत होईल."

चार्टरसंबंधांत कॉंग्रेसमध्यें जो प्रदीर्घ लढा झाला, त्याचा इतिहास प्रस्तुत संदर्भांत अप्रस्तुत आहे. पर्यवसानीं फाउंडेशनला चार्टर मिळवून देऊं पाहणारा कायदा कॉंग्रेसमध्यें संमत होऊं शकला नाहीं, ही गोष्ट खरी. या वेळीं रॉकफेलर पितापुत्रांवर वैयक्तिक हल्ले चढविण्याची संधि अनेकांनीं साधून घेतली. आणि त्यामुळें अनेक प्रकारचे गैरसमज सर्वत्र फैलावले. पण तरीसुद्धां रॉकफेलर पितापुत्रांचें धैर्य खचलें नाहीं. आणि शेवटीं इ. स. १९१३ च्या वसंत ऋतूंत न्यूयॉर्क राज्याच्या कायदे मंडळानें रॉकफेलर फाउंडेशनला चार्टर दिला. परिणामीं चार्टर मिळविण्यांत रॉकफेलरला यश आलें. संकल्पित संस्थेचें उद्दिष्ट या वेळीं गेट्सनें ज्या शब्दांत सांगितलें, ते शब्द तदनंतर संस्थेला निरंतर मार्गदर्शक ठरले आहेत. त्या वेळीं गेट्स म्हणाला, "जगांतील अखिल मानवजातीचें कल्याण साधणें, हा या फाउंडेशनचा एकमेव उद्देश आहे.' तदनंतरच्या अर्धशतकांत अखिल जगांतील असंख्य राष्ट्रांनीं गेट्सनें निर्देशिलेला उद्देश सफल झाल्याची ग्वाही दिली आहे. रॉकफेलर फाऊंडेशनचा पहिला प्रेसिडेंट म्हणून धाकट्या रॉकफेलरची निवड करण्यांत आली. आणि नंतर इ. स. १९१७ मध्यें फाउंडेशनच्या विश्वस्त-मंडळाचा चेअरमन म्हणून तो निवडला गेला. अशा रीतीनें एकूण तेवीस वर्षें रॉकफेलर फाउंडेशनच्या कामकाजावर त्याची निःपक्षपाती देखरेख राहिली. त्याचें क्रियाशील नेतृत्व या संस्थेस उपकारक ठरलें. मानवास साहाय्य करण्यासाठीं जेवढी म्हणून बुद्धि आणि शक्ति वेंचणें शक्य आहे, तेवढी त्यानें वेंचली.

इ. स. १९१८ मध्यें आपल्या दिवंगत पत्नीच्या स्मरणार्थ थोरल्या रॉकफेलरनें

आणखी एका फाउंडेशनची स्थापना केली. तिचें नांव "लॉरा स्पेल्मन रॉकफेलर मेमोरिअल". या संस्थेची सर्व व्यवस्था त्यानें आपल्या पुत्राच्या हातीं सुपूर्द केली. धाकट्या रॉकफेलरनें या संस्थेच्या कार्यांत पहिल्यापासून लक्ष घातलें आणि तिची मनःपूर्वक जोपासना करण्यांत आपली सर्व शक्ति वेंचली. दहा वर्षेंपर्यंत प्रामुख्यानें सामाजिक शास्त्रसंशोधनाच्या आणि यंत्रणेच्या क्षेत्रांत अत्यंत यशस्वी कार्य केल्यानंतर ही संस्था रॉकफेलर फाउंडेशनमध्यें विलीन करण्यांत आली.

हा वेळपर्यंत ज्या चार संस्थांचा आपण विचार करीत होतों, त्या संस्थांचा ताळेबंद पाहिल्यास थोरल्या रॉकफेलरनें एकूण किती रकमा या संस्थांच्या कारणीं खर्चीं घातल्या, त्याची यथायोग्य कल्पना येईल. खालीं जे आंकडे दिले आहेत, ते ज्या दिवशीं या रकमा देण्यांत आल्या, त्या दिवसाच्या बाजारभावांचे निदर्शक असे आहेत :

| | | |
|---|---|---|
| रॉकफेलर इन्स्टिटयूट फॉर मेडिकल रीसर्च | डॉ. | ६०,६७४,४०९·४५ |
| जनरल एज्युकेशन बोर्ड | ,, | १२९,२०९,१६७·१० |
| रॉकफेलर फाउंडेशन | ,, | १८२,८५१,४८०·९० |
| लॉरा स्पेल्मन रॉकफेलर मेमोरिअल | ,, | ७३,९८५,३१३·७७ |
| | एकूण डॉ. | ४४४,७१९,३७१·२२ |

उपर्युक्त संस्थांपैकीं 'रॉकफेलर इन्स्टिटयूट फॉर मेडिकल रीसर्च' ही एक संस्था अशी आहे कीं जी फक्त स्वतःच्या अधिकारक्षेत्रांतील कामांतच लक्ष घालते. आणि त्याबाहेरील कोणत्याहि कार्यासाठीं देणग्या मंजूर करीत नाहीं. या एका संस्थेव्यतिरिक्त इतर संस्थांच्या कार्यासाठीं मूळ भांडवलांतून आणि प्राप्तींतून ज्या रकमा खर्चीं घालण्यांत आल्या आहेत, त्यांची एकूण बेरीज ८५ कोटी डॉलर्सच्यावर होते.

★ ★ ★

प्रकरण सातवें

# कोलोराडो संप

ता. २३ सेप्टेंबर १९१३ रोजीं दक्षिण कोलोराडोंतील कोळशाच्या खाणींतील सुमारें नऊ हजार खाण-कामगार संपावर गेले. सर्वांनीं आपापली चीजवस्त गोळा केली. बाडबिस्तरे गुंडाळले, आणि आपापल्या कुटुंबियांना बरोबर घेऊन हे खाण-कामगार खाणीच्या कक्षेबाहेरील तंबूंत जाऊन राहिले. 'युनायटेड माइन वर्कर्स ऑफ अमेरिका' या खाण-कामगारांच्या संघटनेनें ही तंबूतील वसाहत उभी केली होती. जरी खाणींचे व्यवस्थापक आणि खाण-कामगार यांच्यांतील संघर्ष प्रारंभापासून तीव्र स्वरूपाचा होता, तरीसुद्धां हा संघर्ष पंधरा महिने चालेल आणि त्यांतून एवढा कडवटपणा, हिंसा आणि दुःख निर्माण होईल, असें भविष्य उभय-पक्षांपैकीं कोणींच वर्तवलें नसतें. किंवा जुनाट आणि निरुपयोगी झालेल्या व्यवस्थे-खालीं केवढा औद्योगिक असंतोष धुमसत आहे, त्याची जाणीव सर्व राष्ट्रास धक्का देणारी ठरेल, याची कल्पनासुद्धां उभयपक्षांपैकीं कोणा एकास त्या वेळीं करतां आली नसती. संपाचा शेवट होण्यापूर्वींच सर्व राष्ट्रांत जो आगडोंब उसळला, त्याचें मूळ कारण या संपाच्या घटनेंतच होतें, यांत शंका नाहीं. पण याच्या जोडीला आणखी एक गोष्ट आगींत तेल ओतून भडका उडविण्यास कारणीभूत झाली. या संपाच्या वावटळींत एकूण वीस कंपन्या सांपडल्या होत्या. त्यांपैकीं सर्वांत मोठी 'कोलोराडो फ्युएल अँड आयर्न कंपनी' होती. या कंपनीचे सर्वाधिक शेअर्स जॉन डी. रॉकफेलरच्या मालकीचे होते. पुन्हा एकदां निर्दय, हृदयशून्य उद्योगपति म्हणून

त्याची संभावना होण्याचा समय प्राप्त झाला होता. कामगारांच्या हक्कांविषयीं सर्वस्वीं उदासीन असा भांडवलवाला म्हणून रॉकफेलरचा दुर्लौकिक या निमित्तानें होणार होता.

पण याच वेळीं थोरला रॉकफेलर सर्व आर्थिक व्यवहारांतून निवृत्त झाला आहे आणि त्यानें या सर्वांत मोठ्या खाणीसंबंधींची सर्व जबाबदारी आपल्या पुत्राच्या हातीं निरविली आहे, अशी वार्ता येऊन थडकली. पूर्वीपासून धाकटा रॉकफेलर या कंपनीचा डायरेक्टर होताच. आणि आतां तर या दारुण संघर्षाच्या प्रसंगीं मुख्यत्वेंकरून त्यालाच लोकांच्या टीकेस निर्धारानें तोंड द्यावें लागलें. लोकांच्या विरोधाचा जबरदस्त तडाखा आयुष्यांत पहिल्यानेंच या वेळीं त्याला सहन करावा लागला. शिव्याशापांचा त्याच्यावर वर्षाव करण्यांत आला. खुनाच्या धमक्या त्याला देण्यांत आल्या. आणि या संपांतून निर्माण झालेल्या भयावह संकटपरंपरेस तोच व्यक्तिशः कारणीभूत आहे, असें सर्वत्र बोललें जाऊं लागलें. लोकांच्या अविचारी रोषाचा बळी झाल्यामुळें 'ब्यूरो ऑफ सोशल हायजिन' आणि 'रॉकफेलर फाउंडेशन' सारख्या उपयुक्त संस्थांच्या संबंधांतील त्याचें कार्य धोक्यांत येणार, अशीं चिन्हें दिसावयास लागलीं. कोलोराडो संपाच्या अग्नींतून एक नवा फिनिक्स पक्षी जन्म घेणार होता. आणि आणखी कांहीं वर्षांनंतर हें प्रकरण म्हणजे आपल्या आयुष्यांतील एक मौल्यवान् अनुभव होय, असें तो म्हणणार होता. पण संपांतून निर्माण झालेल्या कटकटी ज्या वेळीं शिगेस पोहोंचल्या आणि त्यांतून भयंकर उग्र अशी परिस्थिति निर्माण झाली, त्या वेळीं पुढील भविष्याची कोणास कल्पनासुद्धां करतां येण्यासारखी नव्हती.

इ. स. १९१३ मध्यें कोलोराडो खाणींतील संप ही कांहीं एकाकी, अनपेक्षित, अपघाती अशी घटना नव्हती. उभय पक्षांतील अविश्वासाच्या आणि संघर्षाच्या दीर्घकालीन वातावरणाची ही स्वाभाविक परिणति होती. कोलोराडो पर्वतांतील निर्जन दऱ्याखोऱ्यांतून खाण-कामांचे एकाकी तळ सर्वत्र पडावयास लागले, तेव्हांच भांडवलवाले मालक आणि श्रमजीवी कामगार यांच्यांतील वितुष्टाचीं बीजें पेरलीं गेलीं होतीं. या तळांचीं वसति-स्थानें आणि तेथें वसाहत करून राहणाऱ्या लोकांचें अनैसर्गिक जीवन, यांजमुळें एक तऱ्हेच्या अनियंत्रित जमीनदारी राज्यपद्धतीचा तेथें फैलाव झाला होता. खाणींची मालकी ज्या कंपन्यांकडे होती, त्यांनीं अनेकविध भूमिका वठविण्याचा चंग बांधला होता. जमीनदार, व्यापारी, कायदे करणारा आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी करणारा,

फार काय अप्रत्यक्षपणें भिक्षुक आणि शिक्षक, या सर्व भूमिका या कंपन्यांस वटवाव्या लागल्या. अधिकांत अधिक चांगलें बोलावयाचें, तर तेथील परिस्थिति सर्वतोपरीनीं असमाधानकारक होती. तेथें सर्व सत्ता कंपनींत केंद्रित झाल्यामुळें कंपनीचे अधिकारी बेगुमान बनले होते. कामगारांच्या रास्त मागण्यांची सतत उपेक्षा करीत राहण्याचें त्यांचें धोरण होतें. आणि हातीं असलेल्या अनिर्बंध सत्तेचा गैर-वापर करण्याकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति होती. मालक आणि मजूर यांच्यांतील संबंध सदाचे ताणलेले होते. कामगारांना न्याय देऊं शकेल अशी यंत्रणा तेथें कोठें अस्तित्वांतच नव्हती. अशा प्रकारच्या सहकारी उद्योगांत मजुराचें स्थान महत्त्वाचें मानावयास हवें, ही जाणीवच कंपन्यांच्या कारभारांतून लुप्त झालेली होती.

कंपनी कोणतीहि असो, खाण-कामगारांच्या विशिष्ट मागण्या एकरूप होत्या. कामाचे तास आणि पगार यांबाबत कामगारांच्या तक्रारी वाजवी होत्या. कामगार-संघटनेला मान्यता मिळावी, मुकादम निवडण्याचा हक्क कामगारांस असावा, कंपनीनें चालविलेल्या दुकानांतून माल खरेदी करण्याची सक्ती नसावी, राज्यांत इतर मजुरीविषयक जे कायदे होते आणि ज्यांची तेथें सतत उपेक्षा होत होती, ते कायदे जारी करावेत, या कामगारांच्या प्रमुख मागण्या होत्या. याशिवाय तांत्रिक स्वरूपाच्या किरकोळ मागण्या बऱ्याच होत्या. कामगारांच्या मागण्यांची वर जी यादी दिली आहे, तिच्यावरून कामगारांची हलाखी व दैन्यावस्था सहज कळून येईल. पण कामगारांतील असंतोषाचीं मुळें यापेक्षांहि अधिक खोलवर रुजलेलीं होतीं. खरी गोष्ट अशी होती कीं कामगार आणि मालक यांच्यामध्यें अतूट असें अंतर निर्माण झालेलें होतें. कामगारांच्या तक्रारी म्हणजे आंतमध्यें खोलवर धुमसणाऱ्या अग्नीचीं केवळ मुखें होतीं. कसलीहि तात्पुरती तडजोड करून उभयतांमधील संबंध सुधारण्याची आशा फारच कमी होती. कामगारांकडे पाहण्याच्या मालकाच्या दृष्टिकोणांत कांहीं क्रांतिकारक बदल झाल्याशिवाय उभय-तांत सलोख्याचें वातावरण निर्माण होणें बिकट होतें. वस्तुस्थिति स्फोटक होती. आणि मालकांनीं अनियंत्रित सत्तेची हाव सोडून मजुरांशीं स्नेहाचे संबंध प्रस्थापित केल्यावांचून भडकलेली आग शमण्याचीं चिन्हें दिसत नव्हतीं.

कोलोराडो फ्युएल अँड आयर्न कंपनीचे व्यवस्थापक जुनाट, जमीनदारी वातावरणांत रुळलेले आणि वाढलेले होते. कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा चेअरमन एल्. एम्. बॉवर्स, कंपनीचा प्रेसिडेंट जे. एफ्. वेलबॉर्न, आणि

सुपरिंटेंडंट ई. एच्. वैटझेल हे सर्व अधिकारी जुन्या परंपरेंत मुरलेले होते. आणि त्यांच्या हातीं सर्व सत्ता एकवटलेली होती. बॉवर्स हा गेट्सचा चुलता. तो रोखठोक व्यवहार करणारा, फटकळ बोलणारा आणि स्वतःच्या कर्तृत्वावर अमर्याद विश्वास ठेवणारा असा मनस्वी पुरुष होता. संपावर गेलेले कामगार, विशेषेंकरून त्यांचे पुढारी, हे सर्व त्याच्या मतानें कुप्रसिद्ध प्रक्षोभक, समाजवादी आणि अराज्यवादी असे होते. त्यानें धाकट्या रॉकफेलरला पाठविलेल्या एका पत्रांत लिहिलें होतें: "हीं अशीं दंगलखोर माणसें, त्यांच्या जोडीला कांहीं सवंग कॉलेज प्रोफेसर्स आणि घाण उपसणाऱ्या मासिकांतून लेख लिहिणारे घाणेरडे लेखक, आणि त्यांच्या जोडीला कांहीं व्यवहारशून्य नास्तिक पाद्री, या सर्वांनीं मिळून देशांतील उद्योगांवर आघात करण्याचा चंग बांधलेला दिसतो. प्रचंड उद्योग निर्माण करण्यांत आणि आपल्या देशाचें भवितव्य घडविण्यांत ज्यांनीं आपली उभी हयात घालविली, त्यांच्यावर हल्ला करण्याची परवानगी अशा समाजकंटकांना मिळूं शकते, हें विशेष होय! माझें असें ठाम मत आहे कीं असले घातक विचार देशभर पसरवूं पाहणाऱ्या या लोकांच्या प्रचारास परिणामकारक पायबंद घालण्याची हीच वेळ आहे. खरें म्हणजे आतां सुद्धां उशीरच झालेला आहे. पण समाजद्रोही गुंडांच्या कारवाया हाणून पाडण्यास फार उशीर झाला, असें केव्हांच म्हणतां यावयाचें नाहीं."

धाकट्या रॉकफेलरच्या ऑफिसमध्यें कोलोराडो संपाची वार्ता येऊन थडकली, ती पहिल्यांदा बॉवर्सच्या आणि नंतर वेलबॉर्नच्या पत्रांतून. या पत्रांतील मजकुरामुळें धाकट्या रॉकफेलरची अशी समजूत झाली कीं कंपनीची बाजू न्यायाची आहे. आणि म्हणून त्यानें कंपनीच्या अधिकारी वर्गास पाठिंबा देते वेळीं अनमान केला नाहीं. मजूर खात्याचा सेक्रेटरी विल्सन यानें एथेलबर्ट स्टेवर्टची नेमणूक या वादांत मध्यस्थ म्हणून केली, म्हणून तो २६, ब्रॉडवे येथें संप टाळण्या-संबंधांत काय उपाययोजना करतां येईल, त्याविषयीं चर्चा करण्यासाठीं आला. तेव्हां रॉकफेलरचा वकील स्टार जे. मर्फी यानें त्याला परस्पर कळविलें कीं कोलोराडोमधील कंपनीचा अधिकारी वर्ग याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यास समर्थ आहे. न्यूयॉर्कमधील कंपनीच्या डायरेक्टर्सना डेन्व्हरमधील परिस्थितीची कांहींसुद्धां कल्पना नाहीं. आणि म्हणून तेथील अधिकाऱ्यांस कांहीं सूचना करण्याची त्यांची इच्छा नाहीं. बॉवर्स आणि वेलबॉर्न यांना लिहिलेल्या पहिल्या पत्रांतून मर्फी आणि धाकटा रॉकफेलर या दोघांनींहि तेथील कारवायांस पाठिंबा

दिला. ता. ६ ऑक्टोबर १९१३ रोजीं ब्रॉवर्सला पाठविलेल्या पत्रांत धाकटा रॉकफेलर लिहितो: "कंपनीच्या नोकरवर्गाविषयीं आणि त्यांच्या हितासंबंधीं आमच्या मनांत जशी चिंता आहे, तशीच तुमच्याहि मनांत असणार. आजवर तुम्हीं जें कांहीं केलें, तें रास्त आणि न्याय्य आहे, अशीच आमची भावना आहे. सर्व खाणींची एक संघटना बांधण्यांत कामगारांचें हित आहे, अशी जी भूमिका तुम्हीं घेतली आहे, ती आम्हांस मान्य आहे. याचे परिणाम काय होणार असतील ते होवोत. अखेरपर्यंत आम्ही तुमची भूमिका उचलून धरूं, आणि तुम्हांला आम्ही कदापि अंतर देणार नाहीं, असा विश्वास बाळगा."

दोन्ही बाजूंनीं जो परस्परविरोधी पुरावा दाखल करण्यांत आला, त्यावरून अत्याचाराची पहिली आगळीक कोणाकडून, केव्हां आणि कशी झाली, त्याचा कयास आज बांधणें केवळ अशक्य आहे. प्रथमपासूनच दोन्ही बाजूंचे लोक सशस्त्र होते. युनायटेड माइन वर्कर्सनें संपवाल्यांस हत्यारें पुरविलेलीं होतीं. तर विरुद्ध बाजूला कंपन्यांनीं सशस्त्र पहारेकऱ्यांची नेमणूक केलेली होती. खाणींच्या सरहद्दीबाहेर तंबूंत वसाहत करून जे कामगार होते, त्यांच्या व कंपनीच्या पहारेकऱ्यांच्या वारंवार चकमकी उडत, आणि कालांतरानें तर त्यांच्यांत उघड युद्धच जुंपलें. ता. १७ ऑक्टोबर रोजीं कांहीं संपवाले आणि डेप्युटी शेरिफ्स यांच्यांत गोळागोळी झाली. लढाई संपण्यापूर्वींच कांहीं शेरिफ्स एका हत्यारबंद गाडींतून कामगारांच्या वसाहतींत घुसले. तेथें त्यांनीं किमान मशिनगनचा मारा केला. त्यामुळें तंबू कोलमडून पडले. आणि कित्येक माणसें ठार झालीं. यानंतर दंगलीनें अधिक उग्र स्वरूप धारण केलें. परस्परांतील द्वेषभाव चांगलाच चेतावला गेला. शेवटीं गव्हर्नरनें कंपन्यांस लष्कराची कुमक पुरविण्याचें कबूल केलें. आणि ता. २९ ऑक्टोबर रोजीं राज्याचें लष्कर खाणविभागांत येऊन थडकलें.

लष्कराच्या आगमनानें कामगारांना प्रथम आनंद झाला. कारण कंपन्यांच्या पहारेकऱ्यांविषयीं त्यांच्या मनांत पराकाष्ठेचा त्वेष निर्माण झालेला होता. पण कालांतरानें लष्करांतील सैनिक आणि वसाहतींतील कामगार यांच्यांत खटके उडावयास लागले. संपाचा वणवा जसा भडकत चालला तसा नागरिकांच्या मनांतील निःपक्षपात भाव लुप्त झाला. जे नागरिक नॅशनल गार्डचे सैनिक होते त्यांनीं राजिनामे सादर केले. आणि त्यांच्या जागीं बेजबाबदार माणसांची नेमणूक करावी लागली. त्यांच्यापैकीं कांहीं जण पूर्वींचे पहारेकरी होते. याचा एक परिणाम

असा झाला कीं, लष्करांतील सैनिक पक्षपाती बनले. पूर्वी सैनिकांचें वर्तन अपक्षपाताचें होतें. पण आतां शांतता प्रस्थापित करण्यासाठीं म्हणून आलेले सैनिकच कामगारांशीं शत्रुत्वाच्या भावनेनें वागावयास लागले.

संप सुरू झाल्यापासून कांहीं महिन्यांच्या अवधींत हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्ह्जच्या कमिटी ऑफ माइन्स ॲंड माइनिंगनें संप-प्रकरणीं एक सब-कमिटी नेमिली. १९१४ मधील मार्च महिन्याच्या अखेरीस धाकट्या रॉकफेलरला साक्ष देण्यासाठीं म्हणून बोलावण्यांत आलें. तदनंतर त्यानें आपल्या पित्यास पाठविलेल्या पत्रांत यासंबधीं लिहिलें: "पुढील सोमवारीं साक्षीच्या संबंधांत मी वॉशिंग्टनला जाणार आहें. मि. मर्फी माझ्याबरोबर येणार आहे. माझ्या साक्षींत मी जी कांहीं माहिती देऊं शकेन, तिचा चौकशीस काय उपयोग होईल तें मला माहित नाहीं. पण मीं असा विचार केला कीं ज्याअर्थी साक्षीसाठीं आमंत्रण आलेंच आहे, त्याअर्थी तें स्वीकारणें शहाणपणाचें आहे. म्हणून विलंब न लावतां मीं आमंत्रणाचा स्वीकार केला."

चौकशी समितीसमोर साक्षीस उभें राहण्याचा धाकट्या रॉकफेलरच्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग. त्या वेळचा अनुभव सुखकारक नव्हता. किंबहुना यातनामय होता. या वेळीं त्याची परिस्थिति मोठी चमत्कारिक होती. संपाबाबत कंपनीनें जी भूमिका घेतली होती, तिचें समर्थन करणें तर त्याला भागच होतें. पण कोलोराडोमधील संपप्रकरणाची पार्श्वभूमि त्याला अपरिचित होती. उदाहरणार्थ, मजुरांचीं घरें आणि त्यांचे पगार यासंबंधांत त्याला विचारलें असतां, आपणास त्याची कांहींसुद्धां माहिती नाहीं, असेंच त्याला सांगावें लागलें. कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा तो एक सभासद होता. पण किती सभांना तो हजर राहूं शकला, म्हणून प्रश्न केला तर बोर्डाच्या सभा कोलोराडोंत होत असल्यामुळें आपण एकाहि सभेस हजर राहूं शकलों नाहीं, अशी सरळ कबुली त्याला द्यावी लागली. तो म्हणाला, "इतक्या दूर अंतरावरून आम्ही काय करूं शकणार ? तेथील अधिकारी वर्गावर आमचा विश्वास आहे. जें जें म्हणून रास्त आणि न्याय्य आहे, तें तें अधिकारी करतील हें आम्हांला माहीत आहे. ज्या क्षणाला आमची अशी खात्री पटेल कीं त्यांचें वर्तन योग्य नाहीं, ज्या क्षणाला आमची खात्री पटेल कीं त्यांचें धोरण शहाणपणाचें नाहीं, त्याच क्षणाला त्यांना जाब विचारण्याचें आमचें कर्तव्य आम्हांला पार पाडावें लागेल."

संपासंबंधीं विचारलें असतां बॉवर्सच्या पत्रांतून जी कांहीं माहिती त्याला

मिळाली होती तीच फिरून सांगणें भाग होतें. बहुसंख्य मजुरांना संप नको होता, असें सांगितलें. पण तरीसुद्धां मजुरांच्या संघटनेला कंपनी मान्यता देत नाहीं, इत्यादि त्यांना सांगून आणि क्वचित् धमक्या देऊन संपावर जाण्यास नाखूष असलेल्या कामगारांना संपांत खेंचण्यांत आलें, असें त्यानें सांगितलें. शंभरांतील नव्वद कामगार युनियनचे सभासद नव्हते आणि त्यांना संपावर जाण्याची इच्छा नव्हती, असें तो म्हणाला. युनियनच्या भाडोत्री प्रचारक गुंडांनीं संपाचा वणवा चेतवून दिला, म्हणून त्यानें सांगितलें. आणि अखेरीस क्लोज्ड शॉपच्या तत्त्वास आपला प्रखर विरोध आहे. कारण तदनुसार कामाच्या अटी ठरविण्याच्या संबंधांत कामगारांस स्वातंत्र्य राहत नाहीं, असें तो म्हणाला. साक्षींत जीं प्रश्नोत्तरें झालीं, त्याची ही एक नोंद बघण्यासारखी आहे. शितावरून भाताची परीक्षा सहज करतां येईल.

चेअरमन फॉस्टर : इतके खून पडले, तरी तुला त्याची कदर नाहीं. प्राणहानि झाली तरी चालेल, पण...एकदां प्रत्यक्ष जावें आणि तेथील परिस्थिति सुधारण्याची कांहीं खटपट करावी, असें कांहीं तुला वाटत नाहीं?

मि. रॉकफेलर : मि. चेअरमन, मला वाटतें चालू परिस्थितींत फक्त एकच गोष्ट करण्यासारखी आहे...आणि ती ही कीं वसाहतींतील मजुरांच्या संघटनेस मान्यता देणें... माझी खात्री आहे कीं मजुरांच्या युनियनला मान्यता दिली, तर संप मागें घेतला जाण्याची शक्यता आहे. पण या घटकेस अशी मान्यता दिल्यानें मजुरांचें हित साधेल, असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. युनियनला मान्यता न देण्यांतच मजुरांचें हित आहे असा आमचा विश्वास आहे. आणि म्हणून येथील अधिकारी वर्गाला आम्ही कदापि अंतर देणार नाहीं...अधिकाऱ्यांना सदोदित आमचा पाठिंबा आहे.

चेअरमन फॉस्टर : आणि मजुरांना संघटनेचा हक्क देण्याऐवजीं तुमच्या अधिकारी वर्गाला तुम्ही पाठिंबा देत राहणार. असेंच ना?

मि. रॉकफेलर : असेंच कांहीं नाहीं, महाशय. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं बाहेरच्या लोकांनीं तेथील कामगारांना व्यर्थ चिथावूं नये. आमची अशी खात्री आहे कीं कंपनीचे कामगार स्वतः संतुष्ट आहेत. पण हे बाहेरचे लोक त्यांना चिथावतात...

साक्षीच्या वेळीं धाकट्या रॉकफेलरनें जो संयम दाखविला आणि ज्या शांतपणानें

त्यानें उत्तरें दिलीं, त्याचा एकूण परिणाम चांगलाच झाला. पण त्याच्या साक्षीची प्रतिक्रिया निदान उदारमतवादी वर्तुळांतून तरी प्रतिकूल अशी झाली. त्याचे टीकाकार म्हणूं लागले कीं, 'गैरहजर भांडवलशाही'चें समर्थन करण्याचा निष्फळ यत्न करण्याची पाळी त्याच्यावर आली. कित्येक विचारी निरीक्षकांचें मत असें झालें कीं डेन्व्हरमधील कंपनीच्या अधिकारी वर्गास परिस्थितीस योग्य असें वर्तन करण्याचा अखत्यार देऊन रॉकफेलरनें डायरेक्टर आणि स्टॉकहोल्डर या नात्यानें आपली जबाबदारी संपूर्णपणें पार पाडली आहे.

रॉकफेलरची साक्ष झाल्यानंतरच्या पंधरवड्यांत अशी एक घटना घडली कीं जिच्यामुळें लोकमत रॉकफेलर्सच्या विरुद्ध एकदम खवळून उठलें. हिंसेस प्रोत्साहन देणारी परिस्थिति आतां बरीच निवळली आहे, अशा समजुतीनें कोलोराडोच्या गव्हर्नरनें लष्कर मागें घेण्यास अनुज्ञा दिली होती. एर्वीतेर्वी तेथील लष्कराचा खर्च राज्यसरकारास चालवावा लागत होता व तो झेपण्यासारखा नव्हता. तेव्हां हळूहळू लष्कर मागें घेतलें गेलें. फक्त ज्या ठिकाणीं दंगल होण्याचा संभव होता, त्या ठिकाणीं मात्र पहाऱ्यासाठीं कांहीं छोटया तुकड्या मागें ठेवण्यांत आल्या. अशा परिस्थितींत लडलोमधील एका कामगार छावणींत ता. २० एप्रिल रोजीं अनपेक्षितपणें एक भयानक प्रसंग गुदरला. येथें एका टेकडीच्या आश्रयानें मैदानांत तंबू ठोकून कांहीं संपवाले कामगार सहकुटुंब राहत होते. मागच्या टेकडीवर पस्तीस सैनिकांची गस्त होती. कांहीं चुकीमुळें किंवा गैरसमजामुळें कोठून तरी एक गोळी झाडली गेली. पहिली गोळी कोणत्या बाजूनें सुटली त्याचा निर्णय कधींच लागला नाहीं. पण दोन्ही बाजू सशस्त्र होत्या. आणि एकदम गोळागोळी चालू झाली. मध्यरात्रीनंतर सुद्धां दोन्ही बाजूंचे लोक एकमेकांवर गोळ्यांचा वर्षाव करीत होते. अखेरीस लष्करांतील सैनिकांनीं छावणीवर हल्ला करून तिचा ताबा घेतला. आणि सारी छावणीच पेटवून भस्मसात् करून टाकली. या चकमकींत कित्येक संपवाले ठार झाले. पण दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत तेथील अत्याचाराची कोणासच अचूक वार्ता कळली नाहीं. सकाळीं बघतात तर गुहेंत अकरा लहान मुलें आणि दोन स्त्रिया गुदमरून मरण पावलेल्या आढळून आल्या. या निरपराध बायकामुलांनीं मशिनगनच्या माऱ्यापासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं या गुहेचा आश्रय घेतला होता.

या क्रूर अत्याचाराची वार्ता जेव्हां संपवाल्यांच्या कानांवर जाऊन आदळली, तेव्हां स्वाभाविकच ते बेहोश झाले. रक्तपाताच्या या एका घटनेव्यतिरिक्त

दुसऱ्या कशाचाच विचार करण्याच्या मनःस्थितींत ते राहिले नव्हते. गेला सर्व हिवाळा त्यांनीं मनस्वी हालअपेष्टांत काढलेला होता. आणि अगोदरपासूनच त्यांच्या मनांत अंगार धुमसत होता. त्यांत या नवीन दुःखदायक वार्तेचें पेट्रोल पडलें, आणि मग एकदम मोठा भडका उडाला. संपवाल्यांनीं शस्त्रें उचललीं आणि संहाराच्या निर्धारानें ते छावणीबाहेर पडले. तावडतोब लष्कर परत पाठविण्यांत आलें. युनियननें लढ्याचा आदेश दिला, आणि सर्व राज्यांतील कामगार या लढाईत सामील झाले. खाणींवर हल्ले झाले, आणि कित्येक खाणी जाळून बेचिराख करण्यांत आल्या. इमारती उद्ध्वस्त झाल्या. लुटालूट सुरू झाली. आणि आतां सर्व राज्यांत अराजक माजतें कीं काय, अशी स्थिति निर्माण झाली. अखेरीस निर्वाणींच्या निराशेनें गव्हर्नरनें राष्ट्राध्यक्ष विल्सनकडे आंतरराज्य फौजेची मागणी केली. विल्सननें कोलोराडो राज्यांत बंडाळीची स्थिति जाहीर केली. आणि ता. ३० एप्रिल रोजीं संयुक्त राज्यांच्या घोडेस्वारांच्या सहा तुकड्या कोलोराडोंत दाखल झाल्या. नंतर कालांतरानें लढाई थांबली. शांतता प्रस्थापित झाली. पण उभयपक्षीं तडजोड होण्याची आशा मात्र आतां कायमची दुरावली, असें वाटावयास लागलें.

या तथाकथित 'लडलो कत्तली'नंतर देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत रॉकफेलरविरुद्ध निषेधाच्या आरोळ्या घुमावयास लागल्या—"कोणत्याहि परिस्थितींत कंपनीच्या अधिकारी वर्गास मी कदापि अंतर देणार नाहीं." ही आपल्या साक्षींत त्यानें दिलेली घोषणा लोक अजून विसरले नव्हते. आतां पुन्हा एकदां त्या घोषणेची आठवण सर्वांस नव्यानें झाली. आणि रॉकफेलर-विरुद्ध कडवटपणाचें आणि सूडबुद्धीचें वातावरण तापावयास लागलें.

लगेच रॉकफेलरविरुद्ध सार्वजनिक निदर्शनें व्हावयास लागलीं. प्रचंड निषेध-सभांचा सर्वत्र डोंब उसळला. न्यूयॉर्कमध्यें शत्रुत्वभावनानें भारलेल्या कामगारांचे मोर्चे निघावयास लागले. दंगलखोर जमावांनीं २६, ब्रॉडवेवरील रॉकफेलर ऑफिस आणि फोर्थ स्ट्रीटवरील रॉकफेलरचें निवासस्थान वेढलें. आणि दोन्ही ठिकाणीं खवळलेल्या कामगारांनीं निरोधन सुरू केलें. न्यूयॉर्कमधील कांहीं कामगारांनीं टॅरी टाउनमधील रॉकफेलर घराच्या बाहेर निदर्शनें करावयाचा यत्न केला. पण गांवकऱ्यांनींच तो हाणून पाडला. लोअर ब्रॉडवेमध्यें जमलेल्या जनसमुदायासमोर भाषण करीत असतांना एका वक्त्यानें रॉकफेलरला 'कुत्र्या-सारखी गोळी घालावी' म्हणून श्रोत्यांस आदेश दिला. परिस्थितीचा गंभीरपणा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
क्रमांक 23288 दि. 5/2/71
नोंद दि. 7/5/7

उत्तरोत्तर उग्र होत चालला. भरीस भर म्हणून धाकट्या रॉकफेलरचें घर उडवून देण्यासाठींच बहुशः तयार केलेल्या एका टाइम बॉम्बचा लेक्झिंग्टन ॲव्हेन्यूमधील एका चाळींत अचानक स्फोट झाला. या स्फोटांत आय्. डब्ल्यू. डब्ल्यू. चे चार सभासद कामगार ठार झाले, आणि सात चाळकरी जखमी झाले.

रॉकफेलरविरुद्ध सर्वत्र जीं उग्र निदर्शनें होत होतीं, त्यांना जबाबदार लोकांचा मुळींच पाठिंबा नव्हता. पण अमेरिकन जनतेपासून आपण दुरावल्याची दुःख-दायक जाणीव या वेळीं जशी धाकट्या रॉकफेलरला झाली, तशी यापूर्वी कधींच केव्हां झाली नव्हती. या संपासंबंधीं तो गंभीरपणानें विचार करावयास लागला होता. आणि संपासंबंधींच्या त्याच्या विचारांत कांहीं महत्त्वाचे निर्णायक बदल याच वेळीं घडून येत होते. हा वेळपर्यंत कोलोराडोमधील परिस्थितीचें त्याचें ज्ञान बॉवर्स आणि वेलबॉर्न यांनीं पत्रांतून पुरविलेल्या माहितीपुरतेंच मर्यादित होतें. उभयतांनीं पुरविलेल्या माहितींत सत्याचा अंश किती आहे, असा प्रश्न करण्याऐवजीं त्यांचा दृष्टिकोण बरोबर आहे किंवा नाहीं, असा प्रश्न नेमक्या कोणत्या क्षणीं त्यानें स्वतःला विचारला, तें समजण्यास कांहींच मार्ग नाहीं. एक गोष्ट मात्र खरी—आणि ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे—कीं, या संपासंबंधीं विचार करीत असतांना केव्हां तरी अचानक त्याला जाणीव झाली कीं हा प्रश्न दिसतो तसा सोपा नाहीं. निदान कंपनीच्या या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं हा प्रश्न जितका सोपा आहे असें भासविलें होतें, तितका तरी खचित तो सोपा नाहीं, हें त्याला केव्हां तरी अकस्मात् कळून चुकलें. युनियननें माजविलेला प्रक्षोभ आणि संपवाल्यांचे वेडेचार यांपलीकडे अधिक कांहीं तरी या संप प्रकरणाच्या बुडाशीं असलें पाहिजे, असें त्याच्या मनानें घेतलें. लडलो येथें घडलेल्या भीषण हत्याकांडास जबाबदार असलेले गुंतागुंतीचे कार्यकारणसंबंध कदाचित् कोणाला कधीं उलगडून दाखवितां येणार नाहींत. आणि आतां त्या कार्यकारण-संबंधांची छाननी करण्यांत फारसा शहाणपणा नव्हता. ही अशी चिकित्सा आतां फार महत्त्वाची ठरली नसती. सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट होती ती हीः ज्या दिवशीं खाणींतील आपलीं घरेंदारें सोडून कामगार बाहेर पडले आणि संपावर गेले, त्या दिवसापर्यंत त्यांच्या अंतःकरणांत कसलीं शल्यें सलत होतीं, त्यांचा शोध घेणें आतां आवश्यक आणि अगत्याचें होतें. कामगारांच्या मनांतील असंतोषाचें मूळ कारण जर समजूं शकलें, तर या अशा दुःखदायक संघर्षांची पुनरावृत्ति फिरून कधींच होणार नाहीं, अशी दक्षता आधींपासून

घेतां येईल. यासाठीं म्हणून असंतोषाचें मूळ कारण शोधून काढण्याचा ध्यास त्याच्या मनानें घेतला. हें मूलभूत कारण समजून घ्यावयाचें असेल तर त्यासाठीं कोणाची तरी मदत घेणें आवश्यक होतें. ज्यांचे व्यक्तिगत हितसंबंध या संपांत गुंतलेले होते, त्यांची फारशी मदत या कामीं तरी निदान होण्यासारखी नव्हती. औद्योगिक संबंधांचा ज्यानें निरपेक्ष अभ्यास केला आहे, अशा एखाद्या अभ्यस्ताचें साहाय्य या कामीं शक्य झाल्यास मिळविण्याचा त्यानें निश्चय केला.

आणि योगायोगाची गोष्ट अशी कीं ज्याच्या शोधांत या वेळीं रॉकफेलर होता तो अभ्यस्त मॅकेंझी किंगच्या रूपानें त्याच्यासमोर उभा राहिला. या वेळीं ज्या रॉकफेलर फाउंडेशनचा धाकटा रॉकफेलर अध्यक्ष होता, त्या संस्थेनें कांहीं महिन्यां-पूर्वीं आर्थिक संशोधनाचा एक नवा विभाग सुरू केला होता. या विभागाची आंखणी चालू होती, तेव्हांच कोलोराडोमध्यें संपाची गंभीर परिस्थिति निर्माण झाली होती. आणि म्हणून त्या वेळींच कोलोराडो राज्यांतील मजूरविषयक प्रश्नांचा अभ्यास या नवीन विभागानें हातीं घ्यावा, असें योजण्यांत आलें होतें. चार्ल्स डब्ल्यू. एलियटच्या शिफारसीवरून किंगची नेमणूक प्रस्तुत संशोधन विभागाचा प्रमुख म्हणून करण्यांत आली होती.

किंगपेक्षां अधिक लायक माणसाची निवड या कामीं होण्याची शक्यता नव्हती. कारण औद्योगिक संबंधाचा त्याचा अभ्यास गाढ होता. टोरांटो विद्यापीठांत कॉलेजमध्यें उच्च शिक्षण घेत असतेवेळींच त्यानें कामगारविषयक प्रश्नाचा अभ्यास करावयास सुरुवात केली होती. इ. स. १८९६ मध्यें शिकागो विद्यापीठांत राजकीय अर्थशास्त्राचा फेलो म्हणून तो दाखल झाला होता. तेथें काम करीत असतांना कामगारप्रश्नांसंबंधींचा त्याचा व्यासंग चालूच होता. मध्यंतरीं ट्रेड युनियन चळवळीसंबंधीं त्यानें पुष्कळ लिखाण केलें होतें. इ. स. १८९८ ते १९०० पर्यंत हार्वर्ड विद्यापीठांत डॉक्टोरेट मिळविण्यासाठीं त्यानें काम केलें होतें. आणि तेथें सुद्धां कामगारप्रश्नांचा त्यानें विशेष अभ्यास केला होता. इ. स. १९०० मध्यें तो कॅनडांत परत गेला. आणि तेथें कॅनेडिअन सरकारसाठीं नवें कामगारखातें निर्माण करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यांत आली. नंतर १९०८ पर्यंत मजूर विभागाचा उपमंत्री म्हणून त्यानें काम पाहिलें. पुढच्याच वर्षीं पार्लमेंटचा सभासद म्हणून तो निवडून आला. आणि तदनंतर लगेच मंत्रिमंडळांत मजूरखात्यासाठीं एक स्वतंत्र मंत्री घेण्याचें ठरविण्यांत आलें. सर विल्फ्रेड लॉरिअरच्या मंत्रिमंडळांत मजूर खात्याचा मंत्री म्हणून किंगची नेमणूक झाली.

आपल्यावर सोपविलेल्या कामगिरीचा किंगनें मोठ्या उत्साहानें स्वीकार केला. त्यापूर्वींच धाकट्या रॉकफेलरनें त्याच्यावर एक काम सोपविलें होतें. या कामाचें स्वरूप असें होतें : खाणकामगारांच्या तक्रारींची आणि मागण्यांची नोंद करून तत्काळ त्यांचा विचार करण्यासाठीं, सांघिक सौद्याची संधि त्यांना उपलब्ध करून देण्यासाठीं आणि युनियनचे सभासद झाल्यामुळें त्यांचे काय फायदेतोटे होतील त्यांचा विचार करण्यासाठीं एखादी यंत्रणा उभारण्याची शक्यता कितपत आहे, तें पडताळून शक्य असल्यास अशा नियोजित यंत्रणेची रूपरेषा किंगनें आंखावी. किंगनें याबाबत एक सहापानी पत्र रॉकफेलरला लिहिलें होतें. या पत्रांत त्यानें नियोजित यंत्रणेची व कार्यपद्धतीची रूपरेषा कळविली होती : मालक आणि कामगार यांच्या प्रतिनिधींची एक संयुक्त समिति स्थापन करावी. या समितीनें वेळोवेळीं—पण ठराविक कालांतरानें—कामगारांच्या तक्रारींचा विचार करावा आणि त्यांच्या एकूण परिस्थितीची पाहणी करावी, अशी ही योजना होती.

किंगचें हें पत्र रॉकफेलरनें डेन्व्हर कंपनीच्या ऑफिसमध्यें लगोलग पाठवून दिलें होतें. पण त्या वेळीं ब्रॉवर्स आणि वेलबॉर्न हे दोघेहि त्या पत्रांत सुचविलेल्या योजनेचा विचार करण्याच्या मनःस्थितींत नव्हते. कारण त्याच वेळीं संपप्रकरणीं त्यांची सरशी होण्याचा रागरंग त्यांना दिसत होता. दोघांनींहि रॉकफेलरला वेगळीं पत्रें लिहून किंगच्या योजनेस आपला विरोध कां आहे, तें स्पष्ट केलें. ब्रॉवर्सनें लिहिलें: "मला वाटतें कीं या वेळीं या योजनेचा विचार करण्यांत मोठासा शहाणपणा नाहीं. कोणत्याहि दृष्टिकोणांतून विचार केला, तरी तसें करणें या वेळीं अत्यंत मूर्खपणाचें ठरेल. इतर कंपन्यांचे अधिकारी व मालक ही योजना या वेळीं मुळींच हातांत धरणार नाहींत. तर उलट डावीं वृत्तपत्रें आमच्यावर हल्ला करण्याची ही आणखी एक संधि साधतील. या योजनेचें बुजगावणें नेमकें या वेळीं उभें करून आपण कामगारांचा बुद्धिभेद करीत आहोंत, असें आपले शत्रू म्हणतील. तर युनियनचे पुढारी या योजनेचा दांडक्यासारखा उपयोग करून आम्हांला कोंडींत पकडण्याचा यत्न करतील. आजवर निर्धारानें आपण जी भूमिका घेतली आहे, तीच चालू परिस्थितींत सर्वस्वीं योग्य आहे. आपल्या चालू धोरणामुळें आपला किती तरी फायदा झाला आहे...तेव्हां या आणीबाणीच्या वेळीं जर का आपण आपल्या भूमिकेपासून तसूभर मागें हटलों, तरी त्यांत घात आहे. आज याच क्षणाला शत्रूचा पराभव निश्चित समोर दिसतो आहे. अशा वेळीं ही योजना विचारांत घेण्यांत शहाणपणा आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं."

कोलोराडो फ्यूएल अँड आयर्न कंपनीच्या अधिकारी वर्गाच्या दृष्टिकोणांत बदल घडवून आणण्याचा हा एक प्राथमिक यत्न होता. औद्योगिक संबंधांत पुरोगामी मतांचा आदर करण्याची प्रवृत्ति या अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं मुळांतच नव्हती. रॉकफेलरला लवकरच कळून आलें कीं बॉवर्सचें मतपरिवर्तन कधीं काळीं होऊं शकेल, ही कल्पनाच मनांतून काढून टाकावयास हवी. जुनाट आचारविचारांत मुरलेल्या या झुंझार माणसानें पैतृक श्रद्धेच्या निशाणाखालीं तळ ठोकून अनेक लढायांत यापूर्वीं भाग घेतला होता. आणि आतां त्याचीं पूर्वींचीं मतें बदलतील, असा सुतराम् संभव नव्हता. अखेरीस नाइलाजानें रॉकफेलरनें एका मुलाखतींत बॉवर्सकडून राजीनाम्याची मागणी केली. यासंबंधांत किंग लिहितो : "या मुलाखतींत जें काहीं घडल्याचें रॉकफेलरनें मला सांगितलें त्यामुळें त्याच्या धैर्यशील आणि चतुर वर्तनाची प्रशंसा करावयास हवी असें मला दिसून आलें. आणि त्याच्याबद्दलच्या आदरभावानें माझें मन भरून गेलें. या मुलाखतींत ज्या माणसाशीं तो बोलत होता त्याचा स्वाभाविक अहंकार आणि त्यांतून निर्माण झालेला विशिष्ट दृष्टिकोण, यांजविषयीं त्यानें योग्य तो समज दाखविला. आणि त्याचें वर्तन जाणून घेण्याच्या इराद्यानें त्याला सन्मानपूर्वक वागविलें. पण ज्या वेळीं तत्त्वाचा प्रश्न आला, त्या वेळीं मात्र रॉकफेलरनें निःसंदिग्ध शब्दांत कंपनीच्या व्यवस्थेपासून त्याची फारकत व्हावयास हवी, असें सांगितलें. आणि आपल्या निर्णयास अखेरपर्यंत तो चिकटून राहिला. कंपनीची व्यवस्था बघण्यास योग्य असा हा माणूस नव्हे, असें जें मत तोंपर्यंत त्यानें बनविलें होतें, तें योग्यच होतें."

मध्यंतरींच्या काळांत लडलो कत्तलीनंतर आणखी आठ महिने लांबलेला लढा संपुष्टांत येऊं पाहत होता. आणि १९१४ च्या डिसेंबरमध्यें संपवाल्यांनीं संप मागें घेण्याचा निर्णय घेतला. अशा रीतीनें दीर्घकाळपर्यंत चाललेला हा संप निकालांत निघाला. आणि त्यामुळें नव्या वर्षाकडे नव्या उमेदीनें वाटचाल करण्याची धमक रॉकफेलरच्या मनांत निर्माण झाली. हा संप विलक्षण तापदायक होता. उभयपक्षीं अन्यायाचें आणि अत्याचाराचें वर्तन घडलें होतें. पण आतां त्या संपाचा शेवट झाला होता. आणि किंगच्या नेतृत्वाखालीं कामगारांस कंपनीच्या व्यवस्थेंत प्रतिनिधित्व देऊं पाहणारी योजना मार्गस्थ झाली होती. त्यामुळें या दुर्दैवी संघर्षांतून एक नवा दृष्टिकोण आणि नवा समज दोन्ही पक्ष स्वीकारतील अशी नवी आशा निर्माण झाली होती. आणि पर्यवसानीं औद्योगिक

अशांततेच्या बिकट प्रश्नाचें उभयपक्षीं समाधानकारक असें उत्तर शोधून काढणें शक्य आहे, असा विश्वास रॉकफेलरला वाटावयास लागला होता.

इ. स. १९१५ च्या सप्टेंबरमध्यें संकल्पित योजना सिद्ध झाली. आणि पुन्हा एकदां किंग कोलोराडोस भेट देण्यासाठीं रवाना झाला. याच वेळीं कोलोराडो औद्योगिक योजनेची प्रत त्याच्या खिशांत होती. ही योजना लौकरच 'रॉकफेलर योजना' म्हणून प्रसिद्धि पावणार होती.

रॉकफेलर जरी या योजनेचा जनक नव्हता, तरी त्याच्या नांवानें ही योजना ओळखली जाऊं लागली, हें सर्वस्वीं योग्य असेंच होतें. ज्यांत त्यानें रस घेतला आणि ज्यांचा त्यानें हिरिरीनें पुरस्कार केला, अशा योजना असंख्य होत्या. पण ज्यांच्या कारणीं त्यानें आपला उत्साह आणि उमेद खर्ची घातलीं, अशा ज्या कांहीं थोड्या योजना होत्या, त्यांपैकीं ही एक होती. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वेळीं असा एक प्रसंग आला होता कीं जेव्हां त्याच्याकडून नेहमींप्रमाणें केवळ पैशाचीच अपेक्षा नव्हती, तर लोकांचा विश्वास मिळविण्याचा आणि आपल्या मतास लोक अनुकूल करण्याचा हा समय होता. मार्गांत अनुल्लंघनीय असे अनेक अडथळे होते. आणि त्या सर्वांवर मात करणारी जिद्द हा प्रसंग मागत होता.

रॉकफेलरनें कोलोराडोमधील परिस्थिति एकदां समक्ष डोळ्यांखालून घालावी, असें अनेक वेळां त्याला सुचविण्यांत आलें होतें. आणि त्यानें साक्ष दिली तेव्हां तर अशी भेट इष्ट ठरेल, असें त्याला वारंवार सांगण्यांत आलें होतें. त्या वेळीं त्याला विचारलेल्या अनेक प्रश्नांपैकीं एक प्रश्न असा होता: "कोलोराडोमधील परिस्थिति आपण स्वतः डोळ्यांनीं पाहिली, तर कांहीं फायदा होईल असें आपणांस वाटत नाहीं काय?" या प्रश्नास त्या वेळीं त्यानें दिलेलें उत्तर असें होतें: "तेथील वस्तुस्थिति जाणून घेण्याचा हाच एक मार्ग आहे, असें मी मानीत नाहीं. दुसरे अनेक मार्ग आहेत, हें समजण्याइतपत मी शहाणा आहें." पण संपाचा शेवट होण्यापूर्वींच त्याचें हें मत बदललें होतें. किंगच्या मतांचा त्याच्या मनावर पुष्कळच परिणाम झालेला होता. औद्योगिक क्षेत्रांतील व्यक्तिगत संबंधांवर त्याची अमर्याद निष्ठा होती. आणि संपवाल्यांच्या मनांत अपप्रचारामुळें त्याची जी एक घृणास्पद प्रतिमा निर्माण करण्यांत आलेली होती, तिची मोडतोड आणि पुनर्निर्मिति करण्यास रॉकफेलरच्या भेटीची पुष्कळच मदत होईल, असें त्याचें मत होतें.

इ. स. १९१५ च्या मार्च महिन्यांत धाकट्या रॉकफेलरनें कोलोराडोंतील

खाणविभागाचा दौरा करावा, असें शेवटीं ठरविण्यांत आलें होतें. त्या वेळीं तेथें किंगची बहुमोल सल्लामसलत त्याला लाभली असती. पण मध्यंतरीं ता. १२ मार्च रोजीं त्याची आई मरण पावली. त्यामुळें सप्टेंबरपर्यंत हा संकल्पित दौरा होऊं शकला नाहीं. सप्टेंबरमध्यें किंग कोलोराडोस परत गेला. या वेळीं संकल्पित औद्योगिक योजना आपण कार्यवाहींत आणूं शकूं, अशा उमेदीनें तो तेथें गेला होता. किंगची भेट कोलोराडोंत जाऊन घेण्याचा रॉकफेलरचा निर्णय धाडसाचा होता यांत शंकाच नाहीं. कारण संप संपून जरी आतां कांहीं महिने लोटले होते, तरीसुद्धां कित्येक कामगारांच्या मनांत अत्याचाराच्या आणि रक्तपाताच्या आठवणी अजून जाग्या होत्या. कित्येक कामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबांवर बेकारीचा आणि उपासमारीचा दुर्धर प्रसंग ओढवला होता. आणि संपकाळानंतर ओढवलेल्या दारिद्र्याच्या खाईत असंख्य कामगार लोटले गेले होते. अशा परिस्थितींत तेथें आपलें थंडें स्वागत होईल, हें रॉकफेलर जाणून होता. एवढेंच केवळ नाहीं, तर कदाचित् या भेटीमुळें आपलें जीवित धोक्यांत येण्याचा संभव आहे, हें पण त्याला दिसत होतें. आपल्या मुलानें कोलोराडोस भेट द्यावी, ही कल्पना थोरल्या रॉकफेलरला रुचण्यासारखी नव्हती, पण उघडपणें त्यानें आपल्या मनांतील विरोध दर्शविला नाहीं. पण दौऱ्यावर निघते वेळीं चार्लस हेट—हा धाकट्या रॉकफेलरचा सेक्रेटरी होता—याला बरोबर पिस्तुल बाळगण्याचा त्यानें सल्ला दिला. हेटनें हा सल्ला जुमानला नाहीं, आणि पहारेकऱ्यांच्या वेढ्यांत फिरण्याची कल्पना धाकट्या रॉकफेलरला मुळींच आवडली नाहीं. उभयपक्षीं शांततेचें वातावरण निर्माण करण्यासाठीं आपण जात आहोंत अशी त्याची श्रद्धा होती. मनःपूर्वक बदललेल्या दृष्टिकोणाचा उत्साह त्याच्या मनांत अमूप होता. एक तिरस्कृत शत्रु म्हणून कदाचित् कामगार आपणांस वागवतील हें त्याला उघड दिसत होतें, पण हा धोका पत्करण्यास तो तयार होता.

ता. २० सप्टेंबर रोजीं रॉकफेलर कोलोराडोंत येऊन पोहोंचला. कोलोराडो फ्यूएल ॲण्ड आयर्न कंपनीच्या मालकीच्या एकूण अठरा कोळशाच्या खाणी तेथें होत्या. आणि एका पंधरवड्याच्या दौऱ्यांत या सर्व खाणींस भेट देण्याचा त्याचा संकल्प होता. अशा दौऱ्याच्या वेळीं स्वाभाविकच जी धांदल, गडबड उडते, ती सर्व त्याला मनापासून टाळावयाची होती. प्रसिद्धीचा गाजावाजा तर त्याला मुळींच नको होता. आणि म्हणून आपल्या संकल्पित दौऱ्याची वाच्यता त्यानें कोठेंहि केव्हांहि केलेली नव्हती. दौऱ्याबाबतचा सर्व पत्रव्यवहार अत्यंत

दक्षतेनें गुप्त ठेवला गेला होता. पण ही सारी पूर्वतयारी अखेरीस व्यर्थ ठरणार होती. खाणींची पाहणी करण्यासाठीं म्हणून तो पहिल्या दिवशीं सकाळीं निघाला तेव्हां आठ वृत्तपत्रांचे वार्ताहर जवळपास होते. सोप्रिस आणि प्रिमेरो खाणींना तो प्रथम भेट देणार होता. निघते वेळीं वार्ताहरांची ही सेना त्याच्या पाठोपाठ निघालेली त्याला दिसली. पुढील भविष्य केवळ अटळ होतें. आणि तें त्याला कळून चुकलें होतें. तेव्हां सर्व वार्ताहरांस एकत्र गोळा करून त्यानें त्यांच्याकडून दोन वचनें घेतलीं. एक म्हणजे खाणकामगारांशीं तो बोलत असतांना त्यांनीं अडथळे आणावयाचे नाहींत आणि दुसरें म्हणजे प्रत्येक रात्रीच्या वृत्तनिवेदनांत दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाची वार्ता कटाक्षानें द्यावयाची नाहीं.

यानंतर योजिल्याप्रमाणें त्याचा दौरा सुरू झाला. दौऱ्याचा मुख्य हेतु तेथील वस्तुस्थितीचें साक्षात् ज्ञान करून घेण्याचा होता. अखंड कार्यरत राहण्याची त्याची स्वाभाविक प्रवृत्ति होती. आणि कोणतीहि गोष्ट एकदां हातीं घेतली कीं संपूर्ण दक्षतेनें तिचा पाठपुरावा करावयाचा, अशी त्याची धारणा होती. हे त्याचे स्वभावविशेष या दौऱ्यांत ठळकपणें उमटून दिसले. योजिल्याप्रमाणें प्रत्येक खाणीस त्यानें भेट दिली. प्रत्येक सुपरिंटेंडंटशीं त्यानें खाजगी बातचीत केली. कामगारांचे जेवढे म्हणून पुढारी तेथें होते, त्यांजपैकीं प्रत्येकाशीं त्यानें विचार-विनिमय केला. शेकडों घरांतून तो हिंडला. कामगारांच्या बायकामुलांशीं त्यानें गोष्टी केल्या. त्यांचे बागबगीचे त्यानें पाहिले. पाणीपुरवठ्याची त्यानें चौकशी केली. कित्येक खाणींत स्वतः खालीं उतरून त्यानें तेथील परिस्थितीची पाहणी केली. शाळा पाहिल्या. शिक्षकांशीं आणि विद्यार्थ्यांशीं तो मोकळेपणानें बोलला. कामगारांचे क्लब जसे त्यानें पाहिले, तशीच त्यांचीं न्हाणी-घरें पण त्यानें पाहिलीं. आणि शेकडों कामगारांशीं त्यानें चर्चा केली. या दौऱ्यांत पुष्कळ वेळां किंग त्याच्याबरोबर होता. किंगचा सेक्रेटरी एफ. ए. मॅकग्रेगॉर लिहितो : "किंगनें तेथील परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन पूर्वीच केलेलें होतें. आणि त्याच्या अनुभवाचा फायदा रॉकफेलरला सहजच मिळाला. अनुकूल आणि प्रतिकूल बाबींचें त्याला काळजीपूर्वक निरीक्षण करतां आलें. महत्त्वाचें तें सर्व त्याच्या नजरेस आलें. आणि तेथील वस्तुस्थिति त्याला साक्षात् बघतां आली. केव्हां केव्हां कामगारांशीं तो एकटाच बोलत बसे. कामगारांच्या मेळाव्यांत तो एकटाच असे. संध्याकाळच्या वेळीं ते दोघे अनुभवांची उजळणी करीत, दिवसा पाहिलेल्या सर्व बाबींची नोंद करीत आणि जें पाहिलें त्याच्या संदर्भात संकल्पित योजना कार्यवाहींत कशी

आणतां येईल, याचा साक्षेपानें विचार करीत.” रात्रीच्या वेळींसुद्धां कामगारांच्या गटांशीं त्याची चर्चा चालू असे.

रॉकफेलर हा जिज्ञासू आणि उत्साही असा विद्यार्थी होता. त्याचा स्वभाव संकोचशील आणि संयत होता. पण दुसऱ्यास समजून घेण्याची आणि स्वतःस समजावून देण्याची त्याची इच्छा अशी जबरदस्त होती कीं स्वाभाविक संयमाची भिंत कोसळून पडली आणि मैत्रीस उत्सुक असलेल्या आणि जिव्हाळा देण्याघेण्यास आतुर असलेल्या त्याच्या स्वभावांतील सुप्त प्रवृत्तीचें दर्शन या दौऱ्यांत सर्वांस घडलें. अगोदर पूर्वसूचना न देतां एखाद्या टेकडीवरील वसाहतीस तो भेट देई. कोठें कांहीं कामगार गप्पा करीत असलेले दिसले तर शांतपणानें त्यांच्याजवळ जाऊन तो त्यांना आपली ओळख करून देई. थोड्याच वेळांत त्यांच्या कामाच्या आणि राहण्याच्या स्थितीविषयीं तो त्यांच्याशीं बोलावयास लागे. आणि त्यांच्या तक्रारींचें मूळ कारण कोणतें, तें शोधण्याचा यत्न करी. स्वभावानें तो गंभीर होता. पण त्याचें वर्तन नेहमींच मैत्रीचें असे. क्वचित् केव्हां खेळीमेळीचे कांहीं क्षण येत. कॅमेरॉन वसाहतींत असा एक मजेदार प्रसंग घडला. तेथील शाळेमध्यें त्याच्या सत्काराचा एक छोटासा सामाजिक समारंभ चालला होता. त्या वेळीं छोटेंसें भाषण केल्यानंतर त्यानें लगेच सुचविलें कीं नाचण्यासाठीं हॉलमधील जागा मोकळी करावी. लगेच तेथील जागा नृत्य-समारंभासाठीं सज्ज करण्यांत आली. अधिक गंभीर प्रकारच्या मनोरंजनासाठीं जुळविलेला ऑर्केस्ट्रा नाचण्यास योग्य असें वातावरण निर्माण करण्यासाठीं हलके-फुलके सूर छेडूं लागला. तेथील सुपरिंटेंडंटच्या बायकोला साथीस घेऊन रॉकफेलर रंगणांत उतरला. आणि नाचाचा कार्यक्रम लवकरच रंगांत आला. नाच संपण्यापूर्वीं हॉलमधील प्रत्येक स्त्रीबरोबर रॉकफेलर नाचला होता. या प्रसंगाचें वर्णन करतांना मॅकग्रेगॉर लिहितो: “नाचास सुरुवात झाल्यावर फोन करण्यासाठीं वार्ताहरांची जी एकच धांदल धावपळ सुरू झाली ती प्रेक्षणीय होती. देशभर या अनौप-चारिक नृत्यसमारंभास जी प्रसिद्धि देण्यांत आली तिजमुळें उभयपक्षीं जें स्नेहाचें वातावरण निर्माण झालें, तसें दहा व्याख्यानांनीं आणि पंधरा सभांनीं झालें नसतें.” कामगारांच्या मनांत मालकांविषयीं आपुलकीची भावना निर्माण करण्यांत अशा घटनांनीं फार मोठें यश मिळविलें, यांत शंका नाहीं.

कार्यक्रमांत आंखल्याप्रमाणें पंधरवड्याची पाहणी संपल्यानंतर रॉकफेलरनें मालकांच्या आणि कामगारांच्या प्रतिनिधींची एक संयुक्त सभा बोलावली. या

सभेंत त्यानें नियोजित औद्योगिक योजनेची कल्पना समजावून सांगितली. पण यापूर्वीच उभयपक्षांत सलोख्याचें वातावरण निर्माण करण्याचें काम यशस्वी झालें होतें. दौऱ्यास सुरुवात करण्यापूर्वी ज्याचा संभव केवळ नाममात्र होता, अशा आत्मविश्वासानें आणि धडाडीनें त्यानें आपल्या भाषणास सुरुवात केली :

"आजचा हा दिवस माझ्या आयुष्याच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे.

आयुष्यांत पहिल्यांदाच सुदैवानें मला ही संधि मिळाली आहे कीं ज्या वेळीं या महान् कंपनीचे अधिकारी, मुकादम आणि कामगारांचे प्रतिनिधि यांना मी एकत्र भेटत आहें. या अशा सभेंत मी बोलूं शकतों याचा मला मनस्वी अभिमान वाटत आहे. हें मी तुम्हांला मोकळेपणानें सांगूं इच्छितों. यावज्जन्म या सभेचें मला कधीं विस्मरण होणार नाहीं.

पंधरा दिवसांपूर्वी जर ही अशी सभा घेण्यांत आली असती, तर एक परका माणूस म्हणून मी तुमच्यासमोर येऊन उभा राहिलों असतों. आणि तुमच्यापैकीं कोणालाच मी ओळखूं शकलों नसतों. पण मध्यंतरीं तुमच्या या सर्व खाणींतून फेरफटका करण्याची संधि मला लाभली. तुमच्यापैकीं बहुतेक प्रत्येकाशीं मीं बातचीत केली. तुमचीं घरें पाहिलीं. तुमच्या बायकामुलांत मिसळलों. आणि आतां आपण एकमेकांस परके राहिलेले नाहीं. आतां आपण एकमेकांचे मित्र म्हणून स्नेहाच्या वातावरणांत येथें एकत्र जमलेलों आहोंत. माझा असा विश्वास आहे कीं आतां आपण एकमेकांस जाणतों. तेव्हां परस्परांचे हितसंबंध ज्या परिस्थितींत गुंतलेले आहेत तिचा विचार तुमच्याबरोबर करण्याची संधि मला आज लाभली, हें मी माझें मोठें भाग्य समजतों."

यानंतर रॉकफेलरनें निमंत्रितांसह आपली सर्व योजना सविस्तर मांडली. कामगारांचे पगार, त्यांच्या कामाची आणि राहण्याची परिस्थिति या संबंधांत उभयपक्षीं बंधनकारक असलेल्या अटींचा त्यानें निर्देश केला. आणि नंतर सर्व निमंत्रितांच्या संमतीसाठीं आपली योजना सादर केली. निमंत्रितांस ही योजना संमत झाली, तर कंपनीचे डायरेक्टर्स, अधिकारी आणि कामगार यांचीं या योजनेवर मतें घेण्यांत यावींत असें ठरविण्यांत आलें. आणि जर सर्वांनीं ही योजना मंजूर केली तर लगेच ती कार्यवाहींत आणण्यांत येईल, आणि

ता. १ जानेवारी १९१८ पर्यंत ती उभयपक्षीं बंधनकारक मानली जाईल, असें त्यानें मनःपूर्वक आश्वासन दिलें. या योजनेंतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे तिचें प्रातिनिधिक स्वरूप होय. १५० कामगारांमागें त्यांनींच निवडून दिलेला एक प्रतिनिधि नियंत्रणमंडळावर घेण्यांत येईल, आणि हें नियंत्रणमंडळ कामगारांच्या तक्रारींचा योग्य तो विचार करील. कोणाहि वरिष्ठ अधिकाऱ्यानें कांहीं अन्याय केल्यास कामगारांस संरक्षण मिळवून देण्याची तरतूद या यंत्रणेंत होती.

अशा रीतीनें कामगारांस त्यांच्या हक्कांचें प्रतिनिधित्व कंपनीच्या नियंत्रक मंडळावर देण्यांत आलें. त्याच्याच जोडीस कंपनीनें कांहीं आश्वासनें कामगारांस आपण होऊन दिलीं. मध्यवर्ती आणि राज्यसरकारचे मजूरविषयक कायदेकानू पाळण्यास आपण बांधलेले आहोंत, असें कंपनीच्या वतीनें कामगारांस अभिवचन देण्यांत आलें. वेतनश्रेणीस मान्यता देण्यांत आली. युनियनच्या सभासदांच्या बाबतींत भेदभाव केला जाणार नाहीं, कोणत्याहि कामगारास कामावरून कायमचें काढून टाकण्यापूर्वी त्याला पूर्वसूचना देण्यांत येईल, कंपनीच्या मालकीच्या जागेंत कामगारांस सभा घेण्याची परवानगी देण्यांत येईल, आवश्यक तो माल कोठूनहि खरेदी करण्याचें स्वातंत्र्य कामगारांस मिळेल. आपले मुकादम आपणच निवडण्याचा हक्क कामगारांस देण्यांत येईल. त्याचप्रमाणें भाडेपट्टी, दिवाबत्ती आणि पाणीपुरवठा यांबाबतचा आकार निश्चित करण्यांत येईल. कामगारांच्या घराभोंवतीं कुंपणें घालून देण्यांत येतील. त्यांच्या क्लबांसाठीं आणि न्हाणीघरांसाठीं कंपनी पैसा पुरवील. खाणींत काम करणाऱ्या कामगारांचा दिवस आठ तासांचा आणि बाहेर काम करणाऱ्या कामगारांचा दिवस नऊ तासांचा, असें मानलें जाईल. इ. स. १९१८ च्या जानेवारीपर्यंत कामगारांच्या पगारांत घट केली जाणार नाहीं. आणि आसपासच्या इतर खाणींतून काम करणाऱ्या कामगारांच्या पगारांत कांहीं प्रमाणांत वाढ करण्यांत आली, तर त्याच प्रमाणांत कंपनीच्या कामगारांस पगारवाढ मिळेल.—अशीं अनेक आश्वासनें कंपनीनें कामगारांस दिलीं. त्याबाबतच्या बंधनकारक अशा अटी स्वतःवर लादून घेतल्या. कामगारांच्या मूलभूत हक्कांस मान्यता दिली. आणि त्यानंतर ही यंत्रणा तत्काळ कार्यवाहींत आणण्याची कंपनीनें हमी घेतली.

रॉकफेलरनें उपर्युक्त कलमांचें वाचन आणि स्पष्टीकरण केलें आणि अखेरीस तो म्हणाला :

"आणखी कांहीं दिवस कोलोराडोंत मी राहणार आहें. उभयपक्षीं सर्वसंमत आणि हितावह होईल, अशी कांहीं तरी निश्चित योजना मार्गस्थ केल्याशिवाय मी येथून हलणार नाहीं. कारण एका बाबतींत तरी निदान माझा निर्धार पक्का झाला आहे. या कंपनींतील कोणत्याहि माणसास—मग तो भांडवलवाला अधिकारी किंवा कामगार कोणीहि असो, आपल्यापैकीं कोणालाहि—यापुढें एक गोष्ट मुळींच कधीं घडावयास नको आहे. आणि ती म्हणजे दुसरा संप!"

यानंतर पुढील आठवड्यांत बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा बोलावण्यांत आली. आणि त्यांची या योजनेस संमति मिळविण्यांत आली. त्याच आठवड्यांत याच संबंधांत सर्व कामगारांनीं गुप्त मतदानपद्धतीनें आपलीं मतें नोंदलीं. एकूण २८४६ कामगारांनीं आपलीं मतें नोंदविलीं. त्यांपैकीं २४०४ कामगारांनीं योजनेस अनुकूल अशीं मतें दिलीं. आणि अशा रीतीनें तीन आठवड्यांत इष्ट तें सर्व साध्य करण्यांत आलें.

काम आटोपून रॉकफेलर न्यूयॉर्कला परत गेल्यावर किंगनें त्याला एक पत्र लिहिलें. त्या पत्रांत ज्याचें भविष्य निश्चयानें कृतींत उतरणार आहे, अशा भविष्यवेत्त्याचा आत्मविश्वास व्यक्त झालेला दिसतो. किंगनें लिहिलें :

"माझी अशी समजूत आहे कीं आपण कांहीं ना कांहीं केलें आहे. औद्योगिक उत्कर्षासाठीं आणि शांततेसाठीं आपण कांहीं ना कांहीं केलें आहे. शेकडों लोकांचें जीवित सुखकारक व्हावें, म्हणून आपण कांहीं ना कांहीं केलें आहे. पण सर्वांत अधिक कोणीं कांहीं केलें असेल, तर तें आपण. आपल्या उदाहरणानें जगासमोर आपण एक भव्य आदर्श ठेविला आहे..."

औद्योगिक संबंधांच्या क्षेत्रांत रॉकफेलरनें जें कांहीं कार्य केलें, त्याचें अचूक मोजमाप करणें फार बिकट आहे. पण एक गोष्ट मात्र निश्चयानें सांगतां येईल ती ही : सदोदित बदलणाऱ्या परिस्थितींत त्यानें आपल्या नांवाचा आणि वजनाचा वापर कांहीं मूलभूत न्यायतत्त्वांसाठीं जाणून केला. आपल्या कामाच्या संबंधांत बोलण्याचा आणि मत देण्याचा कामगारांचा हक्क त्यानें मान्य केला. आणि त्याच्या मान्यतेमुळें तत्कालीन औद्योगिक संबंधांत इष्ट ते बदल घडवून आणण्यास पुष्कळच

मदत झाली. एकच उदाहरण द्यावयाचें तर न्यू जर्सीच्या 'स्टँडर्ड ऑइल कंपनी'चें देतां येईल. गेल्या चाळीस वर्षांच्या इतिहासांत या कंपनींत एकहि सांगण्यासारखा संप झालेला नाहीं. अर्थात् याचें सर्व श्रेय केवळ एकट्या रॉकफेलरलाच देतां येणार नाहीं हें तर खरेंच, पण त्याच्याच जोडीला हीहि गोष्ट खरी कीं कोलोराडो-मधील रॉकफेलरच्या निश्चयी वर्तनामुळें जगभर पसरलेल्या अनेक कंपन्यांच्या कारभारांस वेगळें आणि इष्ट असें वळण लागण्यास साहाय्य झालें. कोलोराडोमध्यें सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीनें घायाळ झालेला एक तरुण माणूस एक अभूतपूर्व क्रांतिकारक प्रयोग करून पाहत होता. त्याचा असा अविचल विश्वास होता कीं 'माणूस हा प्रथम माणूस आहे, आणि नंतर कामगार आहे.'—या उदात्त तत्त्वास अनुसरून औद्योगिक क्षेत्रांतील संबंध सुधारण्यासाठीं तो झटत होता. प्रस्तुत संबंधांत एक निरीक्षक म्हणतो, "स्टँडर्ड ऑइल कंपनीचें कामगारविषयक धोरण दोन संप आणि तीन माणसें यांनीं घडविलें आहे. दोन संप म्हणजे एक १९१३-१४ मधील कोलोराडो फ्यूएल अँड आयर्न कंपनींतील, आणि दुसरा १९१५ मधील जर्सीच्या बेयॉन रिफायनरी कंपनींतील. आणि तीन माणसें म्हणजे धाकटा रॉकफेलर, मॅकेंझी किंग आणि क्लॅरेन्स हिंक्स.

* * *

प्रकरण आठवें

# 'जीवन. धर्मपंथ नव्हे!'

रॉकफेलरनें आयुष्यांत जें जें कांहीं म्हणून केलें, तें तें सर्व धार्मिक प्रेरणेच्या आधीन होऊन केलें. त्याच्या अवघ्या जीवनास मार्गदर्शक ठरणारी ही धार्मिक प्रेरणा जर नीटपणें समजून घेतली नाहीं तर त्याच्या स्वाभाविक गुणांचें नेमकें मूल्यमापन करणें केवळ अशक्य होतें. आयुष्यांत दानाच्या कारणीं त्यानें जो अमाप पैसा वेंचला, त्यांतील किती तरी मोठमोठ्या रकमांचा विनियोग धर्मकार्यासाठीं आणि धार्मिक संस्थांसाठीं त्यानें केला आहे असें आढळून येईल. प्रार्थनामंदिरें, धार्मिक शिक्षणाच्या शाळा, आध्यात्मिक विद्यालयें, धर्माभ्यास वर्तुळें, यंग मेन्स आणि वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशन्स इत्यादि धर्मप्रवण संस्था त्याच्या विपुल दानसाहाय्यानें उपकृत झालेल्या आहेत. अर्थात् त्याची श्रद्धा प्रामुख्यानें शैशवस्मृतीशीं निगडित होती. लहानपणीं प्रार्थनासभांना, बायबलच्या अभ्यासवर्गांना आणि धार्मिक प्रवचनांना त्याची उपस्थिति नियमित असे. त्याच्या धर्मश्रद्धेचीं पाळेंमुळें त्याच्या स्वभावांत खोलवर रुजलेलीं होतीं. पण त्याच्या धर्मश्रद्धेचें कर्मठ, अर्थशून्य आचार-विचारांत कधींच रूपांतर झालें नाहीं, हें प्रस्तुत अनुबंधांत ध्यानांत घेण्यासारखें आहे.

त्याचा सारा जन्म धर्ममूल्यांशीं निगडित होता. त्याची धर्मश्रद्धा सनातन होती. पण असें असूनसुद्धां त्याचे धर्मविचार मनस्वी व्यापक होते. त्याची धर्मश्रद्धा प्रेमाच्या आणि सेवेच्या साध्या ख्रिश्चन तत्त्वांवर आधारलेली होती. अंशतः

ती श्रद्धा कालमानानुसार दृढ झालेली होती. तो स्वतः जरी श्रद्धाशील धार्मिक वृत्तीनें भारलेला असा पुरुष होता, तरी सर्वप्रकारच्या आधुनिक विचारप्रणालींशीं त्याचा निकट परिचय होता. आणि त्यामुळें त्याचीं मतें मनस्वी उदार झालेलीं होतीं. दैनंदिन जीवनांतील नित्यानुभव माणसाची श्रद्धा शोधीत असतात. चर्चसंबद्ध योजना आंखण्यांत डॉ. फाउन्स आणि डॉ. वेएल्फकिन यांच्यासारखे फिफ्थ ॲव्हेन्यू बाप्टिस्ट चर्चचे धर्मोपदेशक आणि उदारमतवादी प्रॉटेस्टंट धर्मपंथाचे नेते यांचें त्याला प्रामुख्यानें साहाय्य झालें होतें. कॉलेजमध्यें आणि तदनंतरच्या जीवनांत त्याला असे कित्येक सन्मान्य आणि प्रतिभाशाली लोक भेटले कीं ज्यांचा कोणत्याहि औपचारिक धर्ममतांशीं संबंध नव्हता. आणि तरीसुद्धां त्याच्या मनांत त्याच्याविषयीं गाढ आदरभाव निर्माण झालेला होता. त्याच्या स्वतःच्या आयुष्यांतसुद्धां असे कित्येक बिकट प्रसंग ओढवले होते कीं ज्या वेळीं जुनीं धर्ममतें त्याला अपुरीं आणि असमाधानकारक वाटलीं होतीं. या अशा अनुभवांमुळें त्याची धर्मश्रद्धा उदार आणि व्यापक झाली होती. प्रॉटेस्टंट धर्ममतास अनुसरणारे अनेक पंथ आणि पोथीनिष्ठ संस्थांविषयीं त्याच्या मनांत फारसा जिव्हाळा राहिलेला नव्हता. आणि एकंदर प्रॉटेस्टंट धर्ममताचीं जीं शकलें उडालेलीं होतीं, त्यांजविषयीं त्याला मनांतून फारशी आस्था वाटत नसे.

इ. स. १९०४ मध्यें जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठास द्यावयाच्या एका देणगीबाबत त्यानें आपल्या पित्यास उद्देशून लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्या पत्रावरून अनुदार आणि आकुंचित धर्ममतांविषयीं त्याच्या मनांत जो दुरावा त्या वेळींसुद्धां निर्माण झाला होता त्याचें दर्शन होतें. डॉ. ग्रिगरशीं थोरल्या रॉकफेलरचे घनिष्ठ संबंध होते. त्यास अनुसरून त्यानें पुत्रास स्पष्ट सांगितलें होतें कीं या विद्यापीठास यापुढें ज्या देणग्या द्यावयाच्या, त्या मुख्यत्वेंकरून एका अटीवरच देण्यांत याव्यात. ती अट ही कीं सदर विद्यापीठानें होमिओपाथीचा प्रथम अंगीकार करावयास हवा. त्याच वेळीं पुत्रानें पित्यास कळविलें होतें कीं, अशी कांहीं एक अट न लादतां ज्या कांहीं देणग्या द्यावयाच्या त्या मुक्त हस्तानें देऊं कराव्यात. वैद्यक शास्त्राचें संशोधन कोणत्या एका विशिष्ट मतप्रणालीस जखडलें जाऊं नये. आणि वैद्यक संशोधनास मुक्त अवकाश असावा, हें आपलें मत आधीं स्पष्टपणें सांगून धाकट्या रॉकफेलरनें त्या पत्रांत लिहिलें होतें :

"जॉन्स हॉपकिन्स हॉस्पिटलमध्यें रोगांवर कोणत्या विशिष्ट पद्धतीनें उपाय-योजना केली जाते, इकडे आपण फारसें लक्ष देऊं नये. अनेक धर्मपंथांच्या संबंधांत माझी जी वृत्ति आहे, तीच अनेक वैद्यकीय विचारधारांबाबत आहे. जोंपर्यंत माणूस मुक्त होऊं पाहत आहे, तोंपर्यंत बाप्टिस्ट, मेथॉडिस्ट किंवा प्रेस्बिटेरियन धर्मपंथास अनुसरून तो मोक्षमार्ग शोधीत आहे किंवा कसें, याचा आपण फारसा विचार करावयाचें कारण नाहीं; असें विचारांतीं उत्तरोत्तर मला वाटावयास लागलें आहे. त्याचप्रमाणें जोंपर्यंत रोगी बरा होतो आहे तोंपर्यंत कोणत्या विशिष्ट उपचारपद्धतीनें त्याची प्रकृति सुधारत आहे, या गोष्टीशीं तुम्हांला, मला किंवा जगाला फारसें कर्तव्य नाहीं. मी एवढेंच म्हणेन कीं आधुनिक संशोधनानें आणि ज्ञानानें सर्वोत्तम ठरलेले उपचार रोग्यास प्राप्त व्हावेत. मग ते उपचार कोणत्याहि विशिष्ट वैद्यकाचे असोत. रोग्याची प्रकृति सुधारण्यास कोणता विशिष्ट उपचार उपयोगीं पडत आहे याची फिकीर तुम्हां-आम्हांस करावयाचें प्रयोजन नाहीं."

तदनंतरच्या दहा वर्षांत त्याचीं हीं मतें उत्तरोत्तर अधिकच दृढ होत गेलीं. खिश्चन चर्चच्या संबंधांत जे अनेक प्रचंड प्रश्न त्या वेळीं निर्माण झाले होते, त्यांविषयींसुद्धां हाच उदार, व्यापक आणि विशाल दृष्टिकोण त्यानें स्वीकारलेला दिसतो. अनेक रॉकफेलर निधींशीं त्याचे घनिष्ठ संबंध होते. त्यामुळें रोग, दारिद्र्य आणि अज्ञान यांच्या पकडींत सांपडल्यामुळें असहाय झालेल्या जगाचें चित्र त्याला नित्य डोळ्यांसमोर वागवावें लागे. सर्वतोपरी गांजलेल्या या जगांत या ना त्या धर्मपंथाचें साहाय्य उपकारक ठरेल, यावर त्याचा विश्वास नव्हता. धर्ममतांचा कीस काढून विशिष्ट पोथी हीच जगास तारक ठरेल असें मानावयास त्याचें मन मुळींच तयार नव्हतें. त्याला असें दिसत होतें कीं जगांत खरोखर एकच महायुद्ध सतत चालू आहे. या महायुद्धांत "पापाचीं सैन्यें सुसंघटित, एकत्र आणि समर्थ आहेत...तर पुण्याचीं सैन्यें विघटित, अव्यवस्थित आणि दूर दूर पांगलेलीं अशीं आहेत." म्हणून त्याचें असें मत होतें कीं, पुण्याचीं सर्व सैन्यें एकत्र आणून सुसंघटित केल्याविना अंतिम विजयाची शाश्वती नाहीं. तेव्हां अशा स्थितींत कोणा एका धर्मपंथानें विश्वकल्याणाचा मक्ता केवळ आपणां-सच मिळाला आहे, असें समजून आपल्या साहाय्यकांचीं मतें तपासून पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्याची जरुरी पण नाहीं. व्यर्थ कालापव्यय करण्यांत धोका

आहे, हें समजून अंतिम विजय हवा असेल तर पुण्याच्या सैनिकांनीं अविलंब संघटित व्हावयास हवें.

अनेकविध धर्मपंथांविषयीं त्याचा दृष्टिकोण अशा रीतीनें निश्चित व्यक्त होत होता. आणि पंथातीत पुण्यप्रचाराचें काम सर्वांगीण निष्ठेनें आपलें म्हणावयास हवें, हा विचार त्याच्या मनांत घर करीत होता. त्याच वेळीं पहिल्या महायुद्धांत अमेरिका गुंतली गेली. परस्पर सहकार्याचें मूल्य आणि महत्त्व या निमित्तानें त्याच्या मनावर कायमचें ठसलें. सहकार्याचें एक प्रचंड प्रात्यक्षिक त्याच्या डोळ्यांसमोर घडलेलें त्यानें पाहिलें. न्यूयॉर्कमधील 'युनायटेड वॉर वर्क कँपेन' या संस्थेचा तो अध्यक्ष होता. या महत्कार्याशीं संबंध जोडल्यामुळें विस्तृत प्रमाणावर जे सहकार्य शोधितात, त्यांच्या मार्गांत किती अडचणी उभ्या राहतात, हें त्याला अनुभवानें कळून चुकलें. भ्रमनिरासाचा आणि वैफल्याचा हा दारुण अनुभव घेत असतांनाच दुसऱ्या एका विलक्षण अनुभवानें त्याचें चित्त वेधलें. देशव्यापी सात राष्ट्रीय संस्था राष्ट्रकल्याणाच्या हेतूनें प्रेरित होऊन युद्धकार्यांत संलग्न झाल्या, आणि सर्व सामर्थ्य एकवटून कामास लागल्या. संयुक्त संस्थांच्या सहकार्यानें असाध्य तें साध्य कसें होतें, हें त्याला त्या वेळीं दिसून आलें. पण त्यापूर्वीच युध्यमान राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांनीं असीम त्याग केला होता. रणांगणावर आणि घरांघरांतून शौर्य-धैर्याचीं कृत्यें केलीं होतीं. आणि एका विशिष्ट ध्येयासाठीं कसें जगावें आणि कसें मरावें, याचे आदर्श वस्तुपाठ देशोदेशींची जनता नित्य देत होती. ध्येयवादानें आणि त्यागभावनेनें भारलेले हे लोक प्रत्येक जातीचे आणि धर्मांचे होते. आणि कांहीं जण तर असे होते कीं जे कोणताच धर्म मानीत नव्हते. लौकिक त्यागाचें हें अननुभूत दर्शन विस्मयकारक होतें. या अलौकिक दर्शनानें तो स्तिमित झाला होता. तदनंतर आपल्याच खंडप्राय देशांत सर्व विधायक शक्ति एका व्यापक ध्येयाच्या कारणीं कशा जुंपल्या जातात, तें पण त्यानें पाहिलें होतें. सहकार्याच्या यशस्वितेचें हें अपूर्व प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर, 'या धड्यापासून चर्चला कांहींच शिकतां येणार नाहीं का?' असा प्रश्न त्याच्या मनास स्पर्श करून गेला.

अमेरिकेनें युद्धप्रवेश केल्यानंतर आठ महिन्यांनीं ता. ११ डिसेंबर १९१७ रोजीं 'बाप्टिस्ट सोशल युनियन' च्या भोजनप्रसंगीं रॉकफेलरनें एक महत्त्वाचें भाषण केलें. नंतर हें भाषण 'सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट'मध्यें संपूर्ण प्रसिद्ध झालें. या भाषणाचा विषय होता: 'ख्रिश्चन चर्च—त्याचें भवितव्य काय?' या भाषणांत

बदलत्या जगाचें आव्हान स्वीकारण्यासाठीं अधिक व्यापक, उदार आणि विशाल अशा चर्चची त्यानें मागणी केली. जुनाट, आकुंचित आणि कर्मठ अशा पोथीनिष्ठ पंथास शरण जाण्याऐवजीं पंथातीत सर्व पंथसमावेशक अशा चर्चचा त्यानें या भाषणांत आवेशानें पुरस्कार केला.

यानंतर अल्पावधींतच आशाभरल्या अंतःकरणानें धर्मकार्याच्या पहिल्या महान् कार्यास त्यानें चालना दिली—'दि इंटरचर्च वर्ल्ड मुव्हमेंट.'

ही संस्था पहिल्या महायुद्धांतील अनुभवांतून आकारांत आली. महायुद्ध संपल्यावर प्रेस्बिटेरियन चर्चच्या बोर्ड ऑफ फॉरेन मिशन्सच्या प्रेरणेमुळें प्रामुख्यानें ही जागतिक 'इंटरचर्च' चळवळ सुरू झाली. अमेरिकेंतील सात राष्ट्रीय धर्म-संस्था एकत्र येऊन त्यांनीं अमेरिकन सैन्याच्या सेवेसाठीं प्रचंड निधि गोळा करण्यांत कल्पनातीत यश मिळविलें होतें. महायुद्धाचें पर्यवसान निश्चित झालें, त्या वेळीं या चळवळीनें यशाचें अत्युच्च शिखर गांठलें. कृतज्ञभावानें अमेरिकन जनतेनें २२ कोटी डॉलर्सची प्रचंड रक्कम या संयुक्त धर्मसंस्थांच्या हवालीं केली. या घटनेंतून निष्पन्न होणारा धडा दुर्लक्ष करण्यासारखा खचित नव्हता. प्रॉटेस्टंट, कॅथालिक आणि ज्यू धर्मसंस्था संयुक्त यत्नांनीं जर असे प्रचंड निधि सहज गोळा करूं शकतात, तर उत्तर अमेरिकेंतील जागतिक धर्मप्रचाराचें कार्य करणाऱ्या संस्थांससुद्धां सेवेसाठीं लोकांकडून असेच निधि कां उपलब्ध होणार नाहींत?—असा प्रश्न स्वाभाविकच धार्मिकांच्या मनांत उभा राहिला. ख्रिश्चन धर्मप्रेरणेनें अखिल विश्व अंकित करण्याची उमेद बाळगून तदनुसार यत्न करणाऱ्या धर्मसंस्था अमेरिकेंत अनेक होत्या. पण त्यांच्या कार्यांत एकसूत्रता नव्हती. उभयपक्षीं शस्त्रसंन्यासाची घोषणा झाल्यावर एक महिन्यानें अमेरिकेंतील आणि परदेशांतील मिशन बोर्डाच्या १३५ प्रतिनिधींची एक संयुक्त सभा बोलाविण्यांत आली. एक योजना आंखण्यासाठीं या सभेनें वीस सभासदांची एक समिति नेमिली. आणखी महिनाभरानें संकलित योजना सिद्ध करण्यांत आली. तिचा उद्देश येणेंप्रमाणें जाहीर करण्यांत आला : "ख्रिश्चन सेवेच्या तत्त्वानुसार उत्तर अमेरिकेंतील प्रॉटेस्टंट चर्चेसनीं अंगीकृत कार्यासाठीं संयुक्त कार्यक्रमांची आंखणी करणें."—अर्थातच अशा संकलित योजनेचा पाया अत्यंत विस्तृत, व्यापक आणि भरभक्कम असावयास हवा; या हेतूनें अनेकविध धर्मप्रचारसंस्थांची एकजूट घडवून आणणें आवश्यक होतें. आजवर आपआपल्या परींनीं स्थानिक चर्चसंस्था हें विश्वव्यापी कार्य करूं बघत होत्या. पण स्वाभाविकच त्यांचे यत्न तोकडे पडत

होते. कारण प्रत्येक संस्था स्वतःच्या हितसंबंधानें बांधलेली होती.

तदनंतर जगभर पसरलेल्या धर्मप्रचारसंस्थांचें साहाय्य घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रांची व्यवस्थित नोंद करण्याचा आणि त्यांच्या अपेक्षांचा विचार करण्याच्या हेतूनें एक विश्वव्यापी योजना आंखण्यांत आली.

या कार्यासाठीं एकूण शंभर सभासदांची एक सर्वसाधारण समिति स्थापन करण्यांत आली. त्यांपैकीं एक तृतीयांश पाद्री, एक तृतीयांश मिशनरी कार्यकर्ते आणि एक तृतीयांश सामान्यजन असावेत, असें ठरविण्यांत आलें. आणि डॉ. जॉन आर. मॉट याच्या अध्यक्षतेखालीं पंधरा सभासदांचें एक कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यांत आलें.

पुढील वर्षाच्या वसंतऋतूंत जगांतील कार्यक्षेत्रांच्या पाहणीचें काम पुरें करावें अशी योजना होती. तोंपर्यंत संकल्पित महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्यासाठीं आवश्यक असलेल्या निधीचें कार्य स्थगित करण्यांत आलें. मध्यंतरींच्या कार्यासाठीं जो पैसा आवश्यक होता, तो विविध धर्मसंस्थांनीं बँक-लोन्स देऊन उपलब्ध करण्यांत यावा, असें ठरविण्यांत आलें. अर्थातच बँकांकडून मिळावयाचीं कर्जें धर्मसंस्थांस मिळविण्यासाठीं कांहीं ना कांहीं तारणाची योजना करणें आवश्यक होतें. ही कार्यपद्धति सर्वस्वीं निर्दोष नव्हती, हें उघड आहे.

अनावर उत्साहानें संकल्पित कार्यास चालना देण्यांत आली. विसाव्या शतकांतील हें जसें कांहीं धर्मयुद्धच होतें. आणि महायुद्धाच्या वेळीं जो ध्येयवाद कारणीं लागला होता, त्याच ध्येयवादाची प्रचीति प्रस्तुत धर्मयुद्धांत प्रत्ययास आली. देशभर पाद्र्यांच्या आणि प्रादेशिक सामान्य जनांच्या सभा घेण्यांत आल्या. पिट्सबर्गमधील पाद्र्यांच्या सभेनें खालील घोषणा केली :

"आमचा असा विश्वास आहे कीं आजवर कधीं नव्हे ती संधि आज ख्रिश्चन चर्चला उपलब्ध झाली आहे. संकल्पित कार्य एवढें अवाढव्य आणि असें बिकट आहे कीं कोणतीहि एक विशिष्ट धर्मसंस्था तें साध्य करूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें विविध संस्थांनीं अलग कार्य करून तें साधण्यासारखें नाहीं. या जाणिवेनें आम्ही उत्तर अमेरिकेंतील इंटरचर्च वर्ल्ड मुव्हमेंटचें उत्साहानें स्वागत करतों... या चळवळीमुळें सहकारी यत्नांनीं सर्व धर्मसंस्थांचें ऐक्य घडून येईल, असें नाहीं. पण अमेरिकन ख्रिश्चन धर्मसंस्थांसमोर जे अनेक विशाल प्रश्न उभे आहेत, त्यांची सोडवणूक करण्यासाठीं सहकारी तत्त्वावर संयुक्त कार्य साधण्याचा हा एक प्रचंड यत्न आहे."

ज्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा ठसा अनेक धर्मसंस्थांच्या कार्यावर स्पष्ट उमटलेला दिसतो, अशा मॉटनें संकल्पित योजनेच्या अकल्पनीय महत्त्वेची ग्वाही खालील शब्दांत दिली :

"आजवर जेवढ्या म्हणून राष्ट्रीय योजना आंखण्यांत आल्या, त्यांच्यावर मात करील आणि अमेरिकेंतील सर्वसामान्य जनांचें साहाय्य ज्या योजनेंत कार्यान्वित होईल, अशी एक परमयोजना आम्ही आज हातीं घेत आहोंत. जगांतील ज्या ज्या भागांत मनुष्यवस्ती आहे, त्या त्या प्रत्येक प्रदेशाची आम्ही पाहणी करणार आहोंत. तेथील झालेल्या कार्याची नोंद आणि अपेक्षित कार्याची कल्पना आम्ही करणार आहोंत. सतत अभ्यासानें हें जगड्व्याळ कार्य आम्ही साधणार आहोंत. या विश्वव्यापी योजनेव्यतिरिक्त—आणि त्याहून लहान असें—कांहींहि आम्ही मागणार वा साधणार नाहीं..."

अखेरीस राष्ट्राध्यक्ष विल्सननें या योजनेचें खालील शब्दांत स्वागत केलें :

"देवाच्या दयेनें पुन्हा एकदां अमेरिकन जनतेस जगाची सेवा करण्याची संधि उपलब्ध झाली आहे. मानवतेच्या सेवेसाठीं अमेरिकेचा अवतार आहे, हें या वेळीं आम्ही जगास दाखवून देऊं."

या अशा विश्वव्यापी चळवळींत रॉकफेलरला पंथातीत सहकार्याच्या ध्येयवादाची आणि श्रद्धेची परिणति झालेली दिसावी, हें क्रमप्राप्त आणि अटळ होतें. ज्या एका ध्येयवादानें तो स्वतः भारला गेला होता, त्या ध्येयवादाची मूर्त प्रतिनिधि अशी ही संकल्पित योजना आहे, असें त्याला स्वाभाविकच वाटलें. आणि म्हणून या कार्याच्या निर्मितीशीं जरी त्याचा साक्षात् संबंध नव्हता, तरी त्यानें त्या चळवळीच्या कार्यांत उत्साहानें आणि गंभीरपणानें लक्ष घातलें. कार्यकारी मंडळाचा सभासद म्हणून त्याची निवड करण्यांत आली. आणि रॉचेस्टर, पिट्सबर्ग, शिकागो, न्यूयॉर्क इत्यादि अनेक ठिकाणीं सार्वजनिक जाहीर सभांतून त्यानें अनेक भाषणें केलीं. शिकागो येथील सभेंत तो म्हणाला :

"दीड-दोन कोटी ख्रिश्चन स्त्रीपुरुषांच्या प्रातिनिधिक अशा अनेक धर्मसंस्था या धर्मकार्यांत सहभागी आहेत, असें मला सांगण्यांत आलें आहे. या प्रचंड सैन्याची संयुक्त आघाडी काय करूं शकेल याचा एक क्षणभर तुम्ही विचार करा. कांहीं दिवसांपूर्वीं जनरल पर्शिंगच्या दहावीस लाख शिस्तबद्ध सैनिकांनीं काय कार्य केलें, त्याची आपल्याला कल्पना आहेच. या चळवळीच्या निमित्तानें कोट्यवधि स्त्रीपुरुष कांहीं एका विशिष्ट ध्येयवादानें एकत्र येत आहेत. देवाचें काम करण्यासाठीं उभारलेली ही लोकसेना केवढें प्रचंड कार्य करूं शकेल, त्याची कल्पना करा."

इ. स. १९२० च्या एप्रिलमध्यें या चळवळीच्या अनेक नेत्यांसह त्यानें चौदा दिवसांचा एक दौरा काढला. त्या वेळीं एकूण पंधरा शहरांतील सार्वजनिक सभांतून त्यानें भाषणें केलीं. आणि रात्रीचा प्रवास सामान्य माणसाप्रमाणें खालच्या बर्थवर झोपून त्यानें केला.

मध्यंतरीं या दुर्दैवी संघटनेचा शोकजनक अंत्यदिन झपाट्यानें जवळ येत होता. संस्थेचे कार्यक्रम विलक्षण वेगानें सर्वत्र साजरे होत होते. आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहास सीमा नव्हती. संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयासाठीं न्यूयॉर्कमधील प्रचंड ग्रीनहट इमारत वार्षिक पांच लाख डॉलर्स भाडें देण्याच्या करारानें घेण्यांत आली होती. ख्रिश्चन पेजंट साजरा करण्यासाठीं भव्य मॅडिसन स्क्वेअर गार्डन महिनाभराच्या करारानें घेण्यांत आला होता. सर्व जगभर निरीक्षकांच्या संघटना पाहणी करीत फिरत होत्या. अमेरिकेंतील २००० परगण्यांतून आणि ३७५ नगरांतून नियोजित नोंदकाम चाललें होतें. हें सर्व अवाढव्य कार्य लोकांच्या निदर्शनास आणण्याचें काम प्रकाशन आणि जाहिरात संस्था भर वेगांत करीत होत्या. पाहणीनोंदणीचीं असंख्य कामें जगभर सर्वत्र चाललेलीं होतीं. त्यांचा व्यवस्थित अभ्यास करण्यासाठीं एक निरीक्षणमंडळ स्थापण्यांत आलें होतें. रॉकफेलर या मंडळाचा सभासद होता. अजूनपर्यंत सर्व नोंदींचे आंकडे हातीं आलेले नव्हते. तरी सुद्धां जी आंकडेवारी उपलब्ध झालेली होती, तिच्या साहाय्यानें संकलित योजनेसाठीं जो निधि उभारावयाचा, त्याचा अखेरचा आंकडा उपलब्ध माहितीच्या आधारावर काढणें सहज शक्य होतें. तदनुसार या कार्यासाठीं गोळा करण्यांत यावयाचा निधि साधारण किती असावा, तें निश्चित करण्यांत आलें. आणि अखेरीस ३३६,७७७,५७२ डॉलर्सची अवाढव्य रक्कम

संकलिपत निधीसाठीं मंजूर करण्यांत आली. प्रस्तुत संबंधांतील जमाखर्चाचें अंदाजपत्रक रॉकफेलरनेंच सादर केलें. त्या वेळीं तो म्हणाला, "ही रक्कम अजस्त्र आहे, असें कोणास वाटेल. पण पुढील कार्याचा योग्य अंदाज न घेतां टीकेच्या भयानें त्यांनीं जर याहून कमी रकमेस मंजुरी दिली असती, तर भव्य इमारतीस पेलणार नाहीं, असा कच्चा पाया त्यांनीं घातला, असें झालें असतें. कारण जी दिव्य वस्तु आपण आकारास आणूं पाहत आहोंत, तिच्या उभारणीसाठीं पाया सुद्धां तसाच लांब, रुंद आणि भरभक्कम हवा. अमेरिकेंतील सर्व ख्रिश्चन लोकांच्या सहकार्यानें जो महान् संयुक्त यत्न आपण करणार आहोंत, त्याला सर्वस्वीं योग्य असें आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणें आमचें कर्तव्यच आहे."

या ठिकाणीं हें लक्षांत घ्यावयास हवें कीं, केवळ 'इंटरचर्च वर्ल्ड मुव्हमेंट'-साठीं ही सर्व रक्कम खर्चीं घालण्यांत यावयाची नव्हती. त्यासाठीं एकूण चार कोटी डॉलर्स पुरेसे होते. पण संकलिपत पंथातीत धर्मसभेंत एकूण एकतीस पंथ-संस्था सहभागी होत्या. आणि त्यांच्या अपेक्षित गरजा लक्षांत घेऊनच ही अवाढव्य रक्कम शेवटीं मंजूर करण्यांत आली होती. एकूण सर्व योजनेंतील सर्वांत कच्चा दुवा नेमका हाच होता. खरें म्हणजे एकच कार्य आणि त्यासाठीं एकच निधि अशी योजना आदर्शांत असावयास हवी होती. पण प्रत्यक्षांत एकतीस सहकारी संस्था होत्या. त्यांचे एकतीस निधि होते. आणि त्यांच्याशीं स्पर्धा करण्यासाठीं जणुं 'इंटरचर्च' संस्था स्वतःचा निधि उभा करणार होत्या. अर्थातच हा पैसा चर्चच्या अनुयायांकडून गोळा केला जाणार नव्हता, तर चर्चशीं संबंध नसलेल्या पण ख्रिश्चन धर्मतत्त्वांशीं सहानुभूति असलेल्या अशा नागरिकाकडून संकलिपत निधि 'इंटरचर्च' गोळा करील अशी अपेक्षा होती.

इ. स. १९२० च्या वसंत ऋतूंत जेव्हां अवास्तव जाहिरातीमुळें गाजलेल्या 'इंटरचर्च'च्या प्रचारमोहिमेस प्रत्यक्ष सुरुवात झाली, तेव्हां ही भाबडी आशा कोलमडून पडली. एकतीस पंथसंस्थांनीं स्वतःच्या कार्यासाठीं एकूण १७ कोटी ६० लक्ष डॉलर्स गोळा करण्यांत यश मिळविलें. पण 'इंटरचर्च'ला मात्र फक्त ३० लक्ष डॉलर्स स्वतःच्या कार्यासाठीं गोळा करतां आले. आणि या ३० लक्ष डॉलर्सपैकीं १० लक्ष डॉलर्सपेक्षां अधिक रक्कम रॉकफेलर कुटुंबानें दिलेली होती.

अशा स्थितींत भ्रमनिरासाच्या आणि निराशेच्या वातावरणांत दिवंगत होऊं पाहणाऱ्या 'इंटरचर्च'च्या प्रचारासाठीं आणखी एक मोहीम सुरू करण्यांत आली. या मोहिमेचा प्रारंभिक खर्च भरून काढण्यासाठीं रॉकफेलरनें अडीच लक्ष डॉलर्स

देऊं केले. पण पहिल्या मोहिमेपेक्षां ही दुसरी मोहीम अधिक अपेशी ठरली. सर्वतोपरींनीं यत्न करूनसुद्धां फक्त सव्वा लक्ष डॉलर्स या वेळीं मिळूं शकले.

अशा रीतीनें ' इंटरचर्च वर्ल्ड मुव्हमेंट 'चें स्वप्न धुळीस मिळाल्यानंतर रॉकफेलरनें धार्मिक ऐक्याच्या यत्नास कशा रीतीनें चालना देतां येईल, त्याचा विचार पुन्हा नव्यानें सुरू केला. या खेपेस मात्र आपलीं उद्दिष्टें मर्यादित असावींत आणि कार्यक्रमाची आंखणी अधिक साक्षेपी असावी, याबद्दल त्यानें अधिक दक्षता घेतली.

जन्मापूर्वीच मृत झालेल्या ' इंटरचर्च 'च्या अनेकविध अपुऱ्या योजनांपैकीं कांहींच्या पाहणीनोंदींचा अभ्यास करण्यासारखा होता. केवळ निरीक्षणाच्या कामीं संस्थेनें १५ लक्ष डॉलर्स अगोदरच खर्चीं घातले होते. आणि तरी सुद्धां पाहणीचें काम तसेंच अर्धवट अपुरें पडलेलें होतें. जें मुख्य उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेविलेलें होतें, तें तर साध्य झालेंच नाहीं. निदानपक्षीं झालेल्या कामाचा शक्य तो फायदा करून घ्यावा, या हेतूनें रॉकफेलरनें जॉन ऑर. मॉट, अर्नेस्ट बर्टन आणि चार्ल्स वॉटसन यांचा सल्ला घेतला. आणि त्यांच्या सूचनेवरून, अपुरें राहिलेलें पाहणीचें काम पुरें करण्यासाठीं एक तात्पुरती समिति नेमावी असें त्याच्या मनानें घेतलें. पाहणीच्या कामीं अगोदरच १५ लक्ष डॉलर्सची प्रचंड रक्कम खर्चीं पडलेली होती. तें काम पुरें करण्यासाठीं आणखी अडीच लक्ष डॉलर्स खर्चीं घालणें सयुक्तिक होईल, असें त्याला वाटलें. म्हणून १९२१ च्या जानेवारी महिन्यांत नव्यानें स्थापन झालेल्या 'सोशल अँड रिलीजस सर्व्हेज कमिटी 'स त्यानें आपला पाठिंबा जाहीर केला. या संकल्पित योजनेची अवस्था पूर्वोक्त ' इंटरचर्च ' सारखी कदाचित् होईल, अशा भयानें आपली संकल्पित देणगी जाहीर करतेवेळीं त्यानें अनेक अटी घातल्या. जीं कामें खरोखरच महत्त्वाचीं, मौल्यवान् आणि शास्त्रोक्त पायावर कार्यान्वित करतां येतील, केवळ अशाच कामांची पाहणी कमिटीनें हातीं घ्यावी. या कामीं जो पैसा खर्चीं घालावयाचा, त्याची पुरी रक्कम त्यानें सांगितली नाहीं. " वेळोवेळीं मला योग्य दिसतील, तशा देणग्या मी देत जाईन, " एवढेंच त्यानें आश्वासन दिलें. त्याचप्रमाणें कमिटीनें आणखी कांहीं पाहणी-कामें हातीं घ्यावयाचीं ठरविलें, तर त्यासाठीं पैसे पुरविण्यास आपण मुळींच बांधलेले नाहीं, ही गोष्ट पण त्यानें वेळींच स्पष्ट केली.

धार्मिक संस्थांच्या अभ्यासासाठीं शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब करावा, या कल्पनेचें अनेक समाजशास्त्रज्ञांनीं आणि धार्मिक नेत्यांनीं मनःपूर्वक स्वागत केलें. आणि हातीं घेतलेल्या पाहणीचें मूळ काम संपविण्यापूर्वीच नवे अभ्यास कमिटीनें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 33288 वि: 5/1/7 क्रमांक 224 नों: दि: 1/5/5



हातीं घ्यावेत, असा आग्रह अभ्यासकांकडून व्हावयास लागला. इ. स. १९२३ मध्यें या कमिटीचें नांव बदलण्यांत आलें. यापुढें तीच कमिटी ‘इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अँड रिलीजस रीसर्च’ या नांवानें ओळखली जावी, असें कायदेशीरपणें ठरविण्यांत आलें. आणि त्याच वेळीं तिच्या अभ्यासवर्तुळाची कक्षा विस्तृत करण्यांत आली. आतां या नव्या संस्थेनें जगांतील कोणत्याहि भागांत पाहणीचें काम हातीं घ्यावें, अशी अनुज्ञा देण्यांत आली. विशेषतः समाजजीवनाचें कोणतेंहि अंग जर संघटित धर्मावर कोणत्याहि प्रकारें परिणाम करीत असेल किंवा संघटित धर्मांचा समाजजीवनाच्या कोणत्याहि अंगावर महत्त्वाचा परिणाम करीत असेल, तर या परस्पर संबंधाचें संशोधन अभ्यासविषय समजून हातीं घ्यावें, असें ठरविण्यांत आलें.

तदनंतर चौदा वर्षेंपर्यंत रॉकफेलरच्या आर्थिक साहाय्यावर विसंबून या संस्थेनें पुष्कळ महत्त्वाच्या योजना हातीं घेतल्या आणि तडीस नेल्या. धार्मिक जीवनाचे मानसशास्त्रीय परिणाम बिनचूक वर्णन करून सांगतां येत नाहींत. त्यांची व्याख्या करतां येत नाहीं, त्यांचें अचूक मोजमाप घेतां येत नाहीं. तेव्हां हा विषय सोडून ज्यांची बिनचूक व्याख्या करतां येईल आणि ज्यांचें वर्णन वा मोजमाप करतां येईल, अशा विषयांवरच संशोधनाचें लक्ष केंद्रित करावें, असें योजण्यांत आलें होतें. आणि त्याप्रमाणें संस्थेचें काम अव्याहत चालू होतें. धार्मिक किंवा शैक्षणिक संस्थांच्या संबंधांत जे प्रश्न नित्य उद्भवतात, त्यांच्या संदर्भात संकल्पित योजनांची आंखणी प्रामुख्यानें करण्यांत आली. हें संशोधन धार्मिक व शैक्षणिक कार्यकर्त्यांस मार्गदर्शक ठरेल, अशा रीतीनें त्याचें नियोजन करण्यांत आलें. उत्तर अमेरिकेंतील चर्चच्या संबंधांत या संस्थेनें वेळोवेळीं जे अनेक संशोधनप्रबंध प्रकाशित केले, त्यांच्या नुसत्या नांवांवरूनसुद्धां संशोधकांस कोणते अभ्यास-विषय आकर्षक वाटले, तें समजून घेण्यास मदत होईल. ‘शेतीविभागांतील चर्चसमस्या, शहरांतील १००० चर्चेसची पाहणी, स्प्रिंगफील्ड चर्चची पाहणी, मिनीआपोलिसमधील चर्चेस आणि त्यांचे नागरिक प्रश्न, शहरांतील चर्चच्या योजनेची आंखणी’ इत्यादि वेळप्रसंगीं मानसशास्त्रीय प्रश्नांचा अभ्यास करण्याचे यत्न झाले. उदाहरणार्थ, ‘अमेरिकन शहरांतील प्रॉटेस्टंट सहकार’ या प्रबंधांत लोकांच्या विविध मतांचें आणि दृष्टिकोणांचें संशोधन आढळतें. त्याचप्रमाणें ‘अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील चर्चेसच्या ऐक्यविषयक चळवळी’ नामक प्रबंधांत लोकमताचें संशोधन ग्रथित केलेलें आढळतें.

इन्स्टिटयूटच्या संशोधनाचा केंद्रबिंदु चर्च हाच असला, तरी सामाजिक पार्श्वभूमीच्या अभ्यासास उत्तरोत्तर अधिकाधिक महत्त्व प्राप्त झालेलें आढळून येतें. उदाहरणार्थ, धर्म आणि लोकजीवन यांच्यांतील परस्पर संबंध स्पष्ट करण्यासाठीं अनेक प्रबंधांचें नियोजन केलेलें आढळतें. धर्म आणि अर्थ, वंश आणि शिक्षण यांचे परस्परसंबंध स्वतंत्र संशोधनाचे विषय झालेले आहेत. कांहीं प्रबंध तर केवळ समाजशास्त्रीय स्वरूपाचे आहेत. हेलेन आणि रॉबर्ट लिंड यांनीं 'मिडल-टाउन' नांवाचा एक नवा प्रबंध सादर केला. एका छोटया गांवांतील एका पिढीच्या आयुष्यांत सामाजिक जीवन कसें बदलत जातें, त्या स्थित्यंतराचा हा सामाजिक अभ्यास त्या क्षेत्रांतील हा पहिलाच समजावा लागेल.

इ. स. १९३४ मध्यें या इन्स्टिटयूटचें काम संपुष्टांत आलें. इन्स्टिटयूटच्या मातृस्थानीं असलेली संस्था अंगभूत दुर्बलतेमुळें जन्मापूर्वीच विलयास गेली. पण तिचें हें अपत्य मोठें गुटगुटीत, बाळसेदार निपजलें. या संस्थेनें एकूण ७७ योजनांसाठीं कोटयवधि डॉलर्स खर्ची टाकले होते. आणि आजवरच्या धर्मविषयक आणि समाजशास्त्रविषयक अधिकृत संशोधनामध्यें या संस्थेचीं प्रकाशनें प्रामुख्यानें सन्मानपूर्वक उल्लेखिलीं जातात.

ता. ५ ऑक्टोबर १९३० रोजीं मॉर्निंग साइड हाइट्सवरील एका भव्य गॉथिक प्रार्थना मंदिरांत रिव्हरसाइड चर्चच्या उद्घाटनसमारंभासाठीं सहा-सात हजार लोकांनीं गर्दी करून सोडली. या चर्चचा चौकोनी घुमट भोंवतालच्या असंख्य इमारतींवर लखलखत होता. या धार्मिक वस्तूचें चित्रशिल्प विलक्षण चमत्कृतिजनक होतें. परंपरागत प्रॉटेस्टंट पंथाच्या रूढ संकेतांशीं सर्वस्वीं विसंगत असें हें अद्भुत शिल्प होतें. या चर्चमध्यें सर्व पंथाच्या अनुयायांना मुक्तद्वार प्रवेश होता. येथें जमणारांनीं आपआपल्या धर्मकल्पना, रूढी आणि चालीरीती यांचा त्याग करण्याची आवश्यकता नव्हती. चर्चमधील काचेच्या तावदानांवर रंगविलेल्या भव्य चित्रांतून आणि दगडांतून कोरून काढलेल्या विस्मयकारक शिल्पांतून प्रत्येक धर्मपंथाच्या अनुयायांचें समाधान शोधण्याचा यत्न दिसत होता. प्रवेशद्वाराच्या कमानींवर पौर्वात्य आणि पाश्चात्य धर्मनेत्यांच्या मूर्ती, ख्रिश्चन साधुसंतांच्या बरोबरीनें विराजमान झालेल्या दिसत होत्या. येथें मोझेसच्या मूर्तीजवळ कन्फ्यूशिअस, बुद्ध आणि महंमद यांच्या मूर्ती होत्या. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानी कांट, हेगेल आणि इमर्सन यांच्याजवळ उभे होते. डार्विन आणि आइनस्टाइन यांच्यासाठीं योग्य ती जागा येथें राखून ठेविलेली होती. कॅथॉलिक

महाकवि डांटे, प्रॉटेस्टंट महाकवि मिल्टनच्या संगतींत उभा होता. आणि कॅथॉलिक संतांच्या सान्निध्यांत प्रॉटेस्टंट सुधारक येथें शोभत होते.

त्या दिवशीं सकाळीं विख्यात धर्मोपदेशक हॅरी इमर्सन फॉस्डिक यानें रिव्हर-साइड चर्चच्या हेतूचें प्रयोजन आपल्या उद्घाटनाच्या प्रवचनांत विशद् केलें. तो म्हणाला, “आजच्या प्रॉटेस्टंट धर्मपंथाची स्थिति नीट ध्यानांत घ्या. मार्टिन ल्यूथरच्या प्रचंड सावलीच्या आश्रयानें या पंथांतील एक विभाग उभा आहे. जिनेव्हांतील कॅल्व्हिनच्या आणि स्कॉटलंडमधील जॉन नॉक्सच्या प्रेरणेनें स्थापित झालेले प्रेस्बिटेरियन आणि सुधारक विभाग आमच्यांत आहेत. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत उत्कर्ष पावलेला एपिस्कोपल विभाग आमच्यांत आहे. धर्मसुधारणेच्या चळवळींतील क्रांतिकारक डाव्या पक्षाचा कडवा प्रतिनिधि असा बाप्टिस्ट विभाग आमच्यांत आहे. प्यूरिटन धर्मतत्त्वाचा वारसा सांगणारा कॉंग्रिगेशन विभाग आमच्यांतच आहे. यांजपैकीं प्रत्येक विभाग वैशिष्ट्यसंपन्न आहे. प्रत्येक विभागाचा स्वतंत्र असा विशिष्ट इतिहास आहे. प्रत्येक विभागाचे परंपराप्राप्त असे कांहीं विशिष्ट संकेत, प्रत्येक विभागाचें एक विशिष्ट असें तत्त्वज्ञान आहे. आमच्या अमेरिकन समाजांत यांतील प्रत्येक विभागाचे अनुयायी सर्वत्र पसरलेले आहेत. येथें जसे आहेत, तसेच ते परदेशांतून आहेत. ख्रिश्चन धर्मपंथांतील प्रत्येक विभागाचें तत्त्वज्ञान आणि धोरण भिन्न आहे. हें सर्व बघून, जे ख्रिश्चन नाहींत त्यांच्या मनांत गोंधळ माजल्याशिवाय राहत नाहीं.”

हे सर्व धर्मपंथ वैशिष्ट्ययुक्त आणि भिन्न असले, तरी त्यांच्या अस्तित्वास कारण होणारी एक समान भूमिका निश्चित आहे. या श्रद्धेनें प्रेरित होऊन रिव्हरसाइड चर्चनें प्रॉटेस्टंट धर्मपंथाचीं हीं सर्व शकलें एका पंथांतील अशा धर्मसंस्थेंत सांधण्याचा यत्न केला. मूलभूत ख्रिश्चन ऐक्याचें हें एक प्रात्यक्षिक रिव्हरसाइड चर्च जगास दाखवीत होतें.

तसें पाहिलें तर पंथातीत धर्मनिष्ठेची कल्पना नवीन नव्हती. फिफ्थ ॲव्हेन्यू बाप्टिस्ट चर्चनें डॉ. फाउन्स या उदारमतवादी तरुण धर्मोपदेशकाची जेव्हां योजना केली, तेव्हांपासून हा विचार मूळ धरावयास लागला होता. आणि डॉ. वोएल्फकिनच्या नेतृत्वानें या विचारास चांगली चालना दिलेली होती. इ. स. १९२२ मध्यें पार्क ॲव्हेन्यूंतील सिक्स्टीफोर्थ स्ट्रीटवरील चर्चच्या नव्या वास्तूंत जेव्हां बाप्टिस्ट पंथानुयायी प्रार्थनेसाठीं एकत्र जमावयास लागले, तेव्हां या आधुनिक विचारानें त्यांच्या मनाची पकड घेतलेली होती. डॉ. वोएल्फकिनच्या

सेवानिवृत्तीनंतर जेव्हां त्याचा वारस शोधावयाचा प्रसंग आला, तेव्हां तशाच अधिकाराचा उदारमतवादी धर्मोपदेशक शोधणें भाग होतें. रॉकफेलरच्या मतानें तर तें अत्यावश्यक होतें. डॉ. फॉस्डिकनें ही नवी नेमणूक स्वीकारावी, अशी पहिली सूचना रॉकफेलरनेंच केली.

मध्यंतरींच्या काळांत या कल्पनेचें कल्पनातीत असें स्वागत झालें. आणि या नवकल्पनेच्या जनकांचीं स्वप्नें आकारास आलीं. एकूण एकतीस धर्मपंथांचे प्रतिनिधि या चर्चच्या सभासदांत आहेत. ज्या वेळीं एखाद्या नव्या सभासदाचा शपथविधि या चर्चमध्यें होतो त्या वेळीं त्याच्या विशिष्ट धर्मपंथानुसार त्याला प्रवेश देण्यांत येतो. प्रत्येक आठवड्यांत अनेक धर्मपंथांचे पूजाविधि येथें साजरे केले जातात. येथें सर्व प्रकारच्या धार्मिक नाटकांचे प्रयोग केले जातात, आणि अनेक धार्मिक प्रश्नांची येथें मुक्त चर्चा केली जाते.

रिव्हरसाइड चर्चच्या विकासास रॉकफेलरनें मनापासून साहाय्य केलेलें आहे. संकल्पित रिव्हरसाइड चर्चची वास्तु उभी करण्याची योजना संमत झाली, तेव्हां वास्तुसमितीचें अध्यक्षस्थान रॉकफेलरला देण्यांत आलें. तेथील शिल्प-वैशिष्ट्याचा प्रत्येक तपशील त्यानें साक्षेपानें अभ्यासिला. या संबंधांत तो सांगतो : "महिन्यांतून एक वेळ असे अनेक महिने आम्ही एकत्र जमत होतों. इमारतीच्या बांधकामांतील प्रत्येक तपशील मीं काळजीपूर्वक नजरेखालून घातलेला होता." याशिवाय रॉकफेलरचें आर्थिक साहाय्य नसतें, तर पंथैक्याचा हा विशाल प्रयोग एवढ्या भव्य प्रमाणावर आकारास आणतां आला नसता. रिव्हरसाइड चर्चच्या योजनेस त्यानें अंतःकरणपूर्वक उत्साहानें पाठिंबा दिलेला होता. तरी या चर्चच्या व्यवहारांत लक्ष घालण्याची इच्छा त्यानें कधीं सुद्धां दर्शविली नाहीं. पंचवीस वर्षांपेक्षां अधिक काळपर्यंत त्याच्या सहकार्यानें काम केल्यानंतर डॉ. फॉस्डिक लिहितो : "रॉकफेलर हा अत्यंत विचारी असा पुरुष आहे. सर्वांविषयीं त्याच्या मनांत जिव्हाळा आहे. कर्तृत्वाची अमर्याद शक्ति असूनसुद्धां तिचें प्रदर्शन मांडण्याची वृत्ति त्याच्या स्वभावांत अंशमात्रसुद्धां नाहीं. आणि प्रत्येक बाबतींत सहकार्यासाठीं त्याचा हात सदा पुढें असतो. चर्चचें धोरण आंखण्यांत त्यानें कधीं रस घेतला नाहीं. किंवा धर्मोपदेशकानें प्रवचनांत काय सांगावें, याविषयीं त्यानें कधीं कांहीं आग्रह धरला नाहीं. आपल्या ठिकाणीं स्वस्थ बसून कार्यकर्त्यांस प्रोत्साहन देण्याची त्याची प्रवृत्ति आहे...आमच्या चर्चमध्यें जर त्याला कांहीं विशिष्ट अधिकार प्राप्त झाला असेल, तर तो केवळ

त्याच्या स्वाभाविक चारित्र्यामुळें आणि शहाणपणानें होय. या भव्य योजनेस त्यानें जें सहकार्य अंतःकरणपूर्वक देऊं केलें, त्यासाठीं त्याचे सहकारी कृतज्ञ आहेत. त्याचा अधिकार जर कांहीं असेल तर तो त्याच्या सेवाभावी कर्तृत्वाचाच निःसंशय आहे."

रिव्हरसाइड चर्चमध्यें पंथातीत धर्मनिष्ठेचें रॉकफेलरचें ध्येयवादी स्वप्न संपूर्णपणें आकारलेलें दिसलें, ही गोष्ट खरी. पण पंथातीत धर्मनिष्ठेच्या प्रचारासाठीं त्यानें केवळ तेवढा एकच यत्न केला, असें नाहीं. पंथातीत धर्मनिष्ठेस वाहिलेल्या अनेक कार्यास त्यानें आर्थिक साहाय्य मोठ्या प्रमाणावर वेळोवेळीं दिलेलें आहे. ज्या संस्था या ध्येयासाठीं नित्य झटत होत्या, त्यांचा तो एकनिष्ठ मित्र होता. उदाहरणार्थ, 'फेडरल कौन्सिल ऑफ चर्चेस' या संस्थेस तो दरसाल मोठ्या देणग्या देत असे. इ. स. १९५० मध्यें फेडरल कौन्सिल ऑफ चर्चेस आणि इतर बारा धर्मसंस्था एकत्र आल्या. आणि त्या सर्वांची परिणति 'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस' नामक व्यापक संस्थेंत झाली. या संस्थेच्या प्रस्थापनेसाठीं त्यानें सर्व प्रकारचे कष्ट घेतले. अशा संस्थेची संघटना कशी बांधावी या प्रश्नाचा संपूर्ण अभ्यास करण्यासाठीं त्यानें आर्थिक साहाय्य दिलें आणि न्यूयॉर्कमध्यें रिव्हरसाइड चर्चच्या जवळ या संस्थेचें मध्यवर्ती कार्यालय उभारण्यासाठीं मुक्तहस्तानें त्यानें मदत केली.

'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस' या संस्थेस सुद्धां त्याचें हार्दिक आणि आर्थिक साहाय्य लाभलेलें आहे. इ. स. १९३८ मध्यें या कौन्सिलची स्थापना झाली. पण दुसऱ्या महायुद्धामुळें तिच्या प्रगतीस योग्य तो अवकाश आणि अवसर मिळूं शकला नाहीं. इ. स. १९४८ मध्यें ॲम्स्टरडॅम येथें या संस्थेचें पहिलें अधिवेशन बोलावण्यांत आलें. कोणतीहि संस्था जागतिक ख्रिश्चन धर्मांचें प्रतिनिधित्व करूं शकत नाहीं, ही गोष्ट हा वेळपर्यंत सर्वांच्या लक्षांत येऊन चुकली होती. आशियांतील आणि आफ्रिकेंतील चर्चेसचा संबंध पाश्चात्य चर्चेसशीं जोडणें आवश्यक होतें. आणि त्यासाठीं यूरोपमधील चर्चेसची मजबूत संघटना आधीं उभारणें आवश्यक होतें. परिणामीं 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस' या जागतिक संस्थेची प्रतिष्ठापना करण्यांत आली. तिच्या विस्तृत कक्षेंत सर्व खंडांतील ४८ देशांतील एकूण १६३ धर्मसंस्था संघटित झाल्या. डॉ. सॅम्युएल मॅक्रीआ कॅव्हर्ट हा 'वर्ल्ड कौन्सिल'चा कार्यकारी कार्यवाह लिहितो : "या संस्थेची स्थापना आणि विकास ही एक अद्भुत घटना आहे. अनेक धर्मपंथांच्या

सहकार्यास अनुकूल अशी पार्श्वभूमि उपलब्ध आहे आणि जगभर पसरलेल्या चर्चेसमध्यें ऐक्यभावना आहे, ही गोष्ट निदर्शनास आल्यावर अनेक लोकांस आश्चर्याचा आनंददायक धक्का बसला."

रॉकफेलरला असा धक्का मुळींच बसला नाहीं. पण 'वर्ल्ड कौन्सिल'च्या स्थापनेमुळें त्याच्या मनास मनस्वी समाधान वाटलें. आणि जेव्हां पद्धतशीर धर्मशिक्षण देणाऱ्या संस्थेची योजना कौन्सिलनें आंखली तेव्हां या कार्यांतील त्याचें आकर्षण वाढीस लागलें. 'इन्स्टिटयूट फॉर एक्युमेनिकल एज्युकेशन'-मध्यें धर्मोपदेशक आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक यांच्या जोडीनें इतर क्षेत्रांतील डॉक्टर्स, शिक्षक आणि पत्रकार या सर्वांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यांत आली. या संस्थेमुळें 'नव्या पद्धतीचें खिश्चन नेतृत्व उद्यास येईल आणि नव्या काळास अनुसरून जगांतील खिश्चन संघटना मजबूत करण्याचें काम तें करील' अशा विश्वासानें कौन्सिलनें इन्स्टिटयूटच्या कार्यास वेगानें चालना दिली. स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा सरोवराच्या कांठावर चॉटो डि बॉसी येथें धर्मशिक्षणाची पहिली शाळा जी सुरू झाली ती रॉकफेलरच्याच उदार देणगीमुळें. जगाच्या कानाकोपऱ्यांतून या शाळेंत विद्यार्थी दाखल झाले होते.

इ. स. १९३१ मध्यें रॉकफेलर म्हणाला, "खिश्चन धर्मपंथांत बाह्यतः अनेक मतभेद दिसतात हें खरें आहे. पण खिश्चन धर्म म्हणजे सहानुभूति, त्याग, सेवा आणि प्रेम असें मानलें—आणि हें सर्व मान्य करतील, असा मला विश्वास वाटतो—तर खिस्ती धर्मास आधारभूत असलेलीं हीं मूलतत्त्वें मानवतेच्या सेवेची प्रत्येक संधि शोधतील आणि साधतील, यांत शंका नाहीं. जगांतील प्रत्येक धर्म या मूलतत्त्वांस मान्यताच देतो. आणि जगांतील सर्व धर्म अंतीं मोक्ष-संपादनाचा मार्ग दाखवितात." अशी त्याची धारणा असल्यामुळें 'सोसायटी ऑफ एथिकल कल्चर फेडरेशन ऑफ ज्यूइश फिलॅन्थ्रॉपिक सोसायटीज' किंवा कॅथॉलिक चॅरिटीजपैकीं एखादी संस्था—संस्था कोणतीहि असो—जेव्हां म्हणून अशा एखाद्या संस्थेस देणगी देण्याची संधि येईल, त्या वेळीं मानवकल्याणाच्या एकाच व्यापक भूमिकेवरून तो ती घेत असे. याच एका उद्दिष्टानें प्रेरित होऊन त्यानें 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस' या संघटनेस सर्वतोपरीचें साहाय्य देऊं केलें. न्यूयॉर्कमधील एका कॅथॉलिक चॅरिटीस मदतीचा चेक पाठवितेवेळीं कार्डिनल हेजला लिहिलेल्या एका पत्रांत जे विचार त्यानें व्यक्त केले आहेत, तसे विचार

असंख्य पत्रांतून वेळोवेळीं त्यानें व्यक्त केलेले आढळतात. कार्डिनल हेजला त्यानें लिहिलें :

"जरी आपण मजकडे देणगीची मागणी केलेली नसली, तरीसुद्धां न्यूयॉर्कमधील नागरिकांवर आपल्या कार्याचा पंथनिरपेक्ष हक्क पोहोंचतो, असें मला वाटतें. कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, ज्यू—आपण कोणीहि असों, जोंपर्यंत आपण मानवाच्या मदतीस धावून जात आहोंत आणि त्याच्या कल्याणास हातभार लावीत आहोंत, तोंपर्यंत आपलें सर्वांचें उद्दिष्ट एकच आहे. पंथनिष्ठेमुळें मानवसेवेच्या कार्यांत अंतराय येण्याचें कारण नाहीं. आपल्या नेतृत्वानें जें कार्य उभें राहिलें आहे त्या कार्यासाठीं जो तुमच्या पंथाचा नव्हे, अशा एका व्यक्तीस मदत करण्याची परवानगी आपण द्याल, तर मी मनस्वी कृतज्ञ राहीन. हाच एक विचार मनांत बाळगून मी सोबतचा चेक पाठविण्याचें धाडस करीत आहें."

'फेडरेशन ऑफ ज्यूइश फिलॅन्थ्रॉपिक सोसायटीज'ला पाठविलेल्या दुसऱ्या एका पत्रांत तो लिहितो :

"गेल्या वर्षीच्या वार्षिक दानमोहिमेच्या प्रसंगीं आपल्या संस्थेच्या अनेकविध कार्यांसाठीं मीं पाठविलेल्या ५०,००० डॉलर्सच्या देणगीचा स्वीकार करण्याचें सौजन्य आपण दाखविलें होतें. चालू सालीं आपण दानमोहीम सुरू केली आहे, आणि आपण जरी माझ्याकडे मागणी केलेली नसली, तरी आपली संस्था जें कार्य करीत आहे, त्या कार्यावर माझा दृढ विश्वास आहे. विशेषतः अनेक दानसंघटना सहकारी तत्त्वावर एकत्र आणण्याचें जें महान् कार्य आपण साधलें आहे त्यावर माझी श्रद्धा आहे. आणि म्हणून गेल्या वर्षी ज्याप्रमाणें आपण माझी देणगी स्वीकारण्याचें सौजन्य दाखविलेंत, त्याचप्रमाणें या वर्षीसुद्धां ५०,००० डॉलर्सचा सोबतचा चेक पाठविण्याची परवानगी देऊन आपण मला उपकृत कराल, असा मला विश्वास वाटतो."

आजच्या संत्रस्त, व्यथित जगाच्या समस्या सोडविण्यास चर्च कधीं ना कधीं समर्थ ठरेल, अशी श्रद्धा जन्मभर चित्तांत बाळगून रॉकफेलर नित्य काम करीत

राहिला. सेवानिवृत्तीनंतर सुद्धां कित्येक वर्षें धर्मकारणांत त्याचें लक्ष अव्याहत गुंतलेलें होतें. त्याच्या अंतःकरणांतील श्रद्धा आणि आशा केवळ अमर्याद होती. वयाचीं ८० वर्षें पुरीं झाल्यावर, हारवर्ड विद्यापीठाचा अध्यक्ष डॉ. नाथान पुसी यानें धार्मिक शिक्षणाची आवश्यकता जाहीरपणें प्रतिपादन केल्यावरून, 'हारवर्ड डिव्हिनिटी स्कूल'साठीं दहा लक्ष डॉलर्सची देणगी त्यानें अनाहूत पाठविली. त्या वेळीं डॉ. पुसीला त्यानें लिहिलें : "आपण आणि आपल्या विद्यापीठानें जी भूमिका प्रस्तुत संबंधांत घेतली आहे, तिजमुळें शैक्षणिक जगांत नव्या युगाचा उदय होईल अशी श्रद्धा मी बाळगून आहें." पुढील वर्षी सीलॅटिक फंडास त्यानें दोन कोटी डॉलर्स देणगी जाहीर केली. त्या वेळीं पुन्हां एकदां आपल्या मनांतील विश्वास त्यानें बोलून दाखविला. त्यानें म्हटलें : 'प्रॉटेस्टंट धर्मशिक्षण या देशांत दृढ व्हावें आणि धर्मज्ञानाचा विकास व्हावा, या हेतूनें मी ही देणगी देत आहें." या संबंधांत न्यूयॉर्क टाइम्सनें त्या वेळीं लिहिलें : "जगांतील मूलभूत शाश्वत मूल्यांवरील दात्याची श्रद्धा या देणगींत व्यक्त झालेली आहे. अश्रद्ध माणसानें अशी देणगी कधींच दिली नसती."

धार्मिक ऐक्याच्या उद्दिष्टानें प्रेरित होऊन रॉकफेलरनें जन्मभर जे अविश्रान्त परिश्रम केले, त्यांचे दूरगामी परिणाम नेमके काय झाले, त्यांची व्याख्या करणें अशक्य आहे. 'पुनर्जात चर्च'चें त्याचें स्वप्न अजूनपर्यंत पूर्णपणें आकारास आलेलें दिसत नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. पण त्याचबरोबर हीहि गोष्ट खरी कीं, गेल्या अर्धशतकांत प्रॉटेस्टंट धर्मपंथ क्रांतिकारक अवस्थेंतून प्रगत झाला आहे. पन्नास वर्षांपूर्वी चर्चेसचें एकसुद्धां कौन्सिल कोठें एखाद्या प्रदेशांत, राष्ट्रांत वा आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत नव्हतें. तर आज अशा प्रादेशिक कौन्सिलांची संख्या हजाराच्या आसपास आहे. ४४ राज्यांचीं अशीं कौन्सिलें आहेत. अगदीं अलीकडे अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत एक 'नॅशनल कौन्सिल' स्थापन झालें आहे. कॅनडा, ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या राष्ट्रांतून अशींच नॅशनल कौन्सिलें स्थापन झालेलीं आहेत. शिवाय 'वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस' ही विश्वव्यापी संघटना कार्यकर आहेच. यांपैकीं प्रत्येक संस्था संपूर्णपणें कार्यक्षम असेल वा नसेल, पण मध्यंतरींच्या अर्धशतकांत धार्मिक क्षेत्रांत केवढा आश्चर्यकारक बदल घडून आला आहे, त्याची साक्ष देण्यास हीं कौन्सिलें आज समर्थ आहेत.

आज आपण नवयुगाच्या उंबरठ्यावर उभे आहोंत. आणि आपापल्या विशिष्ट

धर्मपंथाच्या कक्षेंत राहून काम करण्यापेक्षां पंथातीत धर्मसेवा साधण्याची संधि मिळाल्यास आपणांस ती हवी आहे. पन्नास वर्षांपूर्वी पंथातीत धर्मसेवेचें रहस्य जाणणारा एखादाच पंथनिर्देशक विचारवंत होता. तर आज वस्तुस्थिति अशी आहे कीं भिन्नभिन्न पंथांच्या नेत्यास पंथैक्याची आवश्यकता बहुतकरून पटलेली आहे. अमेरिकन प्रॉटेस्टंट पंथाचें भवितव्य जागतिक धर्मप्रचाराशीं निगडित आहे. आणि चर्चसंलग्न अशा व्यापक प्रश्नांचा विचार सर्वांनीं मिळून समान भूमिकेवरून करावयास हवा, याची जाणीव आतां सर्वत्र सर्वांस झालेली दिसते.

मनोवृत्तींतील या आशादायक बदलाचीं कारणें अनेकविध आणि गूढ आहेत. आणि हा इष्ट तो बदल घडवून आणण्यास ज्यांनीं हयातभर अविश्रांत परिश्रम केले, अशा अनेक लोकांचीं नांवें प्रस्तुत संबंधांत सहज स्मरण्यासारखीं आहेत. पंथांतील धर्मैक्याच्या निष्ठेस ज्यांनीं स्वतःस वाहून घेतलें आणि ती निष्ठा कार्यशील करण्याच्या यत्नांत जे नित्य अग्रेसर राहिले, अशांच्या पंक्तींत रॉकफेलरचें नांव अग्रगण्य समजावें लागेल, यांत शंका नाहीं.

★ ★ ★

प्रकरण नववें

# रॉकफेलर सेंटर

रॉकफेलरनें ज्या अनेक योजनांस चालना दिली, त्यांजपैकीं ज्या एका योजनेचें भवितव्य अपेक्षेपेक्षां सर्वस्वीं भिन्न ठरलें, अशी योजना म्हणजे 'रॉकफेलर सेंटर'ची होय. न्यूयॉर्कमधील मध्यवस्तींत 'रॉकफेलर सेंटर'च्या भव्य वास्तू प्रेक्षकाचें लक्ष दूरवरून वेधून घेतात. या सेंटरची मूळ कल्पना अगदींच तोकडी होती. केवळ अनपेक्षित अशा कांहीं विचित्र योगायोगामुळें मूळ कल्पनेचा अकल्पनीय असा विकास प्रस्तुत उपक्रमाच्या संबंधांत झालेला दिसतो. ऑटो कान नामक कोट्यधीश प्रारंभापासून ऑपेरा संगीत नाट्याचा विलक्षण भोक्ता आणि दाता होता. 'मेट्रॉपॉलिटन ऑपेरा हाउस'ची वास्तु इ. स. १८८३ मध्यें उभी करण्यांत आलेली होती. ती आतां कालांतरानें निरुपयोगी झाली होती. शिवाय नगराचा विस्तार अशा अनपेक्षित दिशांनीं झालेला होता कीं ही वास्तु आतां किंचित् एकीकडे पडल्यासारखी दिसत होती. त्यामुळें ऑपेरा हाउसला साजेशी नवी वास्तु उभी करणें आवश्यक झालें होतें. फॉर्टी-नाइन्थ आणि फिफ्टीएथ स्ट्रीट्सवर फिफ्थ आणि सिक्स्थ ॲव्हेन्यू यांजमधील जागा कोलंबिया विद्यापीठाच्या मालकीची होती. आणि शक्य तर ही जागा विकत घेऊन तेथें ऑपेरा हाऊससाठीं आधुनिक सर्व सोयींनीं युक्त अशी नवी वास्तु उभी करण्याचा संकल्प योजकांच्या मनांत होता. फिफ्थ ॲव्हेन्यूच्या पूर्वेकडील कक्षेशीं समांतर असा मोठा सार्वजनिक चौक होता. आणि या चौकास सन्मुख

अशी संकल्पित वास्तु उभारण्याची योजना मुक्रर झालेली होती. शक्य तर हा चौक विकत घेऊन तेथें सार्वजनिक पार्क उभा करावा आणि नंतर न्यूयॉर्कमधील कायमच्या पार्क योजनेंत त्याचा समावेश करावा, अशी ही योजना होती. या संकल्पित योजनेंत रॉकफेलर लक्ष घालावयास तयार आहे काय, अशी विचारणा योजकांकडून करण्यांत आली.

अशा सार्वजनिक योजनांत लक्ष घालावयास रॉकफेलर नेहमींच तयार असे. या वेळींसुद्धां त्यानें तत्परतेनें आपली संमति कळविली. आणि मग कोलंबिया विद्यापीठाच्या जागेची चौकशी संक्षेपानें करण्यांत आली. ही जागा मूळ राज्याच्या मालकीची होती. नंतर ती नगरास भेट म्हणून देण्यांत आली. नगरानें ती जागा १८०२ मध्यें 'पब्लिक बोटॅनिक गार्डन' साठीं डॉ. डेव्हिड होसॅक याच्या हवालीं भाडेपट्टीनें केली. न्यूयॉर्कमधील प्रतिष्ठित नागरिकांत डॉ. होसॅकची गणना होत असे. तो स्वतः एक निष्णात डॉक्टर होता. ॲरॉन बरशीं झालेल्या द्वंद्वयुद्धांत अलेक्झांडर हॅमिल्टन जखमी झाला, तेव्हां त्याची शुश्रूषा या डॉ. होसॅकनेंच केली होती. स्कॉटलंडमधील एल्जिन नामक गांवीं त्याच्या पित्याची जन्मभूमि होती. तिच्या स्मरणार्थ 'एल्जिन बोटॅनिक गार्डन' असें नांव आपल्या ताब्यांतील जागेस त्यानें दिलें होतें. सर्व बाजूंनीं झपाट्यानें वाढणाऱ्या नगराच्या मध्यभागीं रमणीय असें यात्रास्थान निर्माण करण्याची त्याची मनीषा होती, पण दुर्दैवानें त्याची आर्थिक स्थिति खालावली आणि १८११ मध्यें ७५००० डॉलर्सच्या मोबदल्यांत या जागेवरील आपला हक्क त्यानें न्यूयॉर्क राज्यास विकून टाकला. तीन वर्षांनंतर उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांस साहाय्य करण्याच्या योजनेस अनुसरून राज्यानें ही जागा कोलंबिया विद्यापीठाच्या हवालीं केली. १८२३ मध्यें कोलंबिया विद्यापीठानें ही जागा एका गृहस्थास दरसाल १२५ डॉलर्स आणि कर भरण्याच्या करारानें दिली. १८२६ मध्यें भाड्याची रक्कम ५०० डॉलर्सपर्यंत वाढविण्यांत आली. शंभर वर्षांनंतरसुद्धां या जागेची मालकी कोलंबिया विद्यापीठाकडेच होती. पण आतां मध्यंतरींच्या काळांत विद्यापीठास निव्वळ भाड्याचें उत्पन्न म्हणून सालिना तीस लक्ष डॉलर्स मिळावयास लागले होते.

कोलंबिया विद्यापीठाच्या ताब्यांत असलेली जागा नेमकी कोठें होती, तें आरंभीं निर्देशित केलेंच आहे. पण पूर्वी फॉर्टीसेव्हन्थ आणि फिफ्टीफर्स्ट स्ट्रीट्स व फिफ्थ आणि फॉर्टीसिक्स्थ ॲव्हेन्यूजमधील सर्व जागा या विद्यापीठास

देण्यांत आलेली होती. १८५७ मध्यें विद्यापीठाच्या वाढत्या कार्यास अधिक निधीची आवश्यकता उत्पन्न झाली. तेव्हां फिफ्थ ॲव्हेन्यूमधील फॉर्टीएट्थ आणि फॉर्टीनाइन्थ स्ट्रीट्सवरील दोनशें फुटांचा पट्टा कोलंबियानें विकून टाकला. नंतर १९०४ ते १९१३ च्या दरम्यान मॉर्निंग साइड हाइट्सवरील जागा खरेदी करण्यासाठीं आणि तेथील कार्याचा विकास साधण्यासाठीं कोलंबियानें फॉर्टी सेव्हन्थ आणि फॉर्टीएट्थ स्ट्रीट्सवरील आपल्या मालकीची जागा विकून टाकली. १९२८ मध्यें फिफ्थ आणि सिक्स्थ ॲव्हेन्यूमधील फार्टीएट्थ आणि फिफ्टी-फर्स्ट स्ट्रीट्सवरील तीन प्रचंड इमारती कोलंबियाच्या ताब्यांत होत्या. त्या जागेंत त्या वेळीं २२८ जुनाट दगडी घरें आणि अनेक दुकानें होतीं. १९२८ च्या सप्टेंबर महिन्यांत रॉकफेलरनें ही सर्व जागा खरेदी करण्याचा निर्णय जाहीर केला. पण ती गोष्ट वाटली तशी सोपी नव्हती, हें मागाहून त्याला समजून आलें.

खरेदीच्या निर्णयानंतर दहा वर्षांनीं सिंहावलोकन करण्याच्या निमित्तानें रॉकफेलरनें लिहिलें :

"इ. स. १९२८ मध्यें रॉकफेलर सेंटरची एक योजना आंखण्यांत आली, तेव्हां देशाची आर्थिक स्थिति मोठी भरभराटीची होती. या वेळीं मेट्रॉपॉलिटन ऑपेरा ही संस्था कोलंबिया विद्यापीठाच्या मालकीच्या कांहीं जागेची खरेदी करण्याच्या वाटाघाटींत गुंतलेली होती. तेथें एक भव्य ऑपेरा हाउस बांधण्याची योजना संस्थाचालकांच्या मनांत होती. या जागेलगतचे कांहीं प्लॉट्स कांहीं धनिकांनीं विकत घ्यावेत आणि तेथें रस्ते व चौक बांधण्यासाठीं नगराच्या हवालीं करावेत, म्हणजे संकल्पित ऑपेरा हाउसच्या वास्तूस योग्य अशी पार्श्वभूमि उपलब्ध होईल, अशी चालकांची योजना होती. तदनुसार एक प्लॉट मीं विकत घ्यावा, असें मला सुचविण्यांत आलें.

नगरसुधारणेच्या योजनेस हे व्यवहार चांगलें साहाय्य करतील, अशी खात्री पटल्यामुळें मीं या संकल्पित कार्यांत सहभागी होण्याचें ठरविलें. मूळ कल्पना फक्त एक प्लॉट मीं खरेदी करावा, एवढ्यापुरतीच मर्यादित होती. पण कालांतरानें मूळ योजनेचा विकास सर्वस्वीं अनपेक्षित असा झाला. अखेरीस कोलंबिया विद्यापीठाकडून त्यांच्या मालकीची सर्व जागा चोवीस वर्षांच्या लीजनें मीं खरेदी केली. नंतर ही मुदत चौतीस वर्षांपर्यंत वाढविण्यांत आली. लीजच्या करारांत एक कलम असें होतें कीं, ऑपेरा हाउसच्या इमारतीसाठीं कोलंबियाचा कांहीं भाग

मीं खरेदी करावा. आणि तो त्याच किंमतीस ऑपेरा हाउसच्या व्यवस्थापकांच्या हवालीं करावा. त्याचप्रमाणें सार्वजनिक चौकासाठीं योजिलेली जागा मीं खरेदी करावी आणि ती नगराच्या हवालीं करावी. या हेतूनें मीं कोलंबियाच्या ताब्यांतील सर्व जागा खरेदी केली. पण मूळ योजना बाजूस राहील, माझ्या ताब्यांत आलेली जागा मी इतर सहकारी संस्थांना भाड्यानें देईन, संकल्पित ऑपेरा हाउसच्या व्यतिरिक्त उरलेल्या जागेंत आणखी अनेक इमारती भाडेकरू संस्था स्वतःच्या खर्चानें बांधतील, अधिक कांहीं खर्च करावा न लागतां माझ्या मालकीची झालेली ही जागा अशा रीतीनें कारणीं लागेल, अशी खरेदीच्या वेळीं मला कल्पना-सुद्धां नव्हती.

माझा शब्द देण्यापूर्वीं पांच रिअल एस्टेट एक्सपर्ट्सचा सल्ला मीं घेतलेला होता. मूळ योजना भक्कम आहे, आणि एकंदरींत हा व्यवहार दूरदर्शीपणाचा आहे, अशी त्या पांचांनीं मला ग्वाही दिली होती."

१९२९ मध्यें जागेवरील इमारती खाली करण्यांत आल्या, आणि पाडण्यांत आल्या. मूळ योजनेस बांधेसूद आकार यावा, म्हणून रॉकफेलरनें सिक्स्थ अॅव्हेन्यू-वरील आघाडीची जागा आणि तिच्या जोडीला लगतचे कांहीं प्लॉट्स खरेदी केले. त्यासाठीं 'मेट्रॉपॉलिटन स्क्वेअर कॉर्पोरेशन' नांवाची संस्था कर्नल आर्थर वूड्सच्या अध्यक्षतेखालीं स्थापण्यांत आली. आणि तिच्या हातीं पुढील सर्व कारभार सोंपविण्यांत आला. त्या वेळीं कल्पना अशी होती कीं तीनचार वर्षांत हें सर्व काम सहज आकारास येईल.

पण या महत्त्वाकांक्षी योजनेंत व्यत्यय आणतील अशा दोन घटना १९२९ सालांत घडल्या. पहिली घटना म्हणजे ऑपेरा हाउसनें आपली मूळ जागा सोडून दुसऱ्या जागीं स्थलांतर करण्याच्या संबंधांतील होती. नवीन जागा घेण्याचें साहस करावयाचें तर अगोदर स्वतःच्या मालकीची जुनी जागा खालीं करणें भाग होतें. पण तसें केलें असतें, तर ऑपेराच्या चालू सीझनमधील कार्यक्रमांत खंड पडला असता. दुसरी घटना म्हणजे १९२९ मधील अमेरिकेंतील सर्व संयुक्त राज्यांस ग्रासून टाकणारें आर्थिक अरिष्ट. देशांतील सर्वच आर्थिक व्यवहार या अनपेक्षित अरिष्टामुळें गडगडून कोसळून पडले.

या वेळीं रॉकफेलरला ज्या गंभीर समस्येस तोंड द्यावें लागलें तिची कल्पना त्याच्याच शब्दांत करून देणें युक्त होईल :

"या घटनेनंतर अल्पावधींतच पैशाच्या आणि कायद्याच्या अडचणींमुळें ऑपेरा हाउसच्या संचालकांनीं संकल्पित योजनेंतून आपलें अंग काढून घेतलें—आणि ती योजनासुद्धां अशी कीं जी त्यांनींच आंखलेली होती. केवळ त्यांच्याच आग्रहामुळें मीं त्या योजनेस माझें सहकार्य देऊं केलें होतें. परिणामीं १९३० सालच्या आरंभीं कोलंबियाशीं दीर्घ कालावधीच्या करारान्वयें बांधलेला असा मी एकटाच राहिलों. ज्या लोकांनीं या योजनेंत माझें सहकार्य मागितलें होतें आणि ज्यांच्यासाठीं मी गुंतून पडलों होतों, ते सर्वजण मला सोडून बाजूला सरले होते.

भरीस भर म्हणून आर्थिक व्यवहारास अधिकच अवकळा प्राप्त झाली होती. आतां माझ्या ताब्यांत आलेली ही जागा होती त्या स्थितींत कोणाला भाड्यानें देणें सुद्धां शक्य नव्हतें. व्यर्थ कालहरणांत सहा महिने गेल्यावर बघतों तर देशांतील सर्व अर्थव्यवहार थंड पडले होते. आतां माझ्यासमोर फक्त दोनच पर्याय उभे होते. एक असा कीं हातीं घेतलेली सर्व योजनाच स्थगित करणें. दुसरा पर्याय असा कीं जुनी योजना पुन्हा एकदां नव्यानें विचारांत घेणें. तसें केलें तर प्रसंगीं नव्या इमारती बांधण्याची आणि त्यासाठीं पडेल तो सर्व खर्च स्वतःच सोसण्याची हिंमत मीं धरावयास हवी होती; खरें म्हणजे ऑपेरा हाउसच्या संकल्पामुळेंच या जागेस कांहीं विशेष असें महत्त्व प्राप्त झालें होतें. पण अचानक बदलत्या परिस्थितींत नव्या ऑपेरा हाउसची मूळ योजनाच धुळीस मिळालेली होती. आतां या जागेंतून उत्पन्न काढावयाचें म्हटलें, तर त्यासाठीं आधीं जागा उपयुक्त ठरेल, अशी कांहीं तरी योजना कार्यवाहींत आणणें भाग होतें. त्यासाठीं प्रचंड भांडवलाची तरतूद करावयाची म्हटलें तर त्या दृष्टीनें या पूर्वीं मीं कधीं विचारच केलेला नव्हता. पण तरीसुद्धां दुसरा पर्याय पत्करणें मीं पसंत केलें."

हा निर्णय प्राप्त परिस्थितींत जरी अटळ होता, तरी असा निर्णय विचारांत घेण्यासाठींसुद्धां फार मोठें धैर्य अंगीं असावयास हवें होतें. कोलंबियाशीं केलेल्या कराराप्रमाणें दरसाल ३३ लक्ष डॉलर्स केवळ भाड्यापोटीं देणें भाग होतें. हें करण्यास करारान्वयें तो व्यक्तिशः बांधलेला होता. जागेवर ज्या इमारती होत्या, त्यांचें एकूण भाडें फार तर तीन लक्ष डॉलर्स मिळण्याची शक्यता होती. याचा अर्थ असा कीं, केवळ तात्पुरत्या लीजसाठीं एकूण ३० लक्ष डॉलर्स अधिक कर

एवढी रक्कम नुकसानींत जाण्याची धास्ती होती. उलट दिशेनें विचार केला तर आर्थिक दुरवस्थेच्या त्या काळांत नव्या इमारती उभारण्यासाठीं होणारा खर्च एकट्यानें सोसण्याची कल्पना सुद्धां संकटास आमंत्रण देणारी ठरली असती. अंतीं त्यानें जो निर्णय घेतला त्यासंबंधांत एक विचार लक्षांत घेण्यासारखा होता—अर्थातच प्रत्यक्ष निर्णय ज्या परिस्थितींत घेतला गेला, त्या काळांत हा विचारसुद्धां प्रेरक ठरेल असें नव्हतें—तो विचार हा कीं हजारों बेकारांना सेंटरमधील अनेक प्रचंड इमारतींच्या बांधकामासाठीं मजुरीची संधि अनायासें उपलब्ध होण्यासारखी होती. इतिहासांत पूर्वीं कधीं झाली नव्हती इतकी बेकारी त्या काळांत सर्व क्षेत्रांत मातलेली होती. आर्थिक मंदीच्या काळांत सर्वांत असह्य फटका बसतो तो बांधकामांत गुंतलेल्या मजुरांना. कारण विपन्नावस्थेंत नवें बांधकाम हातीं घेण्यास कोणीच धजावत नाहींत. अशा स्थितींत या निरुपयोगी पडीक जागेवर नवीं बांधकामें योजितां आलीं तर असंख्य बेकारांच्या पोटाची सोय साधतां येण्यासारखी होती.

कित्येक आठवड्यांच्या चिंताजनक विचारविनिमयानंतर नव्या बांधकामास गति देण्याचा निर्णय घेण्यांत आला. अमेरिकेच्या उज्ज्वल भविष्यकाळावर सतत श्रद्धा ठेवणारी व्यक्तीच असा साहसी निर्णय घेण्यास उद्युक्त झाली असती. १९३० च्या परमावधीच्या हलाखीच्या काळांतसुद्धां रॉकफेलरच्या अंतःकरणांतील श्रद्धा अभंग होती. १९३० च्या अखेरीस आपल्या निर्णयास कार्यान्वित करणाऱ्या चार योजनांस त्यानें धडाडीनें हात घातला.

१) राइनहार्ड ॲन्ड हॉफमैस्टर, कॉर्बेट हॅरिसन ॲंड मॅक्मरे व हूड ॲंड फोइलहो—या अग्रगण्य तीन स्थापत्यसंस्थांस त्यानें नियोजित इमारतींची आखणी करण्यास एकत्र पाचारण केलें.

२) जॉन आर. टॉडच्या नेतृत्वाखालीं अनेक कर्तृत्ववान् स्थापत्यतज्ज्ञांस त्यानें 'सेंटर' ची योजना कार्यान्वित करण्यासाठीं कामास जुंपलें. प्रारंभापासूनच या सर्वांचा या योजनेशीं संबंध जडलेला होता. ते सर्वजण निर्भयपणानें सर्व शक्ति एकवटून कामास लागले.

३) देशांतील महान् रेडिओ उद्योगाच्या प्रातिनिधिक अशा तीन संस्थांनीं ऑपेरा हाऊसच्या योजनेंतील मध्यवर्ती स्थान घेतलें. 'रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका', 'नॅशनल ब्रॉडकॉस्टिंग कंपनी', 'रेडिओ कीथऑर्फ्यूम

कॉर्पोरेशन' या तीन संस्था होत. त्यांच्यासाठीं दोन नाट्यगृहें बांधण्याची योजना होती. त्यांजपैकीं एक 'म्यूझिक हॉल' हें जगांतील सर्वांत मोठें नाट्यगृह होईल, असें सांगण्यांत आलें.

४) प्रमुख चित्रसंग्रहांचे आणि विद्यापीठांतील कलाविभागांचे तज्ज्ञ संकल्पित वास्तूच्या सुशोभनाच्या कामीं सल्ला देतील, असें जाहीर करण्यांत आलें.

आर्थिक मंदीच्या विपन्नावस्थेंत या योजनेच्या संयुक्त संचालकांनीं एकूण चौदा अजस्त्र इमारतींचें बांधकाम हातीं घेतलें. आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हजारों बेकार कामगारांस कामाची संधि उपलब्ध करून दिली. प्रत्यक्ष इमारतींच्या बांधकामांत गढलेल्या प्रत्येक माणसामागें दोन माणसें इतरत्र साधनांचा पुरवठा करण्याच्या कामीं गुंतविण्यांत आलीं होतीं. या प्रचंड बांधकामांसाठीं एकूण २,२५,००० कामगारांचे श्रम कारणीं लागले असावेत, असा अंदाज आहे. मध्यंतरींच्या काळांत बांधून झालेल्या इमारतींसाठीं योग्य असे भाडेकरू शोधण्याचे व मिळविण्याचे यत्न करण्यांत आले. या संबंधांत अनेक वर्षांनीं रॉकफेलरनें लिहिलें :

"नवे भाडेकरू उपलब्ध करून घेण्यासाठीं आम्हीं नाना प्रकारच्या युक्त्या योजिल्या. ब्रिटिश, फ्रेंच, इटालिअन आणि आंतरराष्ट्रीय रहिवाशांसाठीं खास इमारती बांधण्यांत आल्या. रेडिओ, बँकिंग, तेल, ग्रंथप्रकाशन इत्यादि विविध व्यवसायांत गढलेले लोक भाडेकरू म्हणून व्यवसायविशिष्ट इमारतींत भरण्याची कल्पना आम्हीं कार्यवाहींत आणली. उच्च श्रेणीची आणि विविध प्रकारची करमणूक येथील भाडेकरूंस सहज प्राप्त होईल, अशी योजना आम्हीं येथें केली. असंख्य प्रकारच्या भाडेकरूंस आधुनिक, सुव्यवस्थित, प्रशस्त आणि सर्व प्रकारच्या सुखसोयींनीं युक्त अशी जागा योग्य किंमतींत मिळावी, हा हेतु मनांत बाळगून आम्ही आमच्या बांधकामाच्या योजना आंखीत होतों."

१९३३ मध्यें रॉकफेलरनें आपलें स्वतःचें ऑफिस 'रॉकफेलर सेंटर'मधील नव्या इमारतींत हलविलें. २६, ब्रॉडवे हा पत्ता आजवर आर्थिक सामर्थ्याचा केंद्रबिंदु समजला जात असे. अर्धशतकपर्यंत अमेरिकेंतील अर्थसत्तेचें केवळ

प्रतीक असें हें स्थान होतें—२६, ब्रॉडवे. ता. १ नोव्हेंबर १९३९ रोजीं या राक्षसी बांधकामांतील अखेरची बिजागरी रॉकफेलरनें मोठ्या समारंभानें ठोकली. या वेळीं स्थापत्यतज्ज्ञ, इंजिनीअर्स, बांधकामांत गुंतलेले असंख्य कामगार व त्यांचे मुकादम, नगराधिकारी, कलाकार आणि भाडेकरू मोठ्या जमावानें एकत्र उपस्थित होते. 'रॉकफेलर सेंटर'च्या उभारणीसाठीं एकूण एक कोटी डॉलर्सची रक्कम खर्ची पडलेली होती. तिची निशाणी अशी ही शेवटची बिजागरी होती.

या समारंभांत कामगारांच्या वतीनें 'बिल्डिंग ॲन्ड कन्स्ट्रक्शन ट्रेड्स कौन्सिल'चा अध्यक्ष थॉमस ए. मरे यानें भाषण केलें :

"या जागेवर एकूण चौदा इमारती उभ्या असलेल्या दिसत आहेत. त्यांच्या बांधकामांत या शहरांतील ७५,००० बांधकामगारांचे श्रम कारणीं लागले आहेत. बेकारीच्या या दुर्धर दिवसांत पाऊण लाख कामगारांस रॉकफेलर सेंटरनें काम मिळवून दिलें. या कामगारांच्या श्रमांचे कोट्यवधि तास या इमारतींपायीं खर्ची पडलेले आहेत. हें सर्व बांधकाम अशा वेळीं उभारण्यांत आलें कीं ज्या वेळीं बेकार कामगारांस कामाची मनस्वी निकड होती. या प्रचंड बांधकामाची योजना ज्यांनीं आंखली आणि कार्यवाहींत आणली, त्यांना न्याय देण्याच्या बुद्धीनें या वेळीं मला असें सांगावेंसें वाटतें कीं त्यांनीं न्यूयॉर्क शहरांतील बांधकामगारांच्या युनियनच्या हजारों सभासदांस काम पुरविलें. आणि तें सुद्धां युनियननें मान्य केलेल्या पगाराच्या आणि कामाच्या अटींवर. यासाठीं प्रस्तुत बांधकामाच्या संयोजकांस आणि संचालकांस अंतःकरणपूर्वक धन्यवाद देणें हें माझें कर्तव्य आहे...आज येथील कामाचा अखेरचा दिवस आहे. आणि या दिवशीं संचालक व कामगार यांच्यांतील परस्परसंबंधांविषयीं मी कांहींच बोललों नाहीं, तर मी माझ्या कर्तव्यांत चुकलों असें होईल. हें सर्व बांधकाम चालू असतांना प्रथमपासून अखेरच्या या दिवसापर्यंत संचालक व कामगार यांचे परस्परसंबंध मैत्रीचे होते. सर्व काम पद्धतशीरपणें शिस्तींत पार पडलें. आणि बांधकामाच्या या दीर्घ कालावधींत एकदां सुद्धां संपाचा प्रसंग उद्भवला नाहीं. टेबलाभोंवतीं एकत्र बसून आम्ही तत्परतेनें मिटवूं शकलों नाहीं, असा एकसुद्धां वादप्रश्न या कालावधींत उपस्थित झाला नाहीं. त्यासाठीं संयोजकांविषयीं सेंटरच्या सर्व कामगारांच्या वतीनें मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतों.'

ज्या क्षणीं ही अखेरची बिजागरी ठोकण्यांत आली त्याच क्षणापासून 'रॉकफेलर सेंटर'चा अद्भुत इतिहास घडावयास लागला. ही गोष्ट खरी कीं कित्येक वर्षेपर्यंत इमारतींत गुंतविलेलें भांडवल योग्य तें व्याज देऊं शकणार नव्हतें. पण आतां मात्र हा 'सेंटर' सर्वतोपरींनीं किफायतशीर ठरला आहे. अक्षरशः हजारों लोकांच्या कामकाजाचें हें घर ठरलें आहे. न्यूयॉर्कमधील मध्यवस्तींतील एकेचाळीस इमारती साधारणपणें जेवढी जागा व्यापितील, तेवढी जागा येथील इमारतींनीं व्यापिलेली आहे. येथील लिफ्ट्स जर एकावर एक रचून उभ्या केल्या, तर दहा मैलपर्यंत त्या आकाशांत वर चढतील. आजवर कोटयवधि पाहुण्यांनीं या लिफ्ट्स-मधून चढउतार केलेला आहे. आणखी अनेक कोटी लोक येथील नाट्यगृहांना, कायम स्थापिलेल्या प्रदर्शनांना आणि 'एन्. बी. सी. स्टूडिओ'च्या ध्वनिक्षेपित कार्यक्रमांना भेटी देण्यासाठीं येथें येऊन गेले आहेत. केवळ या अद्भुत वास्तूचें दर्शन घेण्यासाठीं दर दिवशीं शेकडों प्रेक्षक येतात. आणि त्यांच्या पायरवानें येथील अभ्यागत-मार्ग दुमदुमतात. तर आणखी शेकडों लोक येथील उद्यानांतून गमतीनें फिरत असतात. किंवा बर्फावरून घसरणाऱ्या शौकिनांचे नृत्यविलास बघण्यांत दंग झालेले दिसतात. न्यूयॉर्कमधील सर्वांत अधिक गजबजलेल्या मॅनहॅटन बेटांतील सार्वजनिक वर्दळीचा 'रॉकफेलर सेंटर' लक्ष्यकेंद्र बनलेला आहे. तेथील कोट्यवधि दैनंदिन व्यवहारांचा हा 'सेंटर' साक्षी आहे.

पण केवळ आश्चर्यकारक आंकडेमोडींतून व्यक्त होणारें हें चित्र यथार्थ नव्हे. येथील उत्तुंग गगनभेदी इमारतींचे भव्य समूह एका अर्थानें रॉकफेलरच्या व्यक्तित्वाचेच द्योतक आहेत. 'रॉकफेलर सेंटर' मधील वास्तूंच्या लौकिक दर्शनांत रॉकफेलरच्या अलौकिक गुणांचें दर्शन घडतें. १९३२ मध्यें एका रेडिओ-निवेदकानें या वास्तूंतून व्यक्त होणाऱ्या रॉकफेलरच्या व्यक्तित्वाचें वर्णन या शब्दांत केलेलें होतें : "येथील वास्तु म्हणजे रॉकफेलरचें मंदीच्या दुर्दैवास आव्हान होतें. विकट परिस्थितीच्या कृष्णच्छाया उधळून लावणारें असें हें रॉकफेलरच्या तेजाचें दर्शन होय. अमेरिकेच्या श्रद्धेचें हें मूर्तिमंत स्मारक होय."

* * *

प्रकरण दहावें

# विल्यम्सबर्ग

'अमेरिकन इतिहासाच्या पुनरुजीवनाचा सर्वाधिक महत्त्वाकांक्षी यत्न—' अशा शब्दांत विल्यम्सबर्ग वसाहतीचें वर्णन करतां येण्यासारखें आहे. एका माणसाची उत्तुंग कल्पकता आणि दुसऱ्या एका माणसाचें विधायक औदार्य यांचें केवळ स्मारक अशी ही विस्मयजनक वास्तु आहे. अमेरिकेच्या भूतकालाचें भव्य आणि यथार्थ स्मारक येथील वास्तूंत साकार झालेलें दिसतें. देशोदेशींचे स्थापत्य—वैज्ञानिक, इतिहासकार, शिल्पयोजक आणि शिल्पनिर्माते—या सर्वांच्या संयुक्त श्रमांची परिणति येथील वास्तूंत प्रकट झालेली दिसते. येथील इतिहासकालास साजेशा वास्तूंचें दर्शन घेण्यासाठीं, अठराव्या शतकास शोभतील असे येथील बागबगीचे बघण्यासाठीं, येथील उद्यानवाटिकांतून फिरण्यासाठीं आणि आपल्या तरुण राष्ट्राच्या इतिहासाचें हें मूर्त स्मारक बघण्यासाठीं, येथील ऐतिहासिक वातावरण आत्मसात् करण्यासाठीं आजवर सत्तर लक्षांहून अधिक यात्रेकरूंनीं या यात्रास्थळास भेट दिल्याची नोंद आहे.

१९२४ सालीं न्यूयॉर्कमध्यें 'फिबीटा कापा'च्या एका भोजनप्रसंगीं विल्यम्सबर्गच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीविषयीं एक व्याख्यान ऐकण्याचा योग रॉकफेलरला लाभला. आणि त्याच वेळीं त्या महत्त्वाकांक्षी योजनेची कल्पना त्याच्या मनांत रुजली. आजवर रॉकफेलरनें जेवढ्या म्हणून योजना हातीं घेतलेल्या होत्या, त्या सर्वांपेक्षां या एका योजनेंत त्यानें अधिक लक्ष घातलें. आणि व्यक्तिशः

याच एका योजनेंत तो अधिक रमला व गुंतून पडला, असें आढळून येतें. अर्थात् ज्या एका एपिस्कोपेलिअन पाद्र्याच्या प्रवचनानें रॉकफेलरचें मन त्या प्रसंगीं भारलें गेलें होतें, त्याचें मन कित्येक वर्षें एकच एक स्वप्न बघत आलें होतें. अमेरिकन इतिहासाचें स्मारक ज्या वास्तूंत आकारलेलें दिसेल, अशा वास्तूचें स्वप्न प्रस्तुत व्याख्याता वर्षानुवर्षें बघत होता. त्या स्वप्नाच्या निदिध्यासानें तो जसा कांहीं भारला गेला होता. विल्यम्सबर्गच्या गोष्टीची सुरुवात स्वप्नापासूनच आपण करूं.

त्याचें असें झालें—१९०३ मध्यें डॉ. विल्यम आर. गुडविन हा विल्यम्सबर्ग-मधील ब्रूटन पॅरिश चर्चच्या रेक्टोरेटमध्यें राहावयास आला. त्यापूर्वी कित्येक वर्षा-पासून प्राचीन वस्तूंचें आणि वास्तूंचें वेड त्याच्या मनास जडलेलें होतें. विल्यम्सबर्ग-मधील धर्माधिकाऱ्याची जागा त्यानें एका अटीवर पत्करली होती. ब्रूटन चर्चच्या वास्तूचें पुनरुज्जीवन करण्याचा त्याचा मानस होता. आणि तशी संधि आपणास उपलब्ध करून देण्यांत यावी ही ती अट होय. विल्यम्सबर्गमधील इतर अनेक जुन्या इमारतींप्रमाणेंच ब्रूटन चर्चचें बांधकाम पुराणपद्धतीचें होतें. चर्चची वास्तु इ. स. १७१५ मध्यें उभी करण्यांत आलेली होती. मध्यंतरींच्या शतकाधिक वर्षांत ही वास्तु अखंड काम देत होती. कालांतरानें स्वाभाविकच ही वास्तु जीर्णशीर्ण झालेली होती. आणि तिची पडझड झालेली होती. त्याचप्रमाणें प्रत्येक दुरुस्ती-च्या वेळीं त्या त्या काळांत प्रचलित असलेल्या बांधकामाच्या पद्धतींचा उपयोग करण्यांत आलेला होता. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकांत चर्चमधील लाकूड-काम तोडण्यांत आलेलें होतें. जुन्या पद्धतीचीं उंच आसनें तोडून बैठीं करण्यांत आलीं होतीं. वसाहतीच्या काळांत रूढ असलेलें व्यासपीठ आतां निरुपयोगी म्हणून टाकून देण्यांत आलें होतें. आणि गॉथिक बनावटीच्या कांहीं स्पर्शसुखद खुर्च्या व्हिक्टोरियन काळाची साक्ष देण्यासाठीं इतस्ततः पसरलेल्या दिसत होत्या.

१९०७ मध्यें डॉ. गुडविननें चर्चच्या पुनरुज्जीवनाचें प्रारंभिक पर्व संपविलें होतें. पण आपल्या परिश्रमानें निर्माण केलेल्या वास्तूचा सहवास फार काळपर्यंत त्याला लाभूं शकला नाहीं. कारण पुढच्याच वर्षी न्यूयॉर्कमधील रॉचेस्टरच्या सेंट पॉल्स चर्चमध्यें त्याची बदली करण्यांत आली. तेथें रेक्टर म्हणून पंधरा वर्षें त्यानें काम केलें. पण विल्यम्सबर्गशीं एकदां जडलेले त्याचे संबंध मध्यंतरींच्या काळांत अभंग राहिले. आणि १९२३ मध्यें विल्यम्सबर्गनें त्याला पुन्हा एकदां आमंत्रण दिलें. त्या वेळीं त्यानें मोठ्या आनंदानें त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. तेथें

'कॉलेज ऑफ विल्यम ॲण्ड मेरी' या नांवाची उच्च शिक्षणाची एक संस्था होती. या कॉलेजमध्यें पवित्र साहित्याचा आणि सामाजिक नीतिशास्त्राचा प्राध्यापक व कॉलेज एंडाउमेंट प्लॅनचा डायरेक्टर या नात्यानें या खेपेस विल्यम्सबर्गला तो परत आला.

इ. स. १९०८ मध्यें गुडविननें विल्यम्सबर्गचा निरोप घेतला होता. तेव्हां ती एक शांत, झोपाळू अशी खेडेगांवांतील वसाहत होती. फार फार तर एक हजाराच्या आसपास त्या वेळीं तेथील लोकसंख्या असावी. पण या वसाहतीच्या पाठीशीं मोठा इतिहास होता. एके काळीं व्हर्जिनियांतील भव्य वसाहतीची विल्यम्सबर्ग ही सांस्कृतिक आणि राजकीय राजधानी होती. मध्यंतरींच्या काळांत विल्यम्सबर्गचें महत्त्व ओसरलें होतें. उदासीनतेची एक सुखकारक अवकळा या गांवांत अवतरली होती. आणि नंतर भोंवतालच्या प्रदेशांतून इतिहासानें अनेक स्थित्यंतरें घडवून आणलीं, तरी हा गांव इतिहासानें स्पर्शिला नाहीं. गांवाची एकंदर रचना पूर्वींच्या वसाहतकालास अनुसरून होती, तशीच राहिली. ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीट हा गांवांतील रुंद राजरस्ता पूर्वींप्रमाणेंच त्या वेळीं सुद्धां काम देत होता. १७२४ मध्यें ह्यू जोन्स यानें या रस्त्याविषयीं असें लिहून ठेविलेलें आढळतें : "हा राजरस्ता भूमितींतील सरळ रेषेसारखा आहे...पाऊण मैल त्याची लांबी आहे." या राजरस्त्याच्या दोहों बाजूंस दोन समांतर रस्ते होते. फ्रान्सिस आणि निकल्सन. फ्रान्सिस निकल्सन नांवाच्या गव्हर्नरनें राज्याची राजधानी जेम्सटाउन ही बदलून विल्यम्सबर्गला हलवावी, असें मत आग्रहानें प्रतिपादन केलें होतें. त्याच्या स्मरणार्थ रस्त्यांस हीं दोन नांवें देण्यांत आलीं होतीं. राजरस्त्याच्या पश्चिम टोकास 'कॉलेज ऑफ विल्यम ॲण्ड मेरी' या शिक्षणसंस्थेची रेनच्या प्राचीन स्थापत्यास अनुसरून बांधलेली पुराणी इमारत होती. अमेरिकेंतील शिक्षणसंस्थांमध्यें अजूनपर्यंत उभी असलेली सर्वांत जुनी अशी ही इमारत होती. आज दुरुस्ती आणि उपेक्षा यांजमुळें ही वास्तु आतां किंचित् मोडकळीस आल्यासारखी दिसत होती. पण प्राचीन काळांतल्याप्रमाणेंच आजसुद्धां 'विटांची ही भव्य वास्तु' तशीच उभी होती. अमेरिकेच्या इतिहासांतील सर्वाधिक प्रसिद्ध अशा कांहीं नागरिकांनीं याच जुनाट शाळेंत शिक्षण घेतलेलें होतें. आणि अमेरिकेचे तीन राष्ट्राध्यक्ष या शाळेनें पुरविलेले होते : जेफर्सन, मन्रो आणि टायलर. राजरस्त्याच्या पूर्वेकडील टोकास आज एक रिकामें माळरान दिसत होतें. हें पूर्वींचें कॅपिटॉल. एका काळीं व्हर्जिनियांतील कायदेमंडळाच्या सभा जवळजवळ एक

शतकभर येथील प्राचीन वास्तूंत भरत असत. आतां मूळ वास्तूच्या पायाचे भग्न अवशेष येथें अजून उभे असलेले दिसत होते. इतर कित्येक जुन्या इमारती कालांतरानें नष्ट झालेल्या होत्या. कांहीं ज्या अजून उभ्या होत्या, त्या त्यांच्या मूळ वास्तूंत आधुनिक पद्धतीनें दुरुस्त्या केल्यामुळें विशोभित अवस्थेंत अजून उभ्या होत्या. ज्या कोणीं या दुरुस्त्या केल्या, त्यांना कल्पकतेचें देणें लाभलेलें नव्हतें, हें उघड आहे. आणखी कांहीं पुराणवास्तूंची अमर्याद पडझड झालेली होती. पण असें असूनसुद्धां या गांवाच्या वातावरणांत एक तऱ्हेचा आकर्षक गोडवा होता. जुनेपणाचें एक आगळें वैभव या स्थळास शोभा देत होतें. आणि शांतपणानें येथील पार्श्वभूमीस एक वेगळीच प्रतिष्ठा लाभल्यासारखी दिसत होती. विल्यम्सबर्गमधील प्राचीन पूर्वजांचे वंशज अजून या गांवांत संख्याधिक होते. आणि क्रांतिपूर्व काळांत बांधलेल्या घरांतून ते राहत होते. व्हर्जिनियाची नवी वसाहत त्या काळांत निर्माण होत होती. त्या काळांतील इतिहास या लोकांस विदित होता. आणि प्राचीन परंपरेच्या नशेंत जुन्या आठवणींच्या रमणीय धुंदींत येथील जनता दिवस कंठीत होती. या संबंधांत डॉ. गुडविननें लिहून ठेविलें आहे :

"जुन्या काळांत कोण काय म्हणालें, त्याच्या आठवणी येथील मंडळींच्या मनांत अजून ताज्या होत्या. भूतकाळांतील भुतांनीं येथील घरें झपाटलेलीं होतीं. आणि रात्रीच्या वेळीं रस्त्यावरून फेरफटका करतांना तीं दिसत. हीं भुतें मोठ्या उमद्या स्वभावाचीं आणि आनंदी वृत्तीचीं होतीं. चिंतनाच्या शांत घटकांची सोबत हीं भुतें नित्य करीत. कल्पित कथांत, प्रचलित रूढींत, फार काय इतिहासांतसुद्धां, या भुतांनीं प्रवेश मिळविलेला होता. त्यांच्या आठवणींनीं वर्तमानांत विरलेल्या भूतकाळाचें अस्तित्व येथें पदोपदीं प्रकट झालेलें दिसे. भूतकाळांत नोंदलेल्या घटनांची याद कदाचित् या भुतांस नसली, तरी जीविताशीं इमान राखणारीं अशीं हीं भुतें होतीं. निर्देशित केल्या ठिकाणीं मंद चांदण्यांतील कट्ट्यावर त्यांचीं पावलें उमटलेलीं दिसत. किंवा एखाद्या जुनाट घरांतील दिवाणखान्यांत शेकोटी पेटलेली आहे, भिंतीवर शोभणाऱ्या पूर्वजांच्या चित्राकृतींवर शेकोटीच्या जाळाचा थरथरता प्रकाश पडलेला आहे, लोक गप्पा मारण्यासाठीं शेकोटीजवळ जमलेले आहेत, अशा वेळीं तीं भुतें आसपास सर्वत्र प्रकट झालेलीं दिसत."

विल्यम्सबर्ग 23288 दि. ...
क्रमांक ...425... नों दि: ...

अशा रीतीनें भूतकाळाच्या स्मृतींत गढलेले हे गांवकरी वर्तमानकाळांतील घटनांत रस घेत नसत. १९१२ मध्यें निवडणूक घ्यावयाची ते जवळपास विसरून गेले होते. १९१३ मध्यें ब्रूटन पॅरिश चर्चच्या मनोऱ्यावरील सार्वजनिक घड्याळ कायमचें बंद पडलें होतें. आणि कारण काय, तर त्या घड्याळास किल्ली देण्याचें काम वर्षानुवर्षं ज्या माणसाकडे होतें, त्याचा सालिना पगार ५० डॉलर्स मंजूर करण्याचें ग्रामपंचायतीनें नाकारलें. म्हणून त्या वेळेपासून विल्यम्सबर्गमध्यें काळवेळाचें भान नाहींसें झालें. आणि ज्या कोणीं विल्यम्सबर्गला सहज थट्टेंत 'लोटसबर्ग' असें नांव दिलें होतें, त्यांची भविष्यवाणी खरी ठरली.

वास्तविक विल्यम्सबर्ग दिवसाचें पाहिलें, तर तें एक घाणेरडें, अवकळेनें झपाटलेलें असें दक्षिणेंतील सामान्य गांव होतें. पण या वर्तमानाच्या वास्तवांत डॉ. गुडविनला रस नव्हता. त्याला रस होता तो एका स्वप्नांत. रात्रीच्या वेळीं गांवांतील रस्त्यांतून भटकत फिरण्याचा त्याला नाद होता. नाहींशा झालेल्या काळांतील अनेक भुतें या रस्त्यांत त्याला भेटत. आणि एका गूढ स्वप्नांत त्याचें मन गढून जात असे. एक वेळ एका शाळकरी विद्यार्थ्यास पाठविलेल्या एका पत्रांत डॉ. गुडविन लिहितो :

"मध्यरात्र उलटून गेल्यावर चांदण्यांत विल्यम्सबर्गच्या रस्त्यावरून जर तूं कधीं भटकत फिरला असशील, तरच विल्यम्सबर्ग ही काय आकर्षक वास्तु आहे त्याची जाणीव तुला झाली असेल. त्या वेळीं बहुतेक गांवकरी गाढ झोपलेले असतात. आणि पूर्वकाळांत येथें राहिलेल्या गांवकऱ्यांचा पायरव रस्त्यांवरून सर्वत्र ऐकूं येतो. दिवंगतांची संगत येथील रस्त्यांवर लाभते. त्यांच्या सोबतींत आपण गांवभर भटकलों, तर त्यांनीं काय काय केलें आणि कोणकोणत्या ध्येयांवर त्यांची निष्ठा होती, तें सर्व सहज समजून येतें. ज्या या घरांतून पूर्वी त्यांचें नित्य वास्तव्य होतें त्या घरांत जातांना किंवा घरांतून बाहेर पडतांना त्यांची चाहूल जर तुला कधीं लागली असेल, बर्गेसेसच्या घरांत ते काय बोलले आणि पुराण्या कॉलेजमध्यें त्यांचें काय संभाषण झालें, त्याचा जर तूं कानोसा घेतला असशील, तर विल्यम्सबर्ग ही काय अद्भुत वास्तु आहे, त्याचा प्रत्यय तुला आला असेल. सर्व अमेरिकेंतील सर्वांत आकर्षक असें स्थान हेंच आहे, हें बहुतकरून तुला पटलें असेल."

भूतकाळावर मनस्वी प्रेम करणारा आणि ज्वलंत निष्ठेनें पूर्वस्मृतींचें जतन करूं इच्छिणारा असा हा विलक्षण पुरुष असला, तरी तो मोठा उद्योगी, कार्यरत असा होता. आणि जवळची वस्तु कोणास कशी विकावी, याचें उत्तम ज्ञान त्याला होतें. असाध्य वा अशक्य असें त्याला कांहीं वाटतच नसे. एकदां तो आपल्या एका मित्राला म्हणाला, "दुसऱ्या लोकांना निराशेनें घेरलें कीं लगेच माझें काम सुरू होतें." अनेक भव्य योजना त्याच्या गांठीं होत्या. मोठा कल्पक, धूर्त आणि चतुर असा हा माणूस होता. त्याच्या मनानें एकदां कांहीं घेतलें कीं तें करून सोडल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. असाध्य तें साध्य करण्यासाठीं जो देऊं शकेल त्याच्या राशीस तो वेळींअवेळीं बसत असे.

तूर्त या गांवाचें पुनरुज्जीवन करण्याच्या कल्पनेनें त्याच्या मनाचा कब्जा घेतला होता. पण या असाध्याच्या कामीं दुसऱ्या कोणाचें मन वळवून जुंपावयाचें म्हटलें, तर तें कर्म महाकठिण होतें. पण डॉ. गुडविनचा उत्साह केवळ अमर्याद असा होता. जशी अंगीकृत कार्यावर त्याची निष्ठा होती, तशीच स्वतःच्या कर्तृत्वावर त्याची श्रद्धा होती. पुढील कांहीं वर्षें त्यानें एकट्यानें आपल्या मनांतील या कल्पनेचा प्रचार करण्यांत घालविलीं. ज्या वेळीं त्याला कल्पनासुद्धां नसेल कीं आपलें स्वप्न असा कल्पनातीत आकार धारण करणार आहे, त्या वेळीं सुद्धां अखेरीस आपण जिंकणार असा निर्धार त्याच्या मनांत दृढ होता. आणि त्या दिशेनें त्याच्या मोहिमेची वाटचाल सुरू झाली होती.

इ. स. १९२४ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्याचा मोर्चा न्यूयॉर्कच्या रोखानें वळला. येथें 'फाय बीटा कापा'च्या भोजनप्रसंगीं त्यानें आपल्या निदिध्यासाच्या विषयावर भाषण केलें. 'कॉलेज ऑफ विल्यम ॲण्ड मेरी'साठीं त्याच्या मनांतून एक राष्ट्रीय स्मारकाची वास्तु उभी करावयाची होती. तोंपर्यंत गुडविननें ब्रूटन पॅरिश चर्चच्या पुनरुज्जीवनासंबंधीं दोन इतिहासग्रंथ लिहिलेले होते. आणि त्यांच्या बळावर या संस्थेचा सभासद म्हणून तो निवडून आला होता. मेजवानीच्या त्या दिवशीं संध्याकाळीं 'कॉलेज ऑफ विल्यम ॲंड मेरी'चा समग्र इतिहास त्यानें श्रोत्यांस ऐकविला. अनेक जुने नकाशे आणि जीर्ण हस्तलिखितें यांच्या साहाय्यानें आपल्या मनांतील योजना त्यानें सभासदांस सादर केली. या संस्थेच्या निधिसमितीचा रॉकफेलर अध्यक्ष होता. आणि त्या नात्यानें तो सभागृहांत उपस्थित होता. वक्त्याच्या भाषणाचा त्याच्या मनावर थोडाबहुत परिणाम झालेला दिसला. कारण बोलण्याच्या ओघांत विल्यम्सबर्गला केव्हां तरी व्यक्तिशः भेट

देण्याचा आपला मनोदय तो सहज बोलून गेला. निदान सुतानें स्वर्ग गांठूं पाहणाऱ्या गुडविनला रॉकफेलरच्या भाषणात हा ध्वनि असावा असा भास झाला. संभव असा आहे कीं रॉकफेलरनें स्वाभाविक सौजन्यास अनुसरून औपचारिक असा कांहीं भेटीचा निर्देश सहज केला असेल, आणि गुडविननें मात्र उत्साहाच्या भरांत त्याच्या भाषणाचा अर्थ आपल्या प्रतिज्ञेस अनुकूल असा लावला असेल.

अर्थात् अशी संधि एकदां दाराशीं चालून आल्यावर गुडविनसारखा माणूस थोडाच ती सोडणार होता ? रॉकफेलरच्या भाषणांत कुतूहलाच्या सूक्ष्म ठिणगीचें दर्शन त्याला झालें होतें. आतां ही ठिणगी एकदां चांगली फुलवावी, अशा हेतूनें चार महिने उलटून गेल्यावर तो परत न्यूयॉर्कला आला. आणि २६, ब्रॉडवे या नामांकित पत्त्यावर तो येऊन थडकला. पण दुर्दैवानें त्या वेळीं त्याची रॉकफेलरची मुलाखत होऊं शकली नाहीं. म्हणून त्याच्या सेक्रेटरीजवळ त्यानें निरोप ठेविला. याबाबत रॉकफेलरशीं बोलणें करण्याचें त्यानें कबूल केलें. विल्यम्सबर्गला परत पोंचल्यानंतर कांहीं दिवसांनीं गुडविनला रॉकफेलरकडून निरोप मिळाला. त्याचा आशय असा कीं तूर्त तरी निदान गुडविनच्या संकल्पित योजनेबाबत रॉकफेलर कांहीं करूं शकत नव्हता. त्या निरोपामुळें ठिणगीवर पाणी पडल्यासारखेंच झालें.

इ. स. १९२६ च्या मार्च महिन्यांत असा एक अनपेक्षित प्रसंग घडून आला कीं ज्यामुळें त्याच्या मनांतील आशा पुन्हा एकदां पालवली. या वेळीं रॉकफेलरनें सहकुटुंब 'हॅम्प्टन इन्स्टिटयूट' ला भेट देण्याचें योजिलें होतें. या खेपेस मात्र मोटारमधून विल्यम्सबर्गला सहज एक चक्कर मारून येण्याचें त्यानें ठरविलें.

'फाय बीटा कापा मेमोरियल हॉल'च्या संकल्पित योजनेच्या संबंधांत 'कॉलेज ऑफ विल्यम अँड मेरी'चा प्रेसिडेंट डॉ. जे. ए. सी. चँडलर याच्याशीं रॉकफेलरची ओळख झालेली होती. आणि ज्या वेळीं रॉकफेलर कुटुंब विल्यम्सबर्गला निश्चित येत आहे असें त्याला कळलें, तेव्हां डॉ. गुडविननें रॉकफेलर मंडळीस गांव हिंडून दाखवावें, अशी त्यानें योजना केली. ज्या दिवशीं सकाळीं ही बडी मंडळी गांवीं येणार होती, त्या वेळीं हा रुंद चौकोनी चेहऱ्याचा उत्साही धर्मोपदेशक गांवाच्या सरहद्दीलगत हॅम्प्टन रस्त्यावर पाहुण्यांच्या स्वागतासाठीं तत्पर उत्सुकतेनें उपस्थित होता. ठरलेल्या वेळीं रॉकफेलरची गाडी दृष्टिपथांत आली. आणि लगेच सर्वांनीं मिळून गांव बघण्यास निघावयाचें, असें ठरविण्यांत आलें. विल्यम्स-बर्गमधील महत्त्वाच्या स्थळांस भेट देऊन झाल्यावर रॉकफेलर पुढें जेम्सटाउन-यॉर्कटाउनच्या दिशेनें रवाना झाला. या वेळीं मात्र रॉकफेलरनें त्या स्थळाच्या

इतिहासाविषयीं पुष्कळच जिज्ञासा दाखविली. आणि तेथील जुन्या इमारतींच्या जीर्णोद्धारासंबंधीं कांहीं एखादी योजना तयार आहे काय, म्हणून सहज जातां जातां त्यानें चौकशी केली. "माझ्या मनांतील प्रिय स्वप्नासंबंधीं रॉकफेलरला सांगण्यासारखें माझ्याजवळ पुष्कळच होतें. आणि त्याविषयीं अमर्याद उत्साहानें कांहीं तरी न बोलण्यास मला मोठे प्रयास पडले." अशी कबुली गुडविननें मागाहून दिली. पण ही वेळ अजून पुरतेपणीं अनुकूल नाहीं, असें त्याला दिसून आलें आणि म्हणून अनिच्छेनें तो स्तब्ध बसून राहिला. ती सभ्यता केवळ असह्य होती. पण त्या वेळीं मनांतील सारें कांहीं ओकून टाकणें बरें नव्हे, अशा समजुतीनें तो कांहींच बोलला नाहीं.

इ. स. १९२६ मध्यें नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस 'फाय बीटा कापा मेमोरियल हॉल'च्या समर्पक समारंभासाठीं रॉकफेलर पुन्हा विल्यम्सबर्गला आला. या वेळीं मात्र गुडविननें एक भली मोठी विलासी गाडी शोफरसकट उसनी घेतली. आणि आपल्याबरोबर गांवची समग्र पाहणी करण्याचें निमंत्रण त्यानें रॉकफेलरला दिलें.

त्या दिवशीं रात्रीं 'फाय बीटा कापा'च्या मेजवानीच्या प्रसंगीं डॉ. गुडविनच्या शेजारीं रॉकफेलर बसला. बशांच्या खणखणाटांत आणि संभाषणाच्या संमिश्र नादांत त्यानें जवळच्या सहभोजकांस अशा कांहीं सूचना दिल्या कीं ज्या ऐकून तो विस्मयचकित झाला. आणि त्यानंतर कांहीं बोलण्याचें भानसुद्धां त्याला राहिलें नाहीं. रॉकफेलरनें भोजनप्रसंगींच्या सांगाल्यांस केलेल्या सूचना अशा : विल्यम्सबर्गच्या जीर्णोद्धारासाठीं जर एखादी योजना तयार असेल, तर त्या संबंधांतील रेखाकृति गुडविननें तयार करण्यास सुरुवात करावी. याबाबतचा सर्व खर्च सोसण्यास रॉकफेलरची संमति होती. पण तूर्त याव्यतिरिक्त आणखी कांहीं करण्यास तो मुळींच तयार नव्हता. किंबहुना या संबंधांत यापुढें अधिक कांहीं करण्याची हमी घेण्याची तूर्त त्याला इच्छा नव्हती. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या योजनेशीं रॉकफेलरचा कांहीं संबंध आहे, हें कोणास अवाक्षरानें सुद्धां कळूं द्यावयाचें नाहीं. प्रस्तुत संबंधांत आपल्या नांवाचा उपयोग करण्यास त्याची मनाई होती. ही अखेरची अट अनेक रीतींनीं त्रासदायक आणि बंधनकारक ठरणार होती. पण अनेक कारणांसाठीं ती अत्यावश्यक होती. पहिली गोष्ट अशी कीं या प्रास्ताविक देणगीपलीकडे संकल्पित योजनेशीं आपला कांहीं संबंध जडेल, अशी त्याची त्यालाच मुळींच खात्री नव्हती. अशा स्थितींत अविचारानें अवेळीं

केलेली कांहीं घोषणा पुढेंमागें विनाकारण गैरसमजास कारण होईल, हें त्याला स्पष्ट दिसत होतें. याहून अधिक महत्त्वाची गोष्ट अशी होती कीं अशा कांहीं अवाढव्य योजनेशीं रॉकफेलरचा संबंध आहे, ही बातमी केवळ फुटण्याचाच अवकाश होता, कीं लगेच रीअल इस्टेट एजंटांनीं धमाल उडवून दिली असती, हें त्याला स्वच्छ दिसत होतें. आणि तसें जर का झालें असतें तर संकल्पित जीर्णोद्धार योजनेची अंदाजें किंमत अनेक पटींनीं वाढली असती. आणि परिणामीं सोसाव्या लागणाऱ्या खर्चास सुमार राहिला नसता.

न्यूयॉर्कला परत पोंचल्यावर रॉकफेलरनें गुडविनला दोन पत्रें लिहिलीं. एका पत्रांत भोजनसमयीं संभाषणांत केलेल्या कराराचा पुनरुच्चार होता. आणि दुसऱ्या पत्रांत अधिक माहितीची मागणी केलेली होती.

आपल्या तपास हें फळ आलेलें पाहून गुडविन हतबुद्ध झाला असल्यास नवल नाहीं. उलट टपालीं त्यानें रॉकफेलरला लिहिलें : "एखाद्या माणसानें उगीचच रंगीत काचांचे तुकडे हौस म्हणून गोळा करावेत, पुढेंमागें कधीं काळीं या रंगीत काचांचा उपयोग एखाद्या भव्य चित्राकृतीसाठीं होऊं शकेल, अशी त्याला कल्पनासुद्धां नसावी; तशी आज माझी अवस्था झाली आहे." त्या भव्य चित्राकृतीच्या निर्मितीस रॉकफेलरचा हातभार लागणार आहे, या कल्पनेनें गुडविनच्या मनांत नवा उत्साह संचारला; आणि नवीं नवीं भव्य स्वप्नें बघत विल्यम्सबर्गच्या रस्त्यांतून तो भटकावयास लागला.

आतां एक गोष्ट त्याला पटली होती. ती ही कीं काम अविलंबें पार पाडावयास हवें होतें. केवळ स्वप्नांचा काळ आतां संपुष्टांत आला होता. व्यावहारिक बाबींत अधिक मनःपूर्वक लक्ष घालणें आवश्यक होतें. असें कांहीं काम हातीं घ्यावयाचें तर पहिल्या प्रथम गांवांतील वास्तुस्थानें आधीं विकत घ्यावयास हवीं होतीं. ही गोष्ट अगदीं खरी कीं रॉकफेलरनें केवळ या योजनेच्या रेखाकृतींस पुरेसा पैसा पुरविण्याचें वचन दिलें होतें. त्यापलीकडे अधिक कांहीं खर्चाचा बोजा अंगावर घेण्यास प्रारंभीं तो मुळींच तयार नव्हता. पण तरी सुद्धां कामास प्रत्यक्ष सुरुवात करते वेळीं उभयतांस एक गोष्ट पुरतेपणीं कळून चुकली. संकल्पित जीर्णोद्धार क्षेत्रांतील एखादी वास्तु उपलब्ध होऊं शकेल, तर पुढील ताब्याची गुंतागुंत टाळण्याच्या दृष्टीनें ती तत्काळ विकत घेऊन टाकणें आवश्यक होतें. ता. ४ डिसेंबर १९२६ रोजीं गुडविननें रॉकफेलरला कळविलें कीं ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीटवरील पॅराडाइज हाउस विक्रीसाठीं बाजारांत

आलें आहे. विल्यम्सबर्गमधील पूर्व वसाहत काळांतील कांहीं थोड्या जुनाट विटांच्या इमारतींपैकीं ही एक होती. शिवाय बॉस्वेलनें आपल्या सुप्रसिद्ध जॉन्सन चरित्रांत या घराचा निर्देश केल्यामुळें या घरास कांहीं अलौकिक महत्त्व प्राप्त झालें होतें. प्रारंभींच्या लडवेल कुटुंबाचें हें घर अखेरीस ल्यूसी लडवेलच्या ताब्यांत वारसा हक्कानें आलें होतें. त्या काळांत पंडित, भाषातज्ज्ञ आणि डॉ. जॉन्सनच्या नामांकित लिटररी क्लबचा सभासद म्हणून जॉन पॅराडाइज विख्यात होता. ल्यूसीचें त्याच्याशीं लग्न झालें होतें. आणि लंडनमध्यें त्याच्या सहवासांत तीं दोघें राहत असत. मध्यंतरीं क्रांतीच्या काळांत ही वास्तु कॉमनवेल्थनें जप्त केली होती. त्या वेळीं डॉ. जॉन्सननें या घरास उद्देशून थट्टेच्या भरांत 'पॅराडाइजेस लॉस' असें संबोधिलें होतें. जॉन पॅराडाइजच्या मृत्यूनंतर ल्यूसी विल्यम्सबर्गला आपल्या पूर्वजांच्या घरीं परत येऊन राहिली होती. तिच्या स्वभावांत आणि वर्तनांत अनेक विक्षिप्त खोडी होत्या. आणि गांवाच्या प्राचीन ज्ञानकोशांत या स्त्रीनें विलक्षण भर घातली होती. अशी ही इतिहासप्रसिद्ध सुंदर पण जीर्ण वास्तु आतां बाजारांत आली होती.

पॅराडाइज हाउस विकावयास काढलें आहे, हें कळतांक्षणीं रॉकफेलरनें त्याच्या खरेदीस संमति देणारी तार पाठविली. दात्याचें नांव कोणास कळूं नये या हेतूनें रॉकफेलरनें 'डेव्हिड्स फादर' या नांवानें तार केली. आणि त्यानंतर डॉ. गुडविन आणि त्याचा विश्वासू सेक्रेटरी आपल्या या गूढ दात्याचा उल्लेख मि. डेव्हिड असा करूं लागले.

यानंतर गुडविनला अचानक एका तरुण आर्किटेक्ट मित्राची आठवण झाली. त्याचें नांव विल्यम जी. पेरी. 'पेरी, शॉ अँड हेपबर्न' नांवाच्या बोस्टनमधील फर्मचा पेरी हा एक भागीदार. त्याला वसाहतकालीन प्राचीन वास्तूंचें मनस्वी आकर्षण होतें. त्या वास्तूंच्या शोधांत अनेक वेळां तो विल्यम्सबर्गला आला होता. आणि कित्येक वेळां गुडविनच्या संगतींत गांवभर भटकला होता. पूर्वीं एक वेळ पेरीनें वाइथ हाउसच्या जीर्णोद्धारासंबंधीं कांहीं बहुमोल सल्ला दिला होता. आणि दुसऱ्या एका वेळीं त्यानें गुडविनला कांहीं जुनाट कुलुपांची भेट दिली होती. गुडविनला तें सारें आतां आठवलें. त्यानें पेरीसंबंधीं योग्य ती सारी चौकशी केली. आणि त्याच्याबद्दलचा अनुकूल अभिप्राय रॉकफेलरला कळविला. अखेरीस रॉकफेलरच्या संमतीनें गुडविननें पेरीला विल्यम्सबर्ग येथें भेटीसाठीं बोलावणें पाठविलें.

इ. स. १९२७ च्या जानेवारी महिन्यांत पेरी विल्यम्सबर्गला आला, आणि पुढील महिन्यांत त्या दोघांनीं मिळून गांवांतील जीर्ण वास्तूंची संपूर्ण पाहणी केली. त्या कामांत दोघे इतके गढून गेले होते कीं विचारतां सोय नाहीं. पेरी गांवांत आल्यानंतर गुडविननें त्याला 'फ्रेंचमन्स मॅप' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या नकाशाची एक प्रत दाखविली. १७८२ मध्यें फ्रेंच सैन्यांतील एका कार्टोग्राफरनें हा नकाशा काढला असावा, असा समज होता. हा नकाशा साधारणपणें बरोबर असेल तर त्या नकाशामुळें ग्रामरचनेचें अवघें रहस्य हस्तगत होईल, हें पेरीनें जाणलें. हा नकाशा मोठा विलक्षण होता. गांवाची केवळ मांडणीच त्यांत दाखविली, असें नव्हे, तर क्रांतिकाळांत उभ्या असलेल्या सर्व वास्तूंचे आकार, त्यांच्या आकृती आणि त्यांचे परस्पर संबंध या नकाशांत बारकाव्यांनीं दाखविले होते. या नकाशांतील मोजमापें पडताळून बघावयाचें म्हटलें तर स्वाभाविकच गांवांतील वास्तूंचीं मोजमापें घेणें आवश्यक होतें. पण तसें करण्यांत धोका आहे, हें गुडविनला स्वच्छ दिसत होतें. त्यामुळें नागरिकांच्या मनांत नेमका नको तो संशय निर्माण झाला असता. अखेरीस गांवांत निजानीज झाल्यानंतर रात्रीच्या काळोखांत शक्य तर हें काम उरकून घ्यावें अशी कल्पना त्याच्या मनांत आली. कल्पना मनांत येण्याचाच अवकाश, ते दोघेजण रात्रीच्या काळोखांतून गांवांतील रस्त्यांवरून गुपचुप फिरावयास लागले. टॉर्चच्या प्रकाशांत हें काम त्यांनीं पुरें केलें.

जानेवारीच्या अखेरीस पेरी बोस्टनला परत जावयास निघाला. जवळपास महिनाभर तो आणि गुडविन विल्यम्सबर्गच्या रस्त्यांतून अखंड भटकत फिरले होते. मध्यंतरींच्या काळांत त्यांनीं अनेक छायाचित्रें घेतलीं होतीं. जुने नकाशे काळजीपूर्वक पाहिले होते. जीर्णोद्धाराच्या कामास साहाय्य करूं शकतील, अशा जुनाट हस्तलिखितांचें संशोधन केलें होतें. जीर्ण वास्तूंच्या पायांची त्यांनीं पाहणी केली होती. आणि प्राचीन रेन वास्तूच्या तळाशीं असलेल्या जळमटभरल्या काळोखांतून ते चोरांसारखे फिरले होते. या काळांत गांवाच्या जुन्या वातावरणाशीं ते एकरूप झाले होते. संभव आहे कीं आपल्या मार्गदर्शक मित्राच्या अविश्रांत प्रयासांनीं पेरी शिणून गेला असेल. पण हें कष्टकारक काम आतां संपलें होतें. पण याहूनहि अधिक कष्टकारक असें काम पेरीला यापुढेंच करावयाचें होतें. ग्राम-रचनेच्या आणि वास्तुदर्शनाच्या सर्व चित्राकृती मे महिन्यापर्यंत पुऱ्या करण्याचा त्याचा निश्चय होता.

मार्च महिन्यांत रॉकफेलरनें डॉ. गुडविनला पत्र लिहून कळविलें कीं पुढील मे महिन्यांतील प्रवासांत विल्यम्सबर्गला सपत्नीक भेट देण्याचा आपला मानस आहे. त्याचे शब्द असे होते: "शांतपणानें, कसलाहि गाजावाजा न करतां तेथें येण्याचा आमचा विचार आहे....तेथें तुझ्याबरोबर गांवांतील रस्त्यांतून चोरां-सारखे आम्ही फिरूं. गेले कित्येक दिवस ज्या मनोरंजक जुनाट घरांच्या बाबतींत आपण एकमेकांस लिहीत आहोंत तीं सारीं घरें एकदां डोळे भरून बघूं या." गुडविननें लगेच पेरीला पत्र धाडलें: "हें बघ, आपण दोघांनीं मिळून ही जी योजना हातांत घेतली आहे ना, त्या योजनेंत जिला मी गुंतवूं शकेन अशी एक महत्त्वाची व्यक्ति सुदैवानें येथें येत आहे. मला वाटतें आपल्या कामांत त्या व्यक्तीची बरीच मदत होईल—आणि कदाचित् त्या मदतीमुळें आपण आपलें काम लोकांच्या निदर्शनास आणूं शकूं. ही व्यक्ति मे महिन्याच्या १५ तारखेस किंवा त्या सुमारास इकडे या भागांत येण्याचा संभव आहे."—तेव्हां तोंपर्यंत ज्या चित्राकृती तयार झाल्या असतील त्या सर्व पाठवून देण्यासंबंधीं गुडविननें पेरीला आग्रहपूर्वक लिहिलें.

रॉकफेलर दांपत्य २१ मे रोजीं सकाळीं गांवांत आलें. आणि गुडविननें उत्साहानें उभयतांचें स्वागत करून त्यांना आपल्या अभ्यासिकेंत नेलें. तेथें टेबलावर छायाचित्रें, चित्राकृती, आराखडे आणि ऐतिहासिक वस्तू यांचें एक व्यवस्थित प्रदर्शनच मांडलेलें होतें. उभयतां पतिपत्नींनीं तें सर्व साहित्य मोठ्या साक्षेपानें डोळ्यांखालून घातलें. यासंबंधीं मिस हेजनें नंतर लिहून ठेविलें आहे: "रॉकफेलर मंडळी विल्यम्सबर्गला फारच थोड्या वेळां गेली होती हें लक्षांत घेतलें, म्हणजे अंगीकृत कार्याची त्यांची समज केवढी आश्चर्यकारक होती तें दिसून येतें." त्यानंतर डॉ. गुडविननें रॉकफेलरला गांवभर हिंडवून आणलें. त्या तरुण माणसानें वृद्ध डॉक्टरचें सर्व बोलणें लक्षपूर्वक ऐकून घेतलें. आणि त्यासंबंधीं जिज्ञासेनें अनेक प्रश्न त्याला विचारले. जीर्णोद्धाराच्या या योजनेंत रॉकफेलरला मनस्वी आकर्षण वाटावयास लागलें होतें, हें आतां अगदीं उघड होतें. आणि तरी सुद्धां मिस हेज नंतर म्हणाली त्याप्रमाणें रॉकफेलर नेहमींच जर-तरची जरतारी भाषा करीत असे.

प्रस्तुत संबंधांतील 'जर' कांहीं तीव्र मतभेदांतून उद्भवला होता. जीर्णोद्धाराचा जो कांहीं यत्न करावयाचा, तो एका विशिष्ट मर्यादित क्षेत्रांतच केंद्रित करावा अशी रॉकफेलरची इच्छा होती. सबंध गांवभर पसरलेल्या सर्व जुन्या

इमारतींचें संरक्षण करून त्यांचा जीर्णोद्धार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण ही सर्व प्राचीन वास्तु लौकरच अर्वाचीन बांधकामांनीं सर्व बाजूंनीं वेढली जाणार आहे, हें त्याला स्वच्छ दिसत होतें. तेव्हां गांवांतील एकूण एक सर्व प्राचीन वास्तूंचा जीर्णोद्धार करण्याची कल्पना सोडून देऊन फक्त कांहीं विशिष्ट भागांतील वास्तूंचा संपूर्ण जीर्णोद्धार प्राचीन शिल्पानुसार करावा, असें त्याला वाटत होतें. पण ज्या तीन विशिष्ट भागांवर लक्ष केंद्रित करावयाचें, ते तीन विभाग सर्वथा जीर्णोद्धारयोग्य म्हणून बाजूस काढले तरी ते एकमेकांपासून दूर होते. आणि या विभक्त वास्तूंत एकात्मकता आणण्याची कल्पनासुद्धां विचार-योग्य नव्हती. कसें तें पाहा : ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीटच्या पश्चिम टोकाला कॉलेजच्या इमारती, तर तेथून पाऊण मैल अंतरावर पूर्वेच्या टोकाला जुन्या राजधानीची जागा. आणि या दोन पूर्वपश्चिम टोकांच्या दरम्यान जवळजवळ मधोमध ब्रूटन चर्च, वाइथ हाउस आणि पॅलेस ग्रीनची वास्तु उभी होती. अर्थातच या तीनहि वास्तूंना जोडणारा दुवा म्हणजे ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीट हा राजरस्ताच एकमेव होता. पण गांवांतील एकूण सर्व हालचालींचें आणि व्यवहारांचें केंद्र असलेला हा रस्ता अर्थात् मध्यंतरींच्या काळांतील अनेकविध शिल्पपद्धतींनीं विशोभित झाला होता. आणि वसाहतकाळांतील त्याचें पूर्वस्वरूप पुन्हा एकवार त्याला आणून द्यावयाचें म्हटलें, तर केवळ त्याच एका योजनेंत अधिकांत अधिक पैसा गुंतवावा लागणार, हें उघड होतें. दुसऱ्या बाजूनें विचार केला तर पलीकडच्या फ्रान्सिस स्ट्रीटवर वसाहतकाळांतील अनेक जुनीं घरें होतीं. आणि जुन्या पद्धतीनें फक्त त्यांचीच बांधणी करावयाची म्हटलें, तर हीं घरें एकूण थोडीं आणि लगोलग असल्यामुळें या योजनेस खर्च कमी येईल, हें उघड होतें. पण त्या वेळीं ही कल्पना रॉकफेलरला तितकीशी पसंत नव्हती. केवळ सोयीप्रमाणें कसें तरी काम करून एकूण पूर्वयोजनेचा घात करण्याची कल्पनासुद्धां त्याच्या मनाला शिवण्यासारखी नव्हती. गांवांतील राजरस्ता हा सर्व-प्रथम विचारांत घ्यावा आणि त्याच्या जीर्णोद्धारावर अवघें लक्ष आधींपासून केंद्रित करावें, अशी त्याची धारणा होती. जगाला जोडणाऱ्या बाहेरच्या रस्त्यानें गांवांत यावयाचें तर फ्रान्सिस स्ट्रीटसारख्या एका क्षुद्र लहानशा बोळांत आधीं शिरण्याची कल्पनाच त्याला मुळांत हास्यास्पद वाटत होती.

केवळ सोयीसाठीं मूलभूत तत्त्वाचा बळी देण्यास रॉकफेलर नाखूष होता. पण तरी सुद्धां एकूण सर्व गांवच वसाहतकाळास अनुसरून जुन्या पद्धतीनें बांधून

काढावयाची त्याला इच्छा नव्हती. म्हणून कोणत्या तरी एका विशिष्ट वास्तु-समुच्चयावर लक्ष केंद्रित करून तेवढ्या एका विशिष्ट विभागांत प्राचीन काळाच्या शिल्पाचें वातावरण निर्माण करावें, असें त्याला वाटत होतें. आणि अशा एका शिल्पानुकूल विभागाच्या शोधांत तो होता. पूर्वीच्या एका पत्रांत गुडविनला अशीं दोन केंद्रें सुचविलेलीं होतीं. एक कॅपिटॉलचें आणि दुसरें ब्रूटन चर्चचें. अर्थात् या योजनेंत सुद्धां तडजोडीचा कांहीं भाग होताच. कारण या दोन विभागांत सुद्धां तसें बरेंच अंतर होतें. आणि या अंतरांतील आजकालच्या इमारती संकल्पित जीर्णोद्धारक्षेत्रांशीं सर्वथा विसंगत दिसल्या असत्या.

विभागनिश्चितीचा हा प्रश्न अजूनपर्यंत अनुत्तरित होता. पण तरीमुद्धां जीर्णोद्धाराचा पुरस्कार करणारी आणखी एक कल्पना विचारांत घ्यावयास तूर्त त्याची तयारी होती. त्या दिवशीं गुडविनबरोबर दिवसभर गांवभर भटकल्यावर संध्याकाळच्या शांत वेळीं रॉकफेलरनें त्याच्याशीं बराच वेळ चर्चा केली. मध्यंतरीं अनेक प्रश्नांचा विचार त्यांनीं बारकाव्यानें केलेला होता. कोणत्या इमारती तूर्त ताब्यांत मिळविण्यासारख्या आहेत, त्यांची निगा कशी राखतां येईल, त्यासाठीं अंदाजें किती रक्कम बाजूस काढून ठेवावी लागेल, इत्यादि अनेक प्रश्नांचा खल केल्यावर त्यानें गुडविनला एक तात्पुरती योजना तयार करून तिचा पाठपुरावा करण्यास सांगितलें. पेरीनें विल्यम्सबर्गचा एक विस्तृत नकाशा काढावा आणि त्या त्या नकाशांत प्राचीन वास्तु बिनचूक निर्देशित करावी. आणि नंतर गुडविननें ती ती वास्तु जमेल तशी खरेदी करावी असें तूर्त ठरविण्यांत आलें. खरेदीस एकदां सुरुवात केली कीं योजना कार्यवाहींत आणण्याच्या दृष्टीनें एक टप्पा गांठला, असें होईल. रॉकफेलरनें वास्तूंच्या खरेदीस संमति दिली खरी, पण या पलीकडे स्वतःस कोणत्याहि वचनानें बांधून घेण्यास तो अजूनसुद्धां तयार नव्हता. समजा, कांहीं अनपेक्षित अडथळे मार्गांत आले आणि जीर्णोद्धाराची कल्पना सोडून द्यावी लागली तर खरीदलेल्या इमारती पुन्हा विक्रीस काढतां येतील, असें त्यानें निक्षून सांगितलें. मध्यंतरीं गुडविननें या योजनेंतील रॉकफेलरच्या सहकाराचें रहस्य काळजीपूर्वक जतन करावें. आणि जीर्णोद्धार योजनेची सर्व जबाबदारी यापुढें स्वतः स्वीकारावी, असा रॉकफेलरचा स्पष्ट आदेश होता. "जीर्णोद्धार कल्पनेची जननी तूंच आहेस—जनक जननी होऊं शकली तर!" असें रॉकफेलर थट्टेच्या स्वरांत म्हणाला. या संबंधांत गुडविनचा सेक्रेटरी लिहितो : "गुडविन धर्मोपदेशक होता. आणि रॉकफेलरच्या रहस्याचें जतन करावयाचें म्हणजे त्याच्या सदसद्विवेकबुद्धीवर

मोठाच ताण पडणार होता. पण तरीसुद्धां हें रहस्य निर्धारानें जतन करावयाचें आणि सदसद्विवेकबुद्धीशीं प्रतारणा करावयाची नाहीं, हा खोडा एकंदरींत त्रासदायक होता. दोरीवरची ही कसरत आपण करूं शकूं, अशी त्याला आशा होती.

आशा होती, पण प्रत्यक्षांत रहस्याचा हा भार केवळ असह्य आहे, हें थोड्याच काळांत अनुभवानें त्याला कळून चुकणार होतें. कारण गांवांतील किंमतवान् इमारतींची खरेदी करण्याचें काम यापुढें तो करणार होता. 'ॲसोसिएशन फॉर रिझर्वेशन ऑफ व्हर्जिनिया ॲंटिक्विटीज' नामक संस्थेकडे गुडविननें या संबंधांत विचारणा करावी, असें रॉकफेलरनें सुचविलें. वसाहतकाळांतील राजधानीची वास्तु जेथें होती ती जागा आपणांस कांहीं अटींवर सवलतीनें मिळूं शकेल किंवा काय, अशी ही विचारणा होती. या स्थळापासून रस्त्यावरील जमिनींची खरेदी त्वरित करणें आवश्यक होतें. कारण तेथें ग्याराज बांधण्यासंबंधीं वाटाघाटी चालू होत्या. त्याचप्रमाणें राजधानीच्या जागेपासून पॅलेस ग्रीनपर्यंतच्या हद्दींतील एखादें घर किंवा जमीन उपलब्ध झाली, तर वाजवी किंमत देऊन ती खरेदी करावी; पॅलेस ग्रीनपासून कॉलेजपर्यंतच्या भागांतील एखादी जमीन बाजारांत आली तर तिच्या खरेदीबाबत रॉकफेलरचा सल्ला घ्यावा; ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीटवरील हॉस्पिटलची इमारत एका अटीवर खरेदी करावी—अट ही कीं त्या जागेवरील हॉस्पिटल तेथून दुसऱ्या एखाद्या योग्य जागीं आधीं हलवावें. त्याच रस्त्यावरील कोर्टहाउस ग्रीनच्या बाजूची पलीकडची जागा मिळाल्यास तेथें जुनी खाणावळ बांधण्याच्या इराद्यानें ती ताबडतोब विकत घेण्यांत यावी, असें ठरविण्यांत आलें. थोडक्यांत सांगावयाचें तर रॉकफेलरनें स्वतःला भविष्य-काळांतील कोणत्याहि एका योजनेस बांधून घेतलें नसलें, तरी पॅलेस ग्रीन व कॅपिटॉल यांस जोडणारा ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीट आणि या राजरस्त्याच्या आसमंतांतील कांहीं भाग जीर्णोद्धार योजनेसाठीं त्यानें मर्यादित करून घेतला होता, हें या आदेशावरून सहज समजण्यासारखें होतें. त्याचप्रमाणें रेन बिल्डिंगची पूर्ववास्तु उभी करावी, असा त्याचा मानस असावा. कारण या संबंधांतील सर्व आराखडे पेरीनें तयार करावेत, आणि वसाहतकाळांतील शिल्पाचे तज्ज्ञ म्हणून जे नामांकित होते, अशा अधिकारी आर्किटेक्ट्सच्या कमिटीकडे पाहणीसाठीं ते सुपूर्द करावेत, असें रॉकफेलरनें गुडविनला कळविलें.

जून महिना संपल्यावर प्रत्यक्ष खरेदीच्या व्यवहारास सुरुवात झाली. आणि दैनंदिन घडामोडीच्या हकीकतींचीं पत्रें गुडविन रॉकफेलर ऑफिसकडे दररोज

रवाना करावयास लागला. आणि रॉकफेलरचें ऑफिस या पत्रांच्या ढिगाऱ्यांनीं लवकरच भरून गेलें. ऑगस्टमध्यें गुडविन न्यूयॉर्कला गेला, आणि आवश्यक त्या आणखी कांहीं इमारतींची खरेदी करण्यास त्यानें रॉकफेलरची अनुज्ञा मिळविली. खरेदीचा प्रत्येक व्यवहार इतर कोणास कळूं न देतां गुप्ततेनें पार पाडण्याबाबत आवश्यक ती सर्व दक्षता घेण्यांत आली होती. जागांचे दलाल विवक्षित वास्तूंच्या विक्रीबाबतच्या अटी गुडविनजवळ लिहून देत. गुडविन त्यासंबंधीं न्यूयॉर्क ऑफिसला लिहून कळवी. खरेदीबाबत संमति असेल तर लगेच न्यूयॉर्क बँकेचा चेक गुडविनच्या नांवानें रॉकफेलर ऑफिसमधून रवाना होई. हा चेक घेऊन त्याच्या मोबदल्यांत गुडविननें खरेदीखत आपल्या नांवानें करून घ्यावें आणि नंतर तें रॉकफेलरचा रीअल इस्टेट सल्लागार हेट याजकडे पाठवून द्यावें, अशी सर्व व्यवस्था निश्चित करण्यांत आली होती. पत्रांत, तारेंत किंवा टेलिफोनवरील संभाषणांत रॉकफेलरचा उल्लेख करणें आवश्यक वाटलें, तर तो मि. 'डेव्हिड' या नांवानें करण्यांत येई.

खरेदी-विक्रीचा हा सर्व व्यवहार चोख चालला होता. पण ज्याचें उत्पन्न मर्यादित आहे, असा एक सामान्य पाद्री खरेदीचे अवाढव्य व्यवहार करीत आहे, ही घटना लोकांच्या मनांतील कुतूहल चाळविण्यास पुरेशी होती. आणि लवकरच गुडविनच्या ऑफिसमध्यें जे घरमालक, दलाल आणि वकील गर्दी करून सोडीत त्यांच्यांत वृत्तपत्रांच्या वार्ताहरांची भर पडली. या योजनेस नको ती विस्तृत प्रसिद्धि लाभली तर ती घातास कारण होईल, हें वेळींच ओळखून गुडविननें त्या भागांतील वृत्तपत्रांच्या संपादकांची भेट घेतली, आणि त्यांच्या सहकार्याची मागणी केली. त्यानंतर त्यानें न्यू पोर्ट न्यूज डेली प्रेसमध्यें एक पत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकांत त्यानें आपली भूमिका प्रांजलपणानें स्वच्छ मांडली. त्यानें सांगितलें कीं विल्यम्सबर्गमधील ऐतिहासिक वास्तूंचें संरक्षण करण्याच्या कामीं अनेक लोकांची मदत मिळविण्यांत सुदैवानें आपणांस यश आलें आहे. पण त्याचबरोबर त्यानें हें पण स्वच्छ सांगून टाकलें कीं विल्यम्सबर्गमधील रहिवाशांनींच या कामीं अवश्य तें सहकार्य नाकारलें तर बाहेरील सज्जनांचा या कामांतील उत्साह ओसरेल. आणि तेणेंकरून सर्व कामावरच पाणी पडेल. याच वेळीं या कामांत आपल्याला एका कपर्दिकेची सुद्धां प्राप्ति नाहीं, अशी हमी देऊन पुढें नफा मिळविण्याच्या उद्देशानें चालू खरेदीचे व्यवहार केले जात नाहींत, असें त्यानें लोकांस आश्वासन दिलें. हें पत्रक पाहिल्यानंतर रॉकफेलरनें गुडविनला लिहिलें :

"कोणत्याहि योजनेची प्रसिद्धि इतक्या शहाणपणानें आणि कौशल्यानें केलेली आजवर मीं कधीं पाहिली नाहीं. तूं लोकांना विश्वासांत घेतलेंस, कांहींएक आडपडदा न ठेवतां मोकळेपणानें त्यांना सारें कांहीं सांगून टाकलेंस आणि अशा रीतीनें त्यांच्या मनांतील कुतूहलाचें निरसन आणि संशयाचें निराकरण केलेंस."

गुडविनला आणखी एका अनपेक्षित अडचणीस तोंड द्यावें लागलें. वसाहत-काळांत अगदीं पहिल्याप्रथम जे लोक तेथें घरें बांधून राहण्यास आले होते, त्यांचेच वंशज त्याच घरांतून अद्यापि राहत होते. त्या लोकांच्या दृष्टीनें त्यांची जुनीं राहतीं घरें म्हणजे एका उदात्त स्वप्नाचे अंतिम अवशेष होते. ही ज्यांची धारणा होती त्यांना त्यांच्या घरांतून निघून जाण्यास सांगणें केवळ अशक्य होतें. एवढेंच नाहीं तर तसा कांहीं निर्दय सल्ला त्यांना देणेंसुद्धां घातक ठरलें असतें. वसाहतकाळांतील या जुन्या घरांचें मूल्य जीर्णोद्धाराच्या योजकांस केवळ अमूल्य असें होतें. पण पूर्वजांच्या वास्तूंस जे जिव्हाळ्यानें जपत होते, त्यांचा विचार सहानुभूतीनें करणें आवश्यक होतें. अशा लोकांचें समाधान शोधण्यासाठीं गुडविननें एक व्यवहार्य योजना पुढें केली. या योजनेनुसार घरमालकांनीं आपलीं घरें नाममात्र विकावीत, त्यांच्या जीर्णोद्धारास आडकाठी करूं नये, आणि स्वतःच त्या घरांत खुशाल वस्ती करावी; भाडें, कर किंवा इन्शुरन्स याबाबतची चिंता योजकांनीं वाहावी, असें ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें उभयपक्षीं समाधानकारक अशी योजना गुडविननें रॉकफेलरकडून संमत करून घेतली. अल्पावधींतच या अटींवर अनेक घरमालकांशीं करारमदार करण्यांत आले.

हळूहळू नव्या नव्या जमिनी खरेदी करण्यांत आल्या, आणि खरीदलेल्या जमिनींसाठीं योजिलेला पिवळाधमक रंग गुडविनच्या टेबलावरील नकाशांत सर्वत्र पसरावयास लागला. मध्यंतरीं बोस्टनमध्यें पेरी आराखडे करण्यांत गढून गेला होता. ता. २१ नोव्हेंबर १९२७ रोजीं प्रस्तुत योजनेबाबतची एक निर्णायक सभा बोलावण्यांत आली होती. त्या सभेसमोर हे सर्व आराखडे ठेवण्यांत यावयाचे होते. गुडविनच्या योजनेवर खूष झालेले आणि त्या योजनेस मुक्त हस्तांनीं साहाय्य देऊं इच्छिणारे उदार दाते कोण होते, त्याची कांहींच कल्पना अजूनपर्यंत पेरीला देण्यांत आलेली नव्हती. किंवा नियोजित सभेचा हेतु काय तें पण त्याला कळविण्यांत आलेलें नव्हतें. धूर्तपणानें एक महत्त्वाची गोष्ट मात्र

त्यानें अचूक हेरली होती. या गूढ सभेच्या निर्णायक मतावर विल्यम्सबर्ग जीर्णोद्धारयोजनेचें भवितव्य बहुतांशीं अवलंबून आहे, हें त्याला कळून चुकलें होतें. ता. १८ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळच्या गाडीनें न्यूयॉर्कला जाण्यासाठीं तो निघाला. त्या वेळीं त्याच्या लगेजमध्यें अनेक अवजड नकाशांचे आणि आराखड्यांचे संग्रह होते. त्यांतील एका आराखड्याची नुसती लांबीच नऊ फूट होती. न्यूयॉर्कमधील व्हँडरबिल्ट हॉटेलमध्यें त्यानें डॉ. गुडविनची गांठ घेतली. आणि उभयतांनीं मिळून हॉटेलमधील एका दिवाणखान्यास चित्रप्रदर्शनाचें रूप दिलें. या क्षणीं सुद्धां गुडविनच्या मनांत आपलें रहस्य जतन करून ठेवण्याची इच्छा प्रबळ होती. सभेच्या दिवशीं लगतच्या एका खोलींत त्यानें पेरीला दिवसभर ताटकळत बसवून ठेविलें होतें. सभास्थानीं कोणत्या वेळीं कोणत्या क्षणाला एखाद्या आराखड्याच्या संबंधांत त्याची मदत लागली, तर ती क्षणार्धांत उपलब्ध व्हावी, अशा अपेक्षेनें गुडविननें ही व्यवस्था केली होती.

ता. २१ रोजीं सकाळीं रॉकफेलर गुडविनच्या खोलीवर एकटाच गेला, आणि तेथील एकूण एक सर्व आराखडे त्यानें काळजीपूर्वक नजरेखालून घातले. दुपारीं चारच्या सुमारास गुडविननें पेरीला विल्यम्सबर्गमधील उद्योगक्षेत्राचा आराखडा तयार करण्याचा निरोप दिला. संध्याकाळीं भोजनगृहांत उभयतांची गांठ पडली, तेव्हां गुडविननें पेरीला नुसतें एवढेंच सांगितलें कीं, 'मित्रमंडळी' त्याचे आराखडे बघून खूष झाली आहे. पण याहून अधिक कांहीं तो बोलला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं रॉकफेलर आपल्या सहकाऱ्यांस बरोबर घेऊन गुडविनच्या खोलीवर आला. कर्नल वुड्स, मि. डेबेव्हॉइज आणि मि. हेट हे ते सहकारी होत. त्या महत्त्वाच्या भेटीसंबंधांत नंतर गुडविननें जें कांहीं सांगितलें तें हें:

"या वेळीं रॉकफेलरनें सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं होतीं. आराखड्यांतील प्रत्येक लहानसहान बाबीचें स्पष्टीकरण त्यानें अधिकारवाणीनें केलें. जसा कांहीं तो स्वतः विल्यम्सबर्गमध्यें अनेक वर्षें राहिलेला होता. अशी ही गुंतागुंतीची आणि इतकी विस्तृत योजना अशा प्रभुत्वानें कोणीं कोणास समजावून दिलेली आजवर मीं कधीं पाहिलेली नाहीं. नकाशांतील गांवाची संपूर्ण रचना, गांवांतील प्रत्येक वास्तूचें नेमकें ठिकाण, त्या वास्तूचा सविस्तर इतिहास आणि योजनेंत गुंतलेला तिचा संबंध, इत्यादींविषयीं त्यानें तज्ज्ञाच्या अभ्यस्त अधिकारानें विवेचन केलें. आणि शेवटीं आपणांस या जीर्णोद्धारांत

काय म्हणून रस वाटतो, आणि ही योजना फलद्रूप झाली असतां अमेरिकन जनतेस तिचें कां व कसें आकर्षण वाटेल, त्याविषयीं तो विस्तारानें बोलला. त्याचें विवेचन स्तब्धपणानें ऐकत असतांना मला असें वाटलें कीं जर त्यानें माझ्या विचारासाठीं ही योजना सादर केली असती, आणि माझ्याजवळ तशीं साधनें असतीं, तर खात्रीनें या योजनेस आवश्यक तो सर्व पैसा मीं उपलब्ध करून दिला असता. हें सर्व सांगून झाल्यावर अखेरीस रॉकफेलरनें उपस्थितांस अश्वासनपूर्वक सांगितलें कीं कागदावरील हे निराकार आराखडे वास्तुरूपानें आकारास आणण्याची मी जबाबदारी घेत आहें. पुन्हा एकदां त्यानें पूर्वींचीच अट घातली कीं या संबंधांत कोणीं दुसऱ्या कोणास अवाक्षरानें कांहीं सांगावयाचें नाहीं. त्यानंतर योजनेच्या बारकाव्यांत आपण मुळींसुद्धां लक्ष घालणार नाहीं, असें त्यानें निक्षून सांगितलें. यापुढें धोरणाबाबतचा सर्व सल्ला कर्नल आर्थर वुड्स देईल, खरेदीबाबत मि. हेट मार्गदर्शन करील, आणि कायद्याचा कांहीं प्रश्न उपस्थित झाल्यास मि. डेबेव्हॉइज काय तें सांगेल, असें त्यानें मला सांगितलें.—या योजनेंत माझें लक्ष सदाच गुंतलेलें राहील, पण बारकावे मात्र यापुढें मी बघणार नाहीं, असें तो म्हणाला. हें शेवटचें विधान करतें वेळीं पुढें काय वाढून ठेवलें आहे, त्याविषयीं अर्थातच त्याला कांहींच कल्पना नव्हती. कारण योजनेच्या बारकाव्यांतसुद्धां तो जातीनें लक्ष घालणार होता. आणि पुढील कित्येक वर्षें ही योजना त्याच्या आकर्षणाचा विषय होणार होती."

इ. स. १९२८ च्या जूनमध्यें डॉ. गुडविन आणि त्याचे सहकारी यांना असें वाटावयास लागलें कीं गुप्ततेचा पडदा आतां काढून टाकणें भाग आहे. तोंपर्यंत विल्यम्सबर्गच्या जीर्णोद्धाराची योजना केवळ कागदावर राहिलेली नव्हती. बांधणीचें काम जोरांत सुरू झालें होतें. आणि दर एक नवा दिवस नवे प्रश्न घेऊन उजाडत होता. प्रत्येक वास्तूची पुनर्रचना कशी करावी, एवढ्यापुरताच मर्यादित असलेला हा एकच प्रश्न नव्हता. सर्व गांवच्या गांव मोडून पुन्हा उभारण्याचा हा जगड्व्याळ प्रश्न होता. रस्ते आणि पायरस्ते पुन्हा बांधून काढावयास हवे होते. पाणीपुरवठ्याची आणि सांडपाण्याच्या व्यवस्थेची काळजी घ्यावयास हवी होती. प्राचीन वातावरणाशीं सर्वस्वीं विसंगत दिसणाऱ्या विजेच्या आणि टेलिफोनच्या तारा जमिनींत गाडणें भाग होतें. जुन्या झाडांची जोपासना आणि नव्या झाडांची

लागवड करावयास हवी होती. आगीपासून संरक्षण देण्याच्या नव्या योजना हातीं घेणें भाग होतें. आजवर या गांवांतील लोक शांततेचें सहजीवन जगत होते. आतां इमारती उद्ध्वस्त करावयाच्या, म्हणजे मोडतोडीच्या कर्कश आवाजांची त्यांना सवय करावयास हवी होती. ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर स्ट्रीटच्या प्रशस्त राजमार्गा-वरून घरेंच्या घरें हळूहळू हलविण्याचें काम आतां सुरू होणार होतें. अर्थातच अशा वेळीं अशा भव्य कार्यांत सर्व गांवकऱ्यांचें सहकार्य लाभणें अत्यावश्यक होतें. त्यांच्या जीवनांत एकाएकीं हा जो प्रचंड बदल घडून येऊं पाहत होता, त्याला जबाबदार असलेली व्यक्ति खरोखर कोण आहे याबाबत आतां मुग्धता राखणें शहाणपणाचें ठरलें नसतें. त्यांचें संपूर्ण सहकार्य लाभावयाचें तर गुप्ततेचा पडदा उचलण्याची कोशीस करणें भाग होतें. डॉ. गुडविनला आणि त्याच्या सहकाऱ्यांना ही जाणीव उत्तरोत्तर अधिकाधिक व्हावयास लागली होती. त्या-शिवाय गांवांतील कोर्टाची आणि जेलची इमारत योजनेस आवश्यक म्हणून दुसऱ्या भागांत कोठें तरी बांधण्याची योजना कार्यवाहींत आणणें आतां अटळ होतें. या अदलाबदलीस सर्व गांवाची संमति आवश्यक होती. तेव्हां सिटी कौन्सिलच्या सभासदांच्या संमतीनें विल्यम्सबर्गच्या समस्त गांवकऱ्यांची एक सभा डॉ. गुडविननें बोलाविली. ता. १२ जून १९२८ रोजीं संध्याकाळीं झालेल्या या सभेस गांवकरी बहुसंख्येनें उपस्थित होते. या सभेंत योजनेच्या दात्याचें नांव जाहीर होणार आहे, अशी कुजबुज अगोदरपासूनच सभास्थानीं चालू होती. नियोजित कार्याविषयीं संपूर्ण स्पष्टीकरण आणि चर्चा झाल्यानंतर डॉ. गुडविन बोलावयास उभा राहिला. परिस्थिति नाट्यात्म होती. श्रोते चित्रां-सारखे तटस्थ होते. जीर्णोद्धाराच्या योजनेमुळें गांवकऱ्यांना कोणते फायदे होण्याचा संभव आहे त्याविषयीं विस्तारानें विवेचन करून झाल्यावर शेवटीं तो म्हणाला :

> “आतां मला सांगावयास मनस्वी आनंद वाटतो कीं विल्यम्सबर्गच्या जीर्णोद्धाराचें काम न्यूयॉर्कमधील मिस्टर व मिसेस जॉन डी. रॉकफेलरच्या आर्थिक साहाय्यानेंच शक्य झालें आहे. या अवाढव्य योजनेंत आवश्यक तेवढा सर्व निधि या उभयतांनीं उपलब्ध करून दिला. त्यांचे आभार मानावयास योग्य असे शब्द शोधूनहि मला सांपडत नाहींत.”

ही घोषणा ऐकतां क्षणीं श्रोत्यांनीं उत्स्फूर्तपणें टाळ्या वाजविल्या. आणि मोठ्या

उत्साहानें मनांत दाटून आलेला हर्ष व्यक्त केला. नंतर थोड्याच वेळांत चर्चाविषय झालेल्या बाबींसंबंधीं त्यांनीं एकमतानें अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. आणि मि. रॉकफेलर व डॉ. गुडविन यांच्या कार्याबद्दल धन्यवाद देणारा ठराव मंजूर केला.

एका माणसाचें मनोगत स्वप्न दुसऱ्या एका माणसाच्या उदार सहकारानें आकारास येत होतें. पण प्रारंभीं त्याच्या आकारमानाची वा त्याप्रीत्यर्थ सोसावयास लागणाऱ्या खर्चाची यथायोग्य कल्पना कोणासच नव्हती. पहिलीं कामें सुरू झालीं तेव्हां अंदाज असा होता कीं राजधानीच्या पुनर्रचनेसाठीं पन्नास लक्ष डॉलर्स पुरे होतील. १९३३ मध्यें रेन बिल्डिंगचा कायापालट संपूर्ण झाला. विल्यम्सबर्गचें सर्वांत प्रसिद्ध असें अभ्यागतगृह 'रॅले टॅव्हर्न' बांधून पुरें झालें. या योजनेंतील सर्वांत अधिक महत्त्वाकांक्षी अशीं जीं दोन बांधकामें होतीं— कॅपिटॉल आणि गव्हर्नरचा राजवाडा—तीं दोन्ही पुढील वर्षांत बांधून पुरीं होतील असा अंदाज होता. या वेळीं डॉ. गुडविननें विश्वासपूर्वक लिहिलें : "जीर्णोद्धाराचें हें काम आतां अशा अवस्थेस येऊन पोहोंचलें आहे कीं त्याची सुंदर परिणति दृष्टिपथांत आहे."

वस्तुस्थिति अशी होती कीं या वेळीं नुकतीच कोठें कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली होती. या कामासाठीं खर्चाचा जो अंदाज आरंभीं धरण्यांत आला होता, जवळजवळ त्याच्या दसपट रक्कम या कामीं प्रत्यक्षांत खर्चीं पडणार होती. आणि अगदीं आजसुद्धां हें काम पुरें झालें आहे, असें एकंदर रचनेचा व्याप बघतां खरें वाटत नाहीं. कॅपिटॉलची आणि गव्हर्नरच्या राजवाड्याची इमारत बांधून पुरी होण्यापूर्वीच आणखी कांहीं इमारतींच्या जीर्णोद्धाराचे आणि बांधकामाचे आराखडे हातीं घेण्यांत आले होते. यांपैकीं कांहीं इमारती सार्वजनिक प्रदर्शनासाठीं खुल्या ठेवण्यांत यावयाच्या होत्या, तर दुसऱ्या कांहीं इमारतींतून लोकांनीं राहावें, अशी योजना होती. अशा रीतीनें एक इमारत बांधून पुरी होण्याच्या आंतच दुसऱ्या इमारतीचा पाया खोदण्यास सुरुवात व्हावी, आणि त्याच वेळीं तिसऱ्या इमारतीच्या बांधकामाचा आराखडा हातीं घ्यावा, असें एकसारखें चाललें होतें. काम हातीं घेतेवेळीं योजना हळू हळू विस्तारत जात होती आणि वसाहतकाळांतील विल्यम्सबर्गच्या बांधणीच्या नव्या महत्त्वाकांक्षी योजना हातीं घेण्यांत येत होत्या. १९३५ सालीं लडवेल-पॅराडाइज हाउस सार्वजनिक प्रदर्शनासाठीं खुलें करण्यांत आलें. १९३६ सालीं 'स्ट्रॅग स्वीट प्रिझन'

असें ज्याचें वर्णन करण्यांत आलें होतें आणि कुप्रसिद्ध ब्लॅक बीअर्डच्या तेरा साथीदारांना जेथें डांबण्यांत आलें होतें, त्या पब्लिक जेलची इमारत बांधून पुरी झाली. १९४० सालीं जॉर्ज वाइथचें घर भोंवतालच्या मळ्यांतून आणि बागांतून डौलदारपणें उठून दिसावयास लागलें. जॉर्ज वाइथला इतिहासांत जी प्रतिष्ठा आणि योजना प्राप्त झालेली दिसते, तिला साजेसेंच हें अपूर्व स्मारक होतें. तावत्काळपर्यंत पावडर मॅगॅझिनच्या संगोपनाची आणि प्रदर्शनाची व्यवस्था 'ॲसोसिएशन फॉर दि रिझर्व्हेशन ऑफ व्हर्जिनिया ॲंटिक्विटीज' या संस्थेकडे होती. ही इमारत भाडेपट्टीच्या करारानें ताब्यांत घेण्यांत आली. नंतर योजनापूर्वक तिचा जीर्णोद्धार करण्यांत आला. आणि सर्वस्वीं जुन्या पद्धतीनें नव्यानें पुरी केलेली ही इमारत प्रदर्शनासाठीं पुन्हा एकवार खुली करण्यांत आली. १९५१ सालीं ब्रश-एव्हरार्ड हाउस बांधून पुरें झालें. शेजारच्या भव्य जॉर्ज वाइथ हाउसच्या मानानें ही वास्तु लहान प्रमाणांत मुळांतच योजिलेली होती. पण जुन्या गांवांतील मध्यमवर्गाच्या जुन्या घराचा एक नमुना म्हणून तिचें महत्त्व अनन्यसाधारण होतें.

अशा रीतीनें आस्ते आस्ते या सर्व इमारती बांधून पुऱ्या झाल्या. त्याच वेळीं किंवा आगेमागें या इमारतींच्या आसमंतांतील मोकळ्या जागा खरेदी करून तेथें जुन्या पद्धतीचीं सुंदर उद्यानें उठविण्यांत आलीं. आणि मग ड्यूक ऑफ ग्लूसेस्टरचा पुराणा राजमार्ग प्राचीन काळच्या ऐन वैभवांत खुलून दिसावयास लागला.

वसाहतकाळांतील विल्यम्सबर्गसारखा एक जुना गांव बघण्यासाठीं लोक फारसे उत्सुक असतील किंवा गर्दी करतील, अशी अपेक्षा मुळांतच फारशी नव्हती. पण अमेरिकन जनतेनें अपेक्षेपेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत या कामाबाबत उत्साह दाखविला. आणि पुराणवास्तूंचें हें अपूर्व प्रदर्शन बघण्यासाठीं म्हणून लोकांनीं गर्दी करून सोडली. दोन्ही 'विल्यम्सबर्ग कॉर्पोरेशन्स' च्या अध्यक्षांची जागा कर्नल आर्थर वुड्सनंतर केनेथ चॉर्ले यांजकडे आली होती. त्यानें या संबंधांत लिहून ठेविलें आहे :

"प्रारंभीं अशी समजूत होती कीं लोक या ठिकाणीं येतील, या स्थळापासून कांहीं स्फूर्ति घेतील आणि शांतपणानें लगेच निघून जातील. येथील पुराणवास्तूंचें प्रदर्शन बघून झाल्यावर कोण कशाला येथें थांबणार आहे?

पण लवकरच असें दिसून आलें कीं प्रेक्षकांपैकीं कांहीं जण येथेंच रात्रीचा मुक्काम करावयास उत्सुक आहेत. पुराण्या खाणावळींतून त्यांच्या निवासाची व्यवस्था केली तर त्यांच्या मुक्कामाचा प्रश्न तर सुटेलच, पण येथील आकर्षणांत आणखी एक नवी भर पडेल, अशी कल्पना मनांत आली. आणि त्याप्रमाणें लगेच निवासाच्या सर्व सोयी प्रेक्षकांस उपलब्ध करून देण्यांत आल्या. पण तरीसुद्धां अमेरिकन लोक पुराणीं घरें बघण्यास खरोखर किती उत्सुक आहेत आणि यात्राव्रतची त्यांची तृष्णा किती अनावर आहे, याचा अंदाज कोणासच खरोखर करतां आला नाहीं, असेंच आज म्हणावें लागतें. १९३७ सालीं पुराण वास्तुक्षेत्राच्या हद्दीबाहेर एक खाणावळ बांधण्यांत आली. तेथील निवासांत एकसष्ट खोल्या होत्या. पण त्या कशा भरतील याविषयीं योजकांस चिंता होती. लवकरच असें दिसून आलें कीं या खोल्या प्रवासी यात्रेकरूंस अपुऱ्या पडतात. जीर्णोद्धाराचें काम सुरू होऊन पंचवीस वर्षें झालीं नाहींत, तोंच असें आढळून आलें कीं गांवांतील लोक फार फार तर २००० पाहुण्यांची एका वेळीं सोय करूं शकतात. पण ती सुद्धां पुरेशी नाहीं."

★ ★ ★

प्रकरण अकरावें

# पार्क्स आणि सृष्टिसंरक्षण

सार्वजनिक उद्यानांचें आकर्षण रॉकफेलरच्या मनास अनावर होतें. त्याचप्रमाणें सृष्टीचा कांहीं भाग तरी निदान नैसर्गिक स्वरूपांत जोपासला जावा, अशी त्याची धारणा होती. या संबंधांत रॉकफेलरनें जें कांहीं केलें, त्याविषयीं पुढेंमागें एक ग्रंथ निश्चयानें लिहिला जाईल. या संबंधांतील त्याचें कार्य वयाच्या तरुणपणींच सुरू झालें. आणि आमरण आयुष्यभर तें सतत अखंड चालूच होतें. या विषयांत त्याला विशेष रस होता. व्योमिंगमधील जॅक्सन होल, मेनमधील आकेडिया नॅशनल पार्क आणि न्यूयॉर्क व न्यूजर्सी राज्यांच्या सीमेवरील पॅलिसेड्स इंटरस्टेट पार्क—अशा कांहीं योजनांत त्याचें लक्ष वर्षानुवर्षें गुंतून पडलें होतें. कॅलिफोर्नियांतील सेकोयाज आणि योझेमाइट नॅशनल पार्कमधील शुगर पाइन्स यांचें संरक्षण व संगोपन करण्याबाबत त्यानें निर्वाणींच्या क्षणीं निर्णायक कृति केली, असें इतिहास सांगतो.

मेनराज्यांतील माउंट डेझर्ट हायलंडमधील आकेडिया नॅशनल पार्कच्या संवर्धनांत अगदीं पहिल्याप्रथम रॉकफेलरनें लक्ष गुंतविलें, आणि पुढील अनेक वर्षें या कामांतील त्याचें आकर्षण अबाधित राहिलें. या बेटाच्या नैसर्गिक सौंदर्यानें मोहित होऊन १९०० सालच्या उन्हाळ्यांत तो तेथें प्रथम येऊन राहिला. या स्थळाची त्याची निवड लक्षणीय होती. या बेटावरील ग्रॅनाइट पर्वतांच्या श्रेणी, समुद्रकिनाऱ्यावरील उंच उंच खडक सर्वत्र पसरलेले, विपुल जलाशय

आणि तेथील वन्य वृक्षांची व रानफुलांची विविधता—या सृष्टिविशेषांनीं त्याच्या चित्तास मोह घातला होता. भरीस भर म्हणून येथें जवळपास निर्जन असा एकांत होता. बेटावर मोटरगाड्यांची वर्दळ मुळींच नाहीं, हें पाहून त्याला मनस्वी समाधान वाटलें होतें.

वस्तुस्थिति अशी होती कीं माउंट डेझर्टच्या रमणीय सृष्टिशोभेनें अनेक रसिकांचें लक्ष त्यापूर्वीच वेधलेलें होतें. आणि अटलांटिक किनाऱ्यावरील अनेक सुंदर लोकप्रिय स्थळांपैकीं हें एक, म्हणून त्याची ख्याति होती. पूर्वीपासून येथें वस्ती करून राहणारे जे रहिवासी होते, त्यांच्या मनांत एक त्रासदायक विचार सदा घोळत असे. बेटावरील पर्वतांचीं उत्तुंग शिखरें बघून तेथें धनिकांसाठीं आरामशीर निवासस्थानें बांधण्याची कल्पना व्यापारी वृत्तीच्या साहसी लोकांस आकर्षक वाटेल, हें भय त्यांच्या मनांत नित्याचें घर करून होतें. या भयापोटींच तेथील लोकांनीं बेटाचा निदान कांहीं सुंदर सृष्टिभाग व्यापाऱ्यांच्या लोभापासून मुक्त असावा, अशा हेतूनें यत्न सुरू केले होते. हार्वर्ड विद्यापीठाचा प्रेसिडेंट चार्ल्स डब्ल्यू. एलियट याच्या नेतृत्वानें तेथील लोकांनीं या कामासाठीं एक संस्था स्थापन केलेली होती. तिचें नांव 'हॅानकॉक काउंटी ट्रस्टीज ऑफ पब्लिक रिझर्व्हेशन'. १९१० सालीं सील हार्बर येथें रॉकफेलरनें उन्हाळ्यांत राहण्यासाठीं म्हणून एक सुंदर जागा खरेदी केली. त्याच वेळीं या संस्थेनें जॉर्ज डी. डॉरच्या पुढाकारानें बेटावरील कांहीं महत्त्वाचीं स्थळें हस्तगत केलीं होतीं. त्यांजपैकीं कांहीं देणगीरूपानें आणि कांहीं आर्थिक साहाय्यानें त्यांनीं पैदा केलीं होतीं. अटलांटिक समुद्रकिनाऱ्यावरील अत्युच्च पर्वत जो कॅडिलॅक माउंटन, त्याचें अत्युच्च शिखर हस्तगत करून घेण्यांत या संस्थेनें यश मिळविलें होतें.

नियोजित कार्यांत एवढें यश प्राप्त झाल्यावर हॅनकॉक ट्रस्टीजनीं असा विचार केला कीं तावत्काळपर्यंत पैदा केलेली सर्व जमीन फेडरल सरकारच्या स्वाधीन करावी, आणि तेथें नॅशनल पार्कची उभारणी करावी. १९१३ सालीं या हेतूनें सेक्रेटरी ऑफ दि इंटीरिअर फ्रॅंकलिन के. लेन याच्याशीं बोलणें करण्यासाठीं म्हणून डॉर वाशिंग्टनला गेला. लेननें हॅनकॉक ट्रस्टीजच्या योजनेचें मनःपूर्वक स्वागत केलें, आणि उत्साहानें नॅशनल पार्कबाबत आवश्यक तें सर्व करण्याचें आश्वासन दिलें. यापुढील तीन वर्षें सलग जमिनींच्या खरेदींत आणि करारपत्रांच्या व्यवस्थेंत गेलीं. १९१६ सालपर्यंत जवळजवळ ५००० एकर जमीन संस्थेच्या मालकीची झाली, तेव्हां नॅशनल मॉन्युमेंट्स ॲक्टला अनुसरून हॅनकॉक ट्रस्टीजनीं ही

सर्व जमीन सरकारच्या हवालीं सुपूर्द केली. त्याच वर्षीं जुलै महिन्यांत राष्ट्राध्यक्ष विल्सननें ट्रस्टीजची देणगी स्वीकारली व तीन वर्षांनंतर 'लाफायेत नॅशनल पार्क' नांवानें नंतर प्रसिद्ध झालेल्या योजनेस कायदेशीर मंजुरी दिली. पूर्वेकडील हा पहिलाच नॅशनल पार्क. त्याचप्रमाणें लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें दिलेल्या जमिनींच्या देणग्या स्वीकारून सरकारनें आपल्या अधिकारांत ज्यांच्या व्यवस्थेची संपूर्ण हमी घेतली, असा हा अमेरिकेंतील पहिलाच नॅशनल पार्क. तदनंतर हाच नॅशनल पार्क 'आकेडिया' नांवानें ओळखला जाऊं लागला. आणि त्याची सरहद्द जवळच्या भूप्रदेशांतील कांहीं भागास जोडली गेली.

हॅनकॉक ट्रस्टीजनीं योजिलेल्या नॅशनल पार्कमध्यें प्रारंभापासून रॉकफेलरचें लक्ष गुंतलेलें होतें. आणि या कार्यासाठीं त्यानें मुक्तहस्तानें अवश्य ती मदत वेळोवेळीं दिलेली होती. नॅशनल पार्कला कायदेशीर मंजुरी मिळाल्यानंतर त्यानें पार्कलगतच्या जमिनी खरीदण्यास सुरुवात केली. पार्कचा विस्तार शक्य तितका अधिक व्हावा आणि बेटावरील अनेक पर्वतशिखरें एकमेकांस जोडलीं जाऊन पार्कमध्यें सामील व्हावींत, या हेतूनें त्यानें हा उद्योग आरंभिला होता. एका बाजूस समुद्र-किनारा व दुसऱ्या बाजूस फ्रेंचमन्स बे यांस सांधणारा एक लांबलचक रस्ता या यत्नांतून निष्पन्न व्हावा, असा त्याच्या मनांतील हेतु होता. कालांतरानें अक्षरशः हजारों एकर जमीन आणि स्वतःच्या मालकीची बहुतेक सर्व इस्टेट त्यानें या नॅशनल पार्कच्या स्वाधीन केली. स्वतःच्या मालकीचें सील हार्बरमधील घर तेवढें त्यानें स्वतःसाठीं म्हणून ठेवून घेतलें.

नॅशनल पार्कच्या योजनेस रॉकफेलरनें हजारों एकर जमिनींची देणगी देऊन सहकार दिला. हा त्याच्या एतद्विषयक अनेकविध उद्योगांचा केवळ एक प्रारंभिक भाग होता. खरें सांगावयाचें तर वस्तुस्थिति अशी होती कीं, पार्कच्या विकासाशीं संलग्न असलेली प्रत्येक बाब त्याच्या अभ्यासाचा आणि निदिध्यासाचा विषय होती. पार्कमधील इमारती, बागबगीचे, रानजंगलें, रस्ते-पायरस्ते या सर्वांत त्याला रस होता. बीव्हर आणि हरणें कित्येक वेळां पार्कची नासधूस करीत, तेंसुद्धां त्याला बघवत नसे. आणि त्यासंबंधीं त्याचें संशोधन चालू होतें. आकेडियाशीं त्याचा निकट संबंध वर्षांनुवर्षें असा जडलेला होता कीं त्या बेटावरील जमिनीचा तसू नि तसू त्याच्या परिचयाचा झालेला होता. तेथील जमिनीवर त्याचें प्रेम होतें. त्या जमिनीपायीं त्यानें लक्षावधि डॉलर्स वेंचिले होते. त्याशिवाय पार्कमधील इमारती, रस्ते, पूल, जंगलें आणि लागवड

यांजसाठीं आणखी मोठमोठ्या रकमा कालवधीनें तो खर्ची घालणार होता.

'आकेडिया' योजनेचें रॉकफेलरच्या मनाला एवढें अनावर आकर्षण वाटलें, त्याचें कारण उघड आहे. पहिली गोष्ट अशी कीं माउंट डेझर्ट कम्युनिटीचा तो आरंभापासून सभासद होता. आणि बेटावरील सृष्टिसौंदर्य मूळ स्वरूपांत अबाधित राहावें, याविषयीं त्याच्या मनाला चिंता लागून राहिली होती. दुसरी गोष्ट अशी कीं या अशा योजनेचें आवाहन त्याच्या मनास स्वाभाविक पोहोंचण्यासारखें होतें. अद्यापपर्यंत कोणीं हातीं न घेतलेला असा हा अस्पृष्ट मौलिक उद्योग होता. रॉकफेलर स्वभावानें पूर्णतावादी होता. कोणत्याहि योजनेंत न्यून मात्र त्याला खपत नसे. पूर्णांशीं विसंगत अशा अपूर्णांशीं तडजोड शोधूं पाहणारी प्रवृत्ति त्याच्या स्वभावांतच नव्हती. त्याचप्रमाणें कोणत्याहि योजनेस प्रारंभापासून मर्यादित करणारी कक्षा त्याला मनापासून आवडत नसे. हातीं घेतलेलें काम असाध्य ध्येयासारखें अमर्याद असावें, अशी त्याच्या मनाची धारणा होती. विल्यम्सबर्ग-प्रमाणेंच आकेडिया नॅशनल पार्कशीं त्याचा संबंध प्रारंभापासून जडलेला होता. आणि विल्यम्सबर्गप्रमाणेंच आकेडिया नॅशनल पार्क त्याचें लक्ष वर्षांनुवर्षें वेधून, बांधून ठेवणार होता.

तदनंतर अनेक पार्कयोजनांशीं रॉकफेलरचा संबंध जडणार होता. पण आकेडिया नॅशनल पार्कवरच त्याच्या व्यक्तित्वाचा स्पष्ट ठसा उमटलेला दिसतो. या पार्कच्या विकासासाठीं तो निरंतर, निरलस उद्योगांत गढलेला असे. त्याच्या उदार दातृत्वामुळें या पार्कच्या महत्त्वाकांक्षी कक्षा जशा विस्तृत झाल्या, त्याप्रमाणें त्याच्याच दातृत्वामुळें बेटावरील सर्व सौंदर्यस्थळांना जोडणारे रस्ते बांधणें शक्य झालें. या पार्क-योजनेच्या निमित्तानें पार्कशिल्पाबाबत त्यानें स्वतःच्या खर्चानें संशोधनास चालना दिली. आणि येथील शिल्पपद्धतींत त्याच्या आवडीनिवडीचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें दिसतें. आकेडिया नॅशनल पार्कमध्यें एकूण ३०,००० एकर जमीन समाविष्ट आहे. आणि पूर्वेकडील अतिभव्य पार्क-योजनांमध्यें आकेडियाचा अंतर्भाव होतो.

इ. स. १९२४ सालापासून रॉकफेलर पश्चिमेकडील पार्क-योजनांत लक्ष घाला-वयास लागला. या वर्षी आपलीं तीन वडील मुलें बरोबर घेऊन त्यानें देशांतील जगप्रसिद्ध अशा सर्व पार्कांस भेटी दिल्या. आरिझोनामधील ग्रँड कॅन्यन नॅशनल पार्क, न्यू मेक्झिकोमधील बॅंडेलिअर नॅशनल मॉन्युमेंट, दक्षिण कोलोराडोमधील मेसावेर्दे नॅशनल पार्क आधीं पाहून झाल्यावर त्यानें यलो स्टोन आणि ग्लेशिअर

नॅशनल पार्कच्या दिशेस मोर्चा वळविला. ग्रँड कॅन्यन बघून आल्यावर त्यानें आपल्या प्रवासाच्या डायरींत नोंद केली : 'अवर्णनीय सौंदर्य.' आणि दक्षिण दिशेनें कारमधून चक्कर मारून आल्यावर त्यानें डायरींत लिहून ठेविलें : "हें दृश्य आश्चर्यकारक आहे...आजची रात्र येथेंच काढावी, सूर्योदय आणि सूर्यास्त बघावेत, आणि उघड्यावरच झोपावें, असें राहून राहून वाटतें आहे."

प्राचीन इंडियन अवशेष बघत असतांना मेसावेर्देविषयीं त्याच्या मनांत विलक्षण कुतूहल निर्माण झालें. येथेंच इतिहासपूर्व काळांतील इंडियन लोकांनीं वस्ती केली होती आणि हजारों वर्षें येथें राहिल्यानंतर त्या काळास साजेशी सुधारणा अंमलांत आणली होती. त्यांच्या पुरातन संकृतीचा कांहीं इतिहास येथील भूभागावर स्पष्ट लिहून ठेवलेला दिसतो. निसर्गानें खणलेल्या काळोखभरल्या गुहा आणि पर्वतश्रेणींतील सूक्ष्म खोदकामांतून निर्माण केलेले भव्य राजवाडे त्यांच्या जीवितांतील अनेकविध स्थित्यंतरांचे साक्षी आहेत. पुराण-वस्तु-संशोधकांस अद्यापपर्यंत न सुटलेलीं अशीं दगडांतील कोडीं येथें अनंत आहेत. रॉकफेलरच्या भेटीनंतर पार्क सुपरिंटेंडंट जेस नसबाउम यानें लिहून ठेविलें आहे : "रॉकफेलर आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळी येथील प्राचीन संस्कृतीचे अवशेष बघण्यांत गढून गेली होती. किती तरी वेळ येथील पर्वतराजींत बसून चिंतन करण्यांत त्यांनीं घालवला. मधून मधून कांहीं प्रश्न तो मला विचारी. ज्या गोष्टींबाबत त्याला जिज्ञासा वाटे, त्याची माहिती लगेच विचारून तो शंका-समाधान करून घेई. पर्वतश्रेणींत खोदलेल्या राजवाड्यांच्या कांहीं वैशिष्ट्यांसंबंधीं त्यानें साक्षेपानें चौकशी केली. येथील आदिवासींची शेती कोठें होती, शेतीचीं अवजारें कोणतीं होतीं, पाणीपुरवठ्याच्या जागा त्यांनीं कोठें व कशा शोधून काढल्या, त्यांच्या चालीरीती कोणत्या होत्या, समारंभ-उत्सव कोणते होते, इत्यादींविषयीं त्यानें अनेक बारीकसारीक चौकशींचे प्रश्न विचारले." एक दिवस संध्याकाळीं पर्वताच्या एका कड्यावर उभे राहून त्यांनीं समोरच्या पर्वतावरील इंडियन लोकांचा एक धार्मिक समारंभ पाहिला. "मध्यभागीं पेटविलेल्या होळीचा प्रकाश सर्वत्र फाकला होता. आणि अंधुक छायाप्रकाशांतून निर्माण झालेला संभ्रम रमणीय होता." नसबाउम लिहितो : "समोरच्या पर्वताच्या भिंतीवर नवाहो इंडियन लोकांचे कांहीं धार्मिक विधि चालले होते. फेर धरून उन्मादानें ते नाचत होते. आणि मंत्रोच्चारपूर्वक स्तोत्रें म्हणत होते. आमच्या मध्यें निरुंद दरी पसरलेली होती. गुहेच्या अंतर्भागांतून उमटणारे ध्वनी इकडच्या पठारावर

आम्हांला स्वच्छ स्पष्ट ऐकूं येत होते. तेथील ध्वनिनिनाद आश्चर्यकारक होता."

रॉकफेलरला प्राचीन इंडियन संस्कृतिवैशिष्ट्यांची माहिती मुख्यत: मिळाली, ती नसब्राउमच्या भाषणांतून, हें उघड होतें. अर्थातच या एका पंडिताचें ज्ञान-भांडार लुटण्याची संधि या भागास भेट देणाऱ्या बहुसंख्य यात्रेकरूंस उपलब्ध होण्यासारखी नव्हती. डोळ्यांना जें दिसेल तेवढ्यावरच समाधान मानणें त्यांना भाग होतें. येथें येऊन पोहोंचण्यापूर्वीच ज्ञानमार्गाची दुर्मिळता त्यांच्या प्रत्ययास येऊन चुकली होती. अनेक मैलपर्यंत पसरलेला येथील पर्वतश्रेणींचा विस्तार विस्मयकारक होता. आणि येथें कुतूहलजनक दृश्यें सर्वत्र विखुरलेलीं होतीं. पण यात्रेकरूंना मार्गदर्शनाच्या वा ज्ञानदानाच्या सोयी येथें मुळींच नव्हत्या. येथील आश्चर्यकारक अवशेषांचें संरक्षण व संगोपन डोळ्यांत तेल घालून दक्षतापूर्वक केलें जात होतें. पण डोळ्यांस जें दिसेल त्याचा अर्थ यात्रेकरूंस स्पष्ट करून सांगणारीं साधनें येथें दुर्मिळ होतीं. रॉकफेलरच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाहीं. यात्रेकरूंच्या जिज्ञासेचें समाधान शोधण्यासाठीं तत्परतेनें कांहीं तरी करावयास हवें, ही जाणीव एकदां झाल्यानंतर ही उणीव कशी भरून काढतां येईल, याचा विचार तो करावयास लागला.

या दिशेनें विचार करीत असतां काय करावयास हवें, त्याची स्पष्ट कल्पना त्याच्या डोळ्यांसमोर आकारली. येथें एक म्यूझियम स्थापून ज्ञानसाधनें सर्व लोकांस उपलब्ध करण्याची सोय व्हावयास हवी, असें त्याच्या मनानें घेतलें. याविषयीं चौकशी करतां त्याला कळलें कीं म्यूझियमची योजना मार्गस्थ झालेली आहे. आणि त्यासाठीं निधि गोळा करण्यांत येत आहे. नियोजित निधींत भर घालण्याची परवानगी आपणांस मिळावी म्हणून त्यानें मागणी केली. त्यानें देऊं केलेली देणगी तशी फार मोठी नव्हती. पण योग्य वेळीं ती उपलब्ध झाली. रॉकफेलरच्या या देणगीमुळें म्यूझियमच्या योजनेचें गुणवैशिष्ट्य लोकांच्या निदर्शनास ताबडतोब आणून देणें शक्य झालें. मध्यंतरीं योझेमाइट आणि यलो स्टोन पार्कमध्यें अशींच म्यूझियम्स स्थापिण्या-साठीं 'लॉरा स्पेलमन–रॉकफेलर मेमोरिअल' निधींतून देणग्या देण्यांत आल्या. हीच सोय इतर पार्क्समधून उपलब्ध व्हावी आणि प्रेक्षणीय स्थळांचें दर्शन घेत असतांनाच त्यांच्याविषयींची माहिती यात्रेकरूंस मिळावी, म्हणून तेथें 'ट्रेलसाइड म्यूझियम्स' स्थापिण्यासाठीं याच निधींतून अनेक लहानमोठ्या देणग्या मंजूर करण्यांत आल्या. कालांतरानें स्थलप्रदर्शनांचा हा कार्यक्रम 'नॅशनल पार्क

सर्व्हिस 'नें हातीं घेतला. पण रॉकफेलरला केवळ प्रदर्शनांत तितकासा रस नव्हता. प्रदर्शनांपेक्षां भाष्य अधिक उपयुक्त होय, अशी त्याची खात्री पटली होती. केवळ शिक्षणानें त्याच्या मनाचें समाधान होण्यासारखें नव्हतें. संपूर्ण भाष्य उपलब्ध करून देण्याच्या योजना त्याच्या मनांत नित्य घोळत असत. 'एज्युकेशनल' या शब्दाऐवजीं 'इंटरप्रिटेटिव्ह' हा शब्द तो कटाक्षानें योजीत असे. लोकांना केवळ माहिती पुरविण्यांत—'एज्युकेट' करण्यांत—त्याला तसा रस नव्हता. पार्क्समधील प्रेक्षणीय स्थळांचें दर्शन घेत असतांना, किंबहुना तत्पूर्वीच यात्रेकरूंना संपूर्ण स्थलभाष्य उपलब्ध करून दिलें, तर त्याच्या योगानें डोळ्यांचें व मनाचें संयुक्त व संपूर्ण समाधान मिळूं शकेल, असें त्याला खरोखरच मनापासून वाटत होतें. आणि त्या दिशेनें त्याचे यत्न सतत चालू असत. १९२४ सालांतील रॉकफेलरच्या पश्चिमप्रवासानें आणखी एक संशोधनयोजना मार्गस्थ करण्यास साहाय्य केलें. आणि शेवटीं 'नॅशनल पार्क सर्व्हिस'नें ती योजना पण स्वीकृत केली. ग्रँड कॅन्यन नॅशनल पार्क पाहून झाल्यावर रॉकफेलर आपल्या मुलांसह यलो स्टोन पार्क बघण्यासाठीं गेला. यलो स्टोन पार्कचा सुपरिंटेंडंट होरेस अलब्राइट—हाच नंतर 'नॅशनल पार्क सर्व्हिस'चा डायरेक्टर झाला—रॉकफेलरच्या स्वागतासाठीं रेल्वेस्टेशनवर उपस्थित होता. रॉकफेलरच्या या भेटीची आठवण त्याच्या मनांत चांगलीच बिंबलेली आहे. तो म्हणतो : "नॉर्दर्न पॅसिफिक रेल्वेनें रॉकफेलर येणार असें मला कळविण्यांत आलें होतें. त्याच्यासारखीं धनिक माणसें बहुतकरून प्रायव्हेट कारनें प्रवास करतात; हें जाणून प्रायव्हेट कार जेथें थांबते, तेथें जाऊन त्याची वाट बघत मी उभा होतों. गाडी थांबली तेव्हां प्रायव्हेट कार कोठेंच दिसेना. म्हणून मी रॉकफेलरचा शोध घ्यावयास लागलों. रेल्वेच्या एका गुप्त पोलिसानें इंजिनामागच्या डब्याकडे बोट दाखविलें. तेथें गेलों तर रॉकफेलर आपल्या तीन मुलांसह डब्यांतून उतरण्याच्या गडबडींत होता. आणि आपलें लगेज लावण्याच्या कामीं पोर्टरला मदत करा, म्हणून मुलांना सांगत होता."

"ज्या योजनेस पैशाची आवश्यकता आहे अशा कोणत्याहि योजनेची चर्चा रॉकफेलरशीं मीं केव्हांच करूं नये, असें माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मला निक्षून कळविलें होतें. इतर सर्व यात्रेकरूंप्रमाणेंच त्याची व्यवस्था मीं करावी आणि त्याच्या कलाप्रमाणें त्याला पार्क बघूं द्यावा, अशा स्पष्ट सूचना मला देण्यांत आल्या होत्या." असें अलब्राइट म्हणतो. या सूचना ध्यानांत वागवून अलब्राइटनें आपल्या

पाहुण्यांना कांहीं दिवस कारमधून यथेच्छ भटकूं दिलें. अर्थातच प्रत्येक वेळीं तो जातीनें त्यांच्याबरोबर हिंडत असे. दुसऱ्या दिवशीं यलो स्टोनच्या दक्षिण दिशेनें त्यांनीं चक्कर मारली. आणि जातां जातां ग्रँड टेटन्स पर्वतराजीचें ओझरतें दृश्य त्यांच्या नजरेस पडलें. 'टेटन पर्वताचा भव्य देखावा' पाहिल्याची नोंद त्या दिवशीं रॉकफेलरनें आपल्या डायरींत करून ठेविली. कालांतरानें टेटन पर्वताचें हें भव्य दृश्य एका महत्त्वाकांक्षी पार्क योजनेंत रॉकफेलरला गुंतविणार होतें. पण त्या वेळीं या योजनेचा चुकून केव्हां त्यानें उल्लेखहि केला नाहीं. नंतर पार्कमध्यें व आसमंतांत फिरत असतांना या संकल्पित योजनेबाबतचा विचार त्याच्या मनांत घोळत होता. आणि न्यूयॉर्कला परत पोहोंचल्यावर त्यासंबंधीं कांहीं निश्चित अशी योजना तो सुचविणार होता. मध्यंतरीं तेथील प्रेक्षणीय स्थळांचें दर्शन करण्यांत तो गढून गेला होता. यलो स्टोनचा निरोप घेतल्यावर रॉकफेलर ग्लेशिअर नॅशनल पार्क बघण्यासाठीं गेला. त्याच्या संकल्पित प्रवासांतील हा अखेरचा टप्पा होता. प्रवासांतील सर्वांत अधिक कष्टाचा भाग हाच ठरणार होता. कारण येथून आपल्या मुलांना बरोबर घेऊन रॉकफेलर पॅक ट्रेननें फिरावयास निघाला. दोन आठवडे हे बडे पाहुणे फिरतच होते. दररोज बहुतकरून दहा ते सोळा मैलांची रपेट ते करीत. पश्चिमेकडील अज्ञात प्रदेशांतील सहल संपल्यावर रॉकफेलर मुलांना घेऊन परतला.

न्यूयॉर्कला परत आल्यावर रॉकफेलरनें अलब्राइटला पत्र लिहून यलो स्टोनमधील रस्त्यांच्या स्थितीसंबंधीं विचारणा केली. त्या वेळीं रस्त्यांचें बांधकाम चालू होतें. आणि रस्त्याच्या दोहों बाजूंस लागून दगडधोंड्यांचे पर्वतप्राय ढीग उभे होते. त्यामुळें पलीकडचीं अद्भुत सृष्टिदृश्यें निर्वेधपणें बघण्याची सोय नव्हती. त्यामुळें प्रेक्षणीय दृश्यांच्या अवलोकनांत सतत व्यत्यय येत होता. निरुपयोगी दगडांच्या राशी रस्त्यांच्या दोहों बाजूंस सर्वत्र विखरून पडलेल्या असल्यामुळें झाडांची पद्धतशीर लागवड करणें अशक्यच होतें. एवढेंच काय पण सृष्टिक्रमानुसार जीं झाडें सहज वाढावयाचीं, त्यांच्या वाढीस या दगडांच्या राशी प्रतिबंध करीत होत्या. त्याबाबत विचारणा केली असतां अलब्राइटनें लिहून कळविलें: "नॅशनल पार्क सर्व्हिसचा निधि केवळ मर्यादित होता. रस्ते बांधून काढणें आवश्यक होतें, पण जवळ पुरेसा पैसा नसल्यामुळें रस्त्यांच्या कडा तशाच उपेक्षित अवस्थेंत होत्या. याबाबत कॉंग्रेस कांहीं मदत देईल अशी आशा मुळीं सुद्धा नव्हती. कारण यापूर्वीं वारंवार केलेल्या पैशाच्या मागण्या कॉंग्रेसनें फेटाळून लावल्या होत्या."

रस्त्याच्या बांधणीबाबत रॉकफेलरचा पहिल्यापासून कांहींएक विशिष्ट असा निश्चित दृष्टिकोण होता. तेव्हां अल्ब्राइटचें हें उत्तर त्याला फारसें रुचलें नाहीं. रस्त्यांच्या रचनेच्या संबंधांत कांहीं एक ध्येयवाद असूं शकतो तो साध्य करण्यासाठीं रॉकफेलरनें अलब्राइटला पुन्हा पत्र लिहून कळविलें कीं स्वतःचें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं आपण स्वतःच्या खर्चानें रस्त्याचा एक लहानसा भाग स्वच्छ करून देण्यास तयार आहोंत. अल्ब्राइटनें रॉकफेलरच्या खर्चानें प्रथम एकूण तीन मैल रस्त्याच्या दुरुस्तीचें काम करण्याचें योजिलें. नमुन्यासाठीं म्हणून एक मैल रस्ता भयंकर वाईट, दुसरा मैल मध्यम प्रकारचा आणि आणखी एक मैल त्यांतल्या त्यांत बरा असा—बरा म्हणजे तेथें दगड-वाळूचे ढिगारे त्यांतल्या त्यांत कमी होते, असा—रस्ता बांधणीसाठीं मुक्रर केला. तिन्ही कामें होतीं घेण्यापूर्वीच त्यानें त्या त्या रस्त्यांचीं छायाचित्रें घेऊन ठेविलीं. आणि दुरुस्तीचीं, स्वच्छतेचीं कामें पुरीं झाल्यावर पुन्हा एकदां त्याच रस्त्यांचीं छायचित्रें काढून घेतलीं. आणि दोन्ही छायाचित्रांचे सेट्स रॉकफेलरकडे पाहणीसाठीं पाठवून दिले. प्रारंभिक यत्नास मनाजोगतें यश मिळालें आहे, अशी खात्री पटल्यावर पुढील पांच वर्षांत यलो स्टोनमधील इतर रस्ते साफ करण्याच्या कामीं त्यानें एकूण पन्नास हजार डॉलर्स खर्ची घातले. तोंपर्यंत कॉंग्रेसची या प्रकारच्या कामाच्या आवश्यकतेबाबत खात्री पटली होती. तदनंतर रस्ते साफ करण्याचें व स्वच्छ ठेवण्याचें काम दक्षतापूर्वक सर्वत्र व्हावयास लागलें. केवळ 'नॅशनल पार्क सर्व्हिस' नें या धोरणाचा पुरस्कार केला, असें नाहीं तर बहुतेक सर्व राज्यांतून या धोरणाचा कसोशीनें पाठपुरावा करण्यांत आला.

नंतरच्या भविष्यकाळांत नॅशनल पार्क्ससाठीं रॉकफेलर ज्या प्रचंड देणग्या देणार होता, त्यांच्या मानानें १९२४ सालच्या प्रवासांतून निष्पन्न झालेल्या देणग्या कमीच समजाव्या लागतील. पण त्यांचें महत्त्व त्यामुळें कमी ठरतें असें नाहीं. मुख्यतः याच प्रारंभिक देणग्यांमुळें 'नॅशनल पार्क्स सर्व्हिस'च्या दृष्टिकोणांत व कामांत इष्ट असा बराच बदल घडून आला. याशिवाय उल्लेखनीय गोष्ट अशी कीं हीं दानें करण्यांत रॉकफेलरला मनस्वी आनंद वाटला. १९२६ सालीं फिरून एकदां पश्चिम प्रवासास निघण्याची त्यानें तयारी केली. या वेळीं अगदीं वेगळ्याच जातीच्या एका योजनेंत तो गुंतून पडणार होता. ती योजना विलक्षण विस्तृत आणि भव्य अशी होती. आणि ती तडीस जाण्यापूर्वीं त्याला अनेक चिंताजनक अनुभव घ्यावे लागणार होते.

दूरच्या या दुसऱ्या प्रवासांत रॉकफेलरबरोबर त्याची पत्नी आणि तीन मुलें होतीं. पहिल्याप्रथम ही सर्व मंडळी ग्रँड कॅन्यम नॅशनल पार्कला भेट देण्यास गेली. पूर्वी एकदां ज्या प्रेक्षणीय स्थळांस त्यानें भेटी दिल्या होत्या, त्यांचा परिचय त्यानें अपरिचितांस उत्साहानें करून दिला. तेथून कॅलिफोर्नियास भेट देऊन नंतर ही सर्व मंडळी यलो स्टोन पार्क बघण्यास गेली. तेथून व्योमिंगमधील जॅक्सन होलच्या दिशेनें त्यांनीं मोर्चा वळविला. उत्तुंग टेटन पर्वतांच्या पायथ्याशीं सेज वनस्पतींनीं व्यापिलेला हा खोऱ्यांतील मुलूख आहे. अखिल देशांतील सर्वांत भव्य आणि दर्शनीय अशीं हीं टेटन पर्वतशिखरें आहेत, अशी त्यांची ख्याति आहे. आणि नॅशनल पार्क्सच्या विस्तृत राज्यांत त्यांचा अंतर्भाव करण्याची कांहीं योजना संबंधितांनीं चर्चिलेली होती. जॅक्सन होलच्या तळांतून अचानक आकाशांत घुसलेली अणकुचीदार पर्वतश्रेणींची ही भिंत जॅक्सन खोऱ्याच्या पश्चिमेस चाळीस मैलपर्यंत विस्तारलेली आहे. टेटन पर्वताच्या अत्युच्च शिखराची उंची १३७६६ फूट आहे. जॅक्सन खोऱ्याच्या पूर्वदिशेस याच पर्वतश्रेणींतील डोंगर डेरेदार, सुरेख आहेत. कॉंटिनेंटल डिव्हाइडला तोलून धरणाऱ्या पर्वतांच्या अजस्र, भव्य भिंती पाठीशीं घालून जॅक्सन खोरें तळाशीं शांत वसलेलें आहे. टेटन पर्वतराजीचें रमणीय सौंदर्य डोळ्यांत सांठविण्यासाठीं सृष्टीनें योजिलेलें हें नैसर्गिक प्रेक्षागार अलौकिक शोभेनें नटलेलें आहे. या खोऱ्यांत बर्फ होऊन गोठलेले असंख्य जलाशय आहेत. आणि सेज वनस्पतींनीं आच्छादिलेल्या माळरानांतून आणि जंगलांतून वाकडींतिकडीं वळणें घेत मार्गक्रमण करणाऱ्या छोट्या नद्या किती तरी आहेत. या शोभिवंत खोऱ्यांत पूर्वीच्या काळीं पश्चिम प्रदेशांतील साहसी डाकेखोर वस्ती करून असत. नंतरच्या काळांत हें खोरें संशोधनाच्या, शिकारींच्या आणि व्यापाराच्या प्रवासी काफिल्यांचें केंद्रस्थान म्हणून प्रसिद्ध होतें. ऐतिहासिक संबंधांनीं भारलेलें आणि निसर्गसौंदर्यानें नटलेलें हें विस्तीर्ण खोरें शेतीच्या दृष्टीनें सर्वथा निरुपयोगी आहे. येथील थंडी केवळ असह्य आहे, आणि जमीन नापीक आहे. या सर्व प्रकृतिवैशिष्ट्यांमुळें 'नॅशनल पार्क सर्व्हिस'ला या खोऱ्याविषयीं विशेष आकर्षण वाटावें आणि तेथें एका अप्रतिम पार्कची योजना आंखण्यांत यावी, हें स्वाभाविकच होय.

हें सारें खरें. परिस्थिति सर्वथा अनुकूल होती. आणि तरी सुद्धां तेथें ग्रँड टेटन नॅशनल पार्क स्थापिण्याच्या अनेक योजना पार बारगळल्या होत्या, हेंहि तितकेंच खरें आहे. वस्तुस्थिति अशी होती कीं १८९८ सालापासून हा प्रदेश

नॅशनल पार्कसाठीं राखून ठेवण्याचे यत्न नित्य होतच होते. प्रत्येक वेळीं हे यत्न कोणत्या तरी राजकीय कलहांत सांपडून नामशेष होत. मध्यंतरीं यलो स्टोनच्या दक्षिण सरहद्दीच्या संबंधांत 'पार्क्स सर्व्हिस' आणि 'फॉरेस्ट सर्व्हिस' यांच्यांत कांहीं तंटेबखेडे उद्भवले होते. टेटन पर्वतश्रेणीचा कांहीं भाग व्यापारी कामासाठीं उपयोगांत आणला जाण्याची शक्यता कांहीं काळ थोडीबहुत निर्माण झाली होती. रस्ते सुधारल्यामुळें भोंवतालच्या जॅक्सन होल प्रदेशांत प्रेक्षकांचे तांडे येऊन थडकावयास लागले होते. त्यांच्या सोयीसाठीं हॉटेल्स, गॅस स्टेशन्स इत्यादींचें अस्तित्व कोठें कोठें आकारास येत होतें. आणि तुरळक बांधकामें मधून मधून नजरेस पडावयास लागलीं होतीं.

इ. स. १९२३ सालीं जॅक्सन होलच्या सौंदर्यानें भारलेले कांहीं उत्साही यात्रेकरू एकत्र जमले. त्यांच्यांतच होरेस अलब्राइट हा एक होता. या प्रदेशाचें जतन करण्याच्या उद्देशानें ही सर्व मंडळी मेनॉर्स फेरी येथें मिस मॉड नोबलच्या लाकडी खोपटांत गोळा झाली होती. या सभेंत अशी एक सूचना करण्यांत आली कीं यलो स्टोन पार्कच्या योजनेंत जॅक्सन होलचा अंतर्भाव करावा. म्हशी, हरणें आणि त्याच जातीचे इतर कांहीं प्राणी या भागांत वस्तीसाठीं आणण्यांत यावेत. आणि या कार्यासाठीं आवश्यक असलेला पैसा पूर्वीं या प्रदेशांत शिकारीसाठीं येणाऱ्या धनिकांकडून गोळा करण्यांत यावा, असें ठरविण्यांत आलें. ठरविण्यांत पुष्कळ आलें, पण मग या नियोजित कामासाठीं नियोजित व्यक्तींकडून पैसा मिळणें अशक्य आहे, असें आढळून आलें. आणि अर्थातच ही योजना बारगळली.

इ. स. १९२६ च्या उन्हाळ्यांत रॉकफेलर मंडळी जेव्हां प्रथमच या मुलखास भेट देण्यासाठीं गेली होती, तेव्हां टेटन प्रदेशाचें भवितव्य निश्चित झालेलें नव्हतें. जॅक्सन होलच्या पश्चिम बाजूनें जेव्हां पहिल्यांदाच कारमधून त्यानें फेरफटका केला, तेव्हां रस्त्यांच्या आजूबाजूस अस्ताव्यस्त पसरलेल्या विद्रूप इमारती बघून त्याचें मन फार खिन्न झालें. तेथील पर्वतराजि रम्य होती. आणि कदाचित् या पर्वतप्रदेशांत एक भव्य नॅशनल पार्क उभा राहील, असा संभव निर्माण झाला होता. परंतु जॅक्सन होलचें भवितव्य तेवढें आशादायक दिसत नव्हतें. टेटन पहाडांचा प्रायः सर्व मुलूख सरकारच्या मालकीचा होता. पण जॅक्सन होलची स्थिति तशी नव्हती. तेथील प्रदेशाचा अंदाजें पांचवा भाग कांहीं लोकांच्या खाजगी मालकीचा होता. आणि टेटन पर्वत जरी पार्क-योजनेंत समाविष्ट केले तरी जॅक्सन होल संकल्पित पार्कचा भाग बनेल अशी आशा

फारशी नव्हती. आणि मध्यंतरींच्या काळांत रस्त्यांच्या दोहों बाजूंस सृष्टिशोभेस विसंगत असे जाहिरातींचे पोस्टर्स, पडल्या झडल्या इमारती आणि निर्जन वाडी-घरें यांची उपस्थिति डोळ्यांस त्रासदायक दिसत होती.

अर्थातच या बाबतींतील अशा अडचणींचा रॉकफेलरला आतां सराव झालेला होता. आणि जॅक्सन होलमधील सहल संपल्यावर त्यानें अलब्राइटकडे एक कामगिरी सोपविली. त्या प्रदेशाचा एक विस्तृत नकाशा तयार करून त्या नकाशांत रस्त्यांलगतच्या वाडीघरांची बिनचूक नोंद त्यानें करावी, आणि त्यांची खरेदी करावयाची झाल्यास एकूण खर्चाची रक्कम अंदाजें किती होईल त्याचा अजमास घ्यावा, असें या कामगिरीचें स्वरूप होतें. त्या दिवशीं संध्याकाळीं ही सर्व मंडळी एका जुनाट गाडीरस्त्यानें यलो स्टोन पार्कच्या दिशेस परतून येत होती, तेव्हां अचानक एका उंच टेकाडाच्या मुळक्यावर त्यांच्या गाडीनें वळण घेतलें. तेथून खोऱ्यांतील स्नेक नदीची नागमोड मजेदार दिसत होती. या सहलीचें वर्णन अलब्राइटनें लिहून ठेविलें आहे, तें असें:

"सायंकाळचें दृश्य तर विशेष रमणीय दिसत होतें. पाठीमागच्या पर्वतांच्या छाया खोऱ्यांतील नदीप्रदेशावर सर्वत्र पसरलेल्या दिसत होत्या. पण अँटिलोप फ्लॅट्स ब्लॅकटेल बटभोंवतालचा प्रदेश आणि ग्रोस व्हेंटरपासून जॅक्सन होल तोडून अलग करणारे दूरवरचे पर्वत स्वच्छ सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघालेले दिसत होते. आकाश निरभ्र होतें. त्या रमणीय दृश्यावर नजर ठेवून कांहीं काळ आम्ही तेथेंच थांबलों. तेथील विलक्षण सृष्टिशोभेनें सर्वांच्या डोळ्यांवर भुरळ घातली होती. त्या वेळीं मिस् नोबलच्या लाकडी खोपटांत तीन वर्षांपूर्वी भरलेल्या सभेची हकीकत मीं रॉकफेलर दांपत्याच्या कानांवर घातली. आणि उदात्त सौंदर्यानें नटलेल्या खालाटींतील या प्रदेशाचें संरक्षण आणि संगोपन करण्याच्या उद्देशानें त्या वेळीं आम्हीं जी योजना आंखली होती, तिची माहिती बोलण्याच्या ओघांत जशी कांहीं सहज त्यांना करून दिली. त्या योजनेविषयीं ते कांहींच बोलले नाहींत. मीं पण नंतर तो विषय काढला नाहीं किंवा या बाबतींत त्यांनीं लक्ष घालावयास हवें, असें पण सुचविलें नाहीं. हा विषय आम्हीं तेथेंच सोडून दिला."

पण खरोखर हा विषय संपला नव्हता. खरें म्हणजे हा तर केवळ प्रारंभ

होता. यानंतर कांहीं दिवसांनीं नकाशे, आराखडे, खर्चाचें अंदाजपत्रक इत्यादि साहित्य बरोबर घेऊन अल्ब्राइट रॉकफेलरची भेट घेण्यासाठीं न्यूयॉर्कला गेला. रॉकफेलरच्या सूचनेबरहुकूम आपण हें सर्व काम पार पाडलें, अशीच त्याची समजूत होती. भेटींत त्यानें रॉकफेलरच्या हातीं सर्व नकाशे दिले. आणि डोंगर-पायथ्याच्या मुलुखांतील खाजगी मालमत्ता खरेदी करण्यासाठीं अंदाजें २,८०,००० डॉलर्स खर्ची घालावे लागतील, असें तोंडीं सांगितलें. त्यावर रॉकफेलर म्हणाला : "हें तूं काय केलेंस? हें काम करावयास मीं तुला सांगितलेंच नव्हतें." त्याचें हें उत्तर ऐकून अल्ब्राइट तर चाटच झाला. मग रॉकफेलरच्या मनांत खरोखर काय होतें, तें नंतरच्या बोलण्यावरून त्याच्या ध्यानांत आलें. खरें म्हणजे अल्ब्राइटनें आपल्या नकाशांत जो मुलूख दाखविला होता, त्यापेक्षां किती तरी अधिक विस्तृत प्रदेश रॉकफेलरला अभिप्रेत होता, असें दिसलें. यलो स्टोनला परत येत असतांना उंच टेकाडावरून जें भव्य दृश्य त्यांच्या नजरेस दिसलें होतें, त्या सर्व भूभागाचे नकाशे त्याला हवे होते. तो म्हणाला, "या प्रदेशाच्या संरक्षण-संगोपनाची एक जुनी योजना तूं पुढें मांडली होतीस, आठवते? ती योजना आदर्श होती असें मला वाटलें. आणि केवळ आदर्श योजनांतच मला रस वाटतो!" त्यावर अल्ब्राइटनें सांगितलें कीं तशा योजनेंत किमान दहा लक्ष डॉलर्स गुंतवावे लागतील. रॉकफेलरची त्याला तयारी दिसली. आणि ता. २८ फेब्रुआरी १९२७ रोजीं त्यानें आपला सहकारी कर्नल आर्थर वुड्स याच्या कानांवर आपली ही सर्व योजना घातली. त्याच्या मनांतून जॅक्सन होलचा संपूर्ण उत्तर प्रदेश खरेदी करावा असें होतें. हेतु असा कीं शेवटीं खरीदलेला हा सर्व प्रदेश यलो स्टोन पार्कमध्यें समाविष्ट करावा,—असें त्यानें सांगितलें. आणि नंतर वुड्सजवळ त्यानें आपल्या मनांतील संपूर्ण योजनेचें स्वरूप समजावून सांगितलें. तो म्हणाला, "ही योजना हातीं घेण्यास मी प्रवृत्त झालों याचीं दोन कारणें आहेत. पहिलें असें कीं जॅक्सन होल खोऱ्यांतूनच टेटन पर्वतांचें आणि त्यांच्या पायथ्याशीं पसरलेल्या जलाशय निर्झरांचें विलक्षण सौंदर्य उत्तम दिसतें. आणि दुसरें असें कीं यलो स्टोन पार्क आणि त्याच्या सभोंवतालचा प्रदेश यांत जे प्राणी आढळतात, त्यांच्या संरक्षण-संगोपनासाठीं आवश्यक असें हें नैसर्गिक निवासस्थान आहे. पश्चिम प्रदेशांतच केवळ जगूं वाढूं शकणारे बफेलो, एल्क, मूस इत्यादि जे वन्य प्राणी आहेत, ते या पृथ्वीतलावरून कायमचे नष्ट व्हावयास नको असतील तर या प्रदेशांत त्यांची

निर्वंध वस्ती व वाढ करणें एवढा एकच मार्ग आहे, असें प्राणिशास्त्रज्ञांनीं मला सांगितलें आहे."

नेहमींप्रमाणेंच या वेळीं सुद्धां या विशाल योजनेच्या व्यवहारांत रॉकफेलरचा मुळींसुद्धां कांहीं संबंध नाहीं, असा देखावा करणें भाग होतें- कारण रॉकफेलरच्या केवळ नामोल्लेखानें त्या प्रदेशांतील जमिनींच्या किंमती कल्पनातीत भडकण्याचा संभव होता. हें सर्व लक्षांत घेऊन 'स्नेक रिव्हर लॅंड कंपनी' नामक एका नवीन सहकारी संस्थेची स्थापना करण्यांत आली. या संस्थेनें त्या प्रदेशांतील सर्व जमीन खरेदी करावी आणि नॅशनल पार्क योजनेंत तिचा अंतर्भाव करण्याच्या उद्देशानें सरकारच्या स्वाधीन करावी, असें ठरविण्यांत आलें. जमीनखरेदीबाबत रॉकफेलरनें एकच अट घातली. ती ही कीं जमीनमालकांच्या परिस्थितीचा सहानुभूतीनें विचार करून वाजवी किंमत त्यांना देण्यांत यावी.

येथपर्यंत सर्व कांहीं ठीक जमलें, पण त्यानंतर मात्र जॅक्सन होल योजने-विषयीं इतके वाद माजले आणि त्यांतून अशा कांहीं गैरसमजुती निर्माण झाल्या कीं आतां इतक्या कालावधीनंतरसुद्धां वादास प्रवृत्त करणारीं मूळ कारणें शोधणें अतिदुस्तर झालें आहे. या प्रकरणांतून उद्भवलेले संघर्ष दीर्घ काळपर्यंत धुमसत पेटत राहिले. आणि एकदां त्यांचा स्फोट होऊन प्रचंड भडका उडाल्यानंतर मूळ वादाच्या तळाशीं असलेलीं खरीं कारणें कोणाच्या ध्यानांतसुद्धां राहिलीं नाहींत. छोट्या छोट्या तुकड्यांचे जे गरीब मालक होते त्यांचा दोष यांत खचितच कांहींच नव्हता. त्यांच्यापैकीं बहुतेकांना, वाजवी किंमतींत जमिनी विकण्याची संधि अचानक लाभत आहे, याचाच आनंद वाटत होता. १९३० सालच्या एप्रिलमध्यें प्रस्तुत योजनेशीं जडलेला रॉकफेलरचा संबंध जाहीर करण्यांत आला. त्यामुळें कांहीं नव्या अडचणी मार्गांत उभ्या राहिल्या, हें म्हणणें सुद्धां तर्काला धरून वाजवी नाहीं. कारण या योजनेस ज्यांचा निकराचा विरोध होता, त्यांनीं लगेच सरसावून तत्परतेनें जाहीर केलें कीं त्यांच्या हल्ल्याचा रोख रॉकफेलरवर व्यक्तिशः जरासुद्धां नाहीं. त्यांच्या मतानें त्याचा उद्देश निरपराध आणि न्याय्य होता. 'स्नेक रिव्हर लॅंड कंपनी'च्या हेतूंविषयीं आणि तिच्या कारभाराच्या रीतीविषयीं प्रारंभीं कित्येकांच्या मनांत खरोखर संशय होता, यांत शंका नाहीं. तक्रारीस सुरुवात केली ती प्रथम गुराख्यांनीं. हे लोक वर्षांतील कांहीं थोडे दिवस गुरें चारण्यासाठीं या भागांत येत. त्यांची तक्रार अशी होती कीं त्यांच्या हक्कांवर कंपनी आक्रमण करीत आहे. वादाचे मूळ मुद्दे कोणतेहि असोत, अल्पावधींतच ते सर्व विसरले गेले. आणि

ही योजना राजकीय वादाच्या रंगणांत खेचली गेली. तेथें एकूण एक सर्व राजकीय शस्त्रांचा वापर मुक्तहस्तांनीं करण्यांत आला. शेवटीं काँग्रेसनें हस्तक्षेप करून चौकशीचा फार्स करावा, हें अटळ भविष्य योजनेच्या प्रवर्तकांस चुकवितां आलें नाहीं.

या संघर्षाच्या कंटाळवाण्या तपशिलांत शिरण्याचें आपल्याला कारण नाहीं. १९२९ सालीं जेव्हां 'ग्रँड टेटन नॅशनल पार्क ऑफ व्योमिंग'ची रीतसर स्थापना झाली, तेव्हां टेटन पर्वतश्रेणीचा पार्कयोजनेंत समावेश करण्यांत आला. पण जॅक्सन होलचें खोरें मात्र त्या योजनेंत समाविष्ट करण्यांत आलें नाहीं. १९३१ सालीं जॅक्सन होल योजना अशा थरास येऊन पोहोंचली कीं शेवटीं 'हाउस ॲप्रोप्रिएशन्स कमिटी'नें पार्कच्या विकासासाठीं अधिक रक्कम मंजूर करण्यास साफ नकार दिला. अर्थातच रस्त्यांची सुस्थिति आणि संरक्षणाबाबतचा खर्च तेवढा मंजूर करण्यांत आला. पण मूलभूत वादप्रश्नांचा कायमचा निकाल लागेपर्यंत याबाबत अधिक कांहीं करण्याचें कमिटीनें नाकारलें. मध्यंतरींच्या काळांत ही योजना सीनेटच्या सभांतून वारंवार धारेवर धरली गेली. १९३२ च्या जून महिन्यांत व्योमिंगचे प्रतिनिधि केंड्रिक आणि कॅरे या सेनेटर्सनीं या योजनेबाबत रीतसर, कायदेशीर चौकशी करावी अशी मागणी केली. "यलो स्टोन ॲंड ग्रँड टेटन नॅशनल पार्क्सच्या नियोजित विस्तारयोजनेसंबंधांत सरकारनें चौकशी करावी," असा त्यांचा ठराव होता. त्या संबंधांत सेनेटर कॅरेनें आर्थर वुड्सला लिहिलें :

> "सेनेटर केंड्रिकच्या आणि माझ्या वतीनें मी आपणांस कळवूं इच्छितों कीं रॉकफेलरच्या हेतूंविषयीं आम्हीं केव्हांच कसली शंका म्हणून प्रदर्शित केलेली नाहीं. जॅक्सन होल खोऱ्यांतील जमिनींची खरेदी करण्याची योजना त्यानें आंखली, तेव्हां ज्या प्रदेशांतील जमिनी तो खरेदीत होता, तेथील लोकांची सेवा जरी त्याला अभिप्रेत नसली, तरी व्यापक राष्ट्रसेवेच्या हेतूनें तो हें सर्व करीत होता, हें आम्हीं जाणलें."

तदनंतर कॅरे म्हणतो कीं त्याच्या सहकाऱ्यांनीं रॉकफेलरची फसवणूक केली. उर्मट उन्मत्तपणानें त्यांनीं कंपनीचा कारभार चालविला. आणि रॉकफेलरच्या नांवाचा गैरवाजवी उपयोग करून स्वतःचे खाजगी उद्योग केवळ स्वार्थहेतूनें—आर्थिक कायद्यावर दृष्टि ठेवून त्यांनीं चालविले. सेनेटर कॅरेला पाठविलेल्या पत्रोत्तरांत आर्थर वुड्सनें लिहिलें :

"जॅक्सन होलमधील परिस्थितीविषयीं आपण जें कांहीं लिहिलें आहे, तें लक्षांत घेतां तेथील परिस्थिति उजेडांत येणें अगत्याचें आहे. आणि या संबंधांत चौकशीची जी रास्त मागणी आपण केली आहे, ती आपल्या हेतूंस पोषक अशीच आहे."

या संबंधांत रॉकफेलरनें अलब्राइटला लिहिलें :

"चौकशी म्हटली कीं त्रास, व्याप, संताप आलाच; हें जरी खरें असलें तरी चौकशीमुळें एकूण सर्व परिस्थितीवर प्रकाश पडेल, आणि असें झालें असतां स्नेक रिव्हर लॅंड कंपनीस आणि पार्क योजनेस ही चौकशी हितावह ठरेल, असें मला निखालस वाटतें."

१९३३ च्या ऑगस्टमध्यें सरकारी चौकशीचें काम सुरू झालें. आरंभीं सेनेटर कॅरे आवेशानें म्हणाला कीं टीपॉट डोमच्या दुर्घटनेंत जसे अनेक राष्ट्रव्यापी पापसंबंध उघडकीस आले, त्याचप्रमाणें पुढील साक्षींतून स्नेक रिव्हर लॅंड कंपनीच्या एकूण व्यवहारांत गुंतलेले राष्ट्रव्यापी पापसंबंध उघडकीस येतील, अशी माझी खात्री आहे. पण प्रत्यक्षांत त्यानें दिलेली खात्री पार लटपटली. आणि स्नेक रिव्हर लॅंड कंपनीचे सर्व व्यवहार चोख, निर्दोष असल्याचा निर्वाळा सरकारी चौकशी समितीनें दिला. या वेळीं रॉकफेलरची साक्ष काढण्यांत आली नाहीं. पण प्रस्तुत संबंधांतील त्याचें 'विलक्षण औदार्य' समितीनें मान्य केलें. आणि जमीनमालकांच्या सर्व तक्रारी पुढें आलेल्या पुराव्यानें उधळून लावल्या. समितीचा निर्णय जाहीर झाल्यावर सेनेटर नॉर्बेक उसळून म्हणाला : "राजकीय फूटबॉलचा हा खेळ सरकारला फार महागांत पडतो. कांहीं अफवा निराधार आहेत, हें सिद्ध करण्यासाठीं ५००० डॉलर्स सरकारी तिजोरींतून खर्ची घालावे लागतात." शेवटीं डुलुथ हेरल्ड पत्रानें या प्रकरणाचा समारोप खालील शब्दांत केला :

"स्नेक रिव्हर लॅंड कंपनीचे प्रमुख विरोधक नाय व नॉर्बेक यांचें आतां शंकासमाधान झालें आहे. आणि रॉकफेलरनें जो घोडा उदार बुद्धीनें दान म्हणून दिला, त्याच्या तोंडांतील दांत मोजण्याची मागणी यापुढें कोणी करणार नाहीं."

कॉंग्रेसनें केलेल्या चौकशीमुळें स्नेक रिव्हर लँड कंपनीवरील आक्षेपांचें परस्पर खंडन झालें असलें, तरी सुद्धां त्यानंतर दीर्घ काळपर्यंत जॅक्सन होल योजना तशीच धूळ खात पडणार होती. १९३० सालीं ग्रँड टेटन नॅशनल पार्क योजनेंत जॅक्सन खोऱ्याचा समावेश करण्यास कॉंग्रेसनें मंजुरी द्यावी, यासाठीं अनेक यत्न करण्यांत आले, पण ते सर्व निष्फळ ठरले. मध्यंतरींच्या काळांत रॉकफेलरच्या मालकीची अशी एकूण ३०,००० एकर करपात्र जमीन होती. १९४२ सालीं सेक्रेटरी ऑफ दि इंटीरिअर हॅरोल्ड आइक्स याला रॉकफेलरनें पत्र लिहून कळविलें कीं जवळ जवळ पंधरा वर्षांपूर्वीं खरीद्लेली जॅक्सन खोऱ्यांतील ही सर्व जमीन आतां विकून टाकण्याचा आपला विचार आहे. तोंपर्यंत या उद्योगांत त्याचे पंधरा लक्ष डॉलर्स गुंतून पडले होते. आणि सरकारच्या प्रतिनिधींशीं असंख्य वेळां चर्चा करून सुद्धां आपल्या संकल्पित योजनेबाबत कांहींच प्रगति होऊं शकत नाहीं, असें त्याच्या निदर्शनास आलें होतें. अखेरीस या जाचाला कंटाळून रॉकफेलरनें आइक्सला लिहिलें :

"सरकारला माझी जमीन नको असेल किंवा हवी असून तिचा विनियोग कशा रीतीनें करावा याबाबत कांहींच तडजोड निघण्याचा संभव नसेल, तर एक तर मला स्वतःला योग्य वाटेल त्या रीतीनें या जमिनीची दुसरी कांहीं व्यवस्था आतां लावणें भाग आहे किंवा तें नच जमल्यास खुल्या बाजारांत योग्य किंमत देण्यास जें गिऱ्हाईक तयार असेल, त्याच्या स्वाधीन माझी ही जमीन करण्याचा माझा मानस आहे."

रॉकफेलरच्या या पत्रास सेक्रेटरी आइक्सनें सहानुभूतिपूर्वक जें उत्तर लिहिलें, तें येणेंप्रमाणें :

"जॅक्सन होल खोऱ्याच्या संरक्षण-संगोपनाबाबत जी महान् योजना आपल्या मनांत गेलीं कित्येक वर्षें घोळत आहे, तिचा स्वीकार सरकारच्या वतीनें—माझ्या हातांत ही गोष्ट असती तर—यापूर्वीं कधींच मीं खात्रीनें केला असता. पण आपली संकल्पित स्तुत्य योजना आकारास येऊं नये, यासाठीं स्थानिक हितसंबंधी लोकांच्या काय कारवाया चालू आहेत, तें आपण जाणतांच.

स्थळप्रत
पार्क्स आणि सृष्टिसंरक्षण वि. १३५

या योजनेबाबत आजवर आपण जी सहनशील तितिक्षा दाखविली आहे, तिचा खरोखर मला अचंबा वाटतो. आपली योजना मीं मनापासून समजून घेतली आहे. आणि माझ्या मनांत तिजविषयीं आत्मीयता आहे, हें आपण जाणतांच. पुढें याबाबत जें कांहीं करावयाचें आपण योजिलें आहे, तें युक्तच असणार. आजवर उदारपणानें जें आपण देऊं केलें आहे, तें सरकार घेऊं शकत नाहीं. अशा स्थितींत आपल्याच धोरणाचा अधिक पाठपुरावा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मी जर आपल्या ठिकाणीं असतों तर कंटाळून आपलें दान मीं कधींच मागें घेतलें असतें, असें मला वाटतें. असो, जें झालें तें झालें. आपल्या योजनेशीं सार्वजनिक कारभारी या नात्यानें माझा निकट संबंध जडलेला आहे. आणखी एक वर्षभर वाट पाहण्याचें आपण उदारपणानें कबूल केलें आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून मी आपणांस असें आश्वासन देऊं इच्छितों कीं नॅशनल पार्क योजनेंत आपण देऊं केलेल्या भूदानाचा अंतर्भाव व्हावा, एतदर्थ शक्य असेल तें तें सर्व मी अवश्य करीन."

यानंतर कांहीं महिने लोटले. आणि असें वाटावयास लागलें कीं संकल्पित योजना अखेर समाधानकारक रीतीनें मार्गस्थ होणार. ता. १५ मार्च १९४३ रोजीं राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टनें जॅक्सन होल नॅशनल मॉन्युमेंट निर्मितीच्या योजनेस स्वतःच्या सहीनें मंजुरी दिली. याबाबतची घोषणा कानीं आल्यावर रॉकफेलरनें आइक्सला लिहिलें: "काल आपण टेलिफोनवर जी शुभवार्ता मला दिलीत, तिचें स्वागत समारंभपूर्वक उभयतांस एकत्र करतां आलें असतें तर मला फार आनंद वाटला असता. माझी खात्री आहे कीं या शुभप्रसंगीं आपल्या व माझ्या अंतःकरणांत एकच गाणें उंचबळतें आहे: 'प्रेज गॉड फ्रॉम हूम ऑल ब्लेसिंग्ज फ्लो—'" पण विजयाचा हा उन्माद केवळ क्षणिक ठरणार होता. आणि लगेच ओसरणार होता. वरील शुभवार्ता जाहीर होऊन चार दिवस लोटले नाहींत, तोंच व्योमिंगचा प्रतिनिधि सेनेटर फ्रॅंक ए. बॅरेट यानें जॅक्सन होल नॅशनल मॉन्युमेंट निर्मितीची योजना रद्द करावी, असा ठराव कॉंग्रेसकडे पाठविला. तदनंतर अनेक वर्षें राजकीय रंगणांत या प्रश्नाबाबत कलह माजणार होते, हें भविष्य त्य वेळीं कोणास कळलें नव्हतें.

प्रस्तुत संबंधांतील विरोधी पक्षाचें मत वेस्टब्रुक पेग्लरच्या तुफानी घोषणेंत व्यक्त झालें. तो म्हणाला, "ॲडाल्फ हिटलरनें ज्या रीतीनें ऑस्ट्रियाचा कबजा

बळकावला; त्याच रीतीनें राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट आणि हॅरोल्ड आइक्स हे दोघे मिळून व्योमिंग राज्याचा लचका तोडूं पाहत आहेत. जवळपासचीं राज्यें बलात्कारानें घशांत घालण्याचा हा आसुरी उद्योग चिंताजनक आहे.” टॉमस ई. ड्यूईनें खालील प्रखर शब्दांत रूझवेल्ट घोषणेवर टीका केली : “न्यू डीलच्या वेड्यावाकड्या धोरणास साजेसें हें वर्तन आहे. संबंधित लोकांच्या हक्कांची आणि मतांची बुद्धिपूर्वक पायमल्ली करूं पाहणारी ही बेजबाबदार वृत्ति निंद्य आहे.” त्यावर आइक्सनें टोला मारला : “या योजनेचें श्रेय वस्तुतः रिपब्लिकन पक्षासच द्यावयास हवें. कारण हर्बर्ट हूव्हर राष्ट्राध्यक्ष होता, तेव्हां त्यानें नॅशनल मॉन्यु-मेंटच्या निर्मितीबाबत उच्चांक गांठला होता!”

१९४४ च्या डिसेंबर महिन्यांत बॅरेटचा ठराव कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाला. पण राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टनें त्याबाबत नापसंतीचा शेरा मारून हा ठराव फेटाळून लावला. पण बॅरेट सहजीं नाउमेद होणारा गडी नव्हता. त्यानें आपला विरोध अखंड चालूच ठेविला. १९४५ सालीं दोन आणि ४७ सालीं एक, असे आणखी तीन ठराव त्यानें कॉंग्रेसकडे पाठविले. या ठरावांत प्रस्तुत मॉन्युमेंट रद्द करावा किंवा त्याचा कारभार फॉरेस्ट सर्व्हिसकडे सुपूर्द करावा, अशी त्यानें मागणी केली होती. १९४५ सालीं रॉकफेलरच्या एका सहकाऱ्यानें या जाचास कंटाळून लिहिलें : “आपला हेतु सिद्धीस जात नाहीं, हें उघड दिसतें आहे. जमिनी पडून आहेत. कोणालाच त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. लोकांना तर त्यांचा मुळींच कांहीं उपयोग होत नाहीं. आणि त्यांच्यापायीं आपल्याला मात्र विनाकारण खर्च सोसावा लागत आहे. कोठून हा मनस्ताप विकत घेण्याची बुद्धि आपणांस झाली, असें आपल्याला वाटत असेल.” शेवटीं १९४६ सालीं विरोधी पक्षांतील एक अग्रगण्य पुढारी आणि एके काळचा राष्ट्राध्यक्ष हर्बर्ट हूव्हर यानें रॉकफेलरला लिहिलें : “अमेरिकन जनतेस देऊं केलेली आपली ही महान् देणगी गेलीं कित्येक वर्षें रोखून ठेविली जात आहे, ही गोष्ट मला फार भयंकर वाटते. या वर्षीच बघा ना, उन्हाळ्यांत आठ लक्ष यात्रेकरू यलो स्टोनला गेले असतील आणि त्यांच्यापैकीं बहुतेक सर्व जण जॅक्सन खोऱ्यास भेट देण्यासाठीं गेले असणार...अमेरिकेंतील सहलीच्या उत्तमोत्तम स्थळांपैकीं हें एक आहे, हें आतां सर्वमान्य झालें आहे.”

पुढील कांहीं वर्षांत जॅक्सन होल प्रश्न राजकीय वादाच्या रणधुमाळींत गाडला गेला असला, तरी त्या काळांत उभयपक्षीं वाटाघाटी चालूच होत्या. आणि

१९४८ सालच्या सुमारास विरोधी पक्षाचा केवळ एकच मुद्दा टिकून राहिला होता. तो म्हणजे जॅक्सन खोऱ्यांतील एल्क प्राण्यांच्या कळपांवर सत्ता कोणाची चालावी यासंबंधींचा. या प्रश्नाचा एकदां समाधानकारक निकाल लागल्यावर पुढील रस्ता सरळ, सोपा होता. त्याच सालच्या डिसेंबर महिन्यांत जॅक्सन खोऱ्यांतील आपल्या मालकीच्या जमिनी रॉकफेलरनें सरकारच्या हवालीं केल्या. आणि पुढील वर्षी 'जॅक्सन होल मॉन्युमेंटचा समावेश ग्रँड टेटन नॅशनल पार्कमध्यें करण्यासंबंधीं'च्या ठरावावर राष्ट्राध्यक्ष ट्रूमननें मंजुरीची सही केली. आणि अशा रीतीनें या गाजलेल्या प्रकरणाचा अखेर शेवट झाला. १९२६ सालीं जी 'आदर्श योजना' रॉकफेलरनें प्रथम संकल्पिली होती, ती १९५० सालीं, उण्यापुऱ्या पंचवीस वर्षांनीं मूर्तिमंत साकार झाली. या अखेरच्या शुभ घटनेमुळें जॅक्सन खोऱ्याचा ताबा रॉकफेलरनें सतत मनांत बागविलेल्या इच्छेनुसार सरकारकडे गेला. पण त्यामुळें रॉकफेलरचा प्रस्तुत योजनेशीं प्रथमपासून जडलेला निकट संबंध दुरावला नाहीं, तर उलट दृढतर झाला. पन्नास सालापासून आजतागायत रॉकफेलरनें भोंवतालच्या जमिनींची खरेदी करून मॉन्युमेंटला जोडण्यासाठीं, जॅक्सन सरोवराच्या कांठीं वैभवशाली वसतिगृह बांधण्यासाठीं आणि पार्कमध्यें येणाऱ्या यात्रेकरूंस अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठीं कोट्यवधि डॉलर्स खर्चीं घातले आहेत.

जॅक्सन होलचा इतिहास रॉकफेलरच्या मनस्तापास कारण झाला असला, तरी त्यामुळें रॉकफेलरच्या मनांतील त्या प्रदेशाची ओढ अजूनपर्यंत अनावर आहे. प्रत्येक वर्षी उन्हाळ्यांत तो तेथें जातो. घोड्यावर बसून मनसोक्त रपेट करतो किंवा नुसताच पायीं भटकतो. किंवा या मॉन्युमेंटचा इतिहास घडविण्यास कारण झालेल्या लंच ट्री हिलवर उभा राहून समोरच्या टेटन पर्वतराजीचें भव्य दृश्य डोळ्यांत सांठवितो. यासंबंधीं एकदां त्यानें लिहून ठेविलें आहे: "मी जगभर फिरलों आहें आणि असंख्य नामांकित पर्वतांच्या सहवासांत राहिलों आहें. मला असें वाटतें कीं टेटन पर्वतांसारखे भव्य आणि सुंदर पर्वत जगांत अन्यत्र कोठें नाहींत. सेजब्रश वनस्पतीनें आच्छादिलेल्या विस्तीर्ण खोऱ्यावरून या पर्वतांकडे दृष्टिक्षेप टाकला किंवा जॅक्सन सरोवर आणि त्याभोंवतींचा पाणथळ प्रदेश पुढ्यांत ठेवून हे पर्वत पाहिले, तर नित्य बदलणारें त्यांचें चिरंतन सौंदर्य केवळ अतुलनीय दिसतें."

रॉकफेलरला पार्क्सच्या संरक्षणसंगोपनांत प्रारंभापासून विशेष रस आहे, हें

प्रारंभींच सांगितलें आहे. आणि त्यासंबंधांतील त्यानें केलेल्या देणग्यांची यादी करावयाची म्हटलें, तर कित्येक पृष्ठें त्यासाठीं खर्ची घालावीं लागतील. अशा स्थितींत केवळ एका लहानशा प्रकरणांत त्याजविषयीं कांहीं लिहिणें अशक्यप्राय आहे. असें असलें तरीसुद्धां तुलनेनें लहान पण महत्त्वाच्या दृष्टीनें फार मोठ्या अशा ज्या दोन पार्क योजनांस त्यानें साहाय्य केलें त्यांच्याविषयीं कांहीं थोडेंसें लिहिणें आवश्यक आहे, असें वाटतें. जगांतील सर्वांत अधिक गजबजलेल्या अशा न्यूयॉर्क नगराच्या मध्यभागीं हे दोन्ही पार्क आहेत. हडसन नदीच्या पश्चिम दिशेस उंचच उंच अशी एक नैसर्गिक भिंत पूर्वीं उभी होती. तिचें नांव पॅलिसेड्स. अँथनी ट्रोलोपच्या मतानें "बहुरूपिणी वसुंधरेनें निर्मिलेल्या अति-सुंदर दृश्यांपैकीं एक येथें दिसतें," तर हेन्री जेम्सनें त्या चित्रविचित्र उंच भिंतीची तुलना कोरॉटनें काढलेल्या अप्रतिम चित्रांशीं केलेली आहे. या चित्रकाराच्या कांहीं महान् छायाकृतींत सदा भटकत्या, चंचल यौवनाचें अस्पष्ट दर्शन होतें. हडसन नदीच्या बांधावरील उंच निमुळत्या पहाडांच्या चित्राकृति बघून त्या थोर कलाकाराला असें वाटलें. त्याची जन्मजात प्रतिभा दैवानें ज्यांना प्राप्त झालेली नाहीं, अशीं असंख्य माणसें मुकेपणानें त्याच्या शब्दांची साथ करतात. पण दुर्दैव असें कीं सृष्टीनें या भव्य वास्तूची मांडणी अत्यंत असुरक्षित अशा मानवनिर्मित नगरीच्या सान्निध्यांत केलेली होती. आणि चालू विसाव्या शतकाच्या आरंभीं असें दिसून आलें कीं या स्थळाच्या अपूर्व सौंदर्याचा ग्रास करण्यास उद्योगधुंद अर्थसत्ता टपून बसलेली आहे. अर्थाला सौंदर्याचें आवाहन पोहोंचत नाहीं, असें दिसून आलें. बांधकामासाठीं दगडांच्या शोधांत असलेल्या खाणकंपन्या येथील प्राचीन पहाडांतून उचकटून काढलेले दगड वाहून न्यावयास लागल्या होत्या. विध्वंसाची ही प्रक्रिया अशीच कांहीं काळपर्यंत चालू राहिली, तर येथील रमणीय वास्तूचा विध्वंस अटळ आहे, हें जाणकारांच्या ध्यानांत येऊन चुकलें होतें.

सुदैवानें या सौंदर्यविघातक विध्वंसास आळा घालणारी एक घटना १९०० सालांत घडून आली. या वर्षीं काँग्रेसनें 'पॅलिसेड्स इंटरस्टेट पार्क-कमिशन' ची कायदेशीर नेमणूक केली. न्यूजर्सी राज्यांत फोर्ट लीपासून न्यूयॉर्क राज्यांतील हडसन नदीच्या मुखापर्यंत हारीनें उभ्या राहिलेल्या या चित्रविचित्र पहाडांच्या आसमंतांत पार्कची आंखणी आणि स्थापना करण्याचा आदेश या कमिशनला दिलेला होता. या कमिशनचा अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. पर्किन्स याला या कार्याचा जिव्हाळा होता. इ. स. १९०१ पासून १९०९ पर्यंत कमिशननें अनेक कायदे

पास करून घेतले. आणि प्रथम या सृष्टिनिर्मित पहाडांची धूप थांबविण्याचे सतत यत्न केले. एकूण चौदा मैल पसरलेल्या या पहाडाच्या आसमंतांतील प्रदेश कांहीं सरळ खरेदीनें आणि कांहीं दानरूपानें स्वाधीन करून घेण्यांत कमिशननें यश मिळविलें. १९०९ सालीं पार्कची आंखणी पुरी झाली आणि तदनंतरच्या काळांत पीरपॉंट मॉर्गन आणि मिसेस ई. एच. हॅरिमन प्रभृति उदार धनिकांच्या साहाय्यामुळें पार्क क्षेत्राचा विस्तार पुष्कळच वाढला. त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं आसपासच्या जमिनी स्वतः खरेदी करून पार्क कमिशनच्या नांवें लिहून दिल्या; तर कांहीं जणांनीं मोठमोठ्या रकमांचे चेक्स कमिशनच्या नांवावर लिहून दिले. आणि अशा रीतीनें कमिशनचें कार्य सुकर करण्यास मदत केली.

प्रस्तुत कार्यांत रॉकफेलर कुटुंबांतील सर्वच व्यक्तींचें लक्ष गुंतलेलें होतें. आणि सृष्टीनेंच उभी केलेली पहाडांची ही उंच भिंत जशीच्या तशी सुरक्षित राहावी यासाठीं मनापासून यत्न केले होते. या काळांतील रॉकफेलर कुटुंबियांचा पत्रव्यवहार चाळला असतां पार्कच्या स्थापनेंत त्यांनीं मनापासून कसें आणि किती साहाय्य देऊं केलें होतें, त्याची चांगली कल्पना येते. पार्कची रीतसर स्थापना झाल्यानंतर अल्पावधींत पार्कयोजना व्यवस्थित आकारास यावी, या हेतूनें थोरल्या रॉकफेलरनें पन्नास लक्ष डॉलर्स कमिशनच्या हवालीं केले. १९१६ सालीं रॉकफेलर फाउंडेशननें जमिनींच्या मिळकतसुधारणेसाठीं आणखी दहा लक्ष डॉलर्सची देणगी दिली. तदनंतर 'लॉरा स्पेल्मन रॉकफेलर मेमोरिअल निधीं'तून आणखी तीन मोठ्या देणग्या प्रस्तुत कार्यासाठीं देऊं करण्यांत आल्या.

या सर्व अजस्र देणग्यांची प्रेरणा प्रामुख्यानें धाकट्या रॉकफेलरची होती. लहानपणापासून त्याचें प्रेम या प्रदेशावर जडलेलें होतें. त्या दिवसांत फोर्ट ली धक्क्यास लागलेल्या पडावांतून आपला घोडा हडसन नदीच्या पल्याड न्यावा आणि तेथील पहाडांतून आणि शिखरांवरील जंगलांतून मनसोक्त रपेट करावी, हा त्यांचा आवडीचा छंद होता. बालपणांत केलेल्या त्या सुखदायक सहलींचें स्मरण त्याच्या मनांत सदा जागें होतें. त्याच्या व्यक्तिगत अनुभवांचे धागे या प्रदेशांत पूर्वीपासून गुंतलेले असल्यामुळें त्यानें येथील पार्क योजनेंत आपलें लक्ष उत्कटतेनें गुंतवावें, हें स्वाभाविक होतें. औद्योगिक हितसंबंधांपासून पॅलिसेडचा पहाडी प्रदेश सुरक्षित झाल्यानंतर तेथें आकारांत येणाऱ्या पार्कच्या योजनेंत तो खुषीनें सहभागी झाला. आणि त्याच्या क्रियाशील प्रेरणेमुळें पार्कच्या विस्ताराचें आणि विकासाचें कार्य निरंतर चालू राहिलें.

अशा स्थितींत तेथील पहाडांच्या शिखरावरील जमिनींचा प्रश्न उपस्थित झाला. ही जमीन अजूनपर्यंत खाजगी मालमत्ता होती. त्या जाणिवेनें त्याचें चित्त सदा अस्वस्थ होतें. पहाडांच्या पुढ्यांत प्रचंड पार्कयोजना आकारास येत होती. पण वस्तुस्थिति अशी विचित्र होती कीं पहाडांची मात्र साक्षात् मालकी कांहीं व्यक्तींची होती. आणि पहाडांचे मालक औद्योगिक हितसंबंधांत लक्ष गुंतविणारे होते. जमिनींची वाजवी किंमत देऊन पहाड कोणीं खणून काढले तरी त्यांना त्याची चिंता नव्हती. खरें म्हणजे त्याच सुमारास दक्षिणेच्या टोकाला पहाड खणून काढण्याचा उद्योग कोणीं तरी सुरू केला होता. हा उद्योग असाच अखंड चालू दिला, तर पार्कमागची पहाडांची अखंड क्षितिजरेषा तुटक दिसण्याचा संभव निर्माण झाला होता. एकीकडे सौंदर्यनिर्मिति चालू होती. आणि उलट दिशेनें सौंदर्यविध्वंसाच्या कार्यास सुरुवात झाली होती. वस्तुस्थितीचें हें विदारक दृश्य पाहून रॉकफेलरचें चित्त अस्वस्थ झालें. आणि विध्वंसाचें आक्रमण थोपविण्याच्या उद्देशानें शांतपणानें—आपल्या परीनें—त्यानें यत्न सुरू केला. २० सालच्या आधींपासूनच त्यानें या कामांत लक्ष घातलें. आणि पॅलिसेड्सच्या पठारावरील जमिनींचे तुकडे मिळतील तसे खरेदी करण्यास त्यानें आरंभ केला. दक्षिणेस जॉर्ज वाशिंग्टन ब्रिजपासून उत्तरेस न्यूयॉर्क न्यूजर्सी राज्यास जोडणाऱ्या सीमारेषेपर्यंत जवळजवळ तेरा मैलांच्या अंतरांतील जमिनींचे तुकडे आणि पट्टे खरीदण्याचा त्याचा उद्योग कित्येक वर्षे अखंड चालू होता. पॅलिसेड्सच्या पठारावरील जमिनी खरेदी करण्यांत नक्की कोणाचे हितसंबंध गुंतलेले आहेत, त्याची कल्पना त्या काळांत कोणास फारशी नव्हती. कित्येकांची समजूत अशी होती कीं कोलंबिया विद्यापीठ हा उद्योग करीत आहे, तर कित्येकांस असें वाटत होतें कीं हॉलंडचें राज्यसरकार या जमिनी खरेदीत आहे. रीअल इस्टेट एजंटांच्या वर्तुळांतून अशा प्रकारच्या अनेक भुमका आणि अफवा उठत होत्या. अखेरीस १९३३ सालच्या जुलै महिन्यांत रॉकफेलरनें पठारावरील एकूण ७०० एकर जमीन पॅलिसेड्स पार्क कमिशनच्या हवालीं केली. त्या वेळीं या जमिनींच्या खरेदींत कोणाचे हात गुंतलेले होते, तें लोकांना कळून चुकलें. या जमिनीचें दानपत्र करून देते वेळीं रॉकफेलरनें आपल्या मनांतील हेतु कमिशनच्या सदस्यांस येणेंप्रमाणें कळविला :

"ही सर्व जमीन खरेदी करण्यांत माझ्या मनांतील उद्देश एकच होता. तुमच्या ताब्यांत जो प्रदेश होता त्याच्या पाठीमागें असलेल्या पहाडांची

मालकी दुसऱ्या कोणाच्या ताब्यांत असणें उचित नाहीं, असें मला वाटलें. तुमच्या पार्कयोजनेशीं विसंगत अशा योजना हे जमीनमालक आंखूं शकले असते. आणि त्यांचे हेतू साध्य होते, तर तुमच्या योजनेंत सुरक्षित असलेल्या प्रदेशांस धोका पोहोंचला असता. तुमच्या स्वाधीन ही जी जमीन मी करीत आहें, त्या जमिनीचा उपयोग एखादा रुंद राजरस्ता बांधण्यासाठीं करतां येईल, अशी उमेद मी मनांत बाळगून आहें. रीजनल प्लान ॲसोसिएशननें योजिलेल्या रस्त्याच्या आंखणीस आणि निर्मितीस मी देत असलेल्या या जमिनींचा उपयोग होईल, अशी मला आशा आहे."

रॉकफेलरच्या या समयोचित देणगीचें स्वागत सर्वत्र मोठ्या उत्साहानें झालें. "पॅलिसेड्स पार्क सुरक्षित करावा, तेथील सुंदर प्रदेश औद्योगिक हितसंबंधांपासून मुक्त करावा, अशा धर्मप्रेरणेनें पॅलिसेड्स पार्कचें काम आजवर अखंड चालू होतें. पण पहाडांच्या पुढ्यांतील रमणीय प्रदेश उद्यानांनीं सुशोभित करावा आणि त्याच वेळीं मागचे पहाड उद्यान योजनेशीं विसंगत अशा कार्यासाठीं वापरले जावेत, ही घटना दुर्दैवी ठरली असती. कारण हीं उद्यानें उत्तुंग पहाडांच्या छायेंतच शोभिवंत दिसतात. या पहाडांमुळें कांहीं गूढ असें सौंदर्य येथील उद्यानांस प्राप्त झालें आहे. हें जाणून रॉकफेलरनें जी भव्य देणगी दिली, तिच्यामुळें पॅलिसेड्स पार्कचें भवितव्य आतां कायमचें सुरक्षित झालें आहे, कुरूपतेच्या धोक्यापासून निरंतरचें मुक्त झालें आहे."

रॉकफेलरच्या उदार देणगीमुळें प्राप्त झालेल्या जमिनींचा उपयोग आजवर स्थगित झालेल्या राजमार्गाच्या बांधणीसाठीं करण्याची एक नवी योजना आकारास येईल, अशीं सुचिन्हें दिसावयास लागलीं. संकल्पित मार्गरचनेसाठीं जेवढी जमीन आवश्यक होती, तिचा ऐशीं टक्के भाग रॉकफेलरच्या देणगीनें आतां उपलब्ध झाला होता. आणि रस्ता बांधण्याचें काम हातीं घेण्यास हरकत नाहीं, अशी परिस्थिति होती. पार्कमधील हा रस्ता पक्का बांधून तयार झाला म्हणजे पार्कमधील सर्व रमणीय स्थळें एका फेरींत बघण्याची सोय यात्रेकरूस सहज उपलब्ध होईल, आणि न्यू जर्सीच्या उत्तर विभागांत अनेक उपनगरें या मार्गामुळें अस्तित्वांत येतील, हें भविष्य स्पष्ट होतें.

पण नियति अनुकूल नव्हती. १९४७ सालच्या पावसाळ्यापर्यंत संकल्पित मार्गाच्या बांधणीस प्रारंभ होऊं शकला नाहीं. आणि पहिले पांच मैल रस्ता

बांधून पक्का होण्यास ५३ साल उजाडलें. मध्यंतरींच्या काळांत नव्या नव्या जमिनी खरीदण्याचा रॉकफेलरचा उद्योग अखंड चालूच होता. रस्त्याच्या कामीं येतील अशा जमिनी विकत घेऊन त्या तत्परतेनें कमिशनच्या नांवें त्यानें लिहून दिल्या. पार्कच्या विस्तारास व विकासास अनुकूल ठरतील अशा सर्व जमिनी खरीदून लगेच त्यानें त्या कमिशनच्या हवालीं केल्या. पार्कच्या सरहद्दीबाहेर ज्या जमिनी राहिल्या आणि ज्यांचा उपयोग पार्कच्या संकल्पित विस्तारास होण्यासारखा नव्हता, अशा जमिनी त्यानें नागर संघटनांच्या हवालीं केल्या. तेथें रमणीय उद्यानें निर्माण करतां आलीं असतीं किंवा यात्रेकरूंच्या सोयींसाठीं विहारगृहें बांधतां आलीं असतीं. पॅलिसेड्सच्या आसमंतांतील जमिनी खरेदी करतेवेळीं रॉकफेलरची दृष्टि किती व्यापक होती आणि त्याचे संकल्प कसे दूरदर्शी होते, त्याचा बोध या घटनेवरून होण्यासारखा आहे. रॉकफेलरच्या उदार संकल्पामुळें यात्रेकरूंस आणि जनतेस केवढें तरी मोठें विहारक्षेत्र खुलें झालें. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॅलिसेड्सच्या आकाशरेखेचें सौंदर्य निरंतर अबाधित राहील, हें निश्चित झालें.

मनांत धरलेला हा हेतु साध्य करण्यासाठीं रॉकफेलरनें एकूण दोन कोटी डॉलर्स या कामीं खर्ची घातले. तो म्हणाला : "ही जागाच अशी सुंदर होती कीं शक्य तितक्या अधिक लोकांनीं तिचें दर्शन घ्यावें अशी माझी इच्छा होती." बहुसंख्य लोकांनीं त्याच्या इच्छेचें सहर्ष स्वागत केलें. आणि इच्छापूर्तीचें समाधान त्याला लाभलें असेल, यांत शंका नाहीं. पश्चिममध्य भागांतील एका वृत्तपत्रानें यासंबंधांत असें लिहिलें :

> "रॉकफेलरनें आजवर मुक्त हस्तानें दानाची उधळण केली आहे. पण त्यानें जीं दानें आजवर केलीं, त्यांजपैकीं हें दान सर्वांत अधिक कारणीं लागेल असेंच दिसतें. त्याच्या दानाचें असें देखणें, चिरंतन स्मारक अन्यत्र आढळणार नाहीं. हडसन नदीच्या खोऱ्यांतील भव्य पहाडी प्रदेश त्यानें आम जनतेसाठीं सुरक्षित करून खुला करून दिला. गजबजलेल्या राजधान्यांतून राहणारे आजचे आणि उद्यांचे नागरिक, या देशांतील सर्व लोक या दानासाठीं रॉकफेलरला दुवा देतील, यांत शंका नाहीं."

★ ★ ★

प्रकरण बारावें

# जीर्णोद्धाराचीं कामें

रॉकफेलर रसिक कलाभक्त होता. त्याची कलासक्ति कदाचित् व्यासंगी पंडिताची नसेल, पण कलाकोविदांच्या मनांत कोणत्याहि कलावस्तूविषयीं जो आदरभाव—किंबहुना भक्तिभाव—असतो, तो रॉकफेलरच्या मनांत निःसंशय होता. प्राचीन ईजिप्तमधील असोत किंवा वसाहत काळांतील व्हर्जियनिामधील असोत, सुंदर कलेचे आणि अभिजात अभिरुचीचे नमुने त्याच्या मनांत घर करीत. आणि काळ, युद्ध वा उपेक्षा यांजमुळें कलावस्तूंस जी अवकळा प्राप्त होते, ती बघून त्याचें चित्त व्यथित होई. १९२१ सालीं त्यानें चीनचा प्रवास केला. त्या वेळीं पेकिंगमधील ऱ्हास पावणाऱ्या राजवाड्याचे आणि देवालयांचे अवशेष बघत असतांना त्याचें मन मनस्वी व्याकुळ झालें. त्या भव्य वास्तूंच्या समोर तो उभा राहत असे. आणि त्यांच्या कौलारांत उगवणाऱ्या वनस्पती बघून त्याच्या चित्तांत वेदना दाटून येई. तदनंतर तीस वर्षांनीं तो म्हणालाः "तेथील परिस्थिति बघून माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. महान् सौंदर्य बघतां बघतां डोळ्यांदेखत छिन्नविच्छिन्न होत होतें. तें दृश्य बघून मी उदास झालों."

अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें फिलिप्स मॅनॉर आणि विल्यम्सबर्गसारखीं स्थळें राष्ट्रीय संस्कृतीची प्रारंभनिदर्शक म्हणून महत्त्वाचीं वाटतात. पण या स्थळांतून ज्या संस्कृतीचें ओझरतें दर्शन होतें, त्या संस्कृतीचीं पाळेंमुळें दुसऱ्या एका जगांत भव्य प्रार्थनामंदिरें, किल्ले आणि राजवाडे आज भग्नावशेषांच्या रूपांत

दिसतात. जेव्हां कॅप्टन जॉन स्मिथ व्हर्जिनियांत पहिल्यांदा उतरला किंवा डच यात्रेकरू हडसन नदीच्या मुखांतून वरपर्यंत गेले, तेव्हां ज्या जगांतून ते आले होते, तें जग मृतप्राय अवशेषांनीं केवळ संपन्न असें होतें. लहानपणींच रॉकफेलरच्या त्या जगांतील भग्न वस्तूंशीं परिचय झालेला होता. तदनंतर पुन्हा पुन्हा अनेक वेळां त्या जगाची यात्रा त्यानें केलेली होती. तेथील परंपराप्राप्त संपन्नता, महान् कला आणि भव्य शिल्प बघून झपाटल्यासारखा वारंवार त्या स्थळास तो परतला होता. त्या प्राचीन जगांतील संस्कृतीच्या आसन्नमरण अवशेषांनीं त्याचें मन जसें भारलें होतें. पुन्हा पुन्हा तेथील वास्तुशिल्पाचें दर्शन घेतल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. अशाच एका प्रवासांत फ्रान्समधील व्हर्साय, फांतेनब्लो आणि ऱ्हीम्स येथील वास्तूंच्या जीर्णोद्धारासाठीं कांहीं तरी करण्याची कल्पना त्याच्या मनांत स्फुरली.

१९२३ सालीं अनेक वर्षांच्या कालांतरानें रॉकफेलर दांपत्यानें फ्रान्सला भेट दिली. ता. ३० जून रोजीं संध्याकाळीं व्हर्सायच्या राजवाड्यांतील एका समारंभास तीं दोघें हजर राहिलीं. त्या दिवशीं रात्रीं आपल्या रोजनिशींत त्यानें अशी नोंद केली : "अत्यंत सुंदर आणि मनोवेधक प्रसंग." त्या वेळींच वास्तविक त्याच्या तीक्ष्ण दृष्टीनें तेथील वास्तूंचे अनेक तपशील टिपले होते. उदाहरणार्थ, सभोंवारचें लोखंडी कुंपण पार गंजलें होतें. पुतळे फुटक्या तुटक्या अवस्थेंत होते. लाकूडकाम कुजलेलें दिसत होतें. पण या तपशिलांचा निर्देश त्याच्या रोजनिशींतील नोंदींत आढळत नाहीं. पण तरी सुद्धां त्या भव्य वास्तूंच्या भग्न दर्शनानें त्याच्या मनास खिन्नता आली होती. बुर्बोन राज्याच्या ऐन वैभवाच्या काळांत चौदाव्या लुईनें या दलदलीच्या विस्तीर्ण प्रदेशांत ती भव्य वास्तु उभी केली आणि आसन्नमरण दरबारी थाटांत तिची जोपासना केली. त्याच्या दरबारांतील मानकरी वैभवशाली वस्त्रालंकारांनीं नटलेले होते. पण आपल्या मृत्यूची घंटा लवकरच वाजणार आहे, हें अदृष्टांतील भविष्य त्यांना त्या वेळीं अज्ञात होतें. या राजवाड्याच्या संगमरमरी भिंतीच्या आड यूरोपच्या इतिहासांतील कांहीं महत्त्वपूर्ण नाट्यात्म घटना घडलेल्या होत्या. येथेंच त्या वेगवेड्या सुसंस्कृत नृत्याचे पदक्षेप प्रथम पडले होते कीं ज्याची अखेर फ्रेंच राज्यक्रांतीच्या भयानक संहारांत परिणत झालेली दिसणार होती. फ्रँको-प्रशिअन युद्धानंतर याच वास्तूंत बलिष्ठ जर्मन साम्राज्याचा जन्म झाला होता. येथील गॅलरी द ग्लेसेसमध्यें बसून वुड्रो विल्सन, क्लेमेंको लॉइड जॉर्ज आणि इतर नेते यांनीं सुप्रसिद्ध व्हर्सायच्या

तहनाम्यावर सह्या केल्या होत्या. सतराव्या शतकांतील फ्रान्समधील सर्व कलावैभव येथें एकत्रित झालेलें दिसत होतें. दुर्मिळ जाजमें, रुजामे, पुरातन कलाकृति, भव्य चित्रें आणि शेकडों कारंज्यांनीं व पुतळ्यांनीं सुशोभित केलेलीं विस्तीर्ण उद्यानें, हीं सर्व फ्रान्सच्या ऐन वैभवकाळास साक्षी होतीं. व्हर्सायच्या या राजवाड्यांत इतिहासांतील एका महत्त्वाच्या क्षणिक युगाचें जसें समग्र दर्शन घडत होतें तसें जगांत इतरत्र कोठें दिसण्याची शक्यता नव्हती. सम्राटाचा गर्व आणि त्याचा मूर्खपणा यांचा दंश आतां लयास गेला होता. पण महान् कलेच्या सौंदर्याचें हें साक्षात् प्रतीक वास्तुरूपानें त्या काळाची साक्ष देण्यास अजूनपर्यंत जागच्या जागीं उभें होतें.

पण आतां अशी ही भव्य ऐतिहासिक वास्तु रसातळास जाऊं पाहत होती. खरें म्हटलें तर ऐतिहासिक वास्तूंचें संरक्षण करण्याच्या कामीं फ्रेंच लोक सदा कसे दक्ष असतात. पण त्यांचा सुद्धां प्रस्तुत जीर्णोद्धाराच्या बाबतींत नाइलाज झालेला दिसतो. ते तरी बिचारे काय करणार?

एका बाजूनें युद्धोत्तर पुनर्रचनेच्या अनिवार्य मागण्या भेडसावीत होत्या, तर दुसऱ्या बाजूनें असंख्य प्राचीन वास्तूंच्या जीर्णोद्धारासाठीं कांहीं तरी करणें आवश्यक होतें. आणि परिस्थिति सर्वच बाजूंनीं अशी विलक्षण तंग झालेली होती कीं नियमित मार्गांनीं प्राप्त होणारा अपुरा पैसा कोठें कोठें पुरवावा, या एकाच चिंतेंत ते सदा मग्न असत. आणि या वेळीं रॉकफेलरनें पाहिलें, तर व्हर्साय राजवाड्याची तक्तपोशी आणि छप्पर दोन्ही व्यवस्थित स्थितींत राखण्यासाठीं आवश्यक त्या पैशाची व्यवस्था कांहीं केल्या त्यांना करतां येईना. व्हर्सायच्या या जगप्रसिद्ध ऐतिहासिक वास्तूच्या संरक्षण-संगोपनासाठीं नेमलेल्या समितीनें प्राप्त झालेल्या पैशांत धनिकांकडे मागणी करून आणखी कांहीं रकमांची भर घातलेली होती. पण जो पैसा गोळा झाला, त्या पैशांतून उद्यानांतील कारंज्यांच्या आसमंतांत असलेल्या कांहीं थोड्या पुतळ्यांची डागडुजी तेवढी करतां आली. मध्यंतरींच्या काळांत त्या भव्य वास्तूवर होणारे हवापाण्याचे परिणाम टाळणें अशक्यप्राय होतें. काळाची करणी आस्ते आस्ते विनाशाचें काम साधीत होती. आणि अशा स्थितींत या वास्तूबाबतचें आवश्यक तें उत्तरदायित्व कसें पार पाडावें, या चिंतेंत कलासक्त फ्रेंच जनता होती. ज्या दरबारी दिवाणखान्यांत एका काळीं वैभवशाली वेष धारण करणारे अमीरउमराव, मंत्री, सेनानी, आपल्या बादशहासमोर गुडघे टेकून वाकत असत, त्या दिवाणखान्यांच्या भिंतींवर गळणाऱ्या पाण्याचे ओघळ

सर्वत्र दिसत होते. आणि छपरावर माजलेलें शेवाळें आंतमध्यें डोकावून राजवैभवास वेडावीत होतें. ले ब्रनच्या नामांकित चित्राकृतींनीं नटविलेलें 'गॅलरी द ग्लेसेस'-वरील छत छपरांतून संततधार गळणाऱ्या पाण्यापासून कसें सुरक्षित ठेवावें, या चिंतेंत गढलेला पुराणवस्तुसंशोधन खात्याचा अधिकारी वर्ग आतां आणखी एका भयंकर चिंतेचा बळी झालेला होता. लाकडी तुळयांवर कावळ्याच्या छत्र्या उगवलेल्या दिसत होत्या. महाराणी मेरी अँटॉयनेटसाठीं बांधलेलें अप्रतिम सुंदर नाट्यगृह मोडकळीस आलेलें दिसत होतें. नाट्यगृहावरील छप्पर खालीं झुकलें होतें. आणि तळघराच्या जमिनी, भिंती सदा झिरपणाऱ्या पाण्यानें ओलसर झालेल्या दिसत होत्या. राजवाड्यांतील खिडक्यांच्या तावदानांची मोडतोड झाली होती. तुळया, भिंती कोसळून पडतील कीं काय, अशी धास्ती वाटत होती. गच्च्याचे कठडे तुटले-फुटले होते आणि छप्पर उचकटलें होतें. सभोंवारच्या उद्यानांतील सुंदर कारंजीं जीर्ण-शीर्ण झालीं होतीं. तेथील शोभिवंत पुतळे उद्ध्वस्त झाले होते. मोडून पडलेल्या झाडांच्या फांद्या कारंज्यांच्या आंतमध्यें आणि पुतळ्यांच्या अंगावर सर्वत्र पडलेल्या होत्या. ले नोत्रनें आंखलेलीं सुंदर उद्यानें अजून कशींबशीं तग धरून उभीं होतीं, एवढेंच ! तेथील चित्राकृत लताकुंज आणि आल्हाददायक वाटिका पूर्वसौंदर्याची केवळ आठवण मात्र करून देण्यास समर्थ होत्या. पण योग्य ती निगा राखणें अशक्य झाल्यामुळें उद्यानांची पडझड आणि नासधूस थोपविणें तूर्त अशक्य दिसत होतें. व्हर्सायच्या वैभवशाली वास्तूला वाईट दिवस आले होते. आणि या ऐतिहासिक वास्तूच्या संपूर्ण जीर्णोद्धाराची योजना अविलंब कार्यवाहींत आणली नाहीं, तर या वास्तूचा सर्वनाश अटळ होता.

रॉकफेलरच्या स्मृतिपटलावर व्हर्सायची दुर्दशा स्पष्ट नोंदली होती. पण लौकरच त्याच्या लक्षांत आलें कीं, केवळ व्हर्सायची एकच एक वास्तु जीर्णोद्धाराची अपेक्षा करीत होती, असें नाहीं. रॉकफेलर फांतेनब्लोला गेला, तेव्हां तेथेंसुद्धां तशीच दुर्दशा बघून त्याचें चित्त विषण्ण झालें. तेथील जगप्रसिद्ध राजवाड्याच्या भिंतींवर ओल चढलेली होती, आणि सर्वत्र पडझड चाललेली दिसत होती. या राजवाड्यांवरील छपराची आंखणी-बांधणीच मुळांत सदोष होती. पहिल्या फ्रान्सिसनें बांधलेल्या पुनरुज्जीवनकाळांतील ही भव्य वास्तु फ्रान्सच्या इतिहासांतील अनेक महत्त्वाच्या घटनांची साक्षी होती. फ्रान्सच्या राजघराण्यांतील राजे व राजपुत्र येथें शिकारीच्या निमित्तानें येऊन राहत असत. नेपोलियनचा मुक्काम येथें सतत असे. पहिल्या राजत्यागाच्या घोषणेवर त्यानें सही केली, ती येथेंच.

या पुराण वास्तूच्या सदा गळणाऱ्या छपराखालीं फ्रान्सच्या महान् राजांनीं आपल्या ऐन अमदानींत प्रयासानें प्राप्त केलेल्या मौल्यवान् कलावस्तूंचा संग्रह येथें अजूनपर्यंत तसाच सुरक्षित होता. या भव्य वास्तूचा अंतर्भाग लीओनार्डो दा विंची आणि वेनवेनुतो सेलिनी या जगद्विख्यात कलाकारांच्या अपूर्व सुंदर कलाकृतींनीं नटलेला होता.

व्हर्सायच्या आणि फांतेन ब्लोच्या भग्न आसन्नविनाश वास्तु बघून रॉकफेलरचें चित्त उदास झालें होतें. पण कोणत्याहि भग्न वास्तूच्या अवशेषांनीं त्याच्या मनास जेवढे क्लेश दिले नाहींत तेवढे ऱ्हीम्स कॅथीड्रलच्या दर्शनानें त्याला दिले. या जगप्रसिद्ध प्रार्थनामंदिराची वास्तु म्हणजे फ्रान्सच्या अभिमानाचा आणि पूजेचा विषय झालेली होती. फ्रान्समधील सर्वांत अधिक लक्षणीय आणि पूज्य अशी ही वास्तु होती. व्हर्सायचा राजवाडा फ्रान्सच्या इतिहासांतील कांहीं महत्त्वाच्या घटनांचा साक्षी होता, यांत संशय नाहीं. पण ऱ्हीम्सचें भव्य प्रार्थनामंदिर अखिल फ्रान्सचें केवळ प्रतीकरूप होतें. फ्रान्सच्या राजघराण्याच्या या पवित्र वास्तूंत छत्तीस फ्रेंच राजांना राज्याभिषेक करण्यांत आला होता. फ्रान्सच्या एकूण एक सर्व राजांच्या राज्यारोहणास साक्षी असलेली ही वास्तु होती. जोन ऑफ आर्कनें चंचलबुद्धीच्या डॉफिनला राज्यपद देण्यासाठीं येथेंच खेचून आणलें होतें. आणि १७९३ सालीं जगप्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळांत सिटिझन रूहूल येथेंच आला होता. —फ्रान्सच्या उन्मत्त राजसत्तेस राज्याधिकार देणारें पवित्र अभिषेक तैल ज्या पवित्र पात्रांत ठेविलेलें होतें, तें पात्र लाथेखालीं तुडविण्यासाठीं. अशा अनेक ऐतिहासिक घटना या प्रार्थनामंदिरानें वारंवार पाहिलेल्या होत्या. पण तरी सुद्धां फ्रान्सच्या जीवितांतील केवळ अक्षय असे संबंध या वास्तूशीं निगडित होते. शतकानुशतकें फ्रेंच राष्ट्रास स्फूर्ति देत राहिलेलें प्रार्थनामंदिर अखिल जगताच्या स्तुतीचें आणि भक्तीचें केंद्रस्थान बनून राहिलें होतें.

पहिल्या महायुद्धांत ऱ्हीम्स कॅथीड्रलची जी हानि झाली, ती जवळजवळ कधीं न भरून येण्यासारखी होती. सतत चार वर्षेंपर्यंत आधुनिक युद्धांतील विध्वंसक शस्त्रास्त्रांस तोंड देत ही वास्तु अजून उभी होती. युद्धकाळांत या वास्तूवर सतत बॉंबचा वर्षाव होत होता. एकूण २८७ वेळां या वास्तूवर साक्षात् भडिमार झाला होता. आणि तरीसुद्धां गॉथिक शिल्पाचें हें भव्य प्रात्यक्षिक त्या भडिमारास तोंड देत ताठ उभें होतें. पुन्हा पुन्हा होणाऱ्या अग्निवर्षावास दाद न देतां निश्चयानें ठाण मांडून उभें होतें. कांहीं झालें तरी मातींत घट्ट रोवलेले

पाय जागच्या जागीं रुतवून ठेवण्याच्या अभंग वज्रनिश्चयानें उभें होतें. आणि अखेरीस ज्या दिवशीं युद्धविरामाची घोषणा उभयपक्षीं करण्यांत आली, त्या दिवशीं भोंवतालचा भग्न छिन्नविच्छिन्न परिसर या प्रार्थनामंदिराच्या दक्षिण मनोऱ्यांत टांगलेल्या 'शार्लोट' घंटेच्या नादानें पुन्हा एकदां भरून गेला.

ऱ्हीम्सचा विध्वंस केवळ अवर्णनीय असा होता. ज्या वेळीं सर्वांत अधिक विध्वंसक असा बॉम्बवर्षाव या मंदिरावर सतत कोसळत होता, त्याच वेळीं तेथें आग भडकली. आणि तदनंतर सतत दोन दिवसपर्यंत हें प्रार्थनामंदिर जळत होतें. हा अग्निप्रलय झाला, त्या वेळीं छप्पर कोसळलें. मनोऱ्यांतील घंटा निखळून धडाधड खालीं पडल्या. पुतळ्यांची पडझड आणि मोडतोड झाली आणि छपरावरून वितळलेलें शिसें वाहावयास लागलें. वितळलेल्या शिशाच्या लोटांनीं मंदिराच्या अंतर्भागांत विध्वंसाचा डोंब उसळला. आणि सर्वांत अधिक हानि त्यामुळें झाली. सतत वर्षणाऱ्या भडिमारामुळें मंदिराच्या दर्शनी भागावरील दगडांतील नाजुक खोदकाम छिन्नभिन्न झालें. आणि प्राचीन स्टेन्ड ग्लासच्या तुकड्यांचा ढोपरभर खच अवतींभवतीं पडला. या अजस्र वास्तूचें बांधकाम ठिकठिकाणीं तडे गेल्यामुळें उद्ध्वस्त झालें आणि जागोजाग पडलेल्या भयंकर भगदाडांनीं विद्रूप दिसावयास लागलें. मंदिराचा कोणता भाग केव्हां कोसळून खालीं पडेल त्याचा नेम राहिला नाहीं.

१९२३ सालीं रॉकफेलरनें जेव्हां या उद्ध्वस्त मंदिराचें दर्शन घेतलें, तेव्हां त्या उद्ध्वस्त स्थितींतहि कांहीं अलौकिक अशा भग्न पण भव्य वैभवांत मंदिराची वास्तु उभी असलेली त्याला दिसली. त्याच वेळीं या मंदिराच्या जीर्णोद्धाराची आवश्यकता कळून चुकली. दुरुस्तीचें काम फार मोठ्या प्रमाणांत आणि अविलंबें हातीं घ्यावयास हवें, हें तर स्पष्टच दिसत होतें. त्या वेळीं त्याच्या डायरींतील नोंद त्रोटक आहे :

"कॅथीड्रल पाहून नऊ वाजतां ऱ्हीम्सचा निरोप घेतला. येथील शिल्प आश्चर्यकारक आहे. विलक्षण सुंदर आहे...मंदिराची फार पडझड झालेली दिसली."

त्याच्या रोजनिशींतील तोकड्या नोंदी दर्शवितात त्यापेक्षां किती तरी अधिक दुःखकारक असा परिणाम या जीर्ण, भग्न, उद्ध्वस्त वास्तूंच्या दर्शनानें त्याच्या

मनावर घडविला होता, हें उघड आहे. कारण फ्रान्सचा निरोप घेण्यापूर्वी सोकोनि व्हाक्युमच्या पॅरिस ऑफिसमधील हॅरोल्ड शीट्स याला व्हर्साय, फांतेनब्लो आणि ऱ्हीम्स येथील एकूण परिस्थितीची संपूर्ण पाहणी गाजावाजा न करतां शांतपणें करण्यास त्यानें सांगितलें. त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत त्या वेळीं पॅरिसमध्यें राहत असलेल्या वेलेस बॉस्वर्थ याला त्यानें पत्र लिहिलें व या ऐतिहासिक वास्तूंच्या संबंधांत फ्रेंच सरकार काय करूं इच्छितें, त्याविषयीं चौकशी करून माहितीचा संपूर्ण अहवाल पाठविण्यास सांगितला. त्या पत्रांत त्यानें बॉस्वर्थला लिहिलें :

"पहिली गोष्ट म्हणजे याबाबत सर्व प्रकारची संपूर्ण माहिती मला तावडतोब हवी आहे. आणि—ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची म्हणून लक्षांत ठेव—या संबंधांत मी कांहीं हालचाल करीत आहें, याविषयीं कोणाला सुद्धां सुगावा लागतां नये.—हवी असलेली सर्व माहिती हातीं आली, म्हणजे विचारांत घ्यावयाचा पुढील प्रश्न हा...कीं कशा रीतीनें आणि कोणत्या मार्गानें मी गेलों असतां फ्रेंच सरकार माझ्या संकल्पित मदतीचा विनासंकोच स्वीकार करील..."

अपेक्षित ती सर्व माहिती हातीं आल्यावर आणि मदत-निधीची व्यवस्था पक्की झाल्यावर रॉकफेलरनें फ्रान्सचा मुख्य प्रधान मॉ. रेमंड पॉकारे यास पहिलें पत्र लिहिलें. पत्राच्या प्रस्तावांत फ्रेंच कलेच्या आणि शिल्पाच्या सौंदर्याची त्यानें मुक्तकंठानें स्तुति केली होती. आणि नंतर पत्रलेखनाचें प्रयोजन विशद करून सांगितलें होतें. त्यानें लिहिलें :

"मी असें मानतों कीं आपल्या देशांतील कलाशिल्प केवळ एका राष्ट्राचें वैभव आहे असें नाहीं, तर जगांतील सर्व राष्ट्रांचें हें कलावैभव आहे. आणि फ्रान्स देश त्या वैभवाचा केवळ एक विश्वस्त आहे. आपल्या देशांतील कला-शिल्पाचा वारसा अखिल जगास प्राप्त झालेला आहे. जगांतील कलाशिल्पास सदैव स्फूर्तिदायक ठरेल, असा हा अमूल्य ठेवा आहे. आपल्या देशांतील कलाशिल्पाचीं हीं महान् राष्ट्रीय स्मारकें कालमानानें उद्ध्वस्त, क्वचित् छिन्नभिन्न झालेलीं दिसत आहेत. याचें एक कारण असें कीं युद्धकाळांत

या सुंदर कलाकृतींची अवश्य ती दुरुस्ती करणें व त्यांची योग्य ती निगा राखणें शक्य झालें नसावें; या संबंधांत केवळ आपल्याच देशानें सर्व कांहीं करावें आणि इतरेजनांनीं शांतपणानें युद्धविध्वंसाचे केवळ मूक साक्षी व्हावें, ही वस्तुस्थिति बघून माझ्या मनास मनस्वी दुःख झालें. विद्यमान स्थिति केवळ तात्पुरती आहे. दीर्घकाळ टिकणारी ती नव्हे हें मी जाणतों. याहून अधिक निकडीच्या आणि महत्त्वाच्या बाबींचा विचार केल्यावर आणि तदनुसार वर्तन केल्यावर फ्रेंच लोक सार्वजनिक कलावस्तूंच्या संरक्षण-संगोपनांत अधिक लक्ष घालतील हें मला खात्रीनें माहीत आहे. प्राचीन कलाशिल्पाचें जागरूकतेनें व साक्षेपानें जतन कसें करावें त्याबाबतचे वस्तुपाठ फ्रान्सनें साऱ्या जगास दिलेले आहेत. पुराणवस्तु-संगोपनाच्या संबंधांतील आपल्या देशाची ख्याति जगभर पसरलेली आहे. तूर्त आपला देश युद्धोत्तर पुनर्रचनेच्या कामीं मग्न आहे. अशा स्थितींत आपल्या देशांतील कलाशिल्पाचा जीर्णोद्धार करण्याऱ्या कामीं कांहीं अल्पस्वल्प मदत करण्याची परवानगी व संधि आपण मला देऊं शकाल तर त्यामुळें मला मोठा आनंद होईल. आणि त्यासाठीं मनःपूर्वक मी आपले आभार मानीन. या कामासाटीं दहा लक्ष डॉलर्स आपल्या स्वाधीन करण्यास मला आनंद वाटेल. या निधीच्या विनियोगाबाबत मार्गदर्शन करण्यासाठीं कांहीं फ्रेंच आणि अमेरिकन तज्ज्ञांची एक लहानशी कमिटी स्थापन करावी आणि तिला विश्वस्त मानून तिच्या स्वाधीन हा निधि आपण करावा.

मला असें वाटतें कीं या निधीचा विनियोग ऱ्हीम्स कॅथीड्रलऱ्या छताच्या जीर्णोद्धारासाठीं, व्हर्सायमधील राजवाडे, उद्यानें आणि कारंजीं पुन्हा पूर्व-स्थितीस आणण्यासाटीं आणि फांतेनब्लो येथील राजवाडा व उद्यानें दुरुस्त करण्यासाटीं करण्यांत यावा.”

मॉशर पॉकारेनें तत्परतेनें या देणगीचा स्वीकार केला. आणि लगेच खालील विश्वस्तांची एक कमिटी जाहीर केली : राज्यदूत जसरां, अकादमी फ्रॅंकेचा सदस्य गॅब्रिअल हनोतो, आमि द व्हर्सायचा अध्यक्ष मॉं. पालिओलोग, पॅरिस बॅंकर कर्नल एच्. एच्. हार्जेस, आणि वेलेस बॉस्वर्थ. ‘ॲडमिनिस्ट्रेशन द बो आर्ट्स’चा डायरेक्टर मॉशर पॉल लीऑं यांजकडे या कमिटीच्या योजना कार्यवाहीत आणण्याचें उत्तरदायित्व सोंपविण्यांत आलें. ज्या कलासंस्थेचा तो डायरेक्टर होता, ती संस्था

आणि 'हिस्टॉरिक मॉन्युमेंट्स कमिशन' ही संस्था यांच्या साहाय्यानें त्यानें रीतसर सर्व काम तडीस न्यावें असें ठरविण्यांत आलें. उपर्युक्त प्रत्येक वास्तूची निगा राखण्याचें काम ज्या शिल्पतज्ज्ञांकडे पूर्वी सोंपविलेलें होतें, त्यांनींच जीर्णोद्धाराच्या योजना तपशीलवार आंखाव्यात व लगेच त्या कार्यवाहींत आणण्यासाठीं योग्य ती सर्व कारवाई करावी, असें मुक्रर करण्यांत आलें. आणि लगेच अविलंबें प्रस्तुत संबंधतील कामास सुरुवात झाली.

१९२५ सालच्या उन्हाळ्यांत रॉकफेलर पुन्हा एकदां पॅरिसला गेला. आणि संकल्पित जीर्णोद्धाराच्या कामांतील एकूण प्रगति पाहून त्याला फार समाधान वाटलें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट सर्वप्रथम करावयास हवी होती, ती म्हणजे या वास्तूंवर सतत होत राहणारा हवापाण्याचा परिणाम प्रथम नाहींसा करून नंतर तो होऊंच नये, याविषयीं दक्षता घेण्याच्या संबंधांतील. व्हर्साय येथें राजवाड्यावर कित्येक एकर व्यापतील अशीं छपरें नव्यानें घालण्यांत आलीं होतीं. आणि पाणभरले दगड हवाछिद्रांच्या साध्या युक्तीनें वाळविण्यांत येत होते. फांतेनब्लो येथें छपराच्या दुरुस्तीयोजना मार्गस्थ झाल्या होत्या. र्‍हीम्स येथें फ्रेंच सरकारनें अगोदरपासूनच तेथील वास्तूच्या जीर्णोद्धाराचें काम हातीं घेतलें होतें. भिंतींची दुरुस्ती चालू होती. आणि त्या कामासाठीं सरकारी तिजोरींतून मोठमोठ्या रकमा खर्ची पडत होत्या. येथें मात्र रॉकफेलरनिधीचा विनियोग घुमटांचा, मनोऱ्यांचा आणि छताचा जीर्णोद्धार करण्याच्या कामीं होत होता.

१९२६ सालच्या हिवाळ्यांत रॉकफेलर या कामासाठीं आणखी एक मोठी देणगी देण्यासंबंधींची योजना आंखावयास लागला. त्या संबंधांत त्यानें आर्थर वुड्सला लिहिलें :

"खरें म्हणजे करण्यास योग्य असें किती तरी काम तेथें पडून आहे आणि त्याबाबत आपण कांहीं हालचाल केली नाहीं, तर कदाचित् पुढील कित्येक वर्षांत फ्रेंच सरकार तें काम हातीं घेणार नाहीं, असें मला भय वाटतें. तेथील कमिटी आतां चांगली सुसंघटित आहे. आणि तिचें काम चांगलें चाललें आहे. मीं माझी पहिली देणगी कमिटीच्या हवालीं केली, तेव्हां तिच्या मार्गांत पुष्कळच अनपेक्षित अडचणी होत्या. आतां दुसरी देणगी मीं दिली तर तिचा विनियोग अधिक सुकरतेनें व तत्परतेनें होईल,

असें मला वाटतें. आतां या वेळीं आणखी दहा लक्ष डॉलर्स मीं देऊं केले, तर ती रक्कम कांहीं फार मोठी म्हणतां येणार नाहीं."

नऊ महिन्यांनंतर राज्यदूत मॉ. जसरॉं याला पत्र लिहून संकल्पिलेल्या दुसऱ्या देणगीची वार्ता त्यानें कळविली. त्या पत्रांत रॉकफेलरनें लिहिलें :

"कमिटीनें आजवर केलेली प्रगति समाधानकारक आहे. पण अजून पुष्कळच काम करावयाचें बाकी आहे. अशा वेळीं आणखी कांहीं सहकार्य देऊं केलें तर तें स्वीकारलें जाईल, अशी मला आशा आहे. तुमची कमिटी आजवर जें कार्य करीत आली आहे, त्या कार्याच्या प्रगतीस व विस्तारास अधिक अवसर मिळावा, यासाठीं मीं जर कांहीं देणगी दिली तर तुमची कमिटी तिचा स्वीकार आनंदानें करील, अशी मला उमेद आहे. आपली तशी खुषी असेल तर तुमच्या हवालीं चार कोटी फ्रँक्स—अठरा लक्ष पन्नास हजार डालर्स—करावयास मला मनस्वी आनंद वाटेल."

उपर्युक्त पत्रास मॉ. जसरॉंनें उत्तर पाठविलें, त्यांत त्यानें लिहिलें :

"तुमची ही नवी देणगी इतकी मोठी आहे कीं तिच्या पैशांतून जीर्णोद्धाराचीं आणि सुरक्षिततेचीं बहुतेक सर्व महत्त्वाचीं कामें पुरीं करतां येतील. कृतज्ञतेच्या उत्कट भावनेनें तुमच्या या देणगीचा स्वीकार केला जात आहे. मदतीसाठीं कोणीं याचना केली नसतांना, केवळ पुढील संकटाची पूर्वकल्पना आली म्हणून, ज्या वेळीं अशा मदतीची सर्वाधिक आवश्यकता होती आणि आम्ही मात्र कांहींच करूं शकत नव्हतों अशा वेळीं, तुम्ही आमच्या मदतीसाठीं धावून आलांत, त्याबद्दल अखिल फ्रान्स देश आज आणि पुढें अनतकाळपर्यंत कृतज्ञतापूर्वक तुमच्या नांवास दुवा देत राहील."

रॉकफेलरनें या नव्या देणगीमुळें आणि फ्रेंच सरकारनें सतत साहाय्य केल्यामुळें कमिटीनें नियोजित आणि अंगीकृत केलेलें सर्व काम १९३६ पर्यंत पुरें झालें. रॉकफेलरच्या दोन देणग्यांतून फांतेनब्लोसाठीं १,१४,००० डॉलर्स, ऱ्हीमसाठीं ५,७०,००० डॉलर्स आणि व्हर्सायसाठीं २१,६६,००० डॉलर्स खर्च करण्यांत

आले. या तिन्ही ठिकाणीं सहसा विश्वास बसणार नाहीं, एवढें मोठें जीर्णोद्धाराचें काम पार पाडण्यांत आलें होतें. आणि तेथील वास्तूंचा आश्चर्यकारक पुनर्जन्म झाला होता. अर्थातच सर्वांत अधिक डोळ्यात भरण्यासारखे प्रचंड बदल घडवून आणण्यांत आले, ते निःसंशय व्हर्साय येथें होत. तेथें पंचवीस एकर लांबीरुंदीच्या छतांवर संरक्षक छपराचें आच्छादन घालण्यांत आलें. शेकडों तुळयांना आधार देण्यांत आले. किंवा नव्यानें तयार करून तेथें त्यांची स्थापना करावी लागली. नामांकित वास्तुकार मॉं पॅट्रिक ब्रोने याच्या अधिकारी मार्गदर्शनाखालीं एकूण ३०० लहानमोठ्या योजना हातीं घेऊन त्या पार पाडण्यांत आल्या. नक्षीदार कठडे पूर्वीच्या नमुन्यांबरहुकूम पुन्हा बनविण्यांत आले. आणि मान्सार्तच्या वृक्षालयाचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. ले नोत्रनें आंखलेलीं नेत्रवेधक उद्यानें जशींच्या तशीं फिरून आकारास आणण्यांत आलीं. ब्रोस्के द रोशेलमधील खळखळणारे प्रपात पूर्वीप्रमाणें जलवाही झाले आणि पूर्वीं एकदां सतराव्या शतकांत ज्याप्रमाणें दूर मादागास्करहून चमकदार शंखशिंपले पोतीं भरभरून आणून जलाशयांच्या तळाशीं बसविण्यांत आले होते, त्याचप्रमाणें या वेळींसुद्धां तसेंच करण्यांत आलें. चौदाव्या लुईची सर्वांत आकर्षक अशी जी ग्रँड कॅनॉलची योजना ती पुन्हा एकदा पूर्वीसारखी कार्यवाहींत आणण्यांत आली. या कालव्याच्या दोन्ही कांठांवरील कुरूप इमारती पाडून टाकण्यांत आल्या आणि कालव्यातून खळखळत वाहत जाणाऱ्या निळ्याभोर पाण्यांत एकहि विद्रूप प्रतिबिंब उमटणार नाहीं, अशी साक्षेपानें दक्षता घेण्यांत आली. येथील सर्वांत अधिक मोहक आणि रमणीय वास्तु म्हणजे महाराणी मेरी अँटॉयनेटनें वसविलेलें हामो नामक लाडकें खेडेगांव. येथील संगमरमरी भिंतींचें दुग्धालय पुन्हा पूर्वीसारखें उभें राहिलें आणि काम करूं लागलें. गवतानें शाकारलेल्या चिमुकल्या झोपड्या आणि कुंपणांत बंदिस्त केलेलीं हिरवींगार मैदानें पुन्हा एकदां पूर्वीप्रमाणेंच डोळ्यांस सुख देण्यासाठीं उभीं राहिलीं. ज्या नाट्यगृहांत ती आवडीनें स्वतः बसविलेले नाट्यप्रयोग करीत असे, तें सुंदर रंगभवन तेथील बारीकसारीक तपशिलांसह साकार झालें—तेथील नातिएर निळ्या रंगाच्या सुंदर भिंतींसुद्धां.

* * *

प्रकरण तेरावें

# शिक्षण व संशोधन

रॉकफेलरच्या मनांत योजनांचें आकर्षण एका अर्थानें पितृदत्त परंपरेनें प्राप्त झालें होतें, असेंच म्हणावें लागेल. थोरल्या रॉकफेलरनें शिकागो विद्यापीठाची प्रतिष्ठापना केली होती. आणि इतर अनेक विद्यापीठांस व महाविद्यालयांस मुक्तहस्तानें उदार निधी उपलब्ध करून दिले होते. दक्षिणेंतील नीग्रो विद्यालयांच्या स्थापनेंत आणि प्रसारांत त्यानें विशेष रस घेतला होता. धाकट्या रॉकफेलरनें ऑफिसमध्यें पाऊल टाकलें मात्र, आणि लगेच थोरल्या रॉकफेलरच्या आणि गेट्सच्या सर्व शैक्षणिक विकास योजनांत त्यानें मनापासून लक्ष घालावयास सुरुवात केली. शैक्षणिक क्षेत्रांतील पैतृक उत्तरदायित्व त्यानें अंतःकरणपूर्वक जतन केलें. पित्यानें स्थापिलेल्या 'जनरल एज्युकेशन बोर्डा'च्या निर्मितीस पुत्राचें कार्यकारी साहाय्य केवढ्या मोठ्या प्रमाणांत प्रभावी ठरलें होतें, त्याविषयींचें विवेचन मागें एकदां करण्यांत आलेंच आहे. त्याचप्रमाणें 'इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डा'च्या स्थापनेंत आणि कार्यकारी व्यवस्थेंत त्याचें नेतृत्व किती परिणामकारक ठरलें होतें. त्याविषयींचा निर्देश मागील एका प्रकरणांत पूर्वी एकदां केलाच आहे.

'इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डा'ची स्थापना धाकट्या रॉकफेलरच्या प्रेरणेनें झालेली होती. या संस्थेचें प्राणभूत नेतृत्व डॉ. विक्लिफ रोजचें होतें. चार्टरमधील कलमाप्रमाणें या बोर्डाचें कार्य अमेरिकेंतील संयुक्त राज्यापुरतेंच मर्यादित होतें. पण 'जनरल एज्युकेशन बोर्ड' ज्या कल्पना या विवक्षित मर्यादेंत कार्यवाहींत आणीत

होतें, त्यांपैकीं कांहीं कल्पना जगभर कार्यवाहींत आणल्या जाव्यात, अशी रोजची धारणा होती. त्याची ही इच्छा फलद्रूप करण्यासाठीं म्हणून प्रामुख्यानें 'इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डा'ची निर्मिति करण्यांत आली होती. ज्याच्या आयुष्यांतील उत्तरकाळ जगभर ज्ञानप्रचार करण्याच्या कामीं खर्चीं पडला, त्याचें पूर्वायुष्य विशेष लक्षणीय होतें. टेनेसी राज्यांतील नॅशव्हिलमधील पीबॉडी कॉलेजमध्यें तत्त्वज्ञान विषयाचा प्रोफेसर म्हणून अध्यापनाच्या कामात तो गढून गेला होता. ॲरिस्टॉटल आणि प्लेटो यांच्या निकट सहवासांत राहून तो कालक्रमणा करीत होता. आयुष्य संपुष्टांत आलेलें दिसत असतांना त्यानें पत्नीस लिहिलें होतें: "तारुण्यांतील उत्साहकाळांत ज्या भावावेगानें मीं ॲरिस्टॉटल व प्लेटो वाचले होते, तोच भावावेग वार्धक्यांत आजसुद्धां कायम आहे. त्यांचे ग्रंथ हातीं घेतले कीं आजसुद्धां माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात." १९१० सालीं 'राकफेलर सॅनिटरी कमिशन'चें नेतृत्व करण्यासाठीं त्याची निवड करण्यांत आली. त्या वेळीं योजकांच्या आणि योजिताच्या मनांतील कोणत्या सहज प्रेरणांचा सुसंवाद घडून आला, तें सांगणें आज फार कठिण आहे. प्रस्तुत सॅनिटरी कमिशन अमेरिकेच्या संयुक्त राज्यातील नारूचा प्रसार समूळ नाहींसा करण्याच्या उद्देशानें स्थापन करण्यांत आलें होतें. या कमिशनच्या कार्यांत त्याचें कल्पक नेतृत्व उठावदारपणें दर्शनास आलें. त्याच्या अलौकिक अशा कांहीं गुणांस कारणीं लावावें, या हेतूनें १९१३ सालीं जेव्हां 'रॉकफेलर फाउंडेशन'ची संघटना करण्यांत आली, तेव्हां फाउंडेशनच्या 'इंटरनॅशनल हेल्थ बोर्डा'चें नेतृत्व त्याच्या हातीं सुपूर्द करण्यांत आलें. या बोर्डाचें काम बघत असतांना पूर्वानुभवाचा उपयोग करून त्यानें असाधारण कार्य करून दाखविलें. सॅनिटरी कमिशनवर नारूच्या संबंधांत दक्षिण संस्थानांतून पाहणीचें काम त्यानें केलें होतें. त्या वेळीं अनुभवानें ज्या तत्त्वांचा त्यानें स्वीकार केला होता व तदनुसार कार्यपद्धति अंगिकारिली होती, त्यांचीच योजना जगांत सर्वत्र करणें शक्य आहे, असें या वेळीं त्याच्या निदर्शनास आलें. मलेरियाचें समूळ उच्चाटन करण्यासाठीं दक्षिण राज्यांत त्यानें मोहीम आखली होती. आणि ती यशस्वी करून दाखविली होती. त्याच प्रयोगाची पुनरावृत्ति जगभर करणें शक्य आहे, असें त्याच्या मनानें घेतलें. आणि एका रोगाच्या बाबतींत शक्य झालें, तें इतर रोगांच्या संबंधांत शक्य होण्यास प्रत्यवाय नसावा, असें वाटल्यामुळें यलो फीव्हरशीं मुकाबला करण्याचें त्यानें ठरविलें. या वेळीं राकफेलर फाउंडेशनचें संशोधन, अनुभव आणि

उपयुक्त साधनवैपुल्य गांठीं होतें. त्यांच्या बळावर आफ्रिकेंत आणि दक्षिण अमेरिकेंत त्यानें पूर्वपाहणीसाठीं रोगतज्ज्ञांच्या तुकड्या रवाना केल्या. जगांतील मोक्याच्या ठिकाणीं सार्वजनिक आरोग्याचें शिक्षण देणारीं विद्यालयें त्यानें स्थापन केलीं. जगांतील निवडक चाळीस राष्ट्रांतून साक्षेपानें शोधिलेल्या विद्यार्थ्यांस फेलोशिप्स देऊन या विद्यालयांतून आरोग्य-शिक्षणासाठीं पाठवावें, म्हणजे शिक्षण पुरें झाल्यावर आपआपल्या देशांत ते परत जातील आणि सार्वजनिक आरोग्यक्षेत्रांत नवें नेतृत्व निर्माण करतील, असें त्याला वाटलें. आणि लगोलग अविलंबें जगद्व्यापी संघटना त्या कार्यासाठीं त्यानें निर्माण केली. स्वभावानें विलक्षण नम्र आणि विनयशील असलेल्या या माणसानें जगाच्या आरोग्यमोहिमेच्या इतिहासांत आपलें नाव सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेविलें आहे. केवळ या एका ध्येयवादी माणसाच्या प्रयत्नांमुळें जगभर रोगनिवारक वैद्यक साधनांचा फैलाव होण्यास मदत झाली, असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. देशादेशास विभागणाऱ्या सीमारेषा त्याच्या लेखीं असून नसल्या-सारख्याच होत्या. रोगाविरुद्ध उघडलेल्या या आघाडीचें नेतृत्व करीत असतांना त्याच्या मनांत विचार होता, तो फक्त लोकांचा. लोकांवर लादलेल्या राज्यकर्त्यांचा विचार त्याच्या खिजगणतींत नव्हता. १९२२ सालीं जनरल एज्युकेशन बोर्डाचा प्रेसिडेंट डॉ. बट्रिक सेवानिवृत्त झाला. आणि त्याची जागा रोजनें घ्यावी, असें त्याला सुचविण्यात आलें. 'हें विश्वचि माझें घर', अशी श्रद्धा अंतःकरणांत बाळगणारा हा माणूस—केवळ एका देशाच्या मर्यादेंत बंदिस्त राहून काम करण्याची कल्पना त्याला दुःसह वाटली. लगेच रॉकफेरला त्यानें विचारणा केली : "अमेरिकेंतील संयुक्त राज्यांच्या बाहेर शिक्षणाचें उपयुक्त काम करण्यासाठीं एखादी सहकारी संस्था स्थापून तिच्या हवालीं स्वतंत्र निधि करणें शक्य होईल काय?" आंतरराष्ट्रीय सेवेच्या क्षेत्रांत काम करावयाची संधि उपलब्ध होण्यासारखी असेल, तरच जनरल एज्युकेशन बोर्डाचें अध्यक्षस्थान घेण्याची त्यानें तयारी दाखविली. पण तत्पूर्वी त्याची प्राथमिक अट पुरी केली जाईल, अशी हमी त्याला हवी होती.

रोजच्या या मागणीस जनरल एज्युकेशन बोर्डाच्या विश्वस्तांनीं जोरदार पाठिंबा दिला. आणि खुद्द रॉकफेलरनें मोठ्या उत्साहानें त्याच्या मागणीचा पुरस्कार करण्याचें मनःपूर्वक आश्वासन दिलें. आपल्या मताकडे लोकांचीं मनें शांतपणें बळवून घेण्याची विलक्षण शक्ति रोजच्या संयमशील व्यक्तित्वांत होती. त्याच्या

तर्कशुद्ध प्रतिपादनामुळें लोक आपोआप भारल्यासारखे त्याच्या मतास मान मान देण्यास तयार होत. अशा रीतीनें १९२३ सालीं 'इंटरनॅशल एज्युकेशन बोर्ड' या संस्थेची रीतसर स्थापना करण्यांत आली. आणि लगेच संस्थेच्या कामास निश्चयपूर्वक सुरुवात झालीसुद्धां. या संस्थेचा विश्वस्त होण्यास आपण पात्र नाहीं, म्हणून स्वाभाविक नम्रतेनें रॉकफेलरनें विश्वस्तपदास नकार दिला. त्या वेळीं तो म्हणाला : "अशा या संस्थेच्या कारभारासाठीं कांहीं विशेष तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता आहे, असें मला वाटतें. आणि त्या ज्ञानाच्या अभावीं संस्थेचा सल्लागार होण्यांत मला कांहीं औचित्य दिसत नाहीं." पण तरीसुद्धां या नव्या कार्यास उदारपणानें जरूर ती सर्व मदत त्यानें आपुलकीनें दिली. या संस्थेसाठीं त्यानें दिलेल्या देणग्यांच्या रकमा त्यांजवरील व्याजासुद्धां जवळजवळ दोन कोटी ऐंशीं लक्ष डॉलर्सच्या होत्या.

रॉकफेलरनें हा जो निधि या नव्या संस्थेच्या स्वाधीन केला, तो दहा वर्षांच्या आंतच उपयोगांत आणण्यांत आला. रोज १९२९ सालीं सेवानिवृत्त झाला. त्याच्या तत्पूर्वी पांच वर्षांच्या कारकीर्दींत या निधीचा अधिकांश भाग रोजच्या मागणीवरून संस्थेस देण्यांत आला होता. या बोर्डाचें आयुष्य अल्पजीवी ठरलें असलें, तरी त्या अल्पावधींत बौद्धिक क्षेत्रांत या संस्थेनें अशी कांहीं मौल्यवान् कामगिरी बजावली कीं त्याचें नांव जगभर सर्वत्र गाजलें. या बोर्डाच्या एकूण कार्यसिद्धीचें मूल्यमापन करण्यास हें स्थळ योग्य नव्हे. या बोर्डाच्या कामगिरीचें यथार्थ मूल्यमापन जॉर्ज डब्ल्यू. ग्रेनें इतरत्र केलें आहे. तो लिहितो :

"इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डाच्या एकूण कामाची नुसती आंकडेवारीनें तपासणी केली, तरीसुद्धां या बोर्डाच्या कामाचा योग्य तो अंदाज सहज घेतां येईल. एकूण ५७ विद्यापीठें, संशोधन केंद्रें आणि तत्सम शिक्षणसंस्था यांना बोर्डानें साहाय्य केलें. नियुक्त कामांसाठीं जरूर त्या नव्या इमारती आणि आवश्यक ती साधानसामग्री बोर्डाच्या निधींतून उपलब्ध झाली. त्यामुळें भविष्यकाळांतील त्यांची उपयुक्तता ध्यानांत घेऊन काळजीपूर्वक निवडलेल्या ६०३ अभ्यासकांस विशिष्ट क्षेत्रांतील जागतिक कीर्तीच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीं निर्वेधपणें अभ्यास करण्याची संधि मिळाली. शास्त्रसंशोधनास सर्वस्वीं अनुकूल अशा परिस्थितींत नवें नवें संशोधन मार्गस्थ झालें. या विश्वव्यापी योजनेमुळें यूरोप, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका या पांचहि

खंडांतील एकूण ३३ राष्ट्रांच्या प्रतिनिधींस उच्चतर ज्ञानाचीं अस्पृष्ट क्षितिजें खुलीं झालीं."

कॅलिफोर्नियांतील माउंट पालोमारवर २०० इंची टेलिस्कोप सामावणारी वेधशाळा रोजच्या प्रयत्नांमुळेंच प्रामुख्यानें अस्तित्वांत आली. या कामीं जो अवाढव्य पैसा ओतावा लागला, त्यापैकीं कांहीं फार मोठ्या रकमा जनरल एज्युकेशन बोर्ड आणि रॉकफेलर फाउंडेशनच्या नांवें शेवटीं खर्ची पडल्या. माउंट विल्सनवर १०० इंची टेलिस्कोप जॉर्ज एलेरी हेल नामक खगोलशास्त्रज्ञानें बसविला होता. आणि त्याच्या साहाय्यानें रोजनें या अजस्र वेधशाळेची आंखणी केली होती.

सृष्टिशास्त्राच्या संबंधांत रोजनें ज्या प्रकारचें मौल्यवान कार्य केलें, त्याच प्रकारचें कार्य शेतीच्या संबंधांत त्यानें केलें. अनेक मोठ्या राष्ट्रांतून संशोधन केंद्रांच्या निर्मितीस आणि प्रगतीस त्यानें साहाय्य केलें. आणि शेतीच्या संबंधांतील अद्ययावत् ज्ञानाची देवाणघेवाण राष्ट्रांराष्ट्रांतून सुकर व सुलभ व्हावी, एतदर्थ त्यानें भगीरथ प्रयत्न केले. ३१ राष्ट्रांतून साक्षेपानें निवडलेल्या २२३ विद्यार्थ्यांस स्वतःच्या व्यतिरिक्त इतर राष्ट्रांतील प्रगत शेतकामांचीं प्रात्यक्षिकें बघावयास मिळतील, अशी व्यवस्था त्यानें केली. नव्या ज्ञानानें संपन्न झालेले हे विद्यार्थी आपापल्या मायदेशीं परतल्यावर तेथें शेतकामाच्या संशोधनाचें नेतृत्व पत्करतील, अशा अपेक्षेनें ही उपयुक्त योजना कार्यान्वित करण्यात आली होती.

थोरला रॉकफेलर, त्याची पत्नी आणि तिचे आईबाप—या सर्वांस नीग्रो लोकांच्या अनेकविध प्रश्नांत रस होता. त्यांच्या शिक्षणाच्या आणि कल्याणाच्या अनेकविध कार्यांत या सर्वांनीं मनःपूर्वक लक्ष घातलें होतें. गुलामगिरीचें उच्चाटन करण्यासाठीं करण्यांत आलेले यत्न, त्यांतून निर्माण झालेली यादवी, नीग्रोंना गुलामगिरींतून मुक्त करण्यासाठीं मानवतावादी सत्पुरुषांनीं केलेलें सक्रिय मार्गदर्शन, या सर्वांचा ठसा क्लीव्हलँडमधील युक्लिड ॲव्हेन्यूवरील रॉकफेलरच्या घरांत स्पष्ट उमटलेला होता. पूर्वकाळांतील आठवणींनीं रॉकफेलर व स्पेल्मन कुटुंबांतील वृद्धांचीं मनें भारावलेलीं होतीं. आणि लिंकनच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनीं जरी त्याचा जन्म झालेला असला तरी रॉकफेलर कुटुंबांतील वातावरण असें होतें कीं, 'जॉन ब्राउन्स बॉडी' या गीताचें आवाहन त्याच्या मनास सहज स्पर्श करून जावें.

नीग्रोंच्या संबंधांत जो एक उदार दृष्टिकोण या उभय कुटुंबांनीं आपला मानला

होता, त्याचा विशेष परिणाम रॉकफेलरच्या मनावर झालेला होता. किंबहुना असें म्हणतां येईल: कीं त्याच्या सर्व आयुष्यांत असा असाधारण, मनस्वी परिणाम घडवून आणणारी अन्य कोणतीच गोष्ट नव्हती. तो परिणाम आजन्म कायम टिकणारा असा होता. लहानपणीं आपल्या मातापितरांबरोबर हॅम्प्टन इन्स्टिटयूट आणि स्पेलमन कालेज बघण्यासाठीं त्याला नेण्यांत आलें होतें.—स्पेलमन कॉलेज हें नावसुद्धां त्याच्या आजीच्या स्मरणार्थ दिलेलें होतें.—हॅम्प्टन येथें थोरल्या रॉकफेलरनें आपल्या मुलाच्या नांवानें एक शिष्यवृत्ति विकत घेतली होती. याचा अर्थ असा कीं तेथील एका विद्यार्थ्याचें शिक्षग त्याच्या पुत्राच्या खर्चानें होणार होतें. तदनंतर अनेक वर्षें हे दोघेजण पत्रव्यवहारानें परस्परांशीं संबध जोडून होते. वस्तुस्थिति अशी आहे कीं रॉकफेलर पत्रव्यवहारांत नीग्रो कल्याणाचे निर्देश जसे विपुलतेनें आढळतात, तसे दुसऱ्या कोणत्याच विषयासंबंधीं आढळत नाहींत.

हा सर्व इतिहास लक्षांत घेतां रॉकफेलरनें प्रथमपासून नीग्रो प्रश्नांत जातीनें लक्ष घालावें आणि नीग्रोंच्या शिक्षणकल्याणासाठीं तनमनधनानें झटावें, हें स्वाभाविकच होतें. जनरल एज्युकेशन बोर्डाचा कित्येक वर्षें तो चेअरमन होता. आणि या कार्यासाठीं द्यावयाच्या आपल्या सर्व वैयक्तिक देणग्या त्यानें या बोर्डाच्या स्वाधीन केल्या. अटलांटामधील मुलींसाठीं चालविलेलें स्पेल्मन कॉलेज आणि टस्केगी हॅम्प्टन येथील मुलींचीं महाविद्यालयें व अर्बन लीग, फिलिप्स व्हीटले ॲसोसिएशन यांसारख्या संस्था शिक्षणक्षेत्रांत जें थोर कार्य करीत होत्या, त्या कामांत पहिल्यापासूनच त्याचें लक्ष सदाचें गुंतलेलें होतें. विशेषेंकरून स्पेल्मन कॉलेजविषयीं त्याच्या मनांत विशेष आपुलकी व जिव्हाळा होता. आणि अनेक वेळां या संस्थेस तो सहकुटुंब भेट देत असे.

हॅम्प्टन इन्स्टिटयूटला राकफेलरनें फार मोठ्या प्रमाणांत आर्थिक साहाय्य दिलें. या संस्थेस त्यानें दिलेल्या कांहीं मोठमोठ्या देणग्या कांहीं विशेष कारणांसाठीं खास दिलेल्या आहेत, असें आढळून येतें. उदाहरणार्थ, हॅम्प्टनमधील प्रार्थना-संगीत-गायकांचा जथा त्यानें आपल्या खर्चानें यूरोपच्या प्रवासास पाठविला. हेतु असा कीं, 'नीग्रो वंशांतील अंगभूत कलाकर्तृत्वाची ओळख युरोपियन लोकांस व्हावी. आणि गोऱ्यांना काळ्यांचा अधिक परिचय व्हावा.' त्याचप्रमाणें हॅम्प्टन इन्स्टिटयूटच्या एका वर्धापनसमारंभासाठीं दक्षिणोत्तर विद्यापीठांच्या वरच्या वर्गांतील १५० स्त्री-पुरुष विद्यार्थ्यांस त्यानें आमंत्रण देऊन बोलावून घेतलें. या संबंधांत हॅम्प्टन इन्स्टिटयूटच्या प्रेसिडेंटनें लिहून ठेविलें आहे: "काळया-

गोऱ्यांमधील समज योग्य रीतीनें वाढीस लागावा व एकमेकांचा निकट परिचय व्हावा, या हेतूनें योजिलेलें हें कार्य मनस्वी स्तुत्य होतें."

आपल्या कोणत्याहि एका कृतीनें—मग ती देणगी असो, पत्र असो किंवा भाषण असो—एखाद्या नीग्रो कल्याण संस्थेचा फायदा होणार असेल तर त्या कृतीचें महत्त्व जाणून तो ती तत्काळ करीत असे. उदाहरणार्थ, १९२८ सालीं नॅशव्हील येथें फिस्क विद्यापीठांत रॉकफेलरनें उद्घाटनाचें भाषण केलें. या विद्यापीठाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. नॅशव्हीलमधील यादवी युद्धानंतर गुलामांच्या बाजारांतील गंजत पडलेल्या बेड्यांची रास जुन्या लोखंडाच्या भावांत विकून आलेल्या पैशांतून पहिलीं स्पेलिंगचीं बुकें साक्षरतेच्या वर्गासाठीं विकत घेण्यांत आलीं होतीं. कदाचित् अत्युत्साहाच्या भरांत संस्थेचा प्रेसिडेंट डॉ. टॉमस ई. जोन्स या संबंधांत म्हणाला, "नीग्रोंचें फिक्स विद्यापीठ आणि नॅशव्हीलमधील गोरे नागरिक यांच्या परस्परसंबंधांत अविश्वासाची आणि कटुतेची जी भावना होती, ती रॉकफेलरच्या भाषणानें समूळ उपटून निघाली." याच संदर्भांत एका वृत्तपत्रांत खालील टीका प्रसिद्ध झाली :

> "रॉकफेलरच्या भाषणाच्या वेळीं एक उल्लेखनीय घटना घडून आलेली दिसली. नॅशव्हीलच्या इतिहासांत प्रथमच काळ्या-गोऱ्यांतील भेदरेषा जवळ-जवळ पुसून नाहींशी झाल्यासारखें दिसलें...ज्या स्त्री-पुरुषांनीं फिक्स विद्यापीठाच्या आवारांत कधीं चुकून पाऊल टाकलें नसतें, तेच लोक या वेळीं भोजनगृहांत रॉकफेलरच्या जवळपास वावरण्याची संधि मिळावी म्हणून सर्वांत गरीब अशा नीग्रोच्या शेजारीं जागा शोधण्यासाठीं धडपडत असलेले दिसले."

वस्तुस्थिति अशी होती कीं या वेळीं रॉकफेलरच्या नांवास फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. आणि एखाद्या विशिष्ट कार्याशीं त्याचें नांव निगडित झालेलें दिसलें तर ती घटना त्यानें दिलेल्या एखाद्या मोठ्या देणगीसारखीच प्रभावी ठरत असे. रॉकफेलरच्या नांवाचें हें असाधारण महत्त्व प्रथम समजून घ्यावयास हवें. उदाहरणार्थ, 'युनायटेड नीग्रो कॉलेज फंड' जेव्हां रॉकफेलरच्या नांवानें मदत मागण्यासाठीं लोकांसमोर आला, तेव्हां केवळ त्या एका नांवानें त्या निधीस अशी विलक्षण चालना दिली कीं अन्यथा ती प्राप्त होणें अशक्यप्राय होतें. एकूण ३२ शिक्षणसंस्था या निधीचें नांव पुढें करून जनतेकडून आर्थिक साहाय्याची

मागणी करीत होत्या. तो काळ असा होता कीं वाढत्या किंमतींमुळें नीग्रो युवकांस शिक्षण देणाऱ्या श्रीमान् खाजगी संस्थांचें भवितव्यसुद्धां तेव्हां धोक्यांत आलेलें दिसत होतें. अशा स्थितींत परस्परांच्या सहकार्यानें मदतनिधि उभा करण्याची कल्पना जी आकारास आली, ती केवळ भयाच्या पोटीं. शिक्षणाचें उपयुक्त कार्य करणाऱ्या या संस्थांचें अस्तित्वच त्या काळांत धोक्यांत आलेलें दिसत होतें. संयुक्त मदतनिधि संघटित केल्यामुळें कांहीं विशेष फायदा पदरांत पडेल, अशी आशा खुद्द संघटकांच्या मनांत फारशी नव्हती. निर्वाणींच्या निराशेनें केलेला हा एक अंतिम यत्न होता.

पण या संकल्पित निधियोजनेवर स्वतः रॉकफेलरची श्रद्धा होती. केवळ आपल्या नांवाच्या प्रतिष्ठेचें पाठबळ निधीस देऊं करूनच तो थांबला नाहीं. युनायटेड नीग्रो कॉलेज फंडाच्या नॅशनल कौन्सिलचा अध्यक्ष म्हणून दहा वर्षें त्यानें मनःपूर्वक काम केलें. रॉकफेलर ज्या निधिसंस्थेचें नेतृत्व करीत होता आणि ज्या संस्थेच्या कामांत केवळ सेवावृत्तीनें तो अविश्रांत झटत होता, त्या संस्थेस पराष्ट्रांतील अनेक वजनदार नागरिकांचें साहाय्य त्यानें उपलब्ध करून दिलें. पत्रें लिहून आणि टेलिफोनवर बोलून त्यानें अनेकांस कार्यप्रवृत्त केलें. निधीच्या आघाडीवर सतत काम करण्यासाठीं संघटकांची एक फौज त्यानें उभारली. निधीच्या व्यवस्थेसाठीं व मार्गदर्शनासाठीं त्यानें कार्यक्षम अधिकारीवर्ग पैदा केला. स्वतःच्या सहीनें त्यानें लिहिलेल्या शेकडों पत्रांमुळें लहानमोठ्या देणग्यांचा सतत ओघ या निधीच्या दिशेनें वाहत राहिला. केवळ त्याच्या एकट्याच्या यत्नामुळें निधींत सहकारी झालेल्या संस्थांस आवश्यक तें आर्थिक साहाय्य सहज उपलब्ध झालें. कदाचित् आसन्नमरण झालेल्या नीग्रो शिक्षण-संस्थांस त्यानें जीवदान दिलें. त्याच्या यत्नांनीं संघटित झालेलें हें निधिकार्य असें जबरदस्त होतें कीं त्याचें अनुकरण करून इतर कित्येक खाजगी शिक्षणसंस्था हवा तेवढा निधि जमा करूं शकल्या असत्या. या नीग्रो निधीसाठीं त्यानें मुक्तहस्तानें मदत दिली. रॉकफेलरनें पैशाची मोठी देणगी दिली होती, असें म्हणण्यांत कांहीं विशेष स्वारस्य आहे अशांतला भाग नाहीं. कारण पैसा त्याच्या खिजगणतींत नव्हता. पण अनेक पत्रांतून, सभांतील भाषणांतून आणि रेडिओ-वरील निवेदनांतून याबाबत त्यानें जो दृष्टिकोण वारंवार प्रकट केला, तो विशेष उल्लेखनीय आहे. तो म्हणाला, "एक युद्ध आणि शांततेच्या संबंधांतील प्रश्न वगळले तर या देशासमोर आ वासून राहिलेला एकच एक सर्वांत मोठा प्रश्न

नीग्रोंचा आहे." एका राज्यांतील पुढाऱ्यांच्या भोजनप्रसंगीं केलेल्या भाषणाच्या ओघांत त्यानें प्रश्न विचारला: "युनायटेड नीग्रो कॉलेज फंडासाठीं काम करण्यांत मला मोठी धन्यता वाटते, असें मी कां मानतों?" आणि नंतर आपल्या या प्रश्नाचें त्यानें स्वतःच उत्तर दिलें :

> "पहिलें कारण असें कीं, आपल्या देशांतील एकूण लोकसंख्येच्या दहा टक्के लोकांचा हा प्रश्न आहे.
>
> दुसरें कारण असें कीं हें कार्य विधायक आहे. वादातीत आहे. केवळ शिक्षणसंबंधांतील आहे.
>
> आणि तिसरें कारण असें कीं अनेक नीग्रो शिक्षणसंस्थांच्या संयुक्त सहकार्यानें या निधीचें काम चालत आहे. एकूण बत्तीस महाविद्यालयांचें भवितव्य या निधीशीं निगडित झालेलें आहे. आपल्या हितचिंतकांचें वर्तुळ विस्तृत करावें आणि अशा शिक्षणसंस्थांच्या निर्वाहास आवश्यक असलेला पैसा उभा करावा, असा या फंडाचा हेतु आहे. खरें म्हणजे नीग्रो लोकांनीं या निधीची कल्पना कार्यवाहींत आणली, याबद्दल आपण गोरे लोक त्या आपल्या काळ्या बांधवांचे ऋणी आहोंत. या कार्याचें महत्त्व आपण सर्व जाणतांच. तेव्हां हें ऋण फेडण्यास आपण सर्वांनीं हातभार लावावा, हें उचित होय."

नीग्रोंच्या शिक्षणासाठीं उपयुक्त अशा आणि त्यांच्या संख्येच्या मानानें पुऱ्या पडतील, इतक्या शिक्षणसंस्था उपलब्ध करून देणें व त्यांच्या कार्यक्षम निर्वाहाची तरतूद लावणें, हे प्रश्न मोठेच होते. रॉकफेलरच्या मनांत नीग्रो शिक्षणाच्या प्रश्नास अग्रस्थान प्राप्त झालेलें होतें, यांत कांहीं शंका नाहीं. पण हें खरें असलें तरी या एकाच प्रश्नानें त्याचें अवघें चित्त व्यापिलें होतें, अशांतला भाग नाहीं. वर्णधर्मनिरपेक्ष मानवप्रगतीच्या संबंधांत तो जेव्हां बोले—आणि अनेक वेळां असें बोलण्याची संधि तो साधीत असे—तेव्हां गोऱ्यांचा शिक्षणाचा प्रश्न दृष्टीआड करून चालण्यासारखा नव्हता. नीग्रो शिक्षणाचा प्रश्न त्याला सर्वाधिक जिव्हाळ्याचा वाटत असे हें तर खरेंच, पण या कार्यासाठीं त्यानें जेवढा पैसा वेंचला, त्यापेक्षां किती तरी अधिक गोऱ्यांच्या शिक्षणापायीं त्यानें खर्ची घातला. ठराविक शिक्षण देण्यास बांधलेल्या शाळाकॉलेजांस तर त्यानें सढळ हातानें देणग्या दिल्याच, पण याव्यतिरिक्त लोकशिक्षणास मदत करणाऱ्या अनेकविध

कार्यास त्यानें मुक्तहस्तानें साहाय्य दिलें. ग्रंथालयें, ठराविक चाकोरीबाहेरील कांहीं विषयांचे अभ्यासक्रम, शाळाकॉलेजांतून ठराविक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त चालविण्यांत येणाऱ्या सांस्कृतिक चळवळी, इत्यादिकांत त्यानें विशेष रस घेतला आहे, असें त्याच्या पत्रव्यवहारावरून उघड होतें. जनरल एज्युकेशन बोर्ड आणि रॉकफेलर फाउंडेशन या तर उघड उघड कौटुंबिक-निधि संस्था होत्या. आणि त्यांच्या कार्यांत त्यानें किती व कसें लक्ष आणि साहाय्य दिलें, त्याचा वृत्तांत इतरत्र दिलेलाच आहे. पण उपर्युक्त दोन महान् संस्थांव्यतिरिक्त इतर कित्येक शैक्षणिक उद्योगांस त्यानें यथाशक्ति—आणि त्याची शक्ति काय व किती होती, त्याचें वर्णन करून सांगण्याची जरुरी नाहीं—योग्य तें साहाय्य यथाकाल देण्यांत कसूर केली नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर या उद्योगांचा त्यानें काळजीपूर्वक अभ्यास केला. आणि अशा कार्यांत त्यानें केवळ पैसा गुंतविला असें नव्हे, तर मनहि गुंतविलें.

शिक्षणक्षेत्रांतील हे उद्योग व प्रयोग अनेकविध होते. त्यांपैकीं प्रत्येकाचा साक्षेपानें विचार करून मदतयोग्य अशा कार्यास त्यानें योग्य ती मदत दिली. रॉकफेलर घराण्यास परंपरेनें हें दातृत्व प्राप्त झालेलें होतें. उदाहरणार्थ, त्याची आई बर्नार्ड कॉलेजच्या पहिल्या विश्वस्त मंडळाची सदस्य होती. आणि १८९६ पासून १९०३ सालापर्यंत थोरला रॉकफेलर या संस्थेस नित्य साहाय्य देत असे. आईबापांनीं ज्या शिक्षणसंस्थेस साहाय्य दिलें, त्या संस्थेस कुलपरंपरा स्मरून पुत्रानें तसेंच साहाय्य केलें. बर्नार्ड कॉलेजला आईबापांनीं एकूण जी रक्कम दिली होती, तिच्या सहापट अधिक रक्कम पुत्रानें या संस्थेपायीं खर्चीं घातली.

आपल्याला स्वतःला वैयक्तिक म्हणून ज्या देणग्या द्यावयाच्या किंवा कुलपरंपरा स्मरून ज्या देणग्या द्यावयाच्या, त्या सर्व जनरल एज्युकेशन बोर्डाच्या वतीनेंच दिल्या जाव्यात, असा सर्वसामान्य शिरस्ता होता. * पण रॉकफेलरची मातृसंस्था जी ब्राउन युनिव्हर्सिटी तिच्या बाबतींत मात्र रॉकफेलरनें या सामान्य नियमास अपवाद मानलेलें दिसतें. कारण या एका शिक्षणसंस्थेस त्यानें जेवढी मदत दिली,

---

* अमेरिकन विद्यापीठांस व महाविद्यालयांस जनरल एज्युकेशन बोर्डानें १९०३ पासून १९५४ सालपर्यंत एकूण २६,०७,६३,९११ डॉलर्सच्या देणग्या दिल्या. नीग्रो शिक्षणाप्रीत्यर्थ अनेक निधिसंस्थांच्या वतीनें एकूण ४,९१,१३,३३३ डॉलर्सच्या देणग्या देण्यांत आल्या. त्यांपैकीं अधिकांश भाग जनरल एज्युकेशन बोर्डानें खर्ची घातला.

तेवढी दुसऱ्या कोणत्याहि अमेरिकन विद्यापीठास वा महाविद्यालयास दिली नाहीं, असें दिसून येतें.

असाच आणखी एक अपवाद रॉकफेलरनें डार्टमथ कॉलेजच्या बाबतींत केलेला दिसतो. त्याचा एक मुलगा या कॉलेजमधून पदवी परीक्षेस बसला होता. या कॉलेजचा प्रेसिडेंट डॉ. अर्नेस्ट एम्. हॉप्किन्स याच्याविषयीं रॉकफेलरच्या मनांत गाढ आदरभाव होता. त्याच्याविषयीं रॉकफेलरनें एकदां लिहिलें होतें :

"कॉलेजच्या शोधांत असणारा तरुण विद्यार्थी जर मी असतों आणि कोणत्या कॉलेजमध्यें जावें, असा प्रश्न मला पडला असता, तर लगेच डॉ. हॉप्किन्स कोणत्या कॉलेजचा प्रेसिडेंट आहे, त्याची चौकशी मीं केली असती आणि त्या कॉलेजमध्यें मीं माझें नांव लगेच दाखल केलें असतें."

डॉ. हॉप्किन्सला पाठविलेल्या एका खाजगी पत्रांत रॉकफेलरनें लिहिलें होतें :

"डार्टमथ कॉलेजला मीं जी देणगी दिली, ती या संस्थेच्या कार्याविषयीं माझ्या मनांत श्रद्धा आहे म्हणून मीं दिली. पण त्या देणगीची रक्कम एवढी मोठी कां आणि ती देण्यांत मला मनापासून एवढा उत्साह कां वाटला, असें विचाराल तर या प्रश्नाचें उत्तर एकच आहे : शिक्षणतज्ज्ञ म्हणून आपल्याविषयीं व्यक्तिशः माझ्या मनांत नितांत आदरभाव आहे. माणूस म्हणून आपल्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आणि मित्र म्हणून माझ्या अंतःकरणांत आपल्याविषयीं विलक्षण जिव्हाळा आहे."

१९२७ सालीं जर्मनींतील हायडलबर्ग युनिव्हर्सिटीचा ५५० वा वर्धापन-दिन होता. त्या प्रसंगीं त्यानें त्या संस्थेस फार मोठी देणगी दिली. कॉर्नेल युनिव्हार्सिटीचा माजी प्रेसिडेंट आणि तदनंतर जर्मनींतील अमेरिकेचा राज्यदूत जेकब गुल्ड शूर्मन हा रॉकफेलरचा पुराणा मित्र होता. त्याच्या सांगण्यावरून रॉकफेलरनें आपली ही देणगी योग्य वेळीं जाहीर केली. जर्मनीचा इतिहास बहुतांशीं हायडलबर्गनें घडविलेला होता. आणि तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या संदर्भांत

जर्मनींतील या इतिहासप्रसिद्ध शिक्षणसंस्थेस एका अमेरिकन माणसानें देणगी दिल्यास तिचा परिणाम मनस्वी आनंददायक होईल, असें मत शूर्मननें व्यक्त केलें होतें. त्याच्या मतास मान देऊन रॉकफेलरनें ही उदार देणगी दिली होती.

मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि हार्वर्ड ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थांस रॉकफेलरनें ज्या मोठ्या देणग्या दिल्या, त्या मात्र उभय संस्थांची सार्वजनिक उपयुक्तता ध्यानांत घेऊन देण्यांत आल्या होत्या. जरी एम्. आय. टी. चा प्रेसिडेंट डॉ. कार्ल कॉम्टन आणि हार्वर्ड स्कूलचा माजी डीन डोनाल्ड के. डेव्हिड या दोघांविषयीं त्याच्या मनांत विशेष आदरभाव होता, तरी हा वैयक्तिक संबंध त्या देणग्या मिळविण्यास कारण झाला असें नाहीं. डेव्हिडला पाठविलेल्या एका पत्रांत तो लिहितो :

"आपल्या संस्थेच्या कार्याचा अभ्यास केल्यावर माझी अशी खात्री पटली आहे कीं आपली संस्था तांत्रिक शिक्षणाच्या उत्कर्षासाठीं झटत आहे. आणि उद्योगनेत्यांच्या मनांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व विकसित करण्याचा यत्न करीत आहे."

त्याचप्रमाणें नीअर ईस्ट कॉलेज ॲसोसिएशनला वेळोवेळीं त्यानें ज्या देणग्या दिल्या, त्या केवळ जेथें म्हणून अमेरिकन शिक्षापद्धति ठामपणें प्रतिष्ठापित झाली होती, तेथील कार्याचें त्याला जें महत्त्व वाटत होतें, त्याचें निदर्शक होय. नीअर ईस्ट कॉलेज ॲसोसिएशनमध्यें इस्तंबूल येथील रॉबर्ट कॉलेज आणि वुइमेन्स कॉलेज, बैरूत येथील अमेरिकन युनिव्हर्सिटी आणि अथेन्स व सोफाया येथील शाळा या शिक्षणसंस्थांचा प्रामुख्यानें समावेश झालेला होता. बैरूतमधील आधुनिक वैद्यकशाळा प्रस्थापित करण्यासाठीं रॉकफेलर फाउंडेशननें अगोदरच निर्णायक असे यत्न केलेले होते. आणि ज्या क्षेत्रांत रॉकफेलर फाउंडेशन एका विशिष्ट घटनेंत बांधल्यामुळें परिणामकारक असें साहाय्य देऊं शकत नव्हती, तेथें फाउंडेशनच्या कार्यक्षेत्राबाहेरील मदतयोग्य संस्थांस आवश्यक तें साहाय्य पोहोंचविण्यासाठीं रॉकफेलर स्वतः नेहमींच उत्सुक असे.

याव्यतिरिक्त आणखी कांहीं संस्थांच्या कार्यांत रॉकफेलरनें जातीनें लक्ष घातलेलें आढळून येतें. उदाहरणार्थ, दक्षिण चीनमधील लिंग्नान युनिव्हर्सिटी, कैरोमधील अमेरिकन युनिव्हर्सिटी, बेल्जियममधील लोवेन युनिव्हर्सिटी, स्विट्झरलँडमधील

जिनेव्हा युनिव्हर्सिटी, कॅनडामधील आकेडिया युनिव्हर्सिटी आणि खुद्द अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील वेल्स्ले, स्मिथ, माउंट होलिओक, ब्रीन, मॉर्न, प्रिन्सटन, टीचर्स कॉलेज, हार्वर्ड लॉ स्कूल, यांसारख्या आणखी दहावीस शिक्षणसंस्था त्याच्या दानकक्षेंत आलेल्या दिसतात.

केवळ महाविद्यालयें आणि विद्यापीठेंच त्याच्या दानकक्षेंत समाविष्ट झालेलीं होतीं असें नाहीं. शिक्षणाप्रीत्यर्थ त्यानें ज्या संस्थांस मोठाल्या देणग्या दिल्या, त्यांच्या लांबलचक यादींत इन्स्टिटयूट फॉर गव्हर्न्मेंट रीसर्च, इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, फाय बीटा कापा सोसायटी, आणि चीनमधील 'मास एज्युकेशन मुव्हमेंट' अशा संस्थांचीं नांवें निर्देशित केलेलीं आढळतील. ही नांवें सहज नजरेस पडलीं, तशीं दिलीं आहेत. ज्यांचा निर्देश येथें केलेला नाहीं, अशा आणखी किती तरी संस्थांस त्यानें सढळ हातानें उदार साहाय्य दिलें आहे, असें आढळून येतें. मानवकर्तृत्वाच्या अनेकविध क्षेत्रांत त्यानें संचार केलेला दिसतो. त्याच्या रुचीचें क्षितिज अमर्याद होतें. आणि योग्य कार्यास अवश्य तें साहाय्य करूं पाहणारी त्याची वृत्ति कधीं थकलेली दिसत नाहीं.

पांडित्याचा आव त्यानें कधीं आणला नाहीं. पण ग्रंथालयांविषयीं त्याच्या मनांत विशेष प्रीतिभाव होता. जिनेव्हा येथील राष्ट्रसंघाच्या ग्रंथालयवास्तूसाठीं करण्यांत यावयाच्या सर्व खर्चाचा पत्कर त्यानें एकट्यानें घेतला होता. अमेरिकन इतिहासाचीं मूलभूत साधनें उपलब्ध करण्यासाठीं लायब्ररी ऑफ काँग्रेसनें कांहीं योजना आंखली होती. विशेषतः अमेरिकेच्या इतिहासाचीं सहस्रावधि साधनें परदेशांतून विखुरलेलीं होतीं. आणि अमेरिकन संशोधकांस तीं सर्व प्रायः अप्राप्य अशीं होतीं. रॉकफेलरला या संशोधनकार्यांत मन घालावें, असें वाटलें. आणि तत्संबद्ध योजना कार्यान्वित करण्यासाठीं त्यानें बहुत पैसा वेंचिला. लायब्ररी ऑफ काँग्रेसनें सूचिसाधनें एकत्रित करण्याचें अजस्र कार्य हातीं घेतलें होतें. ही योजना आकारास येती तर अमेरिकेंतील सर्व खाजगी व सार्वजनिक ग्रंथालयांतील सूचि एकत्र पाहण्याची सोय संशोधकांस उपलब्ध होती. आणि या एकाच योजनेमुळें त्यांचे केवढे तरी श्रम वांचले असते. दुर्दैवानें या कार्यासाठीं देऊं केलेला निधि घेण्यास काँग्रेस नाराज दिसली. १९२७ सालीं रॉकफेलरनें या कार्याच्या पूर्तीसाठीं जवळ जवळ ७,००,००० डॉलर्स देऊं केले आणि या अर्थबळानें तें कार्य तडीस पोहोंचविलें.

ज्या नगरांत नागरिक म्हणून तो राहत होता, तेथील न्यूयॉर्क पब्लिक

लायब्ररीचें आव्हान त्याच्या मनास उत्कटतेनें पोहोंचलें असल्यास नवल नाहीं. जगांतील संदर्भ ग्रंथालयांत या महान् ग्रंथालयाचा क्रम अग्रभागीं आहे. या ग्रंथालयाजवळ सार्वजनिक निधि फार मोठ्या प्रमाणांत नाहीं. हें जाणून रॉकफेलरनें या ग्रंथालयाचें एकूण कार्य आणि त्याच्या विकासास आवश्यक असलेलें आर्थिक साहाय्य याबाबत काळजीपूर्वक गोळा केलेल्या माहितीचा साक्षेपानें अभ्यास केला. आणि तदनंतर नियोजित कार्यासाठीं आवश्यक तें सर्व आर्थिक साहाय्य पुरविण्याचें आश्वासन दिलें. या कार्यासाठीं वेळोवेळीं त्यानें ज्या देणग्या दिल्या, त्यांची एकूण बेरीज जवळ जवळ ३३,३०,००० डॉलर्सच्या घरांत जाईल. या संबंधांत या लायब्ररीच्या बोर्डाच्या चेअरमननें लिहिलें आहे: "रॉकफेलरच्या या सर्व देणग्या केवळ आश्चर्यकारक आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यानें या सर्व देणग्या स्वेच्छेनें, अयाचित, अशा दिल्या. कोणीं मदतीसाठीं आवाहन केलें आणि प्रतिसादरूपानें या देणग्या मिळाल्या, असें घडलेलें नाहीं. म्हणून त्या विशेष उल्लेखनीय होत. सार्वजनिक हितासाठीं ग्रंथालय कांहीं एक विशिष्ट काम करीत होतें. काम फार मोठें होतें. कदाचित् व्यवस्थापकांच्या आवाक्याबाहेरचें होतें. पण तें निष्ठेनें करण्यांत येत होतें. लोकहिताच्या या महान् कार्यास आपला हातभार लागावा, अशा अंतःप्रेरणेनें या सर्व देणग्या दिल्या गेलेल्या आहेत. आणि म्हणून त्यांचें महत्त्व विशेष होय."

ग्रंथालयसंबंधांतील सर्वच देणग्या केवळ ज्ञानप्रचाराच्या उदात्त उद्देशानें दिल्या गेल्या होत्या, असें नाहीं. उदाहरणार्थ, १९२३ सालीं एका क्रूर धरणीकंपाच्या धक्क्यानें टोकियोमधील इंपीरिअल युनिव्हर्सिटीचें महान् ग्रंथालय जमीनदोस्त झालें. त्या वेळीं रॉकफेलरच्या एका विश्वासू सहकाऱ्यानें पाठविलेल्या अहवालांत खालील सूचना होत्या:

> "माझी कल्पना अशी आहे कीं या वेळीं जपानी लोकांना त्यांचें ग्रंथालय पुन्हा बांधून देण्यासाठीं किंवा ग्रंथखरेदीसाठीं कोणीं कांहीं मोठ्या प्रमाणावर मदत देऊं केली, तर—हें कार्य फार मोठ्या योग्यतेचें होईल यांत शंकाच नाहीं, पण—अमेरिका व जपान या दोन महान् राष्ट्रांतील बंधुभाव वृद्धिंगत होण्यास त्यामुळें मोठें साहाय्य केलें असें होईल."

यासंबंधीं अधिक चौकशी केल्यावर असें आढळून आलें कीं तूर्त ग्रंथांपेक्षां

ते ग्रंथ सांठविण्याच्या जागेचीच अधिक नड आहे. लगेच नवें ग्रंथालय बांधण्यासाठीं रॉकफेलरनें ४ लक्ष येन—जवळजवळ १५ लक्ष डॉलर्स—देऊं केले. आपली ही देणगी देते वेळीं इंपीरिअल युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंटला रॉकफेलरनें जें पत्र पाठविलें, त्यांत त्यानें लिहिलें :

"माझी खात्री आहे कीं कालांतरानें जपानी लोक उद्ध्वस्त झालेलीं सर्व शहरें आणि जमीनदोस्त झालेल्या सर्व संस्था पुन्हा बांधून काढतील. पण असें असलें तरी सुद्धां, जगांतील अग्रगण्य अशा ग्रंथालयांपैकीं आपलें हें एक ग्रंथालय आहे आणि या ग्रंथालयास योग्य तें सर्व साहाय्य मिळून शक्य तों लवकर त्याची प्रतिष्ठापना व्हावी, असें सर्वांसच वाटेल. तो दिवस लवकर उजाडावा यासाठीं आपण मला कांहीं थोडी मदत करूं देण्याची परवानगी द्याल, तर त्यामुळें माझा मोठा सन्मान झाला, असें मला वाटेल."

१९०१ सालीं 'रॉकफेलर इन्स्टिटयूट फॉर मेडिकल रीसर्च' ही संस्था स्थापन करण्यांत आली. तेव्हांपासून, किंबहुना त्यापूर्वींपासूनच वैद्यकशास्त्रानें रॉकफेलरचें मन विशेष वेधून घेतलें होतें, असें दिसतें. पैशाचा सदुपयोग करण्याचे जे विविध मार्ग आहेत, त्यांच्यासंबंधीं सहज बोलत असतांना वैद्यक संशोधनाचा संदर्भ न चुकतां केल्यावांचून तो राहत नसे. वैद्यक संशोधन किंवा वैद्यकशास्त्राचा विकास असले जाडे शब्द तो फार करून वापरीत नसे. पैशामुळें आजारी माणसांना लवकर बरें करतां येतें असें तो म्हणावयाचा. गेट्स, डॉ. वेल्च, डॉ. फ्लेक्झनर यांच्यासारख्या द्रष्ट्यांच्या विचारांचा त्याच्या मनावर मनस्वी परिणाम झालेला होता, यांत शंकाच नाहीं. हें जसें खरें तसेंच ज्या मनोभूमिकेंत त्यांच्या विचारांचीं बीजें रुजलीं होतीं, ती मनोभूमिका बीजांच्या वृक्षविकासास सर्वस्वीं अनुकूल होती, हें पण तितकेंच खरें आहे. या ध्येयवादी, उदारमनस्क व्यक्ती त्याचें मन सहज वेधून घेऊं शकल्या, या घटनेंत त्या मनाचें म्हणून कांहीं एक विशिष्ट मोठेपण गृहीत धरावेंच लागतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं या संबंधांत त्याच्या मनाची पूर्वतयारी अगोदरपासूनच होऊन चुकली होती.

उदाहरणार्थ, इन्शुलिनच्या संशोधनाशीं रॉकफेलरचा संबंध जडला, त्या घटनेचा प्रस्तुत संबंधांत निर्देश करण्यासारखा आहे. १९२३ सालच्या मार्च महिन्यांत एके दिवशीं त्याच्या पुढ्यांतील टेबलावर एक पत्र अचानक येऊन पडलें. मदती-

साठीं याचना करणारीं अशीं असंख्य पत्रें दररोजच्या डाकेनें त्याच्या नांवें येऊन पडत. त्या दिवशींचें एक पत्र ब्रुकलिनमधील डब्ल्यू. जे. कर्न्स नामक एका पोस्टमननें लिहिलेलें होतें. नऊ वर्षांची त्याची मुलगी डायबेटिसनें आजारी होती. न्यूजर्सी राज्यांतील मॉरिसटाउनमधील फिजिॲट्रिक इन्स्टिटयूटमध्यें त्या वेळीं एक नवें इन्शुलिन उपलब्ध झालें होतें. टोरांटो येथील डॉ. फ्रेडरिक जी. बँटिंग नामक एका संशोधकानें नुकतेंच हें नवें इन्शुलिन शोधून काढलें होतें. आणि कर्न्सच्या मुलीला या नव्या इन्शुलिननें आश्चर्यकारक गुण आला होता. कर्न्सच्या पत्रांत स्वतःसाठीं त्याला कांहींसुद्धां मागावयाचें नव्हतें. त्याची बिचाऱ्याची साधी मागणी एवढीच होती कीं डायबेटिसच्या व्याधीनें हैराण झालेल्या असंख्य रोग्यांस रॉकफेलरनें—त्या काळीं दुर्मिळ असलेलें—हें नवें इन्शुलिन उपलब्ध करून द्यावें. आणि तें मिळविण्याची ज्या दुर्दैवी गरीब लोकांस शक्यता नसेल, त्यांच्यासाठींसुद्धां रॉकफेलरनें कांहीं तरी करून त्यांचा दुवा मिळेल, अशी योजना करावी.

कर्न्सचें हें पत्र अधिक माहिती मिळविण्याच्या उद्देशानें फाइल करण्यांत आलें. आणि लगेच त्यांतील मजकुराच्या संबंधांत अनेक पत्रें इष्ट दिशांस रवाना झालीं. परिणामीं 'हल्लीं जेवढ्या रोग्यांस हा नवा उपचार उपलब्ध होतो, त्यापेक्षां अधिक मोठ्या प्रमाणांत कित्येक व्याधिग्रस्तांस तो उपलब्ध करून देण्यासाठीं' म्हणून रॉकफेलरनें १५ लक्ष डॉलर्सची देणगी मंजूर करावी, अशी शिफारस त्याला करण्यांत आली. जवळजवळ याच वेळीं गेट्सनें हीच इन्शुलिन ट्रीटमेंट स्वतः घेतली होती. आणि त्यालासुद्धां तिच्यामुळें गुण आला होता. त्यानें पण रॉकफेलरला सुचविण्यांत आलेल्या योजनेस जोराचा पाठिंबा दिला. त्यानें लिहिलें :

> "आज स्थिति अशी आहे कीं हजारों तरुण माणसें आणि लहान मुलें डायबेटिसच्या विकारानें आजारी आहेत. आणि जर वेळींच सर्व डॉक्टर्सना हें नवें इन्शुलिन उपलब्ध होऊं शकलें नाहीं, तर ते सर्व दुर्दैवी रोगी बहुतकरून या रोगास बळी पडतील. ही भयंकर आपत्ति टाळावयाची असेल, तर हें नवें इन्शुलिन, सुरक्षित असें, देशांतील सर्व औषधांच्या दुकानांतून विक्रीसाठीं ठेवलें जाण्याची व्यवस्था अविलंबें होणें जरुरीचें आहे. आज केवळ कांहीं मोठ्या वैद्यककेंद्रांत हें इन्शुलिन मिळण्याची सोय आहे...जेथें कोठें अशी सोय आहे, तेथील हॉस्पिटल्स किंवा मेडिकल स्कूल्सजवळ हें नवें इन्शुलिन

रोग्यांस उपलब्ध करून देण्यास आवश्यक ती साधनसामग्री आहेच, असें नाहीं. नवें परिणामकारक इन्शुलिन उपलब्ध झालें खरें, पण हें औषध सर्व रोग्यांस उपलब्ध होऊं शकेल, अशी योजना जोंपर्यंत कार्यवाहींत येऊं शकत नाहीं तोंपर्यंत रोगप्रतिबंधक औषध असून नसल्यासारखेंच होय."

रॉकफेलरनें ही सूचना तात्रडतोब विचारांत घेतली. आणि लगेच सुचविलेली योजना कार्यान्वित करण्यासाठीं केवळ १५ लक्ष डॉलर्सची एक देणगी देऊनच तो थांबला नाहीं; या रकमेंत वेळोवेळीं त्यानें भर घातली. या सर्व देणग्या रॉकफेलर इन्स्टिटयूटच्या नांवें देण्यांत आल्या. आणि अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील व कॅनडांतील पंधरा प्रमुख उपचार-केंद्रांत त्यांची विभागणी करण्यांत आली. या देणग्यांचा उद्देश द्विविध होता. पहिला उद्देश हा कीं इन्शुलिन ट्रीटमेंटसाठीं हॉस्पिटल्समधून फ्री वॉर्ड पेशंट्सची संख्या वाढविण्यांत यावी, आणि दुसरा उद्देश असा कीं इन्शुलिन ट्रीटमेंटचा योग्य प्रचार करण्यासाठीं हॉस्पिटल्समधून खाजगी डॉक्टर्ससाठीं मोफत उपचारवर्ग काढण्यांत आणि चालविण्यांत यावेत. त्यामुळें नवी इन्शुलिन ट्रीटमेंट योग्य रीतीनें कशी देण्यांत यावी, त्याचें प्रत्यक्ष अनुभवजन्य ज्ञान सामान्य डॉक्टर लोकांस होईल. या संबंधांत न्यूयॉर्क टाइम्सनें लिहिलें : "रॉकफेलर केवळ उदार आहे, असें नाहीं. तर तो शहाणा आहे. त्याच्या योजनेमुळें आज ज्या रोगग्रस्तांस इन्शुलिनचा लाभ मिळणें दुरापास्त आहे, त्यांना तो सहज प्राप्त होईल. आणि आज जे रोगी आसन्नमरण आहेत किंवा मरणाच्या दिशेनें वाटचाल करीत आहेत, ते रोगमुक्त होतील."

दुसरें उदाहरण कॅन्सरच्या संबंधांतील आहे. कॅन्सरची व्याधि अजूनपर्यंत दुःसाध्य समजली जाते. एका आकस्मिक दुर्दैवी घटनेमुळें रॉकफेलरचें लक्ष कॅन्सरच्या संशोधनाकडे वळलें. त्याबाबत विचारणा केली असतां तो म्हणाला :

"कॅन्सर संशोधनांत मीं जाणून लक्ष घातलें, या घटनेचा संबंध माझ्या एका मैत्रिणीच्या दुर्दैवी मृत्यूशीं पोहोंचतो. तिचें नांव बेसी डॅशैल. लेफर्ट्स डॅशैलची ही बहीण. ब्राउनमध्यें ती माझ्या वर्गांत होती. ज्या मुलींशीं माझी पहिल्यानें ओळख झाली, त्यांपैकीं ही एक. मला ती भारी आवडत असे. तिच्याबरोबर मी घोड्यावरून रपेट करीत असें. मोटरमधून आम्ही कित्येकदां बरोबर भटकत असूं. अलास्काला ती गेली होती, तेव्हां तिच्या हाताला कांहीं

दुखापत झाली. आणि त्या व्रणांत कॅन्सरचा प्रादुर्भाव झाला. मागून तिचा तो हात समूळ तोडावा लागला. आणि शेवटीं त्यांतूनच तिचें मरण ओढवलें. तिच्या मरणाची वार्ता माझ्या कानीं आली, तेव्हां मला धक्काच बसला."

रॉकफेलर कुटुंबाचा पत्रव्यवहार चाळीत असतां एक गोष्ट ध्यानांत आली ती ही कीं, कॉलेजचें शिक्षण संपतें आहे तोंच कॅन्सरच्या संशोधनांत त्यानें लक्ष घातलें. डॉ. विल्यम बी. कोले हा कॅन्सर संबंधांतील त्याचा पहिला सल्लागार. न्यूयॉर्क कॅन्सर हॉस्पिटलमध्यें तो काम करीत असे. १८८४ सालीं या हॉस्पिटलची स्थापना करण्यांत आली होती. आणि आज हेंच कॅन्सर हॉस्पिटल 'मेमोरिअल सेंटर फॉर कॅन्सर ॲण्ड अलाइड डिसीझेस' या नांवानें प्रख्यात आहे. थोरल्या रॉकफेलरचें कॅन्सरसंबंधांत विशेष लक्ष नव्हतें: पण पुत्राच्या आग्रहावरून हॉस्पिटलच्या संशोधनकार्यासाठीं दर वर्षी निनांवी देणग्या देण्यास त्यानें संमति दिली. आणि त्याप्रमाणें प्रतिवर्षी हॉस्पिटलच्या संशोधनकार्यासाठीं रॉकफेलरकडून मिळणाऱ्या निनांवी देणग्यांचा ओघ सतत, अखंड चालू राहिला. या संशोधन कार्यांत गुंतलेल्या अनेक संशोधकांतील एक डॉ. जेम्स एविंग हा होता. त्याचा निर्देश येथें एवढ्यासाठीं केला आहे कीं कालांतरानें हाच डॉ. एविंग मेमोरिअल हॉस्पिटलचा प्रमुख झाला. संकल्पित संशोधनास अवश्य ती सर्व मदत देण्यास रॉकफेलर स्वतः उत्सुक होता. त्याचा एक सहकारी स्टार जे. मर्फी यानें खालील शब्दांत संशोधनांतील अडचणींची रॉकफेलरला योग्य ती कल्पना वेळींच दिली. आणि तीसुद्धां १९०६ सालांत.

"कॅन्सरसारख्या असाध्य रोगाच्या संशोधनांत कोणकोणत्या अडचणी आल्या, त्यांची यथार्थ कल्पना आपणांस वेळींच आणून देण्याच्या उद्देशानें हें लिहीत आहें. कदाचित् इष्ट तो परिणाम मिळविण्याच्या अपेक्षेनें, मला इष्ट दिसेल त्या संशोधनांत पुष्कळच वेळ घालवावा लागेल. आणि त्यापायीं काळ, श्रम व पैसा यांचा व्यय मला खिजगणतींत मुळींच घेतां येणार नाहीं. कॅन्सरच्या संबंधांत आजवर ज्यांनीं म्हणून संशोधन केलें आहे, ते सर्व हताश होऊन एकमतानें आज कबुली देत आहेत कीं या रोगाविषयीं आपणांस मुळींसुद्धां ज्ञान झालेलें नाहीं. आणि तो बरा करण्याच्या संबंधांत आजवर कांहींसुद्धां प्रगति झालेली नाहीं. तेव्हां प्रारंभापासूनच अनेकविध

वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून या प्रश्नाचा विचार करावा लागेल. प्रारंभीं कांहीं आशा दाखवतील आणि अंतीं सर्वस्वीं निराश करतील, असे अनेक प्रयोग प्रथम हातीं घेऊन शेवटीं सोडून द्यावे लागतील. पण माझी अशी खात्री आहे कीं आपण धीर सोडला नाहीं आणि सतत प्रयत्न करीत राहिलों, तर उपलब्ध झालेल्या व होत असलेल्या सर्व साधनांनिशीं या भयंकर रोगाशीं आपण झुंज देऊं; व अंतीं मनांत धरलेली इच्छा पुरी करूंच करूं."

१९१३ सालीं 'अमेरिकन सोसायटी फॉर दि कंट्रोल ऑफ कॅन्सर' या संस्थेची न्यूयार्कमध्यें स्थापना करण्यांत आली. कॅन्सरच्या संशोधनांत ज्यांना रस होता, असे कांहीं सभ्यजन एकत्र येऊन त्यांनीं या संस्थेचा पाया घातला. प्रारंभीं संस्थेच्या प्रवर्तकांचा उद्देश कॅन्सरची उपलब्ध माहिती लोकांस करून द्यावी, एवढ्यापुरताच मर्यादित होता. टॉमस एम्. डेबेव्हॉइज—हा नंतर रॉकफेलरचा वैयक्तिक सल्लागार झाला—सोसायटीचा सेक्रेटरी म्हणून निवडला गेला. आणि १९३२ सालपर्यंत तो हें काम दक्षतापूर्वक पाहत होता. जवळजवळ वीस वर्षें या संस्थेची एकनिष्ठ सेवा त्यानें केली. रॉकफेलर दांपत्याचा एक निकट स्नेही रॉबर्ट जी. मीड हा पण पूर्वोक्त संस्थेच्या उद्घाटनाच्या सभेस उपस्थित होता. ही संस्था स्थापन झाली, त्या दिवसापासून वेळोवेळीं रॉकफेलरनें हवी तशी मदत या संस्थेस देऊं केली. त्याच्या अभिवचन-पत्रांची सुरुवात बहुतकरून अशा एखाद्या वाक्यानें केलेली आढळते : "आपण आणि आपले सहकारी जें कार्य करीत आहांत, त्याचें महत्त्व मी मनःपूर्वक जाणतों. आपल्या कार्याची मला कदर आहे. कॅन्सरमुळें ओढवणाऱ्या मृत्युसंख्येंत आपल्या संशोधनामुळें कधीं तरी आळा पडेल, अशी उमेद मी मनांत बाळगून आहें. आपलें कार्य स्तुत्य आहे. त्यास अल्पशी मदत म्हणून मी देत असलेल्या खालील..."

मध्यंतरीं याहून अधिक महत्त्वाकांक्षी अशा एक महान् यत्नांत त्यानें आपलें लक्ष गुंतविलें होतें. कॅन्सरच्या संबंधांत आपली सेवा अधिकांत अधिक कोणत्या रीतीनें फलदायी होईल तें जाणण्याच्या इच्छेनें रॉकफेलर इन्स्टिट्यूटचा डॉ. जेम्स बी. मर्फी याचा त्यानें सल्ला विचारला. मर्फीचा सल्ला महत्त्वाचा पण अगदींच त्रोटक होता. त्यानें सांगितलें : "मेमोरिअलच्या एविंगला मदत करा." त्याच्या सल्ल्याप्रमाणें रॉकफेलरनें वागण्याचें ठरविलें. १९२७ सालच्या मार्च महिन्यांत डेबेव्हॉइजनें एविंगला जें पत्र लिहिलें, त्याची सुरुवात अशी होती :

"रॉकफेलरच्या सांगण्यावरून मी हें पत्र लिहीत आहें. पुढील पांच वर्षें दरसाल ६०,००० डॉलर्स मेमोरिअल हॉस्पिटलला देण्याचें त्यानें ठरविलें आहे. या देणगींतील एकूण रकम ३,००,००० डॉलर्स होईल. दरसाल मिळणाऱ्या या देणगीचा उपयोग खालीलप्रमाणें करावा :

| | |
|---|---|
| प्रयोगशाळेसाठीं पगार | २५,००० डॉलर्स |
| नर्सिंग खातें | १०,००० डॉलर्स |
| फुल टाइम डॉक्टर्स | २५,००० डॉलर्स." |

कालांतरानें या संकल्पित देणग्यांच्या रकमांत वेळोवेळीं आवश्यक तशी वाढ करण्यांत आली. पण मध्यंतरीं अशी एक घटना घडली कीं तिचें वर्णन खुद्द रॉकफेलरच्या शब्दांत उद्धृत करणेंच युक्त होईल. जनरल एज्युकेशन बोर्डाचा प्रेसिडेंट ट्रीव्हॉर आर्नेट यास उद्देशून रॉकफेलरनें हें पत्र लिहिलें आहे :

"गेलीं कित्येक वर्षें मी कॅन्सरच्या प्रश्नांत गढून गेलों आहें. कांहीं दिवसांपूर्वीं या प्रश्नाबाबत मी काय मदत करूं शकेन, म्हणून तज्ज्ञांस विचारलें. कॅन्सर सोसायटीचा अधिकारीवर्ग, डॉ. फ्लेक्झनर इत्यादिकांचा त्याबाबत मीं सल्ला घेतला. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं मेमोरिअल हॉस्पिटलमध्यें डॉ. एविंग सध्यां कॅन्सरचें संशोधन-उपचार यासंबंधांत अत्यंत महत्त्वाचें कार्य करीत आहे. केवळ एवढेंच करून तो थांबला आहे असें नाहीं; तर कॅन्सरशीं परिणामकारकपणें मुकाबला करूं शकतील, असे डॉक्टर्स व नर्सेस यांना योग्य तें शिक्षण तो तेथें देत आहे.

हें कळल्यावर डॉ. एविंगचे प्रयत्न त्वरित फलदायी व्हावेत, या उद्देशानें मेमोरिअल हॉस्पिटलला दरसाल ६०,००० ते १,००,००० डॉलर्सपर्यंत मी देत आलों आहें. ही मदत अजूनपर्यंत चालूच आहे. आणि माझा असा विश्वास आहे कीं मीं दिलेली ती मदत सत्कारणीं लागत आहे.

यासंबंधीं आणखी काय करतां येईल, त्यासंबंधीं विचार करीत असतां असें वाटलें कीं केवळ कॅन्सरच्या संशोधनास वाहिलेलें असें एखादें अद्ययावत् हॉस्पिटल असणें अवश्यक आहे. याविषयीं अनेक वर्षें मी विचार करीत होतों. संबंधितांशीं वाटाघाटी करीत होतों. डॉ. वेल्च आणि डॉ. फ्लेक्झनर या उभयतांनीं या वाटाघाटींत महत्त्वाचें आणि उपयुक्त असें पुष्कळच साहाय्य

केलें. अखेरीस आम्हीं तोड काढली ती अशी, मेमोरिअल हॉस्पिटल आणि न्यूयॉर्क हॉस्पिटल यांनीं शक्य तों परस्परांच्या साहाय्यानें संयुक्त कार्य करावें. त्यामुळें कॅन्सरचा अभ्यास व उपचार अधिक परिणामकारक रीतीनें होऊं शकतील. कागदावर ही कल्पना सयुक्तिक दिसते. पण अडचण अशी आहे कीं दोन्ही हॉस्पिटल्स परस्परापासून फार दूर अंतरावर आहेत आणि जर उभयतांमध्यें परिणामकारक सहकार्य प्रस्थापित व्हावयाचें असेल, तर मेमोरिअल हॉस्पिटल न्यूयॉर्क हॉस्पिटलजवळ असणें केवळ अत्यावश्यक आहे. हें सहकार्य साधण्यासाठीं गेलीं कित्येक वर्षें एक विवक्षित जागा डोळ्यांसमोर ठेवून तेथील जागा मिळतील तशा खरीदण्याचा उद्योग मी करीत आहें. पूर्वेस ॲव्हेन्यू ए, पश्चिमेस फर्स्ट ॲव्हेन्यू, उत्तरेस सिक्स्टीएट्थ स्ट्रीट आणि दक्षिणेस सिक्स्टीसेव्हन्थ स्ट्रीट, या कक्षांनीं मर्यादित केलेली ही जागा आहे. हें सर्व साधण्यासाठीं मला आणखी एक खटाटोप करावा लागला. या जागेंतच फर्स्ट ॲव्हेन्यूच्या एका टोकाला न्यूयॉर्क ट्रेड स्कूलची इमारत होती. ती तेथून हलवून दुसऱ्या सोयिस्कर ठिकाणीं पुन्हा बांधून देण्याचें काम मला करावें लागलें. मि. आर. फुल्टर गटिंगची ही संस्था. या जागेंतील इतर सर्व इमारती पाडून तेथील सर्व जागा मीं आतां मोकळी करून घेतली आहे. या कामापायीं आजवर बिनव्याजीं एकूण ३० लक्ष डॉलर्स मीं खर्चीं घातलेले आहेत.

...सुमारें एक वर्षापूर्वी मीं ही जागा रॉकफेलर इन्स्टिटयूटच्या हवालीं करून दिली. हेतु असा कीं त्या जागेवर मेमोरिअल हॉस्पिटलची नवी इमारत बांधण्यासाठीं पुरेसा पैसा उपलब्ध झाला कीं लगेच हॉस्पिटलच्या नव्या इमारतीसाठीं योजिलेली ही जागा आपल्याजवळ जय्यत तयार असावी....

...या जागेपासून न्यूयॉर्क हॉस्पिटल अगदीं जवळ आहे. आणि फक्त मधला रस्ता ओलांडला कीं रॉकफेलर इन्स्टिटयूटच्या समोर कॉर्नेल मेडिकल स्कूलची इमारत आहे. मला असा विश्वास वाटतो कीं या तिन्ही वैद्यक संस्था अशा रीतीनें एकमेकांस जवळ झाल्या, तर त्यांच्यामधील सहकार्य अधिक निकट आणि सुकर होईल. अगोदरपासूनच या तिन्ही वैद्यक संस्थांमध्यें परस्पर स्नेहाचें आणि सहकार्याचें वातावरण आहे. नव्या जागेंत मेमोरिअल हॉस्पिटलची नवी वास्तु उभी राहिली तर कॅन्सरच्या संशोधनास अत्यंत उपयुक्त असें साहाय्य देण्यास ती समर्थ होईल. आणि कॅन्सरवरील परिणामकारक उपाययोजनेच्या

कार्मी तिची फार चांगली मदत होईल. गेलीं कित्येक वर्षें हा विश्वास मनांत बाळगून आणि या प्रश्नाचा सतत काळजीपूर्वक विचार व अभ्यास करून मीं ही योजना मनाशीं निश्चित केली. आणि अनेक वर्षें परिश्रम करून अखेरीस ही जागा पैदा करण्यांत यश मिळविलें...जनरल एज्युकेशन बोर्डानें आजवर वैद्यकाचें शिक्षण, संशोधन व त्यासाठीं आवश्यक त्या प्रयोगशाळा व हॉस्पिटल्स यांप्रीत्यर्थ मोठमोठ्या रकमा खर्ची घातलेल्या आहेत...आपल्या या बोर्डाचा एक विश्वस्त या नात्यानें मला असें वाटतें कीं जर आतां बोर्डानें पुढील काम हातीं घेतलें, नियोजित कॅन्सर हॉस्पिटलच्या विकासास योग्य अशा इमारती यॉर्क ॲव्हेन्यूवर बांधून दिल्या, आणि केवळ इमारती उठविल्यानें सर्व कार्यभाग साधला असें होणार नाहीं म्हणून हें उपयुक्त कार्य सतत अप्रतिहत चालू राहण्यास अवश्य त्या खर्चाची तरतूद करून दिली, तर...याहून अधिक चांगली सेवा बोर्डास करतां येईल, असें मला वाटत नाहीं..."

रॉकफेलरच्या शिफारसींमुळें व तत्प्रीत्यर्थ त्यानें केलेल्या यत्नांस यश मिळून जनरल एज्युकेशन बोर्डानें रॉकफेलरनें पैदा केलेल्या नव्या जागेवर संकल्पित वास्तु उभी करण्यासाठीं ३० लक्ष डॉलर्सची देणगी मंजूर केली. आज या जागेंत मेमोरिअल हॉस्पिटलची नवी वास्तु उभी आहे, व तिच्या सान्निध्यांत स्लोनकेटरिंग इन्स्टिट्यूट, जेम्स एविंग हॉस्पिटल आणि स्ट्रँग कॅन्सर प्रिव्हेन्शन क्लिनिक या संस्थांच्या वास्तु याच जागेवर उभ्या आहेत. कॅन्सरचें संशोधन आणि उपचार यांबाबत कार्य करणारें एवढें मोठें कॅन्सर-केंद्र कदाचित् जगांत अन्यत्र कोठें नसेल.

१९५४ सालीं मेमोरिअल सेंटरच्या कार्यासाठीं नवी देणगी देतेवेळीं रॉकफेलरनें लिहिलें :

"पूर्वीं डॉ. एविंगच्या नेतृत्वानें कॅन्सरचें संशोधन करणारें हें एक छोटेंसें केंद्र होतें. त्याचीच परिणति भव्य मेमोरिअल सेंटरमध्यें झालेली आज दिसत आहे. कित्येक वर्षांपूर्वीं अशा एका कॅन्सर केंद्राचें स्वप्न मीं पाहिलें होतें. तें स्वप्न आज येथें साकार झालेलें दिसत आहे. कॅन्सरचें मूळ शोधण्यासाठीं आणि त्याचें समूळ उच्चाटन करण्यासाठीं ही संस्था परिणाम-कारक कार्य करूं शकेल, अशी माझी श्रद्धा आहे."

रॉकफेलरव्यतिरिक्त अनेक धनिकांनीं या संस्थेस उदार साहाय्य केलें आहे आणि कित्येक संशोधकांच्या एकनिष्ठ यत्नांचें पाठबळ या संस्थेस लाभलें आहे, ही गोष्ट तर खरीच. पण मेमोरिअल सेंटरच्या व्यवस्था समितीच्या चेरअमननें रॉकफेलरला पाठविलेल्या एका पत्रांत जी भावना व्यक्त केली होती, ती अनाठायीं होती असें कोणी म्हणणार नाहीं. त्यानें लिहिलें होतें :

"आजच्या मेमोरिअल सेंटरचे खरे निर्माते आपणच आहांत, असें आम्हांस वाटतें."

रॉकफेलरनें केलेल्या कॅन्सर-संबंधांतील यत्नांचा हा झाला संक्षिप्त अहवाल. पण याव्यतिरिक्त अनेक क्षेत्रांतील वैद्यकीय संशोधनांस व कार्यांस त्यानें मोठ-मोठ्या उदार देणग्या देऊन उपकृत केलें आहे. उदाहरणार्थ, संततिनियमनाच्या कार्यांत त्यानें लक्ष घातलें. संततिनियमन हा जसा वैद्यकीय संशोधनाचा विषय आहे, त्याचप्रमाणें त्याचे आर्थिक परिणाम अभ्यसनीय आहेत. गेलीं तीस वर्षें रॉकफेलर या कार्यांत सतत सहकार्य देत आहे. १९२४ सालीं रॉकफेलरच्या एका सहकाऱ्यानें त्याचें लक्ष या प्रश्नाकडे वेधलें. त्यानें रॉकफेलरला लिहिलें होतें :

"मला वाटतें, हा लोकसंख्येचा प्रश्न भविष्यकाळांत अत्यंत उग्र रूप धारण करणार आहे. संतति-नियमनाच्या प्रचारांत जे लोक आज मन घालीत आहेत, त्यांचें कार्य सुकर करण्यासाठीं जर आपण कांहींच करूं शकलों नाहीं, तर जें जग आपण आपल्या मुलाबाळांच्या स्वाधीन करूं, तें जग बहुतकरून अन्नास मोताद झालेलें असेल. आजवर जगांत कधीं झाले नाहींत, असे भाकरीचे लढे तेव्हां होतील आणि उपासमारीनें अनेकांचें मरण ओढवेल. जगास भेडसावणारें हें संभाव्य संकट टाळावयाचें असेल, तर मिसेस सँगर आणि तिचे सहकारी जे मार्ग सुचवीत आहेत त्या मार्गांच्या दिशेनें शास्त्रज्ञ आशेनें बघत आहेत."

मिसेस सँगरच्या वृत्तीविषयीं व कार्याविषयीं रॉकफेलरच्या मनांत खऱ्या जिव्हाळ्याचा आदरभाव होता. आणि म्हणून तिनें निर्माण केलेल्या वा तिच्या

23244 दि: 
1244 नों: दि:


आदेशानुसार कार्य करणाऱ्या 'नॅशनल कमिटी ऑन मॅटर्नल हेल्थ, अमेरिकन बर्थ कंट्रोल लीग, अमेरिकन युजेनिक्स सोसायटी, प्लान्ड पेरेंटहुड फेडरेशन' इत्यादि अनेक संस्थांस रॉकफेलरनें लहान लहान देणग्या दिलेल्या आहेत.

यापेक्षां अधिक मोठ्या प्रमाणांत न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी-बेलेव्ह्यू मेडिकल सेंटरला रॉकफेलरनें मदत दिली आहे. या संस्थेच्या विश्वस्तांपैकीं एक त्याचा मुलगा स्वतःच होता. कांहीं कांहीं वेळां तात्कालिक संशोधनासाठीं त्यानें स्वतःच्या खिशांतून देणग्या दिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, मदाम क्यूरीच्या रेडिअमसंबद्ध संशोधनासाठीं त्यानें मोठी देणगी दिलेली होती. त्यापूर्वी लॉरा स्पेलमन रॉकफेलर मेमोरिअलनें मदाम क्यूरीसाठीं एक ग्राम रेडिअम उपलब्ध व्हावा, म्हणून धनिकांस उदार साहाय्यासाठीं आवाहन केलें होतें. तेव्हां रॉकफेलरनें पाठविलेल्या पत्राची सुरुवात अशी केली होती :

"मेमोरिअलनें हें कार्य हातीं घेणें उचित आहे, असें मला वाटतें. त्याचें पहिलें कारण असें कीं मदाम क्यूरी स्त्री आहे. दुसरें असें कीं आजच्या जगांतील विद्यमान स्त्रीशास्त्रज्ञांत बहुतकरून ती अग्रगण्य आहे. आणि तिसरें कारण असें कीं कॅन्सरच्या उपचारपद्धतींत रेडिअमचा उपयोग नेमका कसा करतां येईल, त्यासंबंधीं अधिक प्रगत प्रयोग करणें यामुळें शक्य होईल. संभव असा दिसतो कीं तिच्याजवळ एक ग्राम रेडिअम असेल, तर कॅन्सरसारख्या प्राणघातक रोगांशीं मुकाबला करणें सुकर होईल..."

वरील पत्रांत चार ओळींत जे विचार रॉकफेलरनें व्यक्त केले आहेत, ते त्याच्या विशिष्ट स्वभावप्रवृत्तीचे द्योतक आहेत. "जगत्कल्याण साधू पाहणाऱ्या कल्पनांच्या शोधांत तो सदैव असे. अशा एखाद्या कल्पनेसाठीं आपला पैसा कारणीं लागला, तर त्या पैशाचें सार्थक झालें असें त्याला वाटे." या शब्दांत रॉकफेलरसंबंधीं आपला अभिप्राय त्याच्या एका सहकाऱ्यानें नमूद करून ठेविला आहे. वैद्यक-संशोधनाचें आणि विविध क्षेत्रांतील शिक्षणाचें आव्हान स्वीकारल्या-मुळें त्याच्या विपुल संपत्तीचा विनियोग सार्थकीं लागला. त्याचें मूलभूत कारण त्याच्या स्वभावांतील या प्रभावी विशेषांत सांपडण्यासारखें आहे.

रॉकफेलरच्या कर्तृत्वाचें—विशेषेंकरून दातृत्वाचें—असें एक क्षेत्र होतें कीं त्या संबंधांत त्याला आपल्या तज्ज्ञ सहकाऱ्यांचा सल्ला घेण्याची जरुरी कधींच भासली

नाहीं. पण त्यांतसुद्धां आणखी एक क्षेत्र असें आहे कीं त्याविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्याच्या प्रदीर्घ आयुष्यांत, विशेषतः वार्धक्यांत, अनेक व्यक्तींना त्यानें व्यक्तिशः मदत दिली आहे. या व्यक्ती अशा होत्या कीं ज्यांना अशा मदतीची जरुरी होती. किंवा त्यानें देऊं केलेल्या आर्थिक मदतीचें रूपांतर कांहीं उपयुक्त कर्तृत्वांत करून दाखविण्याची त्यांना उमेद होती. रॉकफेलरनें स्वतःच्या अखत्यारांत दिलेल्या या देणग्यांचा तपशील नोंदलेला नाहीं. आणि बहुतकरून अशा देणग्या ज्या देण्यांत आल्या, त्या निनांवी होत्या. त्याचा मित्रपरिवार फार मोठा होता. मैत्रीच्या विस्तृत परिघांतील कोणाकोणास त्यानें मदत दिली, त्याची नोंद उपलब्ध नसल्यामुळें कोणीं एखाद्यानें कृतज्ञतापूर्वक लिहिलेलें एखादें पत्र क्वचित् केव्हां सांपडतें, तेव्हां त्याच्या वैयक्तिक दातृत्वाची साक्ष पटते. मोठमोठ्या देणग्या त्यानें दिल्या, त्यांची व्यवस्थित नोंद अर्थातच उपलब्ध आहे. पण त्यांच्या मानानें किरकोळ भासणाऱ्या लहानसहान देणग्यांची नोंद त्यानें स्वतः कधींच ठेविली नाहीं, व इतर कोणास त्यांची माहिती नाहीं. अशा कांहीं देणग्यांचें त्याला स्मरण असलें तरी त्यांच्याविषयीं बोलण्यास तो नेहमींच नाखूष असे. ज्याची प्राप्ति प्रचंड आहे, तो धनिक समाजाचें ऋण सामाजिक हितासाठीं प्रचंड देणग्या देऊनच फेडूं शकतो, असें तो नेहमीं म्हणे. ज्याची परंपरा त्यानें पुढें अव्याहत चालू ठेविली, त्या त्याच्या पित्याचें मत पण असेंच होतें म्हणून हें जें देणें द्यावयाचें, तें किरकोळ देण्यापेक्षां घाऊक देणें अधिक चांगलें. वैयक्तिक उद्योगास देण्यापेक्षां विस्तृत सांघिक उद्योगांस आणि वैयक्तिक ध्येयास देण्यापेक्षां सार्वजनिक लोककल्याणाच्या ध्येयवादास देणें अधिक इष्ट होय.

उपर्युक्त तत्त्व रॉकफेलरनें कसें आचरणांत आणलें, त्याचा त्रोटक इतिहास कारणपरत्वें सादर केलाच आहे. व्यक्तिगत संबंधांत रॉकफेलरचें अंतःकरण मनस्वी मृदु होतें आणि त्याची स्वाभाविक प्रेरणा सहानुभूतीस अनुकूल अशी होती. त्यामुळें कोणीं कांहीं मदत मागितली कीं लगेच त्याच्या दातृत्वास तें आवाहन पुरेसें होई. विशेषतः कोणाचें संकट साक्षात् त्याच्या दृष्टीस पडलें कीं अविलंब संकटाचा परिहार करण्यास तो उत्सुक असे. वैयक्तिक सहानुभूतीनें त्यानें ज्या कोणास जें कांहीं दिलें, तें उत्स्फूर्त जिव्हाळ्यानें त्यानें दिलें. आपणांस प्रिय असलेल्या व्यक्तीच्या सुखदुःखांत आपण वांटेकरी आहोंत, अशा सहानुभवानें दिलें. मोठ्या देणग्या जाहीर करतांना हें समाधान प्रत्येक

वेळीं त्याला लाभलें असेलच असें नाहीं. वैयक्तिक संबंधांत त्यानें दिलेल्या दानांची त्यानें कधींच वाच्यता केली नाहीं. आणि या एका बाबतींत त्याच्या सहकाऱ्यांनीं त्याच्या भावनेस मान देऊन या रहस्याचें जतन केलें. रॉकफेलर एकदां म्हणाला होता :

"दान हें आरोग्यवान् आयुष्याचें रहस्य आहे. हें दान पैशाचेंच असतें असें मुळींच नाहीं. माणसाजवळ जें कांहीं संचित असतें, त्याचें दान करतां येतें. धैर्याचें, सहानुभूतीचें, सुजाणपणाचें."

* * *

REFBK-0009834